# अमरावती महानगरपालिका

# अमरावती

# लेखा परीक्षण अहवाल

# 2015-2016

उपसंचालक, महानगरपालिका लेखा लेखापरीक्षा, उपविभाग - 3, स्थानिक निधी

लेखापरीक्षा कार्यालय, औरंगाबाद

लेखा कोष भवन, तिसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालया जवळ

# <u>अस्वीकृती प्रमाणपत्र</u>

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे अमरावती महानगरपालिका यांनी 2015-2016 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

**अमरावती शहर महानगरपालिका अमरावती सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल**

जा.क्र.स्था:- १८/ब/लेखापरीक्षण अहवाल/२०१५-१६/१५२ दिनांक :- १६/०६/२०२१

उपसंचालक (मनपालेप),

स्थानिक निधी लेखापरीक्षा औरंगाबाद

उपविभाग क्र.३ यांचे कार्यालय,तिसरा

मजला,लेखा कोष भवन,फाजीलपुरा

औरंगाबाद.

प्रति,

मा.आयुक्त,

अमरावती शहर महानगरपालिका,अमरावती

अमरावती शहर महानगरपालिका, अमरावती सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण श्रीमती एस. एस.सुंकवाड, सहायक संचालक यांच्या पथकाने दिनांक ०३/१२/२०१९ ते ३१/१२/२०२० या कालवधीत पूर्ण केले व श्रीमती वंदना हरिहरराव जोशी, उपसंचालक (मनपालेप), स्थानिक निधी लेखापरीक्षा,औरंगाबाद उपविभाग-३ यांनी दिनांक ०९.०६.२०२१ रोजी अंतिमीकरण केले.

लेखापरीक्षण कालावधीत खालील पदाधिकारी व अधिकारी कार्यरत होते.

| अ.क्र. | नाव | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| १. | सौ. चरणजित कौर नंदा | महापौर | १/०४/२०१५ ते ३१/०३/२०१६ |
| २ | श्री. अरुण डोंगरे | आयुक्त | १/०४/२०१५ ते ०९/०४/२०१५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्री. चंद्रकांत गुडेवार | आयुक्त | १४/०४/२०१५ ते ३१/०३/२०१६ |

लेखापरीक्षणात आढळलेल्या महत्वाच्या अनियमितता खालीलप्रमाणे आहेत.

13 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने व वित्त शासन निर्णय क्र. स्थानिले-2010/प्र. क्र.26 ब/ विमा प्रशासन मंत्रालय मुंबई दि 31/03/2011 नुसार राज्यातील महानगरपालिकेचे लेखापरीक्षण, संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य यांनी मा. नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे मार्गदर्शन व पर्यवेक्षणाखाली करावयाचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी सन २०१४-२०१५ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण पूर्ण करून अहवाल निर्गमित करण्यात आलेले आहे.

अमरावती शहर महानगरपालिका, अमरावती ही स्थानिक स्वराज्य संस्था सन १९८३ पासून अस्तित्वात आलेले असून महानगरपालिकेचा दर्जा "ड" वर्ग आहे. महानगरपालिकेचे कार्यक्षेत्र हे एकूण 04 प्रभागात विभागलेले असून एकूण ९२ नगरसेवक आहेत. २०१५-२०१६ या वित्तिय वर्षाच्या लेखापरिक्षणाच्या सखोल तपासणीकरिता माहे जानेवारी-१६ हा निवडक महिना व नियमित मार्च-२०१६ असे दोन महिने घेण्यात आले आहे. लेखापरीक्षणाच्या अखेरच्या दिवसापर्यंत पथकाने एकूण 211 अर्धसमास ज्ञापन निर्गमित करण्यात आली असून त्यापैकी एकूण ७३ अर्धसमास ज्ञापनाची उत्तरे लेखापरीक्षणास सादर करण्यात आली आहेत. सदर अर्धसमास ज्ञापनास वेळीचं उत्तरे सादर करुन लेखापरीक्षणास सहकार्य करण्यास महानगरपालिकेच्या स्वच्छता विभाग,पाणीपुरवठा विभाग,वाहन/यांत्रिकी विभागाची तसेच एन.यु.एल.एम. योजनेचे अभिलेखे सादर करण्याकरिता मोठया प्रमाणावर उदासिनता दाखविलेली आहे. अभिलेखे उपलब्ध करुन देणेस समक्ष वारंवार भेटुन, अर्धसमास पत्रे देवुनही उपलब्ध करून दिलेली नसल्याने सदर विभागाचे सखोल लेखापरीक्षण करता आलेले नाही. महानगरपालिकेने शासकीय योजनेचे रोख पुस्तक ठेवले नसल्यामुळे सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाचे सखोल लेखापरीक्षण करता आलेले नाही. लेखा विभागाने उपलब्ध करून दिलेल्या प्रमाणके व रोखपुस्तकाच्या आधारे सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करून लेखापरीक्षण अहवालात एकूण १५९ आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. त्याबाबतच्या निवडक आक्षेपांचा सारांश खालील प्रमाणे आहे.

१. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.लेखासं-10/2004/71/प्र.क्र.5/04/नवि-31,दिनांक 6.7.2005 नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखे दुहेरी नोंद पध्दतीने (Accrual Based Double Entry Accounting System) ठेवण्याबाबत सुधारणात्मक बाब म्हणून आदेशीत केले आहे.  तथापि, महानगरपालिका, अमरावती येथे दुहेरी नोंद पध्दनतीने लेखे ठेवण्यात आले नाही.

२.सन 2015-16 या आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या अनामत रकमेच्या नोंदी ठेव स्वरुपात ठेकेदार पुरवठादार यांचेकडून ठेवी या सदराखाली किती रकमा प्राप्त झाल्या किती रक्कमा मागणीदारास प्रदान केल्या वर्षा अखेरीस किती रकमा शिल्लक राहिल्या या बाबत शिल्लक रकमेचा गोषवारा नोंदवही अभावी घेता आला नाही. तसेच तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीच्या रक्कम व्यपगत करून महसुली लेखा लेखा शिर्शाखाली जमा करण्यात आल्या किंवा कसे या बाबतची खात्री करता आली नाही.

३.अधिकारी /कर्मचारी यांचेकडे अध्याप पावेतो अग्रीमाची एकूण रक्कम वसूल झालेली नसून लेख्या बाहेर राहिलेली आहे. सामायोजना अभावी सदरच्या अग्रिम रकमांचा खर्च त्याच प्रयोजनासाठी झाला आहे असे म्हणता येणार नाही.आर्थिक वर्षाअखेर रुपये 30,26,185/- इतक्या रकमेचे समायोजन झाले नाही.

४. अमरावती महानगरपालिकेने मनपा व शासकीय योजनांसाठी एकच रोखनोंदवही ठेवली असून प्रत्येक निधीची स्वतंत्र बँक पासबुक ठेवले आहे, दिनांक 31/03/2016 अखेर वर्षाअखेरीस नोंदवहीची व बँक पासबुक खाते पुस्तकातील शिल्लक रकमांचा ताळमेळ घेतलेला नाही. रोख नोंदवही व पासबुकातील तफावत यात रुपये 131.98.कोटी ची तफावत आहे. रोखवहीपेक्षा बँकपासबुकातील शिल्लक कमी असल्याने रोखनोंदवही मध्ये खर्च न नोंदवता परस्पर खर्च टाकला असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

५. महानगरपालिकेने ताळमेळ न घेण्याचे कारण दिले नाही. त्यामुळे काही गंभीर उणीवा असल्यास त्यावर भाष्य करता येत नाही.

६. महानगरपालिकेने वेळोवेळी विविध योजनांचा निधी, 13 वा वित्त आयोग.14,वित्त आयोगाचा निधी वर्ग करून मनपा फंडात जमा केला आहे. तसेच रस्ते दुरुस्तीची निधी अतिवृष्टी मध्ये वर्ग केला आहे.महानगरपालिकेस प्राप्त झालेला योजनेचा निधी त्याच बाबीवर खर्च करणे आवश्यक आहे. मनपाने सर्व योजनासाठी एकच रोख नोंदवही ठेवली आहे. वेळोवेळी योजनेचा निधी मनपा फंडात वर्ग केला आहे, तसेच वर्गीकरण नोंदवही ठेवली नसल्याने .मनापास प्राप्त झालेला निधी त्याच बाबीवर खर्च केल्या असल्या बाबत खात्री करता आली नाही.

७. कर्मचारी अंशदायी भविष्य निर्वाह निधी बाबत अमरावती मनपाने विभागाने सादर केलेल्या तपशिलानुसार सन 2007-2008 ते 2015-2016 अखेर एकूण कपात रुपये 7,71,12,886/- कपात केली असून त्यापैकी फक्त रुपये 2,43,19,476/- इतकी बँक खाती जमा करण्यात आली आहे. व रक्कम रुपये 5,27,94,310 /- कपात करून देखील भरणा केली नाही.

८. महानगरपालिका लेखासंहिता 2011 चे परिशिष्ठ 5 चे नियम 466 (5) ग नुसार नमुना नंबर 98 मध्ये LEDJER ठेवण्यात आले नाही प्राप्त माहितीनुसार महानगरपालिकेकडे अंशदायी निवृत्ती वेतनाचे एकूण 639 कर्मचारी असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र महानगरपालिका लेखासंहिता 2011 चे नियम 466 (5) प्रमाणे आर्थिक वर्ष

संपल्यावर शक्य तितक्या लवकर वर्गणीदारास, त्याच्या खाती किती रक्कम जमा झाली व या बाबतचे विवरण पत्र, ते अचूक असल्याबाबत कर्मचा-याची पोहोच घेणे आवश्यक आहे.  तथापि अशी कार्यवाही केली जात नाही.

९. अमरावती मनपाने रकमा प्रदान करतना, देयकातून ठेकेदारास  फक्त निव्वळ रकम अदा केली जाते शासकीय कपात केलेल्या रकमा विलंबाने भरणा केल्या आहेत. कपातीचे भरणा केलेले देयके पाहता, कोणत्या देयकातील कपातीच्या रकमा आहेत, हे कपातीच्या भरणा केलेल्या देयकामध्ये तपशील दिला नसल्याने सर्व कपातीच्या रकमा भरणा केल्या असल्याची खात्री करता आली नाही.

१०. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 129 व सन 2010 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ चा कलम १३(ख) व्दारे दर पाच वर्षांनी सुधारित मालमत्ता कर आकारणी करून नवीन कर आकारणी पुस्तक तयार केले पाहिजे. परंतु महानगरपालिका अमरावती यांनी सन 2005-2006 नंतर मनपा हद्दीत नव्याने तयार झालेल्या मालमत्तांवर, मालमत्ता कराची सुधारित कर आकारणी केलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणत आर्थिक नुकसान होत असल्याचे दिसून येत आहे

११. अमरावती महानगरपालिका लेखा विभागाने शासकीय योजनेनिहाय स्वतंत्र रोखपुस्तक ठेवणे आवश्यक असतांना सन २०१५-२०१६ मध्ये शासकीय योजनेचे योजनेनिहाय स्वतंत्र रोखपुस्तक ठेवण्यात आले नाही.

& लेखा विभागाने १४ वित्त आयोगाचा निधी १४ वित्त आयोग मार्गदर्शक सूचना शासन निर्णय दिनांक ०३.०८.२०१५ मध्ये नमूद बाबीवर खर्च करणे आपेक्षित असतांना लेखा विभागाने बांधकामाविषयक कामे अथवा शासन कपातीचे रक्कम रु ३११११४६१/- ची देयके १४ वित्त आयोग निधीतून नियमबाह्य खर्च केलेला आहे.

१२. महाराष्ट्र शासन,नगरविकास विभागाचे अधिसूचना दिनांक २३ जानेवारी २०१३ अन्वये प्रसिद्धी केलेली महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता, २०११ अथवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९३ नुसार स्थायी समितीने विहित केलेल्या नमुन्यात लेखे ठेवणे आवश्यक असतांना, अमरावती महानगरपालिका कालबाह्य झालेली महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता, १९७१ प्रमाणे लेखे ठेवलेले आहेत.

१३.  मनपाने २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात आज्ञावलीत दर्शविण्यात आलेल्या मागणी नुसार एकूण मालमत्ता कराची मागणी निर्धारित करून त्यानुसार कर वसूल करण्यात येत आहे. त्यामुळे सन २०१५-२०१६ पासून आज्ञावलीत वसूल केलेल्या रक्कमेची अचूक नोंदी घेणे आवश्यक असतांना, वसुली लिपिकांनी प्रत्येक्ष पावती व्दारे वसूल केलेल्या रक्कमा, आज्ञावलीत अचूक नोंदवित नसल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होत असल्याचे दिसून येत आहे.

१४. अमरावती महानगरपालिकेत हस्तांतरण शुल्क हे मालमत्तेच्या बाजारमूल्याच्या ०.५% वसूल केला जातो. परंतु निवासी,अनिवासी,औद्योगिक असे प्रयोजनात विभागणी करण्यात आलेली नाही. तसेच मालमत्ता हस्तांतरण प्रकरणात विलंब कालावधी नुसार विलंब शुल्क वसूल करणे आवश्यक असतांना, महानगरपालिका सरसकट फक्त रक्कम रु ५०/- विलंब शुल्क वसूल करीत आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

१५. अमरावती महानगरपालिका स्थानिक संस्था कर विभागाने वसुलीबाबत योग्य नियोजन करून वसुली कार्यवाही केली नसल्यामुळे स्थानिक संस्था कराचे उत्पन्न कमी झाले. त्यामुळे स्थानिक संस्था कर बंद झाल्यानंतर राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आलेले सहाय्यक अनुदान देखील अत्यल्प आहे. परिणामी अमरावती महानगरपालिकेचे स्थानिक संस्था कर विभागाच्या वसुलीबाबत असलेल्या उदासीनतेमुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे.

१६. अमरावती महानगरपालिकेने शहरातील कोणत्याही अवैध बांधकाम इमारतीवर अनाधिकृत/ अवैध बांधकाम शास्ती आकारणी व वसुली केलेली नाही. तरी प्रभागनिहाय शहरातील इमारतीचे सर्वेक्षण करण्यात येऊन अवैध बांधकामास शास्ती आकारणी करून मालमत्ता करासोबत अनाधिकृत/ अवैध बांधकाम शास्ती वसूल करणे आवश्यक आहे.

१७. बडनेरा प्रभागाच्या विवाह निबंधकाने मुलीचे वय १८ वर्षापेक्षा कमी असतांना काही प्रकरणात त्यांच्या विवाहाची नोंदणी करून त्यांना कायदाबाह्य विवाह नोंदणी प्रमाणपत्र निर्गमित केले आहे. बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ मधील कलम ११ नुसार २ वर्ष कठोर कारावास अथवा एक लाख रुपये दंड अथवा दोन्ही तरतुदी नमूद आहेत. तरी विवाह निबंधकावर व संबंधित लिपिकावर कायदेशीर कार्यवाही होणे आवश्यक आहे.

१८. राज्य शासनाच्या मंजुरीशिवाय मनपा अमरावतीचे पदाधिकारी महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती व विरोधी पक्षनेता यांच्या खाजगी सचिवांना सन २०१५-२०१६ मध्ये प्रदान करण्यात आलेले मानधन रक्कम लेखापरीक्षणास मान्य नसून वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

१९. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १९ अ (२) नुसार महानगरपालिकेने राज्य शासन वेळोवेळी आदेशाव्दारे निर्धारित करतील एवढी रक्कम दरवर्षी अतिथी भत्ता म्हणून मा.महापौरांकडे सुपूर्द करणे आवश्यक असतांना,सन २०१५-२०१६ मध्ये मनपाने मा. महापौरांना राज्य शासनाची मंजुरी घेऊन ठराविक रक्कम निर्धारित न करता सन २०१५-२०१६ मध्ये महापौर कार्यालयात वर्षभरात झालेल्या अतिथी चहा-पाणी व नाष्टावरील खर्च हा अतिथी खर्च या लेखाशीर्षावर (लेखाशीर्ष क्रमांक ९१ वर) खर्ची दर्शविण्यात आला आहे.

२०. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १९ अ (१) नुसार राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, महानगरपालिकेस या कलमान्वये महानगरपालिकने केलेल्या नियमाव्दारे विहित करण्यात येईल असे, असे भत्ते

प्रत्येक पालिका सदस्याला देता येतील, असे नमूद आहे. तसेच महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वाहन १००७/प्र.क्र.४८/२००७ विनियम दिनांक ३१/१२/२००७ नुसार शासकीय कामकाजासाठी खाजगी वाहन वापराची योजना बंद करण्यात आली आहे. तरी देखील अमरावती महानगरपालिकेने सन २०१५-२०१६ मध्ये मनपा पदाधिकाऱ्यांना वैकल्पिक वाहन भत्तावर २५,७१,१५१/- खर्च केले आहे

२१. महिला व बालकल्याण विभागाने शहरातील महिला व मुलीकरिता विविध मोफत प्रशिक्षण व लाभाच्या योजनेचे आयोजन करत असते, परंतु विभागाने लाभार्थ्यांचे मास्टर नोंदवही ठेवले नसल्यामुळे एकाच लाभार्थ्यास दुबार लाभ प्राप्त होऊ शकतो.

२२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५३,२०५,२०३(१) अन्वये रस्ते व नाली संबंधी बांधकाम विषय कामांना प्रशासकीय मंजुरी देण्याकरिता महानगरपालिकेने मा.आयुक्तांना प्राधिकृत केल्याबाबतचा ठराव लेखापरीक्षणास उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे सन २०१५-२०१६ मध्ये मा.आयुक्तांनी रस्ते व नाली संबंधी बांधकाम विषयक कामांना दिलेली प्रशासकीय मंजुरी लेखापरीक्षणास मान्य करता येणार नाही.

२३. बांधकाम विभागाच्या लेखापरीक्षणात आढळून आलेल्या सर्वसाधारण अनियमितता खालील प्रमाणे आहे.

१ काही कामात कामाकरिता वापरण्यात आलेल्या स्वामित्व धनावर गौण खनिज शुल्क कमी प्रमाणात कपात करण्यात आले आहे.

२ काही कामात दोष निवारण कालावधी नमूद असलेला बी-१ करारनाम्यातील क्लॉज क्रमांक २० करिता शहर अभियंता व कंत्राटदार यांचे स्वाक्षरी जरुरी असतांना दोन्ही पक्षकारांच्या स्वाक्षरी नसल्यामुळे बी-१ करारनाम्यातील सर्व अटी कंत्राटदाराला मान्य असल्याची खात्री करता आलेली नाही.

३ काही कामात कामाच्या मुद्रांक शुल्काच्या करारनाम्यावर मा.आयुक्त अथवा मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी आढळून आलेली नाही.

४ डांबर रोड कामात, कामावर डांबर वापरण्यापूर्वी डांबराच्या प्रतीची तपासणी केल्याबाबत मोजमाप पुस्तकेत नोंद घेण्यात आलेली नाही.

५ डांबर खरेदी ही सरकारी तेल कंपन्याच्या रिफाईनरी मधून केले असल्याबाबत देयके कामाच्या नस्तीत उपलब्ध नाही.

६ काही कामात कमी मुद्रांक शुल्क कपात करण्यात आला आहे.

७ काही कामाच्या बाबतीत कामाचा मूळ अंदाजपत्रकातील उद्देश व प्रत्येक्षात झालेले काम यात मोठ्या प्रमाणात बदल दिसून येत असतांना देखील मनपाने महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम २६७ नुसार कार्यवाही करणे आवश्यक असतांना,कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही.

२४. महानगरपालिका स्वच्छता विभागामार्फत शहरातील विविध भागातील दैनिक साफ-सफाई बाबत कंत्राट विविध कंत्राटदाराला दिलेले आहे. त्यापैकी काही कंत्राटदाराचे निवडक देयकांच्या तपासणीत केली असता खालील अनियमितता निदर्शनास आलेली आहे.

१ कामगार कामावर गैरहजर कालावधीचे करारनामा अट क्रमांक १५ नुसार दंडात्मक रक्कम देयकातून कपात करण्यात आलेली नाही.

२ करारनाम्यातील अट क्रमांक ५६ प्रमाणे ज्या दिवशी एकही कामगार कामावर उपस्थित राहणार नाही.त्या दिवशी गैरहजर कामगार कपाती व्यतिरिक्त रु ५०००/- प्रतिदिवस अतिरिक्त दंड आकारण्याची तरतूद असतांना देयकातून अतिरिक्त दंडाची रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.

३ करारनाम्यातील अट क्रमांक १५ नुसार कंत्राटदाराने कामगाराचे ई.पी.एफ. भरल्याची पावती, ई.एस.आय.सी.प्रत्येक महिन्यात नियमितपणे द्यावीच लागेल व भरल्याची चालन नियमित प्रतिमाह सादर करावी लागेल.त्याशिवाय देयक अदा करण्यात येणारा नाही. अशी अट नमूद असतांना लेखा विभागाने अटीचे काटेकोर पालन न करता देयके पारित केलेले आहे.

४ करारनाम्यातील अट क्रमांक ५१ नुसार कंत्राटदाराला कामगाराचे महावारी वेतन हे राष्ट्रीयकृत बँकेत अदा करावे लागेल.कामगाराच्या बँक खात्यात वेतन अदा झाल्याचा पुरावा जोडल्यानंतरच महानगरपालिका अमरावती तर्फे पुढील देयक अदा करण्यात येईल. अशी अट नमूद असतांना लेखा विभागाने अटीचे काटेकोर पालन न करता देयके पारित केलेले आहे.

२५. माहे ऑगस्ट-२०१४ व त्या पूर्वीच्या दैनिक साफसफाई कामाच्या देयकाबाबतीत, मा.उपायुक्त यांचे कार्यारंभ आदेशात दैनिक साफ-सफाईच्या कामाची मुदत जास्तीत जास्त दिनांक ३१/०८/२०१४ पर्यंत स्थायी समितीचे ठराव क्रमांक ११९ दिनांक ३१/०८/२०१३ अन्वये देण्यात येत असल्याचे नमूद आहे. निवडक देयकांच्या तपासणीत प्रभाग क्रमांक ८ जमील कॉलनी मध्ये कंत्राटदार सागर नागरी सेवा.सह.संस्था,व प्रभाग क्रमांक ७ नवसारी मध्ये साई वैभव कंन्स्ट्रक्शन अमरावती, यांना माहे सप्टेंबर-२०१४ व ऑक्टोबर-२०१४ मध्ये मनपाचे कोणतेही आदेश प्राप्त न करता दैनिक साफ-सफाई कामे करून देयके मंजूर करून घेतल्याचे दिसत आहे. तरी मनपाचे आदेशाशिवाय केलेल्या कामाचे देयक लेखापरीक्षणास मान्य नसून प्रदानाची संपूर्ण रक्कम वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

२६. कचरा वाहतुकीचा कंत्राट मे.पूजा कन्स्ट्क्शन वर्धा यांना देण्यात आलेल्या कामाबाबत

a सन २००८ मध्ये करण्यात आलेला करारनाम्याची मुदत सन २०१३ मध्ये संपुष्ठात आली असतांना देखील, नव्याने ई-निविदा पद्धतीचा अवलंब करून कचरा वाहतूक कंत्राट देणे आपेक्षित असतांना महानगरपालिकेने सन २०१५-२०१६ मध्ये नवीन करारनामा न करता मे.पूजा कन्स्ट्क्शन वर्धा यांना कचरा वाहतुकीचा कंत्राट देण्यात आले आहे.

b मे.पूजा कन्स्ट्क्शन वर्धा यांना कचरा वाहतुकीचा मोबदला करारनाम्यातील अटीनुसार कचराच्या आकारमानानुसार करणे आवश्यक असतांना,मनपाने कंन्टेनर/ट्रक यांच्या फेऱ्यानुसार रक्कमा अदा करण्यात आले आहे.

c कंत्राटदाराने कचरा वाहतूक कामासाठी वापरण्यात येण्याऱ्या वाहनाचे आर.सी.बुक तसेच २०१५-२०१६ करिता वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र, वाहनाचे विमा उतरविला असल्याबाबतचे विमा प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे प्रत्येक्षात कामावर किती वाहनांचा वापर केला जात होता हे समजणे शक्य झाले नाही.

d कामावर काम करणाऱ्या कामगारांचे वेतन, ईपीएफ, याबाबत कोणतीही माहिती सादर केली नसल्यामुळे प्रत्येक्षात कामावर किती व्यक्ती/कामगार काम करीत होते हे समजणे शक्य झाले नाही.

२७. मनपाने सन २०१५-२०१६ मध्ये १३ व १४ वित्त आयोगातून ९० ॲपे खरेदी करून त्यावर हायड्रोलिक हॉपर बसविणे कामाबाबत

a महानगरपालिकेने ॲपे खरेदीबाबत ई-निविदा प्रक्रिया राबविले नाही. त्यामुळे साई ऑटो एजन्सीज अमरावती यांच्याकडून खरेदी करण्यात आलेले ॲपे खरेदी खर्च लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

शहरातील कचरा गोळा करणे व वाहतूक करणे बाबत महानगरपालिका विविध बचत गट, बेरोजगार संस्था,पूजा कन्स्ट्क्शन यांच्या सारख्या संस्थाना काम देण्यात आले असतांना, शहरातील स्वच्छतेची जबाबदारी त्रेयस्थ संस्थेकडून करून घेत येत असतांना पुन्हा कचरा वाहतुकीसाठी ॲपे खरेदीची महानगरपालिकेला का गरज आहे. याबाबत नस्तीत कोठेही उल्लेख नसल्यामुळे ॲपे खरेदीवर अनावश्यक खर्च केले गेला आहे.

b हायड्रोलिक हॉपर ऑटो खरेदी करण्यापूर्वी त्यांच्या वापराबाबत महानगरपालिकेने नियोजन निश्चित केलेले नाही, जसे वाहन चालकांची उपलब्धता,वाहन पार्किंगची उपलब्धता, प्रभागनिहाय वाहनांची गरज, कचरा उचलणारे कंत्राटदार व वाहतूक कंत्राटदारासोबत कामाचे ताळमेळबाबत अटी

c खरेदी करण्यात आलेल्या हायड्रोलिक हॉपर ऑटो वाहनाचा विमा काढून त्याचे रजिस्टेशन अमरावती येथील प्रादेशिक परिवहन विभागाकडून उपायुक्त, मनपा अमरावती यांचे नावे रजिस्ट्रेशन करून देणे बंधनकारक

असतांना, नस्तीत खरेदी करण्यात आलेल्या वाहनाचे विमा प्रमाणपत्र, आरटीओ नोंदणी प्रमाणपत्र उपलब्ध नाहीत.त्यामुळे किती हायड्रोलिक हॉपर ऑटो करण्यात आले आहे यावर शंका निर्माण झालेली आहे.

d खरेदी करण्यात आलेल्या हायड्रोलिक हॉपर ऑटो वाहनाचे लॉग बुक लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही.

e हायड्रोलिक हॉपर ऑटो खरेदी देयकावर तसेच हायड्रोलिक हॉपर बसविण्याच्या देयकावर कोणत्याही प्रकारची शासकीय कपाती जसे आयकर,सुरक्षा ठेव कपात करण्यात आले नाही.

उपरोक्त सर्व अनियमिततेमुळे ९० ॲपे खरेदी करून त्यावर हायड्रोलिक हॉपर बसविण्यावर करण्यात आलेला खर्च लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

२८. बाजार व परवाना विभागा मार्फत देण्यात आलेल्या सांस्कृतिक भवन कंत्राटबाबत

कंत्राटदाराने सांस्कृतिक भवनात नवीन व दुरुस्तीचे काम केल्याबाबत शहर अभियंत यांच्याकडून झालेल्या कामाच्या मुल्यांकन करून घेण्यात आले नाही, अंदाजपत्रकानुसार काम पूर्ण केल्याबाबत पूर्णत्वाचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले नाही, तसेच कामाच्या गुणवत्तेबाबत साहित्य तपासणी प्रयोगशाळा अहवाल नस्तीत उपलब्ध नसल्यामुळे सन २०१५-२०१६ मध्ये भाड्यात देण्यात आलेली सूट रक्कम रु २६३४७८/- लेखापरीक्षणास मंजूर नसून वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

२९. "ड" वर्ग महानगरपालिके करिता लागू करण्यात आलेल्या विकास नियंत्रण नियमावली मधील परिशिष्ठ "सी" मध्ये नमूद केल्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या पात्रतेनुसार अनुज्ञेय श्रेणीचा परवाना महानगरपालिकेने निर्गमित करणे आवश्यक असतांना, महानगरपालिकेने फक्त वास्तूशास्त्रज्ञ/अभियंता,पर्यवेक्षक या दोनच श्रेणीचे परवाने निर्गमित केलेले आहेत.

३०. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३७३ नुसार आयुक्तास, स्थायी समितीच्या मान्यतेने लायसन्सदार, वास्तूशास्त्रज्ञ किंवा अभियंते, संरचना संकल्पचित्रकार, बांधकाम लिपिक यांच्या मार्गदर्शनासाठी वेळोवेळी आदेश काढता येते, परंतु महानगरपालिकेने सन २०१५-२०१६ मध्ये उपरोक्त परवानाधारकांकरिता कोणतीही मार्गदर्शक सूचना/ आदेश निर्गमित केलेले नाही.

# अनुक्रमणिका

विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण ....1

**I PART I :मागील लेखा परीक्षण अहवाल ....3**

अमरावती महानगरपालिका....3

**PART II ....14**

अमरावती महानगरपालिका....14

**कलम ९ अ खालील आक्षेप....15**

1 मनपा अमरावती आर्थिक वर्ष 2015-2016 चा अर्थसंकल्प जमा खर्च आर्थिक स्थिती वरील अभिप्राय 16

2 मनपाचे लेखे दुहेरी नोंद पद्धतीने न ठेवणेबाबत....20

3 लेखा विभागाने बांधकामाविषयीचे देयक १४ वित्त आयोगातून प्रदान केल्याबाबत....22

4 अंतर्गत लेखापरीक्षण व प्रलंबित परिच्छेदाबाबत. ....27

5 अपंग कल्याण निधी अंतर्गत खर्चातील अनियमितताबाबत....28

6 बडनेरा प्रभागात विवाह नोंदणी प्रकरणात झालेली अनियमितता....30

7 प्रभाग क्रमांक १ रामपुरी कॅम्प येथील विवाह नोंदणी प्रमाणपत्र व मालमत्ता हस्तांतरण प्रकरणात आढळून आलेल्या अनियमितता ....31

8 स्थानिक संस्था कर सहाय्यक अनुदान अल्प प्रमाणात मंजूर झाल्याबाबत....33

9 माहिती व जनसंपर्क विभागामार्फत वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येत असलेले जाहिरातीबाबत....34

10 परवाना फी च्या वसुलीत मासिक विलंब शुल्क वसूल न केल्याबाबत....37

11 अंबादेवी नवरात्र उत्सवा दरम्यान महानगरपालिकेस प्राप्त होणारे उत्पन्नाबाबत ....39

12 गांधी चौक वाहनतळ पार्किंगची जागा एकविरा देवी संस्थानाला भाडे तत्वावर देणे बाबत ....41

13 संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन भाडेतत्वावर दिलेल्या कंत्राट नस्तीतील अनियमिततेबाबत....43

14 महानगरपालिकेने मा.महापौरांना देण्यात येणाऱ्या अतिथी खर्चा करता ठराविक रक्कम निर्धारित न केल्याबाबत ....48

15 प्रभाग क्र १९ मध्ये आर.सी.सी.रोड व पेव्हिंग ब्लॉक बसविणे कामाबाबत....50

16 प्रभाग क्र २७ पठाणपुरा वझीर पटेल लायब्ररी ते सलीमभाई टॅकरवाले पर्यंत पूल बांधणे कामाबाबत 51

17 प्रभाग क्रमांक ७ मध्ये टॉवर लाईन रोड च्या उजव्या बाजूस सिमेंट रोड बांधकाम करणे कामाबाबत 53
18 विलासनगर येथील दलित वस्तीमध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविणे कामाबाबत....55
19 मालमत्ता कर वसुली व थकबाकीबाबत. ....57
20 शालेय पोषण आहार प्रदानातील अनियमितताबाबत....58
21 झेरॉक्स मशीन खरेदीतील अनियमितताबाबत....60
22 चहा पाणी व नास्ता खर्चातील अनियमितताबाबत....62

**कलम ९ ब खालील आक्षेप....64**

23 अमरावती मनपाने नियुक्त केलेल्या विधीज्ञांना अदा केलेल्या देयकातून आयकराची रक्कम वसूल न केले बाबत. ....65
24 अमरावती महानगरपालीकेच्या अग्नीशमन विभागातील अग्नीशमन बळकटीकरण योजनेवरील खर्च प्रमाणकातील अनियमीतता बाबत.....66
25 अमरावती मनपाच्या हद्दीतधील मोठया निवासी इमारतीवर शासकीय कराची वसूली करताना प्रभाग ५ मध्ये झालेली अनियमिततेबाबत. ....69
26 अमरावती महानगरपालीकेच्या अतीक्रमण विभागाकडील समायोजन देयक नोंदवहीतील, जप्ती नोंदवहीतील व कुली , वाहन चालक यांचे हजेरीपटातील अनियमीतता बाबत.....70
27 विवाह नोंदणी फी व दंडाची रक्कम शासनखाती जमा न केल्याबाबत ....71
28 अग्रीम रकमेचे समायोजन केले नसल्यामुळे रक्कमा लेख्याबाहेर राहिल्या बाबत....72
29 सन्मा. पदाधिकारी यांना देण्यात येत असलेल्या वैयक्तिक मोबाईल रिचार्ज खर्चाबाबत....75
30 महानगरपालिकेने सन्मा.पदाधिकारी यांचे खाजगी सचिवाना प्रदान केलेल्या मानधनाबाबत ....76
31 महानगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांना देण्यात येत असलेल्या वैकल्पिक वाहन भत्ताबाबत ....77
32 स्थानिक संस्था कर विभागाच्या लेखापरीक्षणात आढळून आलेल्या अनियमिततेबाबत ....78
33 रात्र निवारा केंद्र (बडनेरा) संचलन व देखभाल खर्चाबाबत....84
34 मनपा अमरावती क्षेत्रा अंतर्गत मोकाट जनावरे पकडण्याकरिता केलेल्या खर्चाबाबत. ....86
35 सन २०१५-२०१६ च्या वृक्ष प्राधिकरण निधीच्या लेखापरीक्षणातील अनियमितताबाबत....88
36 मे.ए.बी.एम.नॉलेजवेअर लि.मुंबई व डी.एस.एस.वर्ड प्रा.लि. यांच्या देयकावर कमी आयकर कपात केल्याबाबत....91

37 फायरवॉल युटीएम हार्डवेअर खरेदीबाबत.....92
38 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कार्यवाहीच्या अनुषंगाने स्वच्छता विभागाकरिता ४० नग ॲपे (ऑटो) खरेदी व त्यावर हायड्रोलिक हॉपर बसविणे बाबत.....93
39 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कार्यवाहीच्या अनुषंगाने स्वच्छता विभागाकरिता ५० नग ॲपे (ऑटो) खरेदी व त्यावर हायड्रोलिक हॉपर बसविणे बाबत.....98
40 कचरा वाहतूकीकरिता देण्यात आलेल्या कंत्राटबाबत.....103
41 लेखा विभागाने कामाचा आदेश नसतांना दैनिक साफ सफाईचे देयके पारित केल्याबाबत.....105
42 अमरावती महानगरपालिकेने नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० चे प्रभावी अंमलबजावणी न करणेबाबत.....106
43 तथागत महिला बचत गट अमरावती यांना देण्यात आलेल्या दैनिक साफसफाई च्या देयकाबाबत 109
44 श्री. जगदंबा स्वंय रोजगार नागरिक सेवा सहकारी संस्था अमरावती यांना देण्यात आलेल्या दैनिक साफसफाई च्या देयकाबाबत.....111
45 श्री. विजय गंगन यांना देण्यात आलेल्या हॉटेल वेस्ट गोळा करण्याच्या कंत्राटबाबत.....114
46 संस्कृती महिला बचत गट यांना देण्यात आलेल्या दैनिक साफसफाई च्या देयकाबाबत.....116
47 कमी परवाना शुल्क वसूल केल्याबाबत.....118
48 करवसुली पावतीपुस्तकाद्वारे केलेल्या करवसुलीतील अनियमितता बाबत.....121
49 सर्वसाधारण पावतीपुस्तकांद्वारे करण्यात आलेल्या वसुलीतील अनियमितताबाबत.....122
50 चिल्लर वसुली कंत्राटबाबत.....124
51 मनपा अमरावती विद्युत विभागाने सन 2015-2016 या आर्थिक वर्षामध्ये वीज वितरण कंपनीची देयके अदा करताना वीज शुल्कासह अदा केल्यामुळे झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत......125
52 प्रभाग क्रमांक १६ मध्ये उर्जा बचतीचे दिवे (ENERGY EFFICIENT FITTING) लावून प्रकाश व्यवस्था करणे 132
53 आरोग्य विभागाकडील टँकर क्र.एम.एच. 27 - 5120 साठी होसपाईप खरेदी बाबत.....133
54 भांडार विभागाने खरेदी केलेल्या साहित्याच्या देयकातून आयकर कपात न केलेबाबत......134
55 अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील हातपंप दुरुस्तीचे कामातील अनियमितता बाबत......140
56 जाहिरातीवरील करवसुलीचे काम कंत्राट त्वावर दिल्याने.विहित मुदतीत कराची रक्कम मनापासप्राप्त होत नसल्याने त्यावर आकारण्यात येणाऱ्या नुकसानी बाबत......141

57 प्र.क्र २२ शारदा नगर मधील खुल्या जागेवर प्रेक्षागृह बांधकाम करणे कामाबाबत ........................144
58 प्रभाग क्रमांक २ बायपास ते महापौर बंगला पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामाबाबत...............147
59 प्रभाग क्रमांक ३६ महादेव खोरी ते गजानन नगर ते प्रिया कॉलनी रस्ता खडीकरण व डांबरीकरण कामाबाबत........................................................................................................149
60 सन २०१५-२०१६ मध्ये राजापेठ उड्डाणपुलाच्या बांधकाम खर्चाबाबत (आर.ओ.बी.).................151
61 प्र.क्र.२२ मध्ये रवी नगर चौक ते नाला डॉ.घोटल यांच्या घरापर्यंत सी.सी.रोड करणे कामाबाबत 154
62 प्र.क्र.२२ मध्ये रवी नगर येथे पर्वतकर मार्केट ते संकटमोचन हनुमान मंदिर सिमेंट रस्ते दुरुस्ती कामाबाबत........................................................................................................157
63 प्रभाग क्रमांक १३ मध्ये डब्यू बी.एम.रोड तयार करणे कामाबाबत ..........................................158
64 प्रभाग क्रमांक २२ शारदा नगर, न्यू.गणेश कॉलनी व किशरवाणी ले-आउट मध्ये डब्ल्यू.बी.एम. रोड करणे कामाबाबत ........................................................................................160
65 प्रभाग क्र. १० विलासनगर मधील म्हाडा कॉलनी येथे पेव्हिंग ब्लॉक बसविणे कामाबाबत ..........162
66 प्रभाग क्रमांक ७ जलपूर्ती कॉलनी येथे सिमेंट रस्ता करणे कामाबाबत ...................................164
67 प्रभाग क्रमांक ७ नवजीवन कॉलनी येथे रस्ता खडीकरण करणे कामाबाबत ................................166
68 रहाटगाव रोड ते सुदर्शन नगर रस्ता खडीकरण करणे कामाबाबत ..........................................168
69 प्रभाग क्रमांक १४ मधील जिजाऊनगर ते विद्यापीठ रस्ता येथे सिमेंट कॉक्रीट रस्ता करणे कामाबाबत........................................................................................................169
70 प्रभाग क्रमांक ३६ घाटे ले-आउट न्यू कॉलनी येथे डब्यु.बी.एम. रस्ता करणे..................................172
71 दावडे ले-आउट सर्व्हे क्र.८ मौजा बेनोडा येथे डब्यु.बी.एम. रस्ता करणे कामाबाबत .......................173
72 लुंबानी नगर ते वडरपुरा व पंचशील नगर येथील मुख्य रस्ताचे कॉक्रीटीकरण करणे कामाबाबत 175
73 प्रभाग क्रमांक ३६ वरूण नगर बेनोडा येथे डब्यु.बी.एम. रस्ता करणे.............................................177
74 पंचशील नगर व संजय गांधी नगर न २ येथे कॉक्रीट रस्ता व कॉक्रीट नाली बांधणे कामाबाबत...179
75 खाउ वाटपासाठी प्रदान केलेल्या अग्रीमाबाबत .........................................................................181
76 कंत्राटी स्वास्थ निरिक्षक पदासाठी होणा-या लेखी परिक्षेकरिता दिलेल्या अग्रीमाबाबत..............182

**कलम ९ क खालील आक्षेप.......................................................................................184**

**------------------- निरंक ------------------- ..................................................................185**

**कलम ९ ड खालील आक्षेप** ........ **187**

77 शहरातील ईमारतींचे संरचनात्मक निरीक्षण (STRUCTURAL AUDIT) करण्याबाबत. ........ 188

78 बांधकाम विभागाने आवश्यक नोंदवह्या न ठेवल्याबाबत ........ 189

79 एका कामासाठी एकच मोजमाप पुस्तक वापरणे बाबत ........ 190

80 शासन प्राप्त निधीच्या 10 टक्के निधी वाहतुक सुरळीत राहणेसाठी खर्च न केले बाबत. ........ 192

81 मोजमाप पुस्तिकेत कामाच्या रक्कम प्रदानाबाबत धनादेश क्रमांक व दिनांकाची नोंद घेणे बाबत 193

82 नवीन रस्ते,नाली तसेच दुरुस्तीच्या कामाला प्रशासकीय मान्यता घेणेबाबत ........ 194

83 मनपा अमरावती यांनी कत्तलखाना उपविधी/विनियम तयार न केल्याबाबत ........ 195

84 मनपा अमरावती क्षेत्रा अंतर्गत पाळीव प्राण्यांना (श्वानांना) मनपाकडून परवाना न दिल्याबाबत 196

85 महिला व बालकल्याण कार्यक्रम राबविण्यासाठी महसुली उत्पन्नाच्या 5% तरतूदीमधून खर्च करण्यातील अनियमितता. ........ 197

86 महिला व बालकल्याण विभागाने लाभार्थ्यांचे मास्टर नोंदवही ठेवली नसल्याबाबत ........ 199

87 अमरावती महानगरपालिका अंतर्गत असलेल्या प्रभागातील सन २०१५-२०१६ च्या मालमत्ता कराच्या पावती पुस्तक वसुलीतील अनियमितता ........ 200

88 अमरावती महानगरपालीका सन 2015-16 चे लेखापरीक्षणादरम्यान प्रभाग क्रमांक ५ मधील विवाह नोंदणी शुल्क कराच्या रकमेतील अनियमीतता बाबत. ........ 201

89 अमरावती महानगर पालीका सन २०१५-१६ चे लेखापरीक्षणादरम्यान झोन क्रमांक ५ मधील मोबाईल टॉवर वरील मालमत्ता कर व थकबाकी रकमेतील अनियमीतता बाबत. ........ 202

90 मोबाईल टॉवर वरील थकीत कराबाबत ........ 204

91 प्रभाग क्रमांक २ राजापेठ येथील विवाह नोंदणी प्रमाणपत्र व कर आकारणी प्रकरणात आढळून आलेल्या अनियमितता ........ 205

92 अमरावती महानगरपालिका अंतर्गत होणाऱ्या मालमत्ता हस्तांतरणा बाबत ........ 206

93 अमरावती महानगरपालिकेने अवैध बांधकामास कर आकारणी व वसुली न केल्याबाबत ........ 208

94 मालमत्ता कराची सुधारित कर आकारणी न केले बाबत ........ 209

95 अमरावती महानगरपालीकेच्या अग्नीशमन विभागातील फायर एन.ओ.सी व अग्नीशमन सेवा कर आकारणी तसेच आग सुरक्षा नीधी व जडसंग्रह नोंदवहीतील अनियमीतता बाबत ........ 209

96 सन 2015-16 मधील अमरावती महानगरपालिका अग्निशमन विभागाकडील वाहनाचे हिस्ट्री सिट व लॉग बुक मधील नोंदी बाबत. ....212
97 अमरावती महानगर पालीका सन २०१५-१६ चे लेखापरीक्षणादरम्यान झोन क्रमांक ५ मधील वसूली लिपीकांचे दैनिक वसूली रजिस्टर, पावती पुस्तके व मागणी नोंदवही , कर वसूली प्रकरण व हस्तांतरण प्रकरण मधील अनियमीतता बाबत. ....215
98 मनपा अमरावती विद्युत विभागाने वीजवितरण कंपनीची देयके विहित मुदतीत अदा न केल्यामुळे झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत. ....219
99 अमरावती मनपा हद्दीतील सार्वजनिक पथदिव्यांची दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे व पथदिवे चालू बंद करणे कामाबाबत. ....222
100 शिक्षण कर, रोजगार हमी कर, उपकर, मोठ्या इमारतीवरील उपकर विलंबाने शासन सदरी भरणा केलेबाबत. ....225
101 वेतन अदा करताना घेण्यात येणाऱ्या रू.1. किमतीच्या मुद्रांकाची रक्कम शासन खाती न भरले बाबत. 226
102 निवृत्ती वेतनधारकांच्या निवृत्ती वेतनातून आयकर कपात न करणे बाबत. ....227
103 मुद्रांक शुल्क सहाय्यक अनुदानाबाबत ....229
104 सन २०१५-२०१६ पासून ऑनलाईन पद्धतीने प्राप्त झालेला मालमत्ता कर लेख्याबाहेर ठेवल्याबाबत ....229
105 महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता’ 2011 महापालिकेस लागू करणे बाबत....230
106 अंशदायी निवृत्ती वेतन योजना (DCPS) चे LEDJER व ब्राहत पत्रक न ठेवलेबाबत. ....231
107 धनादेश साठा नोंदवही न ठेवलेबाबत. ....233
108 लेखा विषयक नोंदवह्या न ठेवल्या बाबत. ....234
109 सन 2015-2016 मध्ये लेखा विभागामार्फत होणारे सर्व प्रदाने ईसीएस/एनईएफटी व्दारे न केले बाबत. 236
110 निवृत्तीवेतन धारक तसेच कुटुंब निवृत्तीवेतन धारक यांच्या हयातीच्या दाखल्याची पडताळणी न करता निवृत्त्तीवेतन सुरु ठेवणे बाबत. ....237
111 निवृत्तीवेतन निधी स्थापन न करणे बाबत....238
112 निवृत्तीवेतन धारकांच्या निवृत्ती वेतनातून आयकर कपात न करणे बाबत. ....239
113 लेखा विभागाने वेतन राखीव निधी ठेवला नसल्या बाबत....241

114 अभियंता,भांडारपाल,रोखापाल, वाहन चालक यांचे कडून प्रतीभूती बंधपत्र न घेतले बाबत........242
115 जल व मल प्रवाह निधीची स्थापना न करणे व कलमात नमूद बाबीवर खर्च न होणे बाबत. .........243
116 ठेव नोंदवही बाबत.........................................................................................................244
117 कंत्राटदार /पुरवठादर यांचे देयकातून कपात केलेल्या शासकीय विम्याच्या रकमा विलंबाने भरणा केलेबाबत. .........................................................................................................245
118 वेतनातून /अथवा देयकातून वजाती करण्यात आलेल्या विविध रक्कमा विहित खाती उशिरा भरणा केले बाबत. .........................................................................................................247
119 सर्वसाधारण रोखवहीतील अनियामिततेबाबत.........................................................................248
120 भविष्य निर्वाह निधी बृहतपत्रक लेखापरीक्षणास उपलब्ध करून न देणेबाबत ............................250
121 अस्थापना खर्चाबाबत. .........................................................................................................251
122 अमरावती महानगरपालिका, सन 2015-2016 चा वार्षिक लेखा उपलब्ध न केलेबाबत................252
123 विविध योजनांचा निधी वळती करून मनपा फंडात वर्ग केल्याबाबत. ..........................................253
124 रोखपुस्तक व बँक खात्यातील शिल्लक रकमेचा ताळमेळ न घातल्याने दिनांक 31/03/2016 रोजीच्या अखेरच्या शिल्लकेमधील तफावतीबाबत. .........................................................................256
125 अमरावती मनपा सन 2015-2016 गुंतवणूक नोंदवहीबाबत .........................................................261
126 अमरावती महानगरपालीकेच्या अतीक्रमण विभागाकडील भरणा नोंदवही, पावती पुस्तके माल पुस्तीका इत्यादीच्या अनुषंगाने अनियमीतता.........................................................................263
127 अमरावती महानगरपालीकेच्या अतीक्रमण विभागाकडील प्रमाणक खर्चातील अनियमीतता बाबत. 264
128 अमरावती महानगरपालीकेच्या अतीक्रमण विभागाकडील वाहनाचे लॉग बुकमधील अनीयमीतताबाबत.........................................................................................................266
129 अमरावती महानगरपालीकेच्या सन 2015-16 चे निरीक्षणादरम्यान अभीलेख शाखेत आढळलेल्या अनियमीतता बाबत. ...........................................................................................267
130 शिकाउ उमेदवारांना विद्यावेतन अदाईबाबत..........................................................................269
131 सामान्य प्रशासन विभागांतर्गत विविध कंत्राटी पदे नियुक्ती बाबत ..............................................270
132 भ्रमणध्वनी/दुरध्वनी देयकांचे प्रदानातील अनियमितताबाबत.......................................................271
133 मनपा अमरावती अंतर्गत अनुसूचीत जाती व जमाती घटकांसाठी घरकूल योजनेतील खर्च प्रमाणके व संचीकेच्या अनुषंगाने अनियमीतता बाबत. ..............................................................273

134 मनपा अमरावती अंतर्गत अनुसूचीत जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकूल योजनेतील खर्च प्रमाणके व संचीकेच्या अनुषंगाने अनियमीतता बाबत. ....276
135 मनपा अमरावती अंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण महोत्सव दलित वस्ती स्वच्छता व पाणी पुरवठा योजनेअंतर्गत अनुसूचीत जाती व नवबौध्द घटका करीता वैयक्तीक नळ जोडणी व शौचालय योजनेच्या अनुषंगाने अनियमीतता बाबत. ....278
136 आरोग्य विभाग (वैद्यकीय) यांच्या लेखापरीक्षणात आढळून आलेल्या अनियमिततेबाबत ....280
137 मनपा दवाखान्याच्या अभिलेख्यातील अनियमिततेबाबत ....281
138 महानगरपालिका हद्दीतील नर्सिंग होम नोंदणी/नुतनीकरण परवानाबाबत ....282
139 स्थानिक संस्था कर ताळमेळाबाबत ....283
140 महानगरपालिका अमरावती यांनी फेरीवाल्यांच्या संदर्भात शासन मान्य फेरीवाला उपविधी तयार केली नसल्याबाबत ....284
141 महानगरपालिके मार्फत अभियंते, पर्यवेक्षक यांना देण्यात येत असलेल्या परवाना बाबत ....285
142 शिवटेकडी येथील वाहनतळ भाडे तत्वावर देणे बाबत ....287
143 घसारा राखीव निधी स्थापन न केले बाबत ....289
144 राष्ट्रीय व राज्य नागरी उपजीविका अभियान (NULM) अंतर्गत बचत गटांना दिलेल्या फिरत्या निधी मधील अनियामितते बाबत. ....290
145 लेखापरीक्षणास अभिलेखे सादर न केले बाबत ....291
146 भांडार विभागाने दरपत्रक मागवून केलेल्या खरेदीतील अनियमिततेबाबत ....295
147 अमनापा क्षेत्रातील सार्वजनिक नळाची व मनपा पी.व्ही.सी. पाईपलाईन वरील लिकेज दुरुस्ती करणे कामातील अनियमिततेबाबत ....297
148 बोअरवेल खोदणे व हातपंप बसविणे कामातील अनियमिततेबाबत. ....298
149 महानगरपालिकेच्या अधिकारी वर्गाकरिता भाडेतत्वावर वाहने पुरवणेबाबत ....301
150 नविन वाहन खरेदीतील अनियामितते बाबत ....302
151 आरोग्य विभाग स्वच्छता विभागाकडील JCB -JS 80 चे दुरुस्ती बाबत ....303
152 टायर ट्यूब खरेदी बाबत. ....304
153 वेतन फरक रकमेच्या अदाईबाबत ....306
154 गणवेश कापड खरेदीतील अनियमितता ....307
155 आरओ वॉटर प्युरीफायर खरेदीतील अनियमितताबाबत ....307

156 फुटबॉल व कबड्डी स्पर्धेकरिता अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत....................................308

लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र ....................................................................................311

**विवरणपत्रे व जोडपत्रे........................................................................................................................312**

## *विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण*

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड |
|---|---|---|---|---|
| इतर | | | | 143, 144, 145 |
| सामान्य प्रशासन | 21, 22 | 76 | | 129, 130, 131, 132 |
| नगर सचिव | 14 | 29, 30, 31 | | |
| शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम | 15, 16, 17, 18 | 57, 58, 59, 60, 61, 62, 63, 64, 65, 66, 67, 68, 69, 70, 71, 72, 73, 74 | | 77, 78, 79, 80, 81, 82 |
| शहर अभियंता आणि विद्युत विभाग | | 51, 52 | | 98, 99 |
| पाणी पुरवठा व मल निसा:रण | | 55 | | 147, 148 |
| लेखा विभाग | 1, 2, 3, 4 | 27, 28 | | 100, 101, 102, 103, 104, 105, 106, 107, 108, 109, 110, 111, 112, 113, 114, 115, 116, 117, 118, 119, 120, 121, 122, 123, 124, 125 |
| जकात किंवा स्थानिक संस्था कर किंवा उपकर | 8 | 32 | | 139 |
| कर निर्धारण व संकलन | 19 | 56 | | 92, 93, 94 |
| आरोग्य | | | | 136, 137, 138 |
| वाहन विभाग | | | | 149, 150, 151, 152 |
| माहिती आणि जनसंपर्क | 9 | | | |

PREVIEW

| | | | | |
|---|---|---|---|---|
| विधी विभाग | | 23 | | |
| घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प | | 38, 39, 40, 41, 42, 43, 44, 45, 46 | | |
| भांडार | | 53, 54 | | 146 |
| परवाना व मंडई विभाग | 10, 11, 12, 13 | 47, 48, 49, 50 | | 140, 141, 142 |
| संगणक किंवा माहिती तंत्रज्ञान | | 36, 37 | | |
| शिक्षण विभाग किंवा शिक्षण मंडळ, प्राथमिक शिक्षण मंडळ किंवा माध्यमिक शिक्षण | 20 | 75 | | 153, 154, 155 |
| नागरी समुदाय विकास प्रकल्प विभाग | | | | 133, 134, 135 |
| महिला व बालकल्याण विभाग | | 33 | | 85, 86 |
| क्रिडा विभाग | | | | 156 |
| अग्निशमन विभाग | | 24 | | 95, 96, 97 |
| अतिक्रमण विभाग | | 26 | | 126, 127, 128 |
| प्रभाग कार्यालये | 6, 7 | 25 | | 87, 88, 89, 90, 91 |
| उद्यान विभाग | | 35 | | |
| समाज विकास किंवा सामाजिक न्याय विभाग | 5 | | | |
| पशु वध गृह | | 34 | | 83, 84 |

PREVIEW

## I Part I :मागील लेखा परीक्षण अहवाल

### *अमरावती महानगरपालिका*

अ) सन २०११-१२ ते २०१३-१४ या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद प्रलंबित असून परिच्छेदांची यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | वित्तीय वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकूण प्रलंबित परिच्छेदांची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 2011-12 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38,39,40,41,42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54,55,56,57,58,59,60,61,62,63,64,65,66,67,68,69,70,71,72,73,74,75,76,77,78,79,80,81,82,83,84,85,86,87,88,89,90,91,92,93,94,95,96,97,98,99,100,101,102,103,104,105,106,107,108,109,110,111,112,113,114,115,116,117,118,119,120,121,122,123,124,125,126,127,128,129,130,131,132,133,134,135,136,137,138,139,140,141,142,143,144,145,146,147,148,149 | 149 |
| 2 | 2012-13 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38,39,40,41,42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54,55,56,57,58,59,60,61,62,63,64,65,66,67,68,69,70,71,72,73,74,75,76,77,78,79,80,81,82,83,84,85,86,87,88,89,90,91,92,93,94,95,96,97,98,99,100,101,102,103,104,105,106,107,108,109,110,111,112,113,114,115,116,117,118,119,120,121,122,123,124,125,126,127,128,129,130,131,132,133,134,135,136,137,138,139,140,141,142,143,144 | 144 |
| 3 | 2013-14 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24,25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38,39,40,41,42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54,55,56,57,58,59,60,61,62,63,64,65,66,67,68,69,70,71,72,73,74,75,76,77,78,79,80,81,82,83,84,85,86,87,88,89,90,91,92,93,94,95,96,97,98,99,100,101,102,103,104,105,106,107,108,109,110,111,112,113,114,115,116,117,118,119,120,121,122,123,124,125,126,127,128,129,130,131,132,133,134,135,136,137,138,139,140,141,142,143,144,145,146,147,148,149,150,151,152,153,154,155,156,157 | 157 |
| | | एकूण | 450 |

PREVIEW

ब) सन 2014-2015 या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद (चालू लेखापरिक्षणाचे मागील वित्तीय वर्ष)

| परिच्छेद क्रमांक | शीर्षक |
|---|---|
| 1 | मनपा अमरावतीच्या आर्थिक वर्ष 2014-15 चा अर्थसंकल्प, जमा-खर्च व आर्थिक स्थितीवरील अभिप्राय. |
| 2 | महानगरपालिका अमरावती येथे शासन निर्देशानुसार बंधनकारक असलेल्या दुहेरी नोंद पध्दतीने लेखे न ठेवणेबाबत. |
| 3 | आयकर अधिनियम 1961 कलम 192 च्या तरतूदीनुसार मनपा सेवेतून सेवानिवृत्ती झालेल्या निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनातून आयकर कपात न करणेबाबत. |
| 4 | शासनाने विहित केलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे वार्षिक लेखे तयार करून ते लेखापरीक्षणास प्रमाणिकरणाकरिता सादर न करणे. |
| 5 | GIS Database तयार करणे या योजनेच्या अंमलबजावणी मधील अनियमिततांमुळे 13 व्या वित्त आयोगातील रु.1.33 कोटी एवढया खर्चाची उपयोगिता शून्य ठरणेबाबत. |
| 6 | मंजूर अभिन्यासातील खुल्या जमिनीच्या वाटपाची प्रक्रिया पूर्ण झाली नसतांना स्वयंसेवी संस्थेद्वारे सदर जमिनीचा वापर सुरु असणेबाबत |
| 7 | रु.46.81 लाख मूल्य असलेल्या भूखंडाचे स्वयंसेवी संस्थाना नियमबाह्यपणे वाटप करणेबाबत. |
| 8 | मंजूर आकृतीबंधानुसार उपलब्ध पदोन्नतीचे पद डावलून पदोन्नती व त्यानुषंगाने त्या वरील वेतनश्रेणी मध्ये सुधारित आश्वासित प्रगती योजनेंतर्गत चुकीचे ग्रेड वेतन मंजूर केल्यामुळे दि. 01.03.1993 पासून वेतनाचे झालेले अतिप्रदानाबाबत. |
| 9 | पदे मंजूर नसल्यामुळे दवाखान्याच्या दोन (सुतिकागृह) इमारती बंद अवस्थेत पडून असतांना व पद निर्मिती संबंधाने नियोजन न करता नविन दवाखाना इमारती वरील खर्च झालेला रु. 83.56 लाख एवढा 13 व्या वित्त आयोगातील निधी अडकवून ठेवण्याबाबत. |
| 10 | रमाई आवास योजनेतंर्गत पेव्हटेक कन्सल्टंट, पुणे यांना निविदा मुल्यापेक्षा जादा रकमेचे नियमबाह्य प्रदान तसेच बांधकामातील त्रृटया व करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्याबाबत. |
| 11 | तातडीची बाब नसताना तसे दर्शवून निविदा न मागविता रु.8.25 लाख मूल्याचे आराखडा तयार करण्याचे व समन्वयक पदाचे काम एकाच सल्लागारास देण्याबाबत. |
| 12 | शासनास भरणा करावयाच्या रॉयल्टी रकम कंत्राटदाराकडून वसूल करावयाची असताना मनपा/शासन निधितून 2014-2015 मध्ये रु. 64.16 लाख खर्च करण्याबाबत. |
| 13 | खोदकामातील मातीचे जादा परिमाण दाखवून वाहतुकीवर झालेल्या अतिप्रदानाबाबत. |
| 14 | कर अधिकाऱ्याच्या कक्षासाठी दरपत्रके न मागविता नियमबाह्य अग्रीमातून वित्तीय |

PREVIEW

| | |
|---|---|
| | औचित्याबाहेरील अवाजवी खर्च करणेबाबत. |
| 15 | कनिष्ठ अभियंता या पदावरून शाखा अभियंता पदावर दर्जावाढ मंजूर केली असताना पदोन्नती समजून वेतन निश्चिती केल्याने मूळ वेतनात झालेले रु.143520 व त्यावरील भत्ते एवढ्या अतिप्रदाना बाबत. |
| 16 | प्रशासकीय प्रस्ताव नसताना वेळेवरील विषय म्हणून तसेच वित्तीय मर्यादेनुसार अधिकार नसताना दुकान गाळ्यांचे हस्तांतरण या अर्थविषयक बाबीस स्थायी समितीने मान्यता देण्याबाबत. |
| 17 | गांधी चौक वाहनतळ पार्किंगची जागा स्वस्त दराने भाडेतत्वावर देऊन मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याबाबत. |
| 18 | कोंडवाडा विभागांतर्गत प्रत्यक्ष खरेदी झाली नसताना रु.19.43 लाख एवढा खर्च संबंधित लेखाशिर्षाखाली नोंदविल्याने खर्च केलेल्या रकमेच्या गैरविनियोगाच्या शक्यतेबाबत. |
| 19 | महसुलाचा प्रमुख स्त्रोत असलेल्या मालमत्ता कराच्या थकीत मागणीबाबत. |
| 20 | स्थानिक संस्था कराची एकाच व्यापा-यांनी दुबार नोंदणी केल्याबाबत. |
| 21 | आरोग्य विभागातील कार्यरत श्रीमती वैशाली व.भुयार (शेंडे) प्रयोगशाळा तंतज्ञ यांची वेतननिश्चिती करताना चुकीची वेतनवाढ देवून मूळ वेतनात रु.58444/- व त्यावरील भत्त्याचे अतिप्रदान केल्याबाबत. |
| 22 | वैद्यकीय अधिकारी यांना नियमबाहय व्यवसाय रोध भत्त्याचे रु.4,18,053/- एवढे अतिप्रदान झाल्यामुळे. |
| 23 | कु. उर्मिला एम.कासदेकर ए.एन.एम. आरोग्य विभाग यांना चुकीची वेतनवाढ लागू केल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत तसेच उपभोगलेली रजा खात्यात कमी खर्ची टाकण्यातील अनियमितता |
| 24 | श्री. अविनाश कात्रे लसटोचक यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ नियमबाह्य लागू केल्याने झालेल्या अतिप्रदान तसेच अर्हताकारी सेवेबाबत |
| 25 | आरोग्य व पर्यवेक्षण विभागातील स्वास्थ/स्वच्छता निरीक्षक यांना रु.4300 ऐवजी रु.4800 असे चुकीचे ग्रेड वेतन देऊन अतिप्रदान केल्याबाबत. |
| 26 | 31 नालाकुली(वर्ग-4) कर्मचा-यांना पुर्वलक्षी प्रभावाने नियमबाहयपणे वरिष्ठ पदावर सेवेत सामावून घेणे व या प्रभावावरील सेवा आश्वासित प्रगती योजनेसाठी विचारात घेऊन प्रारंभापासून वेतनाचे अतिप्रदान होत असल्याबाबत |
| 27 | प्रथम कालबद्ध पदोन्नती अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणी मध्ये वेतन निश्चित न करता चुकीची वेतनश्रेणी लागू केल्याने झालेल्या रु.70600 व त्यावरील भत्त्याचे अतिप्रदानाबाबत. |
| 28 | कर विभागातील कार्यरत श्रीमती सविता भगवंत पाटील, कनिष्ठ लिपिक यांची वेतननिश्चिती करताना चुकीची वेतनवाढ देवून मूळ वेतनात रु35400/- व त्यावरील भत्त्याचे अतिप्रदान केल्याबाबत. |
| 29 | मा.राज्यमंत्री यांच्या सत्कार समारंभासाठी गरजेपेक्षा अधिक व अवास्तव दराने शाल खरेदी केल्यामुळे वित्तीय औचित्याचा भंग होणेबाबत. |

PREVIEW

| | |
|---|---|
| 30 | श्री.सुधीर श्यामराव कडू, आरोग्य कर्मचारी यांना चुकीची वेतननिश्चिती केल्यामुळे अतिप्रदान झाल्याबाबत. |
| 31 | श्री. टि.एस.भोसले से.नि. क्रीडा अधिकारी यांना बडतर्फ कालावधीतील नियमबाहय वेतनाचे प्रदानाबाबत. |
| 32 | शासन निर्णय वित्त विभाग दि. 03.07.2009 नुसार दि. 01.01.2006 नंतर आगाऊ वेतनवाढ अनुज्ञेय नसताना श्री मिराणी वरिष्ठ लिपीक तथा श्री भूषण पुसनकर,कनिष्ठ लिपीक यांना आगाऊ वेतनवाढ दिल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत. |
| 33 | शिक्षण विभागातील वर्ग 4 च्या कर्मचा-यांची शैक्षणिक अर्हता विचारात न घेतल्याने नियमबाह्य आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजूर करणेबाबत |
| 34 | आर्थिक क्षमतेपेक्षा तिप्पट मुल्यांची शासन निधीतील बांधकामे एकाच कंत्राटदारास मंजूर करणेबाबत. |
| 35 | 10% पेक्षा कमी दराच्या निविदेचे दर विश्लेषण व अंदाजपत्रकाची पुन:मांडणी न करता 15 ते 37% ने कमी दराच्या निविदा स्विकृत करणेबाबत |
| 36 | विभागीय आयुक्तांच्या सक्षम प्रशासकीय मान्यतेशिवाय शासननिधीतील शिल्लक रकमेतून रु.45.32 लाखाचे रस्ता डांबरीकरणाचे काम करण्याबाबत |
| 37 | मनपा नाक्याची इमारत व्यावसायिक प्रयोजनासाठी दीर्घमुदतीसाठी नाममात्र दराने देणेबाबत. |
| 38 | मनपा शाळेतील गरीब मुला-मुलींसाठी पटसंख्येपेक्षा जादाची टाय व बेल्ट खरेदी केल्याने अवाजवी खर्च झाल्याबाबत. |
| 39 | समाजमंदिरा पासून रु.70 लाखाच्या अवैध वसुली प्रकरणावर कार्यवाही न होणेबाबत. |
| 40 | शहरातील अनाधिकृत मोबाईल टॉवर्समुळे अंदाजे रु. 2. 27 कोटी एवढे मनपाचा महसुल, वाढीव मालमत्ता कर तसेच पर्यावरणविषयक हानी होणेबाबत. |
| 41 | सन 2013 व 2014 च्या शीघ्र सिद्धगणकातील दराच्या तफावतीनुसार जमीनवापर मूल्याची अतिरिक्त रक्कम रु. 1.17 लाख वसूल न करणे व विशिष्ट हेतूसाठी प्राधिकृत नसलेल्या संस्थेस त्या हेतूसाठी भूखंड वाटप करणे बाबत. |
| 42 | बांधकाम परवानगी देताना भूखंडधारकाकडून प्राथमिक विकास खर्चापोटी रु.90/- प्रती चौ.मी. ऐवजी रु.20/- प्रमाणे वसूल केल्याने रु.2.72 लाखाच्या महसुलाची हानी होण्याबाबत. |
| 43 | अतिक्रमण विभागातील मजूरांना रोखीने प्रदान केलेल्या मजूरीसंबंधी मजूरांच्या स्वाक्षऱ्या नसतांना दर्शविण्यात आलेल्या रु.47352/- एवढया प्रदानातील अनियमिततेबाबत. |
| 44 | अतिक्रमणाचे काम केले नसलेल्या (कामावर अनुपस्थित असलेल्या) दिवसांची रु.1.18 लाख एवढे मजूरीचे प्रदान करणेबाबत. |
| 45 | जमीन वापर मूल्याची तफावतीची रकम रु.2.15 लाखाच्या वसुलीकडे दुर्लक्ष करणेबाबत. |
| 46 | सर्वसाधारण सभेचा धोरणात्मक निर्णय असताना नविन अभिन्यासातील विकास कामासाठी त्यामधील दर्शनी भागातील भूखंडाचे अधिग्रहण न करण्याबाबत. |
| 47 | अतिक्रमण विभागाने घेतलेल्या अग्रिमाचा वापर प्रलंबित कालावधीतील मजूरी प्रदानाकरिता करणेबाबत तसेच मोठया प्रमाणात रोख काढून त्याचा गैरवापर करणेबाबत |

PREVIEW

| | |
|---|---|
| 48 | बांधकाम परवानगी धारकाकडून स्थानिक संस्था कर वसूल न करता प्रतिज्ञापत्रे प्राप्त न केल्याने कराच्या महसुलाची हानी होणेबाबत. |
| 49 | व्यावसायीक प्रतिष्ठानांतील कचरा गोळा करणा-या कंत्राटदाराने करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार रॉयल्टी रकमेचा भरणा न केल्यामुळे मनपाच्या झालेल्या हानीबाबत. |
| 50 | दैनदिन साफसफाईच्या कामाला मुदतवाढ देणे तसेच विहित मुदतीत नविन निविदा प्रक्रिया न राबविणे व सेवा शुल्काचे प्रदानातील अनियमिततेबाबत |
| 51 | मनपा हद्दितील प्रभागनिहाय दैनदिन साफसफाईचे कामाचे कंत्राटदारांना मासिक देयकाचे प्रदानातील अनियमिततेबाबत. |
| 52 | कर निर्धारणानंतर स्थानिक संस्था कराची रु.23.46 लाख एवढी रक्कम अद्याप वसूल न होणेबाबत. |
| 53 | दैनदिन साफसफाईचे कंत्राटदारांना प्रदान करतांना 13.5% सेवा शुल्क अदा केल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत. |
| 54 | नाली कामगार व सफाई कामगारांना लागू करण्यात आलेल्या नियमबाहय ग्रेड-पे बाबत. |
| 55 | सार्वजनिक शौचालयाच्या साफसफाईच्या कामाच्या कंत्राटाची निविदा प्रसिध्द न करता जुन्याच कंत्राटदाराला मुदतवाढ देण्याबाबत. |
| 56 | भांडार विभागाने मनपाच्या विविध विभागासाठी खरेदी केलेल्या साहित्य खरेदीतील अनियमितता. |
| 57 | सन 2014-15 मध्ये महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या जाहिरातीसाठी संबंधित वृत्तपत्रांना शासन मान्य दरापेक्षा अधिक दराने रक्कम अदा केल्याने मनपाचे झालेले नुकसान रु.104076/- बाबत. |
| 58 | मनपाचे कर विभाग/म्यु.नगर रचना विभागातील कर्मचा-यांचे सेवापुस्तकातील अनियमिततेबाबत. |
| 59 | श्रीमती उर्मिला अटाळकर सेवानिवृत्त कनिष्ठ लिपीक यांना सेवेत सामावून घेताना आवश्यक असणा-या प्रमाणपत्राची पुर्तता न करता वरिष्ठ पदावर सेवेत सामावून घेणे व इतर अनियमिततेबाबत. |
| 60 | महानगरपालिकेच्या हद्दीतील प्रवेश नाक्यावर खाजगी सुरक्षा रक्षक पुरविण्याचे आदेश होण्यापूर्वीच्या कालावधीतील पारिश्रमिक अदा केल्याने झालेले अतिप्रदान रु.67560/-बाबत. |
| 61 | अधिकच्या दराने सुरक्षा रक्षकांची नेमणूक केल्याने मनपाचे दरमहा होत असलेले नुकसानीबाबत. |
| 62 | सामान्य प्रशासन विभागातील कर्मचा-यांना वाढीव ग्रेड-पे दिल्याने झालेले अतिप्रदान तसेच सेवापुस्तकातील अनियमिततेबाबत. |
| 63 | मनपाच्या नुकसान भरपाईच्या रु. 240825/- पैकी रु.140489/- एवढी रकम कर्मचाऱ्यांकडून वसूल न होणेबाबत. |
| 64 | कंत्राटपध्दतीने चालविण्यास दिलेल्या सांस्कृतिक भवनापासून ठराविक रकमांच्या तुलनेत दोन स्वतंत्र अभिलेख्यानुसार वेगवेगळी व कमी रकम प्राप्त होणेबाबत. |
| 65 | स्थायी समिती ठरावाद्वारे निश्चित केलेल्या परवाना शुल्काच्या रकमेपेक्षा कमी दराने |

PREVIEW

| | |
|---|---|
| | वसुली केल्याने रु.22000/- च्या महसुलाच्या हानीबाबत. |
| 66 | सेवाकराची आकारणी न केल्यामुळे व विहित मुदतीत सेवाकराचा भरणा न केल्यामुळे रु. 29.00 लाख एवढ्या संभाव्य दंडनीय व्याजाची जबाबदारी निश्चित करून वसुली होणेबाबत. |
| 67 | जाहिरातीवरील कर वसुलीचे काम कंत्राट तत्वावर दिल्याने विहित मुदतीत कराची रक्कम मनपास प्राप्त होत नसल्याने त्यावर आकारण्यात येणाऱ्या व्याजाची एकूण रक्कम रु. 10048500/- चे मनपाचे नुकसान होणेबाबत. |
| 68 | भाडेपट्टीने दिलेल्या दुकान, गाळेधारकाकडून विलंबाने वसूल केलेल्या थकबाकीच्या रकमेवर शास्तीची आकारणी न केल्यामुळे मनपाचे रु. 70123/- चे नुकसान होणेबाबत |
| 69 | बाजार ओटयांच्या भाडे रकमेत स्थायी समितीच्या ठरावानुसार भाडेवाधीची अंमलबजावणी न केल्याने 2014-2015 मध्ये मोठ्या महासुलाचे नुकसान होणेबाबत. |
| 70 | स्थानिक संस्था कराच्या प्राप्त रकमेतील आढळून आलेल्या तफावतीचा ताळमेळ न घेणेबाबत. |
| 71 | कारखाना विभागाकडील भंगार ठरलेल्या वाहनांच्या विक्री प्रक्रियेतील विलंबामुळे मनपाचे झालेले नुकसान रु.1,53,000/- बाबत. |
| 72 | सन 2014-15 मध्ये महानगरपालिकेच्या अधिकारी वर्गाकरिता भाडेतत्वावर घेतलेल्या खाजगी वाहनांच्या मासिक भाडे देयकांच्या तपासणीत आढळून आलेल्या अनियमिततांबाबत. |
| 73 | रमाई आवास घरकुल योजनेतंर्गत लाभार्थ्यांना निवास वाटपातील अनियमितता. |
| 74 | रमाई आवास योजनेतंर्गत शासनाकडून प्राप्त निधीवरील व्याज तसेच अखर्चित निधी शासनाकडे जमा न करणे व इतर अनियमिततेबाबत. |
| 75 | आयुर्विमा महामंडळाकडून घेतलेल्या कर्जाची हमी शुल्क रक्कम तसेच त्यावरील व्याज व दंडणीय व्याजाबाबत. |
| 76 | मनपा अमरावतीची पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अमरावती यांचेकडे सोपविली असतांना आस्थापना खर्चावर तसेच सार्वजनिक नळाच्या पाणीपुरवठा देयकावर फार मोठया प्रमाणातील खर्चाबाबत. |
| 77 | सन 2014-15 मध्ये शासनाच्या वतीने शिक्षण कर,रोजगार हमी उपकर व मोठया निवासी इमारतीवरील कर अंतर्गत नागरिकांकडून वसूल केलेली रक्कम रु.5.01 कोटी शासन खात्यात विलंबाने भरणा करण्यात आल्याबाबत. |
| 78 | सन 2014-15 या आर्थिक वर्षात प्रदान केलेल्या रु.11.57 लाख इतक्या अग्रीमाचे प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या बिजकांसह समायोजन न झाल्याने मनपा निधीच्या झालेल्या संभावित हानीबाबत. |
| 79 | कर्जनिवारण निधी खात्यातील जमा रकमा दीर्घ मुदतीसाठी गुंतवणूक न करता बचत खात्यात ठेवल्याने 2014–15 मध्ये अंदाजे रु 48843/ व्याजाचे नुकसान होणेबाबत. |
| 80 | सन 2014-15 मध्ये कंत्राटदार, पुरवठादार यांच्या देयकातून कपात केलेल्या रु.1.82 कोटी एवढया कार्यकंत्राट कर रकमेचा शासन खात्यात विलंबाने भरणा करण्यात आल्याबाबत. |
| 81 | मनपाच्या कर्मचा-यासाठी सेवानिवृत्तीनंतरच्या दायित्वासाठी तसेच मासिक निवृत्ती वेतनाची अदायगीसाठी निवृत्तीवेतन अशंदान निधीची स्थापना न करणेबाबत. |

| | |
|---|---|
| 82 | सक्षम मान्यता प्राप्त न करता 80 वर्ष व त्यावरील निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना निवृत्तीवेतनात 10% वाढ लागू करण्याबाबत. |
| 83 | जिल्हा नियोजन विकास निधीमधील सन 2014-15 अखेर रु.50.78 लाख एवढी अखर्चित रक्कम शासनास परत न केल्याबाबत. |
| 84 | झोन क्र.1 मधील कार्यक्षेत्रात येणा-या मालमत्तेचे करनिर्धारण तसेच खुल्या भुखंडावर आकारणी न केल्याने मनपाच्या होत असलेल्या हानीबाबत |
| 85 | मनपातील पदाधिकारी/अधिकारी यांना सन 2014 व 2015 मध्ये पुरविण्यात आलेल्या दैनदिनी छपाईतील अनियमितेबाबत. |
| 86 | मनपाच्या नगर सचिव विभागाकडील चहापान खर्च, आकस्मिक खर्च, सादिल खर्च तसेच सदस्यांचे मानधन  व वाहन भत्यावरील खर्चातील अनियमितता, अखर्चित निधीबाबत. |
| 87 | मनपातील पदाधिकारी यांचेकडील खाजगी सचिवांच्या नियमबाह्य नेमणुकीबाबत. |
| 88 | न्यायालयीन प्रकरणात महानगरपालिकेला सेवा देणाऱ्या अधिवक्त्याच्या शुल्कातून आयकराची कपात न केल्याबाबत. |
| 89 | ऑप्टीकल फायबर केबलचे जाळे टाकणे व अन्य भूमिगत कामासाठी वापरलेल्या जमिनीवरील भाडे रकमांवर रु. 5.87 कोटीचा सेवाकराची आकारणी व वसूली न करण्याबाबत. |
| 90 | राजापेठ उड्डाणपूलच्या बांधकाम सल्लागारास होणाऱ्या प्रदानातील अनियमितता मुळे शासननिधीचे होत असलेल्या नुकसानीबाबत. |
| 91 | दीर्घमुदतीसाठी भाडेपट्टीवर दिलेल्या वडाळी तलाव व छत्री तलावापोटी कंत्राटदाराकडून सेवाकराची रु.5.18 लाख एवढी रकम वसूल न करणेबाबत. |
| 92 | मनपा शाळेचे इमारत बांधकाम, देखभाल व दुरूस्ती यावरील खर्चाचे नस्त्या व अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध करुन न देणेबाबत. |
| 93 | छत्री तलाव सुशोभित व सौंदर्य करण्यासाठी दिलेले एजन्सीद्वारे रक्कम उशिराने मनपा खात्यात जमा केल्याबाबत |
| 94 | मनपा अमरावती क्षेत्रा अंतर्गत मोकाट जनावरे पकडण्याकरिता वाहन भाडे यावरील केलेल्या अनावश्यक खर्चा बाबत |
| 95 | पशुसवंर्धन विभागाने लेखापरिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे तसेच पाळीव प्राणी परवाना शुल्क वसुल न केल्याने मनपा निधीची हानी झाल्याबाबत. |
| 96 | मनपा शाळेतील वर्ग 1 ते 7 मधील गरीब मुला-मुलींसाठी गणवेश शिलाई करून वाटप करण्यातील अनियमितता. |
| 97 | मनपा शाळेतील वर्ग 1 ते 7 मधील गरीब मुला-मुलींसाठी गणवेश कापड खरेदी करतांना गरजेपेक्षा जादा कापडाची खरेदी केल्याने मनपावर रु.893923/- एवढया अनावश्यक खर्चाचा भार पडल्याबाबत. |
| 98 | मनपाच्या शाळेतील वर्ग 9 व 10 च्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके पुरविणेबाबत. |
| 99 | शालेय पोषण आहाराबाबत प्राप्त तांदुळाची प्राथमिक शाळेच्या साठा नोंदवहीत नोंद नसणे तसेच अंदाजपत्रकातील खर्चाबाबत. |



PREVIEW

| | |
|---|---|
| 100 | शिक्षण विभागाने शाळा इमारत भाडयाचे केलेले अतिप्रदान व आकस्मिक खर्चाचे मंजूरीतील अनियमिततेबाबत. |
| 101 | जिल्हापरीषदेकडून समायोजनाने मनपाकडे वर्ग झालेल्या शिक्षकांच्या संबंधाने जिल्हापरीषदेकडून सेवानिवृत्ती अंशदान प्राप्त न करणे व प्रदानातील इतर त्रृटयांबाबत. |
| 102 | महिला व बालकल्याण कार्यक्रम राबविण्यासाठी महसुली उत्पन्नाच्या 5% तरतूदीमधून खर्च करण्यातील अनियमितता. |
| 103 | अमरावती शहर बस वाहतुक उपक्रम अभिकर्त्याने रॉयल्टीचा भरणा विलंबाने करणे तसेच वाहतुक उपक्रम हस्तांतरणबाबत. |
| 104 | मनपाच्या मालकीच्या जागेवरील बस पार्किंगचे भाडे वसुल न केल्याने मनपाची हानी झाल्याबाबत. |
| 105 | मनपा शाळेतील वर्ग 1 ते 10 पर्यंतच्या विद्यार्थ्यांकरिता डेस्क व बेंच खरेदीतील अनियमिततेबाबत. |
| 106 | बांधकाम विभागातील सन 2014-15 चा आकस्मिक खर्चाचा अभिलेख लेखापरीक्षणास सादर न करणे तसेच मंजूर अनुदानापेक्षा जादा खर्च करणेबाबत. |
| 107 | महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानाच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी मनपास बंधनकारक असलेल्या प्रशासकीय सुधारणात्मक बाबींवर अंमल न होणेबाबत |
| 108 | ऑप्टीकल फायबरसाठी मार्गाच्या हक्काच्या परवानगीचे नुतनीकरण न झाल्याने रु.1.54 कोटीच्या परवाना शुल्काची हानी होणेबाबत व 2014-15 मध्ये या प्रयोजनावरील प्राप्त रु.18.37 कोटीच्या महसुलाचे उचित लेखांकन न होणेबाबत. |
| 109 | मनपाकडील बांधकामाचा व त्यावर लावलेल्या कामगाराचा विमा न काढल्यामुळे मनपाच्या आर्थिकहिताचे व कामगारांचा विमा संरक्षण न होणेबाबत. |
| 110 | शासन अनुदानाच्या शिल्लक रकमेवर बँकेकडून प्राप्त व्याज रु. 37.75 लाख शासनास परत न करणेबाबत. |
| 111 | उचित स्पर्धा न होता बांधकामाच्या एकल निविदा (Singal tender) स्विकारणे बाबत व रु. 50 लाखावरील निविदांना स्थायी समितीने स्विकृती देणेबाबत. |
| 112 | एकाच कामाच्या नऊ देयकांच्या मोजमापाच्या नोंदी एका मोजमाप पुस्तिकेत व त्याच्या गोषवाऱ्यांसह प्रदानाच्या नोंदी अन्य पुस्तिकेत घेण्याबाबत. |
| 113 | बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंत्यांना पूर्वलक्षी प्रभावाने नियुक्तीचा लाभ प्रदान करणेबाबत. |
| 114 | राष्ट्रीयकृत बँके ऐवजी सहकारी बँकेचे रु. 1 कोटीचे हमीपत्र स्विकृत करणेबाबत. |
| 115 | महात्मा गांधी संकुल नुतनीकरण/नवीन लीजप्रक्रिया न राबविता 30 वर्षापेक्षा कालावधी होऊनसुद्धा सुरूच असणेबाबत. |
| 116 | बांधकाम परवानगी जारी करण्यापूर्वी स्थानिक संस्था कराच्या बँकेत परस्पर भरलेल्या रकमांची बँक स्क्रोलवरून तपासणी न केल्याने मनपा महसुलाच्या हानीच्या शक्यतेबाबत |
| 117 | स्थानिक संस्था कर निर्धारण रक्कम विलंबाने भरणा केल्यास व्याज व दंडाची रक्कम न आकारणेबाबत. |

PREVIEW

| | |
|---|---|
| 118 | स्थानिक संस्था करनिर्धारण कंत्राटदाराचे देयकातून आयकराची वसुली न करणेबाबत. |
| 119 | वेतनातून आयकराची दरमहा कपात न करता एकत्रित कपात करणेबाबत. |
| 120 | सार्वजनिक संडासाची दुरुस्तीमधील अनियमिततेबाबत |
| 121 | अतिक्रमणाचे कामावरील वाहनांच्या वापरातील अनियमितता तसेच लॉगबुकावरील दैनंदिन नोंदीसमोर स्वाक्षऱ्या नसणेबाबत. |
| 122 | रमाई आवास (घरकुल) योजनेसाठी शासनाकडे निधी मागणीचा प्रस्ताव सादर न केल्याने योजनेपासून लाभार्थी वंचित राहिल्याबाबत. |
| 123 | रमाई आवास योजनेतंर्गत मंजूर प्रकरणातील अनियमिततेबाबत. |
| 124 | अपंगाकरीता वैयक्तिक लाभ योजनावर विहित प्रमाणात खर्च न करण्याची अनियमितता. |
| 125 | सहकारी बँकेकडून अथवा पतसंस्थेकडून कर्ज घेतांना कर्मचा-यांची एकूण वित्तलब्धी तसेच सहकार कायदयातील तरतूदी विचारात न घेता विभाग प्रमुखाने बेजबाबदारपणे हमी देण्याची अनियमितता. |
| 126 | सन 2014-15 च्या भांडार तथा छपाई विभागाचे लेखापरीक्षणात आढळून आलेल्या अनियमिततांबाबत. |
| 127 | मनपा अमरावतीच्या भांडार विभागाने साहित्य खरेदी करताना शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही न केल्याने शासन निर्देशाचे उल्लंघन झाल्याबाबत. |
| 128 | मनपाच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या सेवापुस्तकातील नोंदी अद्ययावत नसणे तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार आवश्यक नोंदी न घेणेबाबत |
| 129 | अधिकारी/कर्मचारी यांनी संगणक परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर न करताही नियमित वेतनवाढी मंजूरीबाबतची अनियमितता. |
| 130 | सामान्य प्रशासन विभागामधील कर्मचाऱ्यांना चुकीच्या दराने स्थानिक पूरक भत्त्याचे प्रदान व वेतन देयकातून भविष्य निर्वाह निधी/डीसीपीएस वर्गणी कपात न करणे. |
| 131 | श्री.सुहास चव्हाण, उपअभियंता यांना पूर्वलक्षी प्रभावाने दिलेल्या पदोन्नतीबाबत. |
| 132 | क्रिडा विभागातील क्रिडा रत्न पुरस्काराच्या खर्चामधील अनियमिततेबाबत. |
| 133 | महानगरपालिका अमरावती कार्यालयातील आरोग्य विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतनामधून भविष्य निर्वाह निधी किंवा डीसीपीएस ची कपात न केल्याबाबत. |
| 134 | आरोग्य विभागातील कर्मचारी यांना निलंबित केल्यानंतर त्यांचा निलंबन कालावधी नियमित केला नसताना त्यांना कालबद्ध पदोन्नती व नियमित वेतनवाढी प्रदान करण्यात आल्या |
| 135 | महानगरपालिकेच्या आरोग्य तसेच कर विभागातील आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार परिपूर्ण व आवश्यक नोंदी न घेतल्याबाबत. |
| 136 | विवाह नोंदणी शुल्काची रक्कम तसेच विवाह मंडळाचे नोंदणी शुल्क व नुतनिकरणाची रक्कम शासनाकडे जमा न केल्याबाबत. |
| 137 | महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील तरतूदीनुसार निवृत्तीवेतन प्रदानासंबंधीच्या विहित नमुन्यातील नोंदवहया न ठेवणेबाबत. |
| 138 | अखेरच्या शिलकेचा ताळमेळ न घातल्याने व बँक खात्यातील शिल्लक रोखपुस्तकापेक्षा |

PREVIEW

| | |
|---|---|
| | कमी असल्याने अंदाजे रु.125.94 कोटीचा खर्च रोखपुस्तकात न नोंदविता थेट बँकेतून झाल्याच्या शक्यतेबाबत. |
| 139 | अनुदान नोंदवही विहित नमुन्यात न ठेवणे,नोंदवहीत अपूर्ण नोंदी घेणे व योजनानिहाय स्वतंत्र रोखपुस्तक न ठेवणे याप्रमाणे आढळून आलेल्या त्रुट्याबाबत. |
| 140 | महानगरपालिकेच्या सर्व चल व अचल संपत्तीवर घसारा आकारून घसारा निधीची उभारणी न केल्यामुळे निर्लेखनयोग्य चल व अचल संपत्तीची नव्याने उभारणी करण्यास आर्थिक अडचण येत असलेबाबत. |
| 141 | कर्जनिवारण निधीमध्ये रकम जमा न करणे,उपलब्ध रकमांची गुंतवणूक न करणे याप्रकारे निधीच्या चुकीच्या व्यवस्थापनाबाबत. |
| 142 | खाजगी बांधकामाचे संबंधात कामगार कल्याण उपकराची रकम शासनाचे बँक खात्यात परस्पर भरणा केल्यानंतर मनपाकडून त्याची सत्यता व तपासणी न होण्याबाबत. |
| 143 | सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेच्या मानधनाचे देयकातील अनियमिततेबाबत. |
| 144 | मनपाच्या शिक्षण विभागातील शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध मंजूर नसणे व वेतन देयकातील त्रृटयाबाबत. |
| 145 | महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या जाहिराती प्रसिद्ध करण्याचे आदेश, संबंधित वृत्तपत्रांना जाहिराती प्रसिद्ध झाल्यानंतर निर्गमित केल्याने झालेली अनियमितता. |
| 146 | महानगरपालिकेच्या मोटार कार्यशाळा विभागाकडील दहा वर्षाहून अधिक कालावधी झालेली वाहने निर्लेखित करून नविन वाहने खरेदीकरिता सुयोग्य नियोजन करणेबाबत. |
| 147 | JNNURM अतंर्गत शहर बस खरेदीस मंजूरी प्राप्त असून मनपाकडून बस खरेदीस विलंब झाल्याने शहर बसेसचा लाभ नागरिकांना न मिळणेबाबत. |
| 148 | अभिलेखे / माहिती उपलब्ध न करण्याबाबत. |

उपरोक्त नमूद केलेल्या आक्षेपांचे संदर्भात त्या त्या पुढील वर्षाचे अभिप्रायामध्ये नमूद करण्यात आलेले परिच्छेद क्रमांक अंतिम समजण्यात यावेत.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या लेख्यावरील लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालामध्ये समाविष्ट परिच्छेदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | लेखापरीक्षण वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकूण |
|---|---|---|---|
| 1 | 2011-2012 | 02 व 03,41,66,83,89,97 | 07 |
| 2 | 2012-2013 | 3,4,13,22,23,24,58,74,75,106,115<br>तक्तांकन 2,56,83,84,109,107,82 | 18 |
| 3 | 2013-2014 | 02,09,10,24,25,29,58, 59 व 61(एकत्रीत),<br>तक्तांकन 7,67,34 व 66(एकत्रीत),120,95 | 15 |



PREVIEW

PREVIEW

# Part II

## *अमरावती महानगरपालिका*

## भाग एक

## गंभीर अनियमितता

## कलम ९ अ, ब, क खालील आक्षेप

PREVIEW

# कलम ९ अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान

PREVIEW

## *1 मनपा अमरावती आर्थिक वर्ष 2015-2016 चा अर्थसंकल्प जमा खर्च आर्थिक स्थिती वरील अभिप्राय*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 11**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

मनपा अमरावतीच्या 2015-2016 च्या मूळ व सुधारित अंदाजपत्रकाचे व त्या अनुषंगाने प्रत्यक्ष जमा व खर्चाचे अवलोकन करताना, मूळ अंदाजपत्रकात विविध बाबीवर अवाजवी जमेचे अंदाज नोंदविणे, वैधानिक राखीव निधीसाठी तरतूद न करणे, व तरतूद केले प्रमाणे प्रत्यक्ष जमा न करणे अस्थापना खर्च मर्यादेपेक्षा जास्त करणे, अनावश्यक व निर्रथक खर्च या त्रुट्यामुळे मनपाची वर्षा अखेरची स्थिती समाधानकारक दिसून येत नाही.

PREVIEW

अर्थसंकल्प हा पुढील वर्षातील अपेक्षित उत्पन्न व मनपाचे मर्यादित उत्पन्नातून, मनपा क्षेत्रांतर्गत विविध विकासात्मक व अन्य विहित बाबीवर करावयाचा खर्च यांच्या नियोजनाचा आराखडा असल्याने, तो मनपाच्या सर्व प्रकारच्या वित्तीय कार्यवाही मध्ये प्राथमिक व अत्यंत महत्वाचा दस्ताऐवज मानला जातो. मागील तीन वर्षाच्या उत्पन्नाचा आढावा घेवून, अर्थसंकल्प वर्षातील उत्पन्नाचे स्त्रोत व नव्याने प्रस्तावित उत्पन्नाचे स्त्रोतापासून मिळणारे अपेक्षित उत्पन्न यांचा वास्तववादी विचार करून त्यातून आवश्यक खर्चाचे अंदाज मांडण्यात आले पाहिजेत.

मनपा अमरावतीचा सन 2015-2016 चा मूळ व सुधारित अर्थसंकल्प मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिय 1949 चे कलम 95,96, व 100 नुसार मंजूर करण्यात आला असून, त्याचा जमा खर्चाचा गोषवारा पुढील प्रमाणे आहे.

जमा बाजू (आकडे कोटीत)

| उत्पन्नाचे स्वरूप | मूळ अंदाज | सुधारित अंदाज | प्रत्यक्ष उत्पन्न |
|---|---|---|---|
| प्रारंभिक शिल्लक (महसुली) | 13.76 | 11.44 | 208.71 |

| | | | |
|---|---|---|---|
| महसुली उत्पन्न | 353.10 | 440.09 | |
| प्रारंभिक शिल्लक (भांडवली )<br>भांडवली उत्पन्न | 45.08<br>260.49 | 88.57<br>446.40 | 141.80 |
| प्रारंभिक शिल्लक(असाधारण )<br>असाधारण ऋण व निलंबन उत्पन्न | 5.85<br>7.3 | 5.85<br>8.83 | 10.11 |
| एकूण | 685.6 | 1001.18 | 360.62 |

खर्च बाजू (आकडे कोटीत)

| खर्चाचे स्वरूप | मूळ अंदाज | सुधारित अंदाज | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| महसुली खर्च | 354.53 | 450.77 | 202.50 |
| भांडवली खर्च | 217.00 | 451.73 | 86.41 |
| असाधारण ऋण व निलंबन | 7.3 | 8.83 | 7.31 |
| एकूण | 578.83 | 911.33 | 296.22 |

यावर पुढील अभिप्राय आहेत.

1) जमेचे अवास्तव अंदाज.

अंदाजपत्रक हे वास्तववादी मागील तीन वर्षाच्या अनुभवाच्या आधारे तयार केले पाहिजे परंतु तसे न करता महसुली उत्पनाच्या काही बाबी फुगवून वाढविलेल्या दिसून येतात.

उदारणार्थ

आकडे कोटीत

| उत्पन्नाची वाढ | मागील 3 वर्षाची सरासरी | 2015-2016 चे मूळ व सुधारित अंदाज | प्रत्यक्ष उत्पन्न |
|---|---|---|---|

PREVIEW

| | | | |
|---|---|---|---|
| महसुली | 152.07 | 440.09 | 208.71 |
| भांडवली | 115.18 | 446.40 | 141.08 |
| ऋण व निलंबन | 5.97 | 8.83 | 10.19 |
| एकूण | 273.22 | 895.32 | 359.98 |

विशेष राखीव निधीसाठी तरतुदी व प्रत्यक्ष जमा न करणे

मनपाने महाराष्ट्र मनपा अधिनियमाचे विविध कलमाखाली विविध राखीव निधीची उभारणी करून त्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करणे व प्रत्यक्ष स्वतंत्र खात्यामध्ये रकमा जमा करणे आवश्यक आहे.केवळ वेतन राखीव निधीसाठी 2,00,00,000/- तरतूद करण्यात आली, घसारा निधीसाठी 2,00,000/- तरतूद करण्यात आली तथापि त्याअनुषंगाने निधीमध्ये प्रत्यक्ष जमा निरंक आहे. म्हणजेच यावरील तरतुदी अन्य बाबीवर खर्च केल्याची शक्यता आहे.

कर्ज निवारण निधी,निवृत्ती वेतन निधी डीसीपीएस मध्ये मनपाचा हिस्सा इत्यादी निधीसाठी तरतूद करण्यात आली नाही.

2) शासन निर्णय, नगरविकास विभागाचा आदेश व परिपत्रकान्वये महापालिकांनी त्यांचा वार्षिक अर्थसंकल्प तयार करताना राखीव निधी ठेवण्याबाबत सूचना केल्या आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

अ)नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमाक GEN 1093/325/प्र.क्र.24 नवि.-32 दिनांक 17/04/1993 नुसार महिला व बाल कल्याणासाठी 5% अर्थसंकल्प निधी राखीव ठेवावा.

ब) नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक GEN-1093/1981/न.वि.-14 दि.14/07/93 नुसार अपंग कल्याणसाठी 3% राखीव निधी ठेवावा.

क)नगरविकास विभाग,शासन निर्णय क्र .GEN-1655/प्र.क्र./46/न.वि.33 दि.1402/2002 नुसार नगर सेवकांना 2% राखीव निधी ठेवावा.

ड) नगरविकास विभाग,परिपत्रक क्रमांक 1400/2264/प्र.क्र./144 नवि.24 दिनांक 26/02/2001 नुसार आर्थिक दुर्बलघटकासाठी 5% राखीव निधी ठेवावा.

3) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 27(6) व शासन निर्णय दिनांक 4/5/2006 नुसार अस्थापना खर्च 35% पेक्षा जास्त होवू नये असे स्पष्ट नमूद असतना, अमरावती महापालिकेचा अस्थापना खर्च 35% पेक्षा जास्त आहे.

4) सन 2015-2016 च्या अर्थसंकल्पाच्या जमेचे अवलोकन केले असता महानगरपालिकेने अर्थसंकल्पीय अंदाज



PREVIEW

हे पारंपारिक पद्धतीने घेतलेले आहेत. मागील तीन आर्थिक वर्षाच्या प्रत्यक्ष जमा रक्कम व त्यावर आधारीत चालू अर्थसंकल्पात जमा होवू शकणाऱ्या सरासरी जमा रकमा गृहीत धरणे आवश्यक आहे. परंतु मागील तीन वर्षातील प्रत्यक्ष जमा रक्कम खूप कमी असतना त्या प्रमाणात जमा रकमा न घेता. त्यात अनावश्यक वाढ दर्शवून जमा रक्कमा घेतलेल्या आहेत. यावरून जमा रकमा वाढविलेचे स्पष्ट होते.

5) अमरावती महानगरपालिकेने घसारा निधी नियमावली तयार करून, त्याप्रमाणे घसारा निधीची रक्कम निश्चित करून अंदाजपत्रकात तरतूद करणे आवश्यक असतना अशी तरतूद अमरावती महानगरपालिकेने केलेली नाही.

6) अमरावती महापालिकेने वित्तीय विवरणपत्राच्या आधारे जमा व खर्चाचे लेखाशीर्ष निहाय तपशीलवार वर्गीकरण छोट्या घटकापर्यंत केले नाही. तसेच वर्गीकरण रजिस्टर ठेवण्यात आले नाही.

7) अर्थसंकल्पीय तरतुदी प्राप्त झाल्या नंतर खर्च करणारे विभाग, त्यांना प्राप्त तरतुदीनुसार रकमा प्रत्यक्ष जमा नसल्या तरी रक्कमा महापालिकेकडे उपलब्ध आहेत, किंवा नाही याची खातरजमा न करता वर्षा अखेरीस रक्कम खर्च करण्यात येतात त्यामुळे महानगरपालिकेच्या देयतेत (LAIBILITY)

वाढ होते.

8)आर्थिक वर्षाच्या सुरवातीच्या सहा महिन्यानंतर जमा होणाऱ्या रकमा व होणारा प्रत्यक्ष खर्च यावर नियंत्रण ठेवण्यासाठी वेळेवेळी विभागानिहाय आढावा घेवून आर्थिक संतुलन राखण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे अशी कार्यवाही होताना दिसत नाही.

9) विविध विभागांना वाटप केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीचे वार्षिक नियोजन करून समप्रमाणात आर्थिक वर्षाच्या सुरवातीपासून खर्च करणे अपेक्षित आहे. परंतु तसे न करता आर्थिक वर्ष संपताना

खर्च करण्याकडे कल दिसून येतो. वाटप केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदी वर्षाअखेरीस संपवल्या नाही तर खालील प्रमाणे घटना घडतात.

अ) विभागाच्या खाती शिल्लक राहिलेली अर्थसंकल्पीय तरतूद वर्षा अखेरीस व्यपगत होते.

ब) विभागाकडून मागील वर्षीची अर्थसंकल्प तरतूद व्यपगत झाल्यामुळे पुढील वर्षी तरतूद कमी प्राप्त होते.

क) नियंत्रण अधिकारी संबधीत विभागास मागील वर्षाच्या तरतुदी प्रमाणे कमी खर्च करणेसाठी बजावतात यामुळे आर्थिक वर्षाच्या समाप्तीमुळे तरतूद व्यपगत होतात. त्यामुळे शासकीय नियम व वेळेचे बंधन या मुळे संबंधीत विभागाचे अधिकारी वर्ष संपण्यापूर्वी दिलेली तरतूद संपवण्याची घाई करताना दिसतात.

ड)विविध विकासाच्या योजनासाठी घेतलेली कर्ज त्यांची परतफेड व व्याजाचे हप्ते, त्या त्या योजनेवर खर्च न टाकल्यामुळे योजनाचे मूल्य कमी दिसून येते. व अंतिम उपभोगकत्याकडून कराच्या रूपाने वसूल करावयाची

PREVIEW

किंमत अपुरी राहते.

10) सन 2015-2016 च्या अंदाजपत्रकात एखाद्या लेखाशीर्षाखाली तरतूद केली असतना, देयकाची संपूर्ण रक्कम पारित/वितरीत न करता अंशत:प्रदान का करणेत येते. या बाबत खुलासा सादर करावा. रकमा प्रदान करतना संबंधिताना निव्वळ रक्कम प्रदान करण्यात येते व शासकीय वजावटीच्या रक्कमा विलंबाने भरणा करण्यात येतो.

11) मनपाची आर्थिक स्थिती प्रामुख्याने स्वउत्पनावर व त्यामधून झालेल्या खर्चावर आधारित असून विकास व सुधारणात्मक कामे करण्यासाठी मनपाने त्यांचे कार्यक्षेत्रातील विविध स्त्रोत ओळखून त्याचे बळकटी करण करणे आवश्यक असते.मनपाने मालमत्तेचे सर्वेक्षण फेरमुल्यांकन करणे, विविध कराचे पुनर्निर्धारण करणे आवश्यक होते. विविध कराचे फेरलोकन करून सन 2015-2016 चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. परंतु प्रत्यक्षात सुधारित कर व दराची आकारणी करण्यात आली नसल्यामुळे मनपाची स्थिती कमकुवत असल्याची दिसून येते.

DATSGCF7501 (Ref No : 135, Hmm No : 1)

## *2 मनपाचे लेखे दुहेरी नोंद पद्धतीने न ठेवणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.लेखासं-10/2004/71/प्र.क्र.5/04/नवि-31,दिनांक 6.7.2005 नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखे दुहेरी नोंद पध्दतीने (Accrual Based Double Entry Accounting System) ठेवण्याबाबत सुधारणात्मक बाब म्हणून आदेशीत केले आहे. तथापि, महानगरपालिका, अमरावती येथे दुहेरी नोंद पध्दनतीने लेखे ठेवण्यात आले नाही. |

नागरी प्रशासनास सुधारणा घडवून आणणे व स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिकदृष्टया सक्षम बनविणे व त्यांची बाजारातील पत सुधारण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्र शासनाने ज्या सुधारणा करणे बंधनकारक केले आहे त्यातील अनिवार्य सुधारणामध्ये आधुनिक द्विनोंद पध्दतीने लेखे ठेवणेबाबतचा



PREVIEW

समावेश आहे.

त्यानुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.लेखासं-10/2004 /71 /प्र.क्र.5 / 04/नवि-31, दिनांक 6.7.2005 नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखे दुहेरी पध्दतीने (Accrual Based Double Entry Accounting System) ठेवण्याबाबत आदेशीत केले आहे. सदर नोंदवहया राष्ट्रीय महानगरपालिका लेखा नियम पुस्तिका (NMAM) मधील विहीत नमुन्यात ठेवणे आवश्यक आहे. परंतु खालील नोंदवहया विहीत नमुन्यात ठेवण्यात आल्या नाहीत.

| Sr.No. | CONTENTS | FORM |
|---|---|---|
| 1 | Cash Book | GEN-1 |
| 2 | Journal Book | GEN-2 |
| 3 | Ledger | GEN-3 |
| 4 | Cash Bank Receipt voucher | GEN-4 |
| 5 | Cash bank payment voucher | GEN-5 |
| 6 | Contra voucher | GEN-6 |
| 7 | Journal voucher | GEN-7 |
| 8 | Receipt | GEN-8 |
| 9 | Receipt register | GEN-9 |
| 10 | Statement on status of cheque received | GEN-10 |
| 11 | Collection register | GEN-11 |
| 12 | Summary of daily collection | GEN-12 |
| 13 | Registers of bills for payments | GEN-13 |
| 14 | Payment order | GEN-14 |
| 15 | Cheque issue register | GEN-15 |
| 16 | Register of advance | GEN-16 |
| 17 | Register of permanent advance | GEN-17 |
| 18 | Deposit register | GEN-18 |
| 19 | Summary statement of deposits adjusted | GEN-19 |
| 20 | Demand Register | GEN-20 |
| 21 | Bill of ………..income | GEN-21 |
| 22 | Summary statement of bills raised | GEN-22 |
| 23 | Register of notice fee, warrants fees, other fee | GEN-23 |
| 24 | Summary statement of notice fee, warrants fees, other fee | GEN-24 |
| 25 | Register of refunds, remissions and write off | GEN-25 |
| 26 | Summary statement refunds and remissions | GEN-26 |
| 27 | Summary statement write – off | GEN-27 |
| 28 | Statement of outstanding liability for expenses | GEN-28 |
| 29 | Documents control register + stock account of receipt / cheque book | GEN-29 |

PREVIEW

उपरोक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनांनुसार दुहेरी नोंद लेखा पध्दत अंमलबजावणीसाठी राज्य विनिर्दिष्ट लेखा संहिता तयार होईपर्यंत राष्ट्रीय लेखा नियम पुस्तिकेतील तत्वांना बाधा न आणता नगर विकास संचालनालयातील लेखा सुधारणा कक्षाचे पूर्ण संमतीने आवश्यक असल्यास त्यात किरकोळ बदल करणे व त्या अनुसार कोडींग पध्दतीचा वापर करणे अनिवार्य केले असून वार्षिक अंदाजपत्रक, ताळेबंद व Income and Expenditure Statement हे उपरोक्त सुचनेनुसार ठेवावयाचे आहे.

उपरोक्त शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांना आपले लेखे दुहेरी नोंद पध्दतीने अद्यावत ठेवण्याबाबत स्पष्ट सुचना असून महानगरपालिकांना अशा दुहेरी नोंद पध्दतीची अंमलबजावणी दिनांक 1 एप्रिल 2005 पासून अनिवार्य केली असताना महानगरपालिका, अमरावती यांनी सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाअखेर उपरोक्त लेखे दुहेरी नोंद पध्दतीने ठेवले नसल्याचे आढळून आले. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक ३ दिनांक १४/०२/२०१९ देण्यात आले असून, (NMAM) नुसार व्दिनोंद पद्धतीत अभिलेखे ठेवल्याबाबत कोणतेही अभिलेखे लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSGCF7501 (Ref No : 1, Hmm No : 02)

PREVIEW

### *3 लेखा विभागाने बांधकामाविषयीचे देयक १४ वित्त आयोगातून प्रदान केल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 31111461.00 /-

अंतिम अमान्य रक्कम रु. 31111461.00/-

१४ वित्त आयोगातून निधी खर्च करण्यास प्रशासकीय मंजुरी देण्यापूर्वी मा.आयुक्तांनी खालील बाबीची पूर्तता केली नसल्याचे दिसून येत आहे.
१ प्रस्तावित खर्च हा १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या कामांपैकीच असला पाहिजे.
२ सर्वसाधारण सभेच्या ठरावान्वये संबंधीत प्रदानाबाबत शिफारस असणे आवश्यक आहे.
बांधकामाविषयक कामे अथवा शासन कपातीचे देयके अदा बाबत खर्च करण्याच्या तरतुदी शासन निर्णयात नमूद नाही. त्यामुळे १४ वित्त आयोगातून करण्यात आलेला बांधकाम विषयक बाबीवर व शासकीय कपातीवर करण्यात आलेला खर्च रक्कम रु ३११११४६१/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

अमरावती महानगरपालिका लेखा विभागाने सन २०१५-२०१६ मध्ये खालील प्रमाणकानुसार विविध कंत्राटदारास बांधकामविषयक कामाचे व देयकातून कपात केलेल्या रक्कमा शासन खाती भरणा करण्याकरिता १४ वित्त आयोग निधीतून खालील प्रमाणे रक्कम रु ३११११४६१/- खर्च केलेला आहे.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | तपशील | कोणास प्रदान | विभाग |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 8679 | 04-11-2015 | **3245392.00** | const.of under pass road nawathe | juzar saify | बांधकाम |
| 8933-8934 | 07-11-2015 | **1100004.00** | आर्कीटेक्ट फी | संदीप जोशी | बांधकाम |
| 9871-72 | 08-12-2015 | **150372.00** | शासकीय कपाती )income tax and MVAT) | शासकीय कपाती | शासकीय कपाती |
| 12600 | 22-01-2016 | **1051122.00** | const. of CC road | saif ali baig mirza | बांधकाम |
| 13209 | 04-02-2016 | **23714.00** | शासकीय कपाती MVAT | शासकीय कपाती MVAT | शासकीय कपाती |
| 13210 | 04-02-2016 | **53124.00** | शासकीय कपाती INCOME TAX | शासकीय कपाती INCOME TAX | शासकीय कपाती |
| 13352 | 11-02-2016 | **30471.00** | छत्रीतलाव पार्क विकसित | KSD Borewell & Const. | बांधकाम |
| 13354-56 | 11-02-2016 | **1100003.00** | आर्कीटेक्ट फी | संदीप जोशी | बांधकाम |
| 13484 | 18-02-2016 | **1884645.00** | const. of CC road | saif ali baig | बांधकाम |
| 13485 | 18-02-2016 | **959423.00** | const. of CC road | mirza chotu | बांधकाम |
| 14123 | 01-03-2016 | **114104.00** | शासकीय कपाती गौण) (शुल्क खनिज | शासकीय कपाती | शासकीय कपाती |
| 14131 | 01-03-2016 | **108634.00** | शासकीय कपाती INCOME TAX | शासकीय कपाती INCOME TAX | शासकीय कपाती |

PREVIEW

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 14132 | 01-03-2016 | **67088.00** | शासकीय कपाती MVAT | शासकीय कपाती MVAT | शासकीय कपाती |
| 14589 | 03-03-2016 | **392549.00** | const. of PCC drain | shyam chaudhari | बांधकाम |
| 14805-14807 | 04-03-2016 | **2140386.00** | const. of CC road | juzar saify | बांधकाम |
| 14997 | 14-03-2016 | **395277.00** | const. of PCC drain | shyam chaudhari | बांधकाम |
| 15271 | 18-03-2016 | **1465501.00** | const. of CC road | saif ali baig | बांधकाम |
| 15323 | 22-03-2016 | **1954196.00** | const. of CC road | juzar saify | बांधकाम |
| 15450 | 28-03-2016 | **464827.00** | const. of CC road | shyam choudhry | बांधकाम |
| 15508 | 28-03-2016 | **6456876.00** | ग्रीन जिम साहित्य | Sansun Industries | बांधकाम |
| 15676-678 | 29-03-2016 | **306032.00** | शासकीय कपाती )income tax and MVAT) | शासकीय कपाती | शासकीय कपाती |
| 15775 | 30-03-2016 | **1328961.00** | const. of CC road | M.M.Monga | बांधकाम |
| 13419 | 12-02-2016 | **6318760.00** | R.O.B.payment | मेचाफेकर. अँड कंपनी | बांधकाम |
| 8679 | 04-11-2015 | **3245392.00** | const.of under pass road nawathe | juzar saify | बांधकाम |
| 8933-8934 | 07-11-2015 | **1100004.00** | आर्कीटेक्ट फी | संदीप जोशी | बांधकाम |
| 9871-72 | 08-12-2015 | **150372.00** | शासकीय कपाती )income tax and | शासकीय कपाती | शासकीय कपाती |

PREVIEW

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | MVAT) | | |
| 12600 | 22-01-2016 | **1051122.00** | const. of CC road | saif ali baig mirza | बांधकाम |
| 13209 | 04-02-2016 | **23714.00** | शासकीय कपाती MVAT | शासकीय कपाती MVAT | शासकीय कपाती |
| 13210 | 04-02-2016 | **53124.00** | शासकीय कपाती INCOME TAX | शासकीय कपाती INCOME TAX | शासकीय कपाती |
| 13352 | 11-02-2016 | **30471.00** | छत्रीतलाव पार्क विकसित | KSD Borewell & Const. | बांधकाम |
| 13354-56 | 11-02-2016 | **1100003.00** | आर्कीटेक्ट फी | संदीप जोशी | बांधकाम |
| 13484 | 18-02-2016 | **1884645.00** | const. of CC road | saif ali baig | बांधकाम |
| 13485 | 18-02-2016 | **959423.00** | const. of CC road | mirza chotu | बांधकाम |
| 14123 | 01-03-2016 | **114104.00** | शासकीय कपाती गौण) (शुल्क खनिज | शासकीय कपाती | शासकीय कपाती |
| 14131 | 01-03-2016 | **108634.00** | शासकीय कपाती INCOME TAX | शासकीय कपाती INCOME TAX | शासकीय कपाती |
| 14132 | 01-03-2016 | **67088.00** | शासकीय कपाती MVAT | शासकीय कपाती MVAT | शासकीय कपाती |
| 14589 | 03-03-2016 | **392549.00** | const. of PCC drain | shyam chaudhari | बांधकाम |
| 14805-14807 | 04-03-2016 | **2140386.00** | const. of CC road | juzar saify | बांधकाम |

PREVIEW

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 14997 | 14-03-2016 | **395277.00** | const. of PCC drain | shyam chaudhari | बांधकाम |
| 15271 | 18-03-2016 | **1465501.00** | const. of CC road | saif ali baig | बांधकाम |
| 15323 | 22-03-2016 | **1954196.00** | const. of CC road | juzar saify | बांधकाम |
| 15450 | 28-03-2016 | **464827.00** | const. of CC road | shyam choudhry | बांधकाम |
| 15508 | 28-03-2016 | **6456876.00** | ग्रीन जिम साहित्य | Sansun Industries | बांधकाम |
| 15676-678 | 29-03-2016 | **306032.00** | शासकीय कपाती )income tax and MVAT) | शासकीय कपाती | शासकीय कपाती |
| 15775 | 30-03-2016 | **1328961.00** | const. of CC road | M.M.Monga | बांधकाम |
| 13419 | 12-02-2016 | **6318760.00** | R.O.B.payment | मेचाफेकर. अँड कंपनी | बांधकाम |
| | एकूण | **31111461.00** | | | |

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक शासन निर्णय क्र. टीएफसी ८०१५/प्र.क्र.१०६ /नवि-४ दिनांक ०३.०८.२०१५ नुसार १४ वित्त आयोगाचा निधी हा परिच्छेद (II)(I) मध्ये नमूद केलेल्या बाबीवरच खर्च करता येतो. बांधकामाविषयक कामे अथवा शासन कपातीचे देयके अदा बाबत खर्च करण्याच्या तरतुदी शासन निर्णयात नमूद नाही. तसेच शासन निर्णयातील परिच्छेद (III)(१)(अ) नुसार मा.आयुक्तांना १४ वित्त आयोगातून निधी खर्च करण्यास प्रशासकीय मंजुरी देण्यापूर्वी प्रस्तावित खर्च हा खालील बाबीची पूर्तता करीत असल्याची खात्री करणे आवश्यक असतांना,तशी तपासणी न करता मा.आयुक्तांनी खर्चास मंजुरी प्रदान केल्याचे दिसून येत आहे.

१ प्रस्तावित खर्च हा १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या कामांपैकीच असला पाहिजे.

२ सर्वसाधारण सभेच्या ठरावान्वये संबंधीत प्रदानाबाबत शिफारस असणे आवश्यक आहे.

त्यामुळे १४ वित्त आयोगातून बांधकाम विषयक कामावर करण्यात आलेला खर्च रक्कम रु ३११११४६१/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही. तरी १४ वित्त आयोगातून खर्च करण्यात आलेली रक्कम रु



PREVIEW

३११११४६१/- १४ वित्त आयोगाच्या खात्यात त्वरित वळती करण्यात यावे.
उपरोक्त सर्व बाबीकरिता अर्धसमास पत्र क्रमांक ११० दिनांक १५/०९/२०२० निर्गमित करण्यात आले असून, संयुक्तिक खुलासा प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 47, Hmm No : 110)

## *4 अंतर्गत लेखापरीक्षण व प्रलंबित परिच्छेदाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 4**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

अमरावती महानगरपालिकेने सन 2015-2016 चे अंतर्गत लेखापरीक्षणाबाबत, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 106 चे पालन केले नाही .तसेच महालेखाकार व स्थानिक निधी लेखापरीक्षा,औरंगाबाद यांचेकडील प्रलंबित आक्षेप वगळून घेणेबाबत प्रभावी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 9 चे कलम 106 (3) अन्वये प्रत्येक सरकारी वर्ष सुरु झालेवर मुख्यलेखा परीक्षकाने मागील वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. तसेच कलम 106 (4) प्रमाणे आयुक्ताने उक्त अहवाल छापून त्याची प्रत प्रशासन अहवालाच्या व लेखा विवरण प्रत्राच्या छापील प्रतीसह प्रत्येक सदस्यास पाठविण्याची व्यवस्था केली पाहिजे. अशी तरतूद आहे. परंतु अमरावती महानगरपालिकेने सन 2015-2016 वर्षाचे लेख्यावरील अहवाल झोन क्रमांक 1,2,व 4 वगळता स्थायी समितीस सादर केला नाही.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 105 नुसार मनपाचे लेख्यांची साप्ताहिक तपासणी करून अभिप्राय स्थायी समितीस कळविण्याबाबत तरतूद असतना त्याप्रमाणे कार्यवाही झालेचे दिसून येत नाही.

2) महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियमा मधील कलम 106 नुसार नियमबाह्य प्रकरणाची माहिती व त्यावरील सविस्तर अहवाल स्थायो समितीस सादर करणे अभिप्रीत असतना त्या प्रमाणे विभागाने कार्यवाही केली नाही.

3) सन 2015-2016 वर्षाच्या लेखापरीक्षणाचे वेळी महानगरपालिकेचे खालील लेखाआक्षेप प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे.

| अ.क्र. | लेखापरीक्षण विभाग | लेखापरीक्षण वर्ष | एकूण आक्षेप | मान्य आक्षेप | शिल्लक आक्षेप |
|---|---|---|---|---|---|
| 1 | महालेखाकार, नागपूर | 1995-2013- | 169 | 19 | 150 |
| | एकूण | | 169 | 19 | 150 |
| | स्थानिक निधी लेखा परीक्षा औरंगाबाद | | | | |
| 1 | स्थानिक निधी लेखापरीक्षा | 2011-2012 | 149 | 0 | 149 |
| 2 | स्थानिक निधी लेखापरीक्षा | 2012-2013 | 133 | 0 | 133 |
| 3 | स्थानिक निधी लेखापरीक्षा | 2013-2014 | 156 | 0 | 156 |
| 4 | स्थानिक निधी लेखापरीक्षा | 2014-2015 | 148 | 0 | 147 |
| | एकूण | | 586 | 0 | 586 |

सन 2015-2016 अखेर स्थानिक निधी लेखापरीक्षा, औरंगाबाद याचेकडील 586 परिच्छेद प्रलंबित आहेत तरी लवकरात लवकर परीच्छेद निकाली काढण्याबाबत प्रयत्न करण्यात यावेत

DATSGCF7501 (Ref No : 78, Hmm No : 161)

PREVIEW

## *5 अपंग कल्याण निधी अंतर्गत खर्चातील अनियमितताबाबत*

**0**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष :232 अपंगांसाठी सोईसु महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 72698.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 72698.00/-

महापौर यांचे वैयक्तीक नावाचे बिजक पारीत केले आहे, बुट व मोजे खरेदीसाठी दरपत्रके मागवलेली नाहीत, बुट व मोजे विद्यर्थ्यांना वाटप केल्याबाबत वाटप रजीष्टर दर्शवले नाही, शासन निर्णया दर्शवल्याप्रमाणे विवक्षीत बाबीवरच खर्च केल्याची पडताळणी करता आली नाही, वितरीत अनुदान योग्यरित्या खर्च केल्याबाबत उपयोगीता प्रमाणपत्र घेतलेले नाही, अनुदानाची रक्कम थेट लाभार्थ्याच्या खात्यात NEFT/RTGS द्वारे जमा केलेली नाही, दोन मुळ प्रमाणके व त्यासंबंधीची अभिलेखे दर्शवली नाही, अंदाजपत्रकातील उत्पन्नाच्या प्रमाणात तरतुद केलेली नाही व केलेली तरतुद रकमेपेक्षा खुप कमी खर्च केल्यामुळे अपंग समुहाला लाभापासुन वंचीत राहावे लागले आहे.

महानगरपालीका अमरावतीचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात सादर केलेल्या अंदाजपत्रक व सर्वसाधारण रोखपुस्तीकेप्रमाणे अपंग कल्याण विकास निधी अंतर्गत निवड महिन्यात खालील प्रमाणकान्वये खर्च नोंदवल्याचे आढळून आले.

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| 01 | 12626 | 25.01.2016 | 17698 | श्री.लक्ष्मी ट्रेडर्स कडुन बुट व मोजे खरेदी |
| 02 | 14560 | 03.03.2016 | 25000 | रामविजय जाधव, राष्ट्रीय दृष्टीहिन संघ |
| 03 | 14575 | 03.03.2016 | 10000 | विनोद कोल्हे, स्वयंरोजगाराकरिता |
| 04 | 14576 | 03.03.2016 | 10000 | सुनिता कोल्हे, स्वयंरोजगाराकरिता |
| 05 | 15320 | 22.03.2016 | 10000 | रविंद्र इंगळे, अनुदान |
| | | एकुण | 72698 | |

यावर पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. लेखापरीक्षणात उपरोक्त अ.क्र.01 चे प्रमाणकाची तपासणी केली असता सदरील प्रमाणकान्वये नुतन मुकबधीर विद्यालय (निवासी), अंबिकानगर येथील 60 विद्यार्थ्यांना बुट व मोजे देण्याबाबतचे बिजक आढळून आले सदरील बिजक महापौर सौ.चरणजीतकौर नंदाजी यांचे नावे आहे याबाबत सदरील महापौर यांचे वैयक्तीक नावाचे देयक पारीत करण्याबाबत प्राधीकार दर्शवणे आवश्यक आहे.

2. उपरोक्त क्र.01 चे खरेदीसाठी उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4 दि.30 ऑक्टोबर 2015 मधील 3.2.3 नुसार दरपत्रके मागवल्याचे आढळून आले नाही, खरेदी केलेली बुट व मोजे संबंधीत विद्यार्थ्यांना वाटप केल्याबाबत वाटप रजीष्टर दर्शवणे आवश्यक आहे तसेच करण्यात आलेली खरेदी रास्त भावाने केल्याबाबत खात्री पटवणे आवश्यक आहे.

3. उपरोक्तपैकी अ.क्र.02 चे प्रमाणकाची तपासणी केली असता अपंग विवाह परिचय मेळावा करीता अनुदान अदा केल्याबाबत आढळून आले तथापी नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2015/प्र.क्र.118/नवि-20 दिनांक 28 ऑक्टोबर 2015 मधील मार्गदर्शक सुचना एक मधील 13 नुसार अपंगांच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करण्याची तरतुद असताना विवाह परिचय मेळाव्यासाठी अनुदान वाटपाबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच उक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचना दोन मधील 1 ते चार बाबींचे पालन केल्याची खात्री पटवणे आवश्यक आहे.

4. अ.क्र.02 चे प्रमाणकाचे अनुषंगाने लेखापरीक्षणासाठी सादर अभिलेख्यांची तपासणी केली असता त्यात सदरील मेळाव्यासाठी किती युवक/युवती तसेच ईतर लोक उपस्थीत होते याची खात्री करता आली नाही तसेच सदरील कार्यक्रमाचे फोटो अथवा प्राप्त अनुदानाचे उपयोगीता प्रमाणपत्र दर्शवणे आवश्यक आहे.

5. लेखापरीक्षणात उपरोक्तपैकी अ.क्र.05 चे प्रमाणकाची तपासणी केली असता संबंधीत अपंगाचे मागणी अर्जावर अंगठा आढळून आला आहे तर देयकावर स्वाक्षरी आढळून आली आहे नगरविकास विभाग शासन



PREVIEW

निर्णय क्रमांक संकिर्ण-2015/प्र.क्र.118/नवि-20 दिनांक 28 ऑक्टोबर 2015 मधील मार्गदर्शक सुचना 3 नुसार अनुदानाची रक्कम थेट लाभार्थ्याच्या खात्यात NEFT/RTGS द्वारे जमा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाल्याचे आढळुन आले नाही याबाबत खुलासा करावा.

6. उपरोक्तपैकी अ.क्र.03 व 04 ची मुळ प्रमाणके व अनुषंगीक अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केली नाही त्यामुळे सदर खर्चाची पडताळणी करता आली नाही. लेखापरीक्षणासाठी अभिलेखे न दर्शवणे हि गंभीर बाब असुन लेखापरीक्षणास अभिलेखे सादर न केल्यामुळे महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 (सुधारीत 2011) चे कलम 8 नुसार दंडात्मक कार्यवाही होणे आवश्यक आहे.

7. अपंग व्यक्तींसाठी समान संधी संरक्षण व समान सहभाग कायदा 1995 मधील कलम 40,42 व 43 नुसार महानगरपालीका क्षेत्रामध्ये प्राप्त झालेल्या महसुली उत्पन्नाच्या 3 टक्के रक्कम अपंगाकरीता वैयक्तीक लाभ् योजनांवर खर्च करणे आवश्यक आहे लेखापरीक्षणाकरिता महानगरपालीकेने उपलब्ध करुन दिलेल्या वार्षीक अहवाल/अंदाजपत्रका प्रमाणे सन 2015-2016 चे एकुण महसुली उत्पन्न रु.2142672600/- एवढे असून त्याच्या 3 टक्के रक्कम रु.64280178/- एवढी तरतुद करुन तेवढाच खर्च करणे आवश्यक असताना रक्कम रु.4000000/- एवढी तुटपुंजी तरतुद केली आहे तर प्रत्यक्षात केवळ रु.130732/- एवढाच खर्च केला आहे हि बाब शासन निर्देशांचे उल्लंघन असुन विशिष्ट समाज घटकांच्या उत्थानासाठी आवश्यक निधी अन्य खर्चासाठी वळविण्यात आल्यामुळे सदरील घटक मिळणा-या लाभापासुन वंचीत राहीला आहे याबाबत अनुशेष भरुन काढून खुलासा होणे आवश्यक आहे.

उपरोक्त अनियमिततांबाबत अर्धसमासपत्र क्र.159 दिनांक 08.10.2020 अन्वये खुलासा मागवूनही खुलासा केलेला नाही.

DATVPWM6902 (Ref No : 27, Hmm No : 159)

## *6 बडनेरा प्रभागात विवाह नोंदणी प्रकरणात झालेली अनियमितता*

**प्रभाग क्रमांक ४ बडनेरा**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 02**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| बडनेरा प्रभागाच्या विवाह निबंधकाने मुलीचे वय १८ वर्षापेक्षा कमी असतांना काही प्रकरणात त्यांच्या विवाहाची नोंदणी करून त्यांना कायदाबाह्य विवाह नोंदणी प्रमाणपत्र निर्गमित केले आहे. बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ मधील कलम ११ नुसार २ वर्ष कठोर कारावास अथवा एक लाख रुपये दंड अथवा |

PREVIEW

| |
|---|
| दोन्ही तरतुदी नमूद आहेत. तरी विवाह निबंधकावर व संबंधित लिपिकावर कायदेशीर कार्यवाही होणे आवश्यक आहे. |

अमरावती महानगरपालिकेच्या सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात बडनेरा प्रभागातील निवडक महिन्याच्या विवाह नोंदणी प्रकरणात खालील अनियमितता निदर्शनास आलेली आहे.

१ श्री. डोंगरे वंदन करमलाल व श्रीमती.खोब्रागडे प्रिया सुधाकर यांचा विवाहाची नोंद खंड क्रमांक २ नोंदणी क्रमांक २२३ दिनांक १-०९-२०१५ वर घेण्यात आलेली आहे. त्यांचा विवाह दिनांक १०-०६-२००७ आहे. वर-वधू त्यांचे वयाच्या दाखल्याची तपासणी केली असता, श्रीमती खोब्रागडे प्रिया सुधाकर यांचे कन्या विद्यालय बडनेरा टी.सी. क्रमांक ३४९५ दिनांक ०२-१२-२०१४ वरील नोंदी नुसार त्यांची जन्म तारीख दिनांक ०७-०८-१९९१ आहे. त्यांच्या विवाह दिनांकास १८ वर्ष पूर्ण होत नाही.

२ श्री. मडकाम संदीप गोविंदराव व श्रीमती जुन्नाके मीनाक्षी उत्तमराव यांचा विवाहाची नोंद खंड क्रमांक ३ नोंदणी क्रमांक ५६५ दिनांक २५-०२-२०१६ वर घेण्यात आलेली आहे.त्यांचा विवाह दिनांक २८-०६-२००५ आहे. श्रीमती जुन्नाके मीनाक्षी उत्तमराव यांचे शारदा कन्या विद्यालय अँड ज्यू. कॉलेज शारदा नगर अमरावती येथील टी.सी. क्रमांक ९०७/५५ दिनांक ०६-०६-२०१३ वरील नोंदी नुसार जन्म तारीख दिनांक १६-०३-१९८९ आहे. त्यांच्या विवाह दिनांकास १८ वर्ष पूर्ण होत नाही.

तरी देखील प्रभाग विवाह निबंधकानी उपरोक्त दोन्ही प्रकरणात त्यांच्या विवाहाची नोंदणी करून त्यांना कायदाबाह्य विवाह नोंदणी प्रमाणपत्र निर्गमित केले आहे. बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ मधील कलम ११ नुसार २ वर्ष कठोर कारावास अथवा एक लाख रुपये दंड अथवा दोन्ही तरतुदी नमूद आहेत. तरी विवाह निबंधका वर व संबंधित लिपिकावर कायदेशीर कार्यवाही होणे आवश्यक आहे.

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक ७८ दिनांक २७/०२/२०२० देण्यात आले आहे.प्राप्त खुलासा संयुक्तिक नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 28, Hmm No : 78)

PREVIEW

## *7 प्रभाग क्रमांक १ रामपुरी कॅम्प येथील विवाह नोंदणी प्रमाणपत्र व मालमत्ता हस्तांतरण प्रकरणात आढळून आलेल्या अनियमितता*

**प्रभाग क्रमांक १ रामपुरी कॅम्प**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 02**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 45940.00 /-

| |
|---|
| १ प्रभाग क्रमांक १ रामपुरी कॅम्प यांचे सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात विवाह नोंदणी फी वसुलीबाबत चालन बुक व दैनिक भरणा रजिस्टर लेखापरीक्षणास सादर करण्यात आला नाही.<br>२ विवाह नोंदणी फी वसुली लिपिकाने वारंवार वसुली पावत्यावर खाडाखोड करून रक्कमेचा अपहार केल्याचे दिसून येत आहे. |

अमरावती महानगरपालिका प्रभाग क्रमांक १ रामपुरी कॅम्प यांचे सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात विवाह नोंदणी फी वसुली व मालमत्ता हस्तांतरण प्रकरणात खालील अनियमितता निदर्शनास आलेली आहे.

१. विवाह नोंदणी शुल्क वसुली पावती पुस्तक बुक क्रमांक १२०४ मध्ये पावती क्रमांक ७ रक्कम १५०/- पावती क्रमांक ८ रक्कम २५०/- पावती क्रमांक ९ रक्कम २५०/- व पावती क्रमांक १० रक्कम २५०/-असे एकूण रक्कम रु ९००/- जमा करणे आवश्यक असतांना संबंधित लिपिकाने रक्कम रु ८५०/- जमा केल्याचे पावतीच्या मागील पृष्ठावरील नोंदी वरून दिसून येत आहे. तरी रक्कम रु ५०/- संबंधिताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

पावती पुस्तक बुक क्रमांक १२०४ मधील पावती क्रमांक ३० तपासले असता, पावतीत अक्षरी रक्कम रु दोनशे पन्नास नमूद असून अंकात खाडाखोड करून रक्कम रु १५०/- जमा केल्याचे दिसून आले आहे.

पावती क्रमांक ४० तपासले असता, पावतीत अक्षरी रक्कम रु दोनशे पन्नास नमूद असून अंकात खाडाखोड करून रक्कम रु ५०/- जमा केल्याचे दिसून आले आहे.

पावती क्रमांक ५४ तपासले असता, पावतीत अक्षरी रक्कम रु दोनशे पन्नास नमूद असून अंकात खाडाखोड करून रक्कम रु ५०/- जमा केल्याचे दिसून आले आहे.

पावती क्रमांक ५५ तपासले असता, पावतीत अक्षरी रक्कम रु दोनशे पन्नास नमूद असून अंकात खाडाखोड करून रक्कम रु ५०/- जमा केल्याचे दिसून आले आहे.

पावती क्रमांक ७७ तपासले असता, पावतीत अक्षरी रक्कम रु एकशे पन्नास नमूद असून अंकात खाडाखोड करून रक्कम रु ५०/- जमा केल्याचे दिसून आले आहे.

पावती क्रमांक ८७ तपासले असता, पावतीत अक्षरी रक्कम रु दोनशे पन्नास नमूद असून अंकात खाडाखोड करून रक्कम रु १५०/- जमा केल्याचे दिसून आले आहे.

पावती क्रमांक ९८ तपासले असता, पावतीत अक्षरी रक्कम रु एकशे पन्नास नमूद असून अंकात खाडाखोड करून रक्कम रु ५०/- जमा केल्याचे दिसून आले आहे.

PREVIEW

पावती क्रमांक ९९ तपासले असता, पावतीत अक्षरी रक्कम रु दोनशे पन्नास नमूद असून अंकात खाडाखोड करून रक्कम रु १५०/- जमा केल्याचे दिसून आले आहे.

पावती पुस्तक क्रमांक १२१६ पावती क्रमांक ११ पावतीत अक्षरी रक्कम रु एकशे पन्नास नमूद असून अंकात खाडाखोड करून रक्कम रु ५०/- जमा केल्याचे दिसून आले आहे.

पावती पुस्तक क्रमांक १२१६ पावती क्रमांक २० पावतीत अक्षरी रक्कम रु दोनशे पन्नास नमूद असून अंकात खाडाखोड करून रक्कम रु ५०/- जमा केल्याचे दिसून आले आहे.

पावती पुस्तक क्रमांक १२१६ पावती क्रमांक २२ पावतीत अक्षरी रक्कम रु एकशे पन्नास नमूद असून अंकात खाडाखोड करून रक्कम रु ५०/- जमा केल्याचे दिसून आले आहे.

पावती पुस्तक क्रमांक १२१६ पावती क्रमांक ७१ पावतीत अक्षरी रक्कम रु दोनशे पन्नास नमूद असून अंकात खाडाखोड करून रक्कम रु १५०/- जमा केल्याचे दिसून आले आहे.

तरी उपरोक्त पावत्यात संबंधित लिपिकाने खाडाखोड करून रक्कमेचा अपहार केल्याचे दिसून येत आहे. तरी संबंधिताची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.

२ . प्रभाग क्रमांक १ रामपुरी कॅम्प अंतर्गत सन २०१५-२०१६ मध्ये निर्गमित करण्यात आलेल्या विवाह नोंदणी प्रमाणपत्रासंबंधी विवाह नोंदणी पावती पुस्तकांची तपासणी केली असता,प्रभागाने सन २०१५-२०१६ मध्ये रक्कम रु ४५९४०/- वसूल केल्याचे दिसून येत आहे. परंतु सदर रक्कम प्रथम मनपा निधीत जमा केल्याचे चालन पुस्तक व भरणा रजिस्टर लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही.

विवाह नोंदणी प्रमाणपत्रासंबंधी विवाह नोंदणी खंड पुस्तक व विवाह नोंदणी प्रकरणे लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक ४२ दिनांक २३/०१/२०२० देण्यात आले आहे.खुलासा अप्राप्त झाल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 31, Hmm No : 42)

PREVIEW

## *8 स्थानिक संस्था कर सहाय्यक अनुदान अल्प प्रमाणात मंजूर झाल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम  : 9अ*

| |
|---|
| अमरावती महानगरपालिका स्थानिक संस्था कर विभागाने वसुलीबाबत योग्य नियोजन करून वसुली कार्यवाही केली नसल्यामुळे स्थानिक संस्था कराचे उत्पन्न कमी झाले. त्यामुळे स्थानिक संस्था कर बंद झाल्यानंतर राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आलेले सहाय्यक अनुदान देखील अत्यल्प आहे. परिणामी अमरावती महानगरपालिकेचे स्थानिक संस्था कर विभागाच्या वसुलीबाबत असलेल्या उदासीनतेमुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे. |

महानरपालिका अमरावती स्थानिक संस्था कर विभागाने सन २०१५-२०१६ मध्ये, महाराष्ट्र शासन अधिसूचना स्थासंक २०१५/प्र.क्र.४७/२०१५ नवि-३२ दिनांक ०१.०८.२०१५ अन्वये माहे जुलै-१५ अखेर पासून स्थानिक संस्था कर बंद केले असल्यामुळे शहरातील ज्या व्यापाऱ्यांचे माहे-जुलै-२०१५ अखेर पर्यंत कर निर्धारण प्रलंबित असतील त्याबाबत योग्य नियोजन करून व्यापाऱ्यांचे कर निर्धारण करून स्थानिक संस्था कर वसूल करणे आपेक्षित असतांना, विभागाने स्थानिक संस्था कर वसुली बाबत उदासीनता दर्शविले आहे. अमरावती महानगरपालिकेचे स्थानिक संस्था कर उत्पन्न कमी झाले असल्यामुळे राज्य शासनाकडून देखील अत्यल्प ७.१४ कोटी प्रती माहे स्थानिक संस्था कर सहाय्यक अनुदान मंजूर झाल्यामुळे अमरावती महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक १२१ दिनांक १८ /०९/२०२० देण्यात आले आहे. संयुक्तिक खुलासा अप्राप्त झाल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 40, Hmm No : 121)

PREVIEW

## *9 माहिती व जनसंपर्क विभागामार्फत वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येत असलेले जाहिरातीबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 4**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम  : 9अ*

गुंतलेली रक्कम  रु. 4888.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2640.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2248.00/-

माहिती व जनसंपर्क विभाग अमरावती महानगरपालिकेच्या सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात खालील अनियमितता निदर्शनास आलेले आहे.
१ अमरावती महानगरपालिकेने इंग्रजी भाषेतील जाहिरीती करिता त्या वर्गातील वृत्तपत्र उपलब्ध नसल्यास खालच्या दर्जाकडे न वळता मराठी भाषेच्या वृत्तपत्रात इंग्रजी भाषेतील जाहिरात देण्यात आले आहे. त्यामुळे जाहिरातीचा मूळ उद्देश सफल झालेला नाही.
२ जाहिरात देयकातील जाहिरातीचा आकार व प्रत्येक्ष वृत्तपत्रातील जाहिरातीचा आकार यात तफावत दिसून येत आहे. तरी जादा जाहिरातीचा आकार दर्शवून उचल केलेली जादा रक्कम रु २२४८/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.
३ जनसंपर्क अधिकारी यांचे आदेशातील जाहिरात आकारापेक्षा जास्त आकाराचे जाहिरात प्रसिध्द करून जादा रक्कम उचल केलेली आहे. तरी जादा उचल रक्कम रु २६४०/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे.
४ अमरावती महानगरपालिकेने सन २०१५-२०१६ महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक पीयुवी -१०००/प्र.क्र.७३/२०००/३४ दिनांक १/०५/२००१ मधील जोडपत्र अ नियम ६ नुसार समान तत्वावरील वाटप धोरणाचे पालन केलेले नाही.

PREVIEW

अमरावती महानगरपालिका सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाच्या माहिती व जनसंपर्क विभागामार्फत पारित करण्यात आलेल्या वृत्तपत्र जाहिरातीचे देयकांची लेखापरीक्षण केले असता, खालील बाब निदर्शनास आलेली आहे.

१ महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक पीयुवी -१०००/प्र.क्र.७३/२०००/३४ दिनांक १/०५/२००१ मधील जोडपत्र अ नियम ५ फ नुसार जाहिरातीच्या भाषेबाबत एखाद्या विभागाने शिफारस केली असेल तर, अशा प्रकरणात शासन निर्णय १/०५/२००१ मधील नियम ३-ब नुसार त्या वर्गातील वृत्तपत्र उपलब्ध नसेल तर त्या खालच्या वर्गाच्या वृत्तपत्रात जाहिरात वितरीत करणे आवश्यक असतांना, अमरावती महानगरपालिकेने इंग्रजी भाषेतील जाहिरीती करिता त्या वर्गातील वृत्तपत्र उपलब्ध नसल्यास खालच्या दर्जाकडे न वळता मराठी भाषेच्या वृत्तपत्रात इंग्रजी भाषेतील जाहिरात देण्यात आले आहे. त्यामुळे जाहिरातीचा मूळ उद्देश सफल झालेला नाही.

उदाहरणादाखल निवडक महिन्याच्या लेखापरीक्षणात खालील जाहिराती

a. प्रमाणक क्रमांक १४९१८ दिनांक ९-३-२०१६ रक्कम ३७५००/- दैनिक तरुण भारत

जनसंपर्क अधिकारी यांचे आदेश क्रमांक ३१८/१५ दिनांक ९/११/२०१५ नुसार दिनांक १०/११/२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात ही इंग्रजी भाषेतून असून ती मराठी भाषेतील दैनिक तरुण भारत मध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे. त्यामुळे जाहिरातीचा मूळ उद्देश सफल झालेला नाही.

b प्रमाणक क्रमांक १५०५६ दिनांक १४-३-२०१६ रक्कम ११४७१६/- दै. विदर्भ मतदार

.जनसंपर्क अधिकारी यांचे आदेश क्रमांक ३१/१४ दिनांक २३/०५/२०१४ नुसार दिनांक २६/०५/२०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात ही इंग्रजी भाषेतून असून ती मराठी भाषेतील दैनिक विदर्भ मतदार मध्ये प्रसिध्द

करण्यात आले आहे. त्यामुळे जाहिरातीचा मूळ उद्देश सफल झालेला नाही.

c प्रमाणक क्रमांक १४८१९ दिनांक ४-३-२०१६ रक्कम १९२४०/- दै. भारत की आन बान

जनसंपर्क अधिकारी यांचे आदेश क्रमांक ३४६/१५ दिनांक १२/०३/२०१५ नुसार दिनांक १३/०३/२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात ही मराठी भाषेतून असून ती हिंदी भाषेतील दैनिक भारत की आन बान मध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे. त्यामुळे जाहिरातीचा मूळ उद्देश सफल झालेला नाही.

d प्रमाणक क्रमांक १५११९ दिनांक १६-३-२०१६ रक्कम ३५३१६/- दै. प्रेरणापुंज (हिंदी)

जनसंपर्क अधिकारी यांनी आदेश क्रमांक ३८२/१५ दिनांक १७-१२-१५,१७१/१५ दिनांक १८-४-१५,२३२/१४ दिनांक ३०-१२-१४,२८५/१३ दिनांक १७-१२-१३,४१२/१६ दिनांक ४/१/१६,२६०/१५ दिनांक ९-१०-१५,३५४/१५ दिनांक २-१२-२०१५,३२२/१५ दिनांक १०-११-१५,३०७/१५ दिनांक ४-११-१५,२४४/१५ दिनांक २९/९/१५ नुसार विविध दिनांकास दै. प्रेरणापुंज (हिंदी) वृत्तपत्रात मराठी भाषेतील जाहिरात प्रसिध्द करण्यात आले आहे. हिंदी भाषेच्या वृत्तपत्रात मराठी भाषेतून जाहिरात प्रसिध्द केल्यामुळे जाहिरातीचा मूळ उद्देश सफल झालेला नाही.

तरी शासन निर्णय दिनांक १/०५/२००१ मधील तरतुदीनुसार ज्या भाषेतील वृत्तपत्र आहे त्याच भाषेत जाहिरात देणे आवश्यक आहे.

२. निवडक महिन्याच्या तपासणीत खालील काही प्रकरणात देयकातील जाहिरातीचा आकार व प्रत्येक्ष वृत्तपत्रातील जाहिरातीचा आकार यात तफावत दिसून येत आहे. तरी जादा जाहिरातीचा आकार दर्शवून उचल केलेली जादा रक्कम रु २२४८/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

a प्रमाणक क्रमांक १४८१९ दिनांक ४-३-२०१६ रक्कम १९२४०/- दै. भारत की आन बान

दै.भारत की आन बान यांचे देयक क्रमांक ३७४ दिनांक १४/०३/२०१५ नुसार दिनांक १३/०३/२०१५ रोजी ६०० चौमी आकाराचे जाहिरात देण्यात आले आहे. वृत्तपत्रातील प्रत्येक्ष जाहिरातीची तपासणी केली असता, जाहिरातीचा कमाल आकार ४६*१२ =५७६ चौमी येत असतांना देयकात ४८ चौमी जादा आकार दर्शवून रक्कम रु ६२४/- जादा उचल केलेले आहे. तरी जादा उचल रक्कम रु ६२४/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

b प्रमाणक क्रमांक १५०८४ दिनांक १६-३-२०१६ रक्कम २०१६०/- दै. जनमाध्यम

दै. जनमाध्यम यांचे देयक क्रमांक ४४९ दिनांक २९/०७/२०१४ नुसार दिनांक २९/०७/२०१४ रोजी १२० चौमी आकाराचे जाहिरात देण्यात आले आहे. वृत्तपत्रातील प्रत्येक्ष जाहिरातीची तपासणी केली असता, जाहिरातीचा कमाल आकार ८*१३ =१०४ चौमी येत असतांना देयकात १६ चौमी जादा आकार दर्शवून रक्कम १४ रु प्रतीचौमी दराने रु २२४/- जादा उचल केलेले आहे. तरी जादा उचल रक्कम रु २२४/-वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

C प्रमाणक क्रमांक १५७५१ दिनांक ३०-३-२०१६ रक्कम ५०६००/- दै. मातृभूमी

दै. मातृभूमी यांचे देयक क्रमांक 15-16/D/01584 दिनांक २१/११/२०१५ नुसार दिनांक ०५/११/२०१५ रोजी ४८० चौमी आकाराचे जाहिरात देण्यात आले आहे. वृत्तपत्रातील प्रत्येक्ष जाहिरातीची तपासणी केली असता, जाहिरातीचा आकार २५*१६ =४०० चौमी येत असतांना देयकात ८० चौमी जादा आकार दर्शवून रक्कम १० रु प्रतीचौमी दराने रु ८००/- जादा उचल केलेले आहे. तरी जादा उचल रक्कम रु ८००/-वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

PREVIEW

दै. मातृभूमी यांचे देयक क्रमांक 15-16/D/01110 दिनांक ०२/१०/२०१५ नुसार दिनांक ३०/०९/२०१५ रोजी २४० चौमी आकाराचे जाहिरात देण्यात आले आहे. वृत्तपत्रातील प्रत्येक्ष जाहिरातीची तपासणी केली असता, जाहिरातीचा आकार १५*१२ =१८० चौमी येत असतांना देयकात ६० चौमी जादा आकार दर्शवून रक्कम १० रु प्रतीचौमी दराने रु ६००/- जादा उचल केलेले आहे. तरी जादा उचल रक्कम रु ६००/-वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

३ वृत्तपत्रातील जाहिरात देयकाची तपासणी केली असता, काही प्रकरणात जनसंपर्क अधिकारी यांचे आदेशातील जाहिरात आकारापेक्षा जास्त आकाराचे जाहिरात प्रसिध्द करून जादा रक्कम उचल केलेली आहे. तरी जादा उचल रक्कम रु २६४०/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

उदाहरणादाखल निवडक महिन्याच्या लेखापरीक्षणात खालील जाहिराती

a प्रमाणक क्रमांक १५०८१ दिनांक १६-३-२०१६ रक्कम १३६८०/- दै. अमरावती खबर

जनसंपर्क अधिकारी यांचे आदेश क्रमांक २३२/१४ दिनांक ३०/१२/२०१४ नुसार दिनांक ३०/१२/२०१४ रोजी जाहिरात आकार १२*३५ =४२० चौमी प्रसिद्धीचे आदेश दिले असतांना, दै. अमरावती खबर यांचे देयक क्रमांक १४१ दिनांक ३१/१२/२०१४ नुसार दिनांक ३१/१२/२०१४ रोजी ६०० चौमी आकाराचे जाहिरात देण्यात आले आहे. तरी आदेशापेक्षा जास्त आकाराच्या जाहिरातीवरील खर्च रक्कम रु १८० चौमी* ६/- =१०८०/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

b प्रमाणक क्रमांक १४८१९ दिनांक ४-३-२०१६ रक्कम १९२४०/- दै. भारत की आन बान

जनसंपर्क अधिकारी यांचे आदेश क्रमांक ३४६/१५ दिनांक १२/०३/२०१५ नुसार दिनांक १३/०३/२०१५ रोजी जाहिरात आकार १२*४० =४८० चौमी प्रसिद्धीचे आदेश दिले असतांना, दै.भारत की आन बान यांचे देयक क्रमांक ३७४ दिनांक १४/०३/२०१५ नुसार दिनांक १३/०३/२०१५ रोजी ६०० चौमी आकाराचे जाहिरात देण्यात आले आहे. तरी आदेशापेक्षा जास्त आकाराच्या जाहिरातीवरील खर्च रक्कम रु १२० चौमी*१३/- =१५६०/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

४ महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक पीयुवी -१०००/प्र.क्र.७३/२०००/३४ दिनांक १/०५/२००१ मधील जोडपत्र अ नियम ६ नुसार जाहिरात वितरीत करतांना समान तत्वावरील वाटपाच्या धोरणाचा कटाक्षाने अंमलबजावणी करणे आवश्यक असतांना,अमरावती महानगरपालिकेने सन २०१५-२०१६ मध्ये तशी कार्यवाही केली नसल्याचे दिसून आले आहे.

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक ५२ दिनांक ०३/०२/२०२० देण्यात आले आहे.खुलासा अप्राप्त झाल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 43, Hmm No : 52)

### *10 परवाना फी च्या वसुलीत मासिक विलंब शुल्क वसूल न केल्याबाबत*

PREVIEW

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 1**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक १७ दिनांक २०.०२.२०१३ अन्वये जुना परवाना नुतनीकरण न केल्यास प्रती महा १०% दराने विलंब शुल्क वसूल करण्याबाबत ठराव मंजूर करण्यात आला आहे. परंतु विभागाने सन २०१५-२०१६ मध्ये मासिक विलंब शुल्क वसूल न करता ज्या व्यवसायधारकांना एक वर्षाहून अधिक विलंब झाला असेल त्यांच्याकडूनच वार्षिक विलंब शुल्क वसूल केलेला आहे, त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. |

बाजार परवाना विभागाकाकडून सन २०१५-२०१६ मध्ये रक्कम रु ३२८७३४०/- परवाना शुल्क वसूल करण्यात आला आहे. परवाना शुल्क वसुलीबाबत निवडक महिन्याचे पावती पुस्तके तपासले असता, खालील बाब निदर्शनास आलेली आहे.

सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक १७ दिनांक २०.०२.२०१३ अन्वये जुना परवाना नुतनीकरण न केल्यास प्रती महा १०% दराने विलंब शुल्क वसूल करण्याबाबत ठराव मंजूर करण्यात आला आहे. परंतु विभागाने सन २०१५-२०१६ मध्ये मासिक विलंब शुल्क वसूल न करता ज्या व्यवसायधारकांना एक वर्षाहून अधिक विलंब झाला असेल त्यांच्याकडूनच वार्षिक विलंब शुल्क वसूल केलेला आहे, त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तरी संबंधित कर्मचारी/अधिकारी यांनी सर्वसाधारण सभेच्या ठरावाचे पालन न करता कमी परवाना शुल्क वसूल केल्यामुळे त्यांच्या विरुध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६ अन्वये प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे.

उदाहरणा दाखल खालील काही परवाने

| परवाना क्रमांक | दुकानाचे नाव | पूर्वीची नोंदणी दिनांक | नूतनीकरण दिनांक | विलंब कालावधी महिने | परवाना फी |
|---|---|---|---|---|---|
| १७७३५ | शहनाई मंगलम मंगल कार्यालय | ०५-०१-२०१४ | १८-११-२०१५ | १० | १३०००/- |
| १७१३७ | पूजा मॅचिंग सेंटर | १३-०६-२०१४ | ३०-०३-३०१६ | ९ | ५००/- |
| १६८०० | तिरुपती आईस्क्रीम पार्लर | १२-०३-२०१४ | ०५-११-२०१५ | ८ | १०००/- |
| १६९६७ | अविनाश कोंडे अभियंता | २३-०४-२०१४ | १५-१०-२०१५ | ६ | ५०००/- |

PREVIEW

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६५८५ | श्री साई कन्स्ट्क्शन बिल्डर | १५.०५.२०१४ | ०७-१२-२०१५ | ६ | २०००/- |
| १७१८९ | वाईन गॅलरी विदेशी दारू चिल्लर विक्री | ३०-०६-२०१४ | २०/१०/२०१५ | ४ | ५०००/- |
| १७२५१ | Exer Eat Foodsफास्ट फूड हॉटेल | १४-०७-२०१४ | १६-११-२०१५ | ४ | २०००/- |
| १६७८४ | साई क्लिनिक | ११-०३-२०१४ | २९-०७-२०१५ | ४ | ५००/- |
| १६६१६ | जय माता दी हाउस | २३.०५.२०१४ | १३-०९-२०१५ | ४ | ५००/- |
| १६९४८ | आस्था मेडिकल्स मेडिकल दुकान | ०४-०४-२०१४ | १४-०७-२०१५ | ३ | ५००/- |
| १६९५३ | प्रेम इलेक्ट्रिकल | ०१-०४-२०१४ | ०४-०७-२०१५ | ३ | ५००/- |
| १७८६३ | जामनदास रणकोडदास चिल्लर धान्य विक्री | ३०-१२-२०१४ | २३-०२-२०१६ | २ | ५००/- |
| १७८९९ | मनोर मांगल्य मंगल कार्यालय | १८-०१-२०१५ | ०९-०३-२०१६ | २ | १३०००/- |
| १७९०८ | ब्राह्मण सभा सामाजिक सभागृह | २९-०१-२०१५ | २९-०३-२०१६ | २ | १०००/- |
| १७०७५ | मॅजीक डीजीटल फोटो स्टुडीओ | २८.०५.२०१४ | ११.०८.२०१५ | २ | ५००/- |

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक १५३ दिनांक ०१/१०/२०२० देण्यात आले आहे. खुलासा अप्राप्त झाल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 63, Hmm No : 153)

PREVIEW

## *11 अंबादेवी नवरात्र उत्सवा दरम्यान महानगरपालिकेस प्राप्त होणारे उत्पन्नाबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 3**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 283980.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 283980.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 9620.00/-

| |
|---|
| १ मा. आयुक्तांनी कोणत्याही सभेची मान्यता न घेता, नमूद कलमाचे उल्लंघन करून प्रती चौफुट ८०/- प्रमाणे भाडे वसुलीस मंजुरी दिलेली आहे. त्यामुळे स्थायी समितीच्या मान्यतेशिवाय लागू केलेले दर लेखापरीक्षणास मान्य करता येणार नाही.<br>२ नवरात्र कालावधीत महिला बचत गटाकडून मनपास कोणतेही जागा भाडे प्राप्त झालेले नाही. तसेच राखीव जागा नवरात्र कालावधीत खाली राहून तेथे कोणतेही स्टॉल उभारण्यात आले नसल्याचे बाजार अधीक्षकाकडून प्रमाणित करण्यात आले नाही. त्यामुळे महिला बचत गटाकडून प्राप्त होणारे जागा भाडे चे नुकसान झालेले आहे.<br>३ नस्तीची तपासणी केली असता,विविध स्टॉल करिता ८ BY ५,६ BY ८,७ BY ८,८ BY ८ चौफुटाची जागा निश्चित करण्यात आले आहे. त्या अन्वये प्रती स्टॉल किमान ३२००/- भाडे प्राप्त होणे आपेक्षित असतांना, काही पावतीव्दारे कमी जागा भाडे वसूल केल्याचे दिसून येत आहे. तरी कमी जागा भाडे रक्कम रु ९६२०/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे. |

अमरावती महानगरपालिका बाजार व परवाना विभागाचे सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाचे जमा बाजूचे लेखापरीक्षणात दिनांक १३/१०/२०१५ ते २२/१०/२०१५ या कालावधीत अंबादेवी नवरात्र यात्रे करिता खुले प्लॉट व दुकाना समोरील जागा भाडे मोबदला रक्कम रु २८३९८०/- जमा करण्यात आले आहे. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे

१ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ नुसार कोणतीही स्थावर मालमत्ता अथवा जागा स्थायी समितीच्या अथवा सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने भाडे तत्वावर देता येईल, परंतु लागू केलेले भाडे दर हे चालू बाजार किंमतीपेक्षा कमी असता कामा नये अशी तरतूद आहे. मा. आयुक्तांनी कोणत्याही सभेची मान्यता न घेता, नमूद कलमाचे उल्लंघन करून प्रती चौफुट ८०/- प्रमाणे भाडे वसुलीस मंजुरी दिलेली आहे. त्यामुळे स्थायी समितीच्या मान्यतेशिवाय लागू केलेले दर लेखापरीक्षणास मान्य करता येणार नाही.

२ अंबादेवी नवरात्र कालावधीत गांधी चौक वाहनतळामध्ये महिला बचत गटांना जागा राखीव ठेवण्यात आली असून मा.आयुक्त यांच्या आदेशानुसार ५००/- भाडे महिला बचत गटाकडून वसूल करणे आवश्यक होते. परंतु नवरात्र कालावधीत महिला बचत गटाकडून मनपास कोणतेही जागा भाडे प्राप्त झालेले नाही. तसेच राखीव जागा नवरात्र कालावधीत खाली राहून तेथे कोणतेही स्टॉल उभारण्यात आले नसल्याचे बाजार अधीक्षकाकडून प्रमाणित करण्यात आले नाही. त्यामुळे महिला बचत गटाकडून प्राप्त होणारे जागा भाडे चे नुकसान झालेले आहे.

३ नस्तीची तपासणी केली असता,विविध स्टॉल करिता ८ BY ५,६ BY ८,७ BY ८,८ BY ८ चौफुटाची जागा निश्चित करण्यात आले आहे. त्या अन्वये प्रती स्टॉल किमान ३२००/- भाडे प्राप्त होणे आपेक्षित असतांना, खाली नमूद केलेल्या पावतीव्दारे कमी जागा भाडे वसूल केल्याचे दिसून येत आहे. तरी कमी जागा भाडे रक्कम रु ९६२०/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.



PREVIEW

| पावती क्रमांक | दिनांक | रक्कम | तपशील | कमी वसुली |
|---|---|---|---|---|
| ११०१/ १२ | १४/१०/२०१५ | २४००/- | छन्नुलाल गहलोत | ८००/- |
| ११०१/ ३८ | १७/१०/२०१५ | २०००-/ | शेख गुलाब शेअहमद. | १२००/- |
| ११०१/ ४८ | १७/१०/२०१५ | २४००-/ | कॅशीस रेडीमेड (गाडी ज्यूस) | ८००/- |
| ११०१/ ५० | १९/१०/२०१५ | १९८०-/ | शेख गफूर शेपापा . | १२२०/- |
| ११०१/ ५४ | १९/१०/२०१५ | १२००-/ | मोहम्मद हुसेन डोराजीवाला | २०००/- |
| ११०१/ ६४ | १९/१०/२०१५ | १६००-/ | प्रकाश राजगुरे | १६००/- |
| ११०१/ ६५ | १९/१०/२०१५ | २८००-/ | आकाश पाटील गणोरकर | ४००/- |
| ११०१/ ७८ | २०/१०/२०१५ | १६००-/ | शेख हुसेन भाई सीताराम फास्ट फूड | १६००/- |
| | | | | **९६२०/-** |

वरील सर्व बाबीची पूर्तता होईपर्यंत प्राप्त रक्कम रु २८३९८०/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक १५१ दिनांक ०१/१०/२०२० देण्यात आले आहे. खुलासा अप्राप्त झाल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 65, Hmm No : 151)

## *12 गांधी चौक वाहनतळ पार्किंगची जागा एकविरा देवी संस्थानाला भाडे तत्वावर देणे बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 3**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 80000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 80000.00/-

१ अध्यक्ष/सचिव श्री.एकविरादेवी संस्थान यांच्यासोबत करण्यात आलेल्या करारनाम्यातील अट क्रमांक ६ नुसार संस्थान यांना वाहनतळावर कंत्राट कालावधीत विविध प्रकारचे सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. संस्थानाने नमूद सोयी-सुविधा पुरविण्यात न आल्यास किंवा त्या पुरविण्यामध्ये काहीही कसूर केल्याचे आढळल्यास कंत्राट रद्द करण्यात येईल असे स्पष्ट नमूद असतांना संस्थांनाने कोणतीही सोयी-

PREVIEW

| |
|---|
| सुविधा उपलब्ध करून दिली नसतांना देखील कंत्राट रद्द करण्यात आले नाही.<br>२ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २४३(अ)(२) नुसार मनपा आयुक्तास, महानगरपालिकेच्या संमतीने वाहन थांबविण्याकरिता अथवा उभे करून ठेवण्याकरिता वापरण्यात आलेल्या जागेकरिता प्रती दिवस अथवा भागाकरिता फी अथवा शुल्क ठरविण्याचे अधिकार असतांना, मनपाने अधिनियमातील कलमाचे उल्लंघन करून स्वतः भाडे फी निश्चित न करता, भाडे ठरविण्याचे अधिकार संस्थानाला देण्यात आले आहे.<br>३ तसेच संस्थानाने निश्चित केलेले दर महानगरपालिकेस कळविणे आवश्यक असतांना, असे संस्थानाने निश्चित व वसूल केलेले वाहन पार्किंग दर नस्तीत उपलब्ध नाहीत. |

अमरावती महानगरपालिका बाजार व परवाना विभागाचे सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाचे जमा बाजूचे लेखापरीक्षणात महानगरपालिकेने आपल्या मालकीची १०२५४ चौ.फुट जागा रु.८०,०००/- प्रतीवर्ष प्रमाणे दहा वर्षाकरिता म्हणजेच दि.०१/११/२०१४ ते ३१/१०/२०२४ या कालावधी करिता एकविरा देवी संस्थान,अमरावती यांनी भाडेपट्ट्यावर देण्यात आली आहे. सन २०१५-२०१६ मध्ये संस्थानाने खालील पावती नुसार रक्कम जमा केलेली आहे.
पावती बुक क्रमांक ९८५ दिनांक १९/११/२०१५ रक्कम ८०,०००/- अध्यक्ष/सचिव श्री.एकविरादेवी संस्थान
याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे
१. अध्यक्ष/सचिव श्री.एकविरादेवी संस्थान यांच्यासोबत करण्यात आलेल्या करारनाम्यातील अट क्रमांक ६ नुसार संस्थान यांना वाहनतळावर कंत्राट कालावधीत खालील प्रमाणे व्यवस्था करणे बंधनकारक आहे. संस्थानाने खालील प्रमाणे सुविधा पुरविण्यात न आल्यास किंवा त्या पुरविण्यामध्ये काहीही कसूर केल्याचे आढळल्यास कंत्राट रद्द करण्यात येईल असे स्पष्ट नमूद असतांना संस्थांनाने सन २०१५-२०१६ मध्ये कोणतेही सुविधा उपलब्ध करून दिली नसल्याचे नस्ती वरून दिसत येत आहे. त्यामुळे त्यांच्या सोबत करण्यात आलेला करारनामा रद्द करून कंत्राट रद्द करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.
खालील सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याचा अहवाल नस्तीत नाही.

१. थंड पिण्याचे पाण्याची व्यवस्था

२. स्वच्छता रूम

३. पेव्हिंग ब्लॉक

४. पार्किंग करिता कायमस्वरूपी आरेखन

५. विद्युत प्रकाश योजना

६. संगणकीकृत आवागमन व्यवस्था नियंत्रण करणे

७. अमरावती शहराचा इतिहास असलेला माहिती फलक व नकाशा

८. मंदिराबद्दलची माहिती

९. बस व रेल्वेचे वेळापत्रक

PREVIEW

१०. चौकीदारा करिता नियंत्रण कक्ष

११. फेन्सिंग

१२. वाहनचालकाकरिता विश्रामालय

१३. कायमस्वरूपी प्रशिक्षित कर्मचार्यांची नियुक्ती

१४ .भविष्यात बहुमजली पार्किंग व्यवस्था निर्माण करणे

१५. नागरिकांच्या सुरक्षिततेकरिता संपूर्ण परीसरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरांची व्यवस्था

१६. नागरिकांचे सुरक्षिततेकरिता अग्निशमन बाबतची व्यवस्था

२. करारनामा अट क्रमांक ४ नुसार वाहनाचे दैनिक भाडे ठरविण्याचे अधिकार संस्थानाला देण्यात आले आहे. परंतु महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २४३(अ)(२) नुसार मनपा आयुक्तास, महानगरपालिकेच्या संमतीने वाहन थांबविण्याकरिता अथवा उभे करून ठेवण्याकरिता वापरण्यात आलेल्या जागेकरिता प्रती दिवस अथवा भागाकरिता फी अथवा शुल्क ठरविण्याचे अधिकार असतांना, मनपाने अधिनियमातील कलमाचे उल्लंघन करून स्वतः भाडे फी निश्चित न करता, भाडे ठरविण्याचे अधिकार संस्थानाला देण्यात आले आहे. तरी अधिनियमातील कलमा विरुध्द करण्यात आलेली करारनाम्यातील अट लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

३. तसेच संस्थानाने निश्चित केलेले दर महानगरपालिकेस कळविणे आवश्यक असतांना, असे संस्थानाने निश्चित केलेले वाहन पार्किंग दर नस्तीत उपलब्ध नाहीत.

उपरोक्त सर्व बाबीची पूर्तता होईपर्यंत प्राप्त रक्कम रु ८०,०००/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक १५१ दिनांक ०१/१०/२०२०  देण्यात आले आहे. खुलासा अप्राप्त झाल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 66, Hmm No : 151)

PREVIEW

## *13 संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन भाडेतत्वावर दिलेल्या कंत्राट नस्तीतील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 11**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम  रु. 7041581.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7041581.00/-

संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन भाडेतत्वावर दिल्याबाबत कंत्राट नस्ती तपासणीत खालील अनियमितता

निदर्शनास आलेली आहे.

१ सांस्कृतिक भवनाच्या मूळ संविदेवर (दिनांक २२/०५/२०१३ रोजीच्या) फक्त मा.आयुक्त व कंत्राटदार यांचेच स्वाक्षरी आहेत. नगरसचिव,स्थायी समिती सदस्य,साक्षीदार यांच्या स्वाक्षरी नसल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७४ नुसार जी संविधा अधिनियमाच्या तरतुदी व नियम यांस अनुसरून केली नसेल अशी कोणतीही संविदा महानगरपालिकेस बंधनकारक असणार नाही असे नमूद आहे. त्यामुळे दिनांक २२/०५/२०१३ रोजी करण्यात आलेला मूळ करारनामा लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

२ सुधारित करारनाम्यात सन २०१५-२०१६ चे वार्षिक भाडे रक्कम रु ६१८२३३१/- (मागील दोन वर्षाचे ५% नैसर्गिक वाढसह) नमूद करून त्यावर प्रतिवर्षी ५% नैसर्गिक वाढ अनुज्ञेय राहील असे स्पष्ट उल्लेख करणे आपेक्षित असतांना तसे नमूद करण्यात आले नाही. त्यामुळे सुधारित करारनाम्यात बदल करणे आवश्यक आहे.

३ स्थायी समिती ठराव क्रमांक ५१ दिनांक १०.०५.२०१३ अन्वये आर्ट गॅलरी व नाट्यगृह (स्थानिक/व्यवसायिक) चे दर वगळता ईतर गतीविधीचे दरामध्ये दर वर्षी ५% वाढ करण्यास मंजुरी प्रदान केलेली आहे. त्यामुळे सुधारित करारनाम्यात दर वाढी बाबत नमूद करण्यात आलेल्या १०% वाढीच्या अटीत बदल करणे आवश्यक आहे. व सन २०१६-२०१७ पासून अतिरिक्त वाढीव दरापासून प्राप्त झालेले उत्पन्न महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात यावे.

४ मनपा प्रशासनाकडून करारनाम्याच्या अटीचा अभ्यास न करताच मा. आयुक्तांनी सुधारित करारनाम्यावर स्वाक्षरी केलेली आहे. त्यामुळे जबाबदार कर्मचारी/अधिकारी यांच्यावर महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६ पोटकलम १ व २ अन्वये प्रशासकीय चौकशी करून शास्ती लादणे आवश्यक आहे.

५ कंत्राटदाराने सांस्कृतिक भवनात नवीन व दुरुस्तीचे काम केल्याबाबत शहर अभियंत यांच्याकडून झालेल्या कामाच्या मुल्यांकन करून घेण्यात आले नाही, अंदाजपत्रकानुसार काम पूर्ण केल्याबाबत पूर्णत्वाचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले नाही, तसेच कामाच्या गुणवत्तेबाबत साहित्य तपासणी प्रयोगशाळा अहवाल नस्तीत उपलब्ध नसल्यामुळे सन २०१५-२०१६ मध्ये भाड्यात देण्यात आलेली सूट रक्कम रु २६३४७८/- लेखापरीक्षणास मंजूर नसून वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

६ कंत्राटदाराकडून भाडे रक्कम विलंबाने भरणा करण्यात आल्यामुळे थकीत रक्कमेवर २४ टक्के दराने व्याज वसूल करण्यात यावे. तसेच मार्च १६ अखेर थकीत असलेली भाडे रक्कम रु १५,०७,७११/- व त्यावरील विलंब कालावधीचा व्याज कंत्राटदाराकडून वसूल करण्यात यावे.

७ सन २०१३-२०१४ पासून सन २०१५-२०१६ पर्यंत सेवा कर व सेवा करावरील विलंब शुल्क कंत्राटदाराकडून वसूल करण्यात यावे.

८ करारनाम्यातील मुद्दा क्रमांक ९ नुसार इमारतीच्या विमाच्या हप्ता अभिकर्त्यास भरावे लागेल असे नमूद असून ते भरल्याबाबत पावती प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आले नाही.

९ करारनाम्यातील अटीनुसार कंत्राटदार सन २०१५-२०१६ मध्ये सांस्कृतिक भवनाची रंगरंगोटी करणे आपेक्षित आहे. सांस्कृतिक भवनाची रंगरंगोटी केल्याबाबतचे पुरावे नस्तीत उपलब्ध नाहीत.

PREVIEW

१० करारनाम्यातील अटीनुसार कंत्राटदार सन २०१५-२०१६ मध्ये अग्निशमन विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आपेक्षित आहे परंतु ते घेतल्याबाबत प्रमाणपत्राची छायांकित प्रत नस्तीत उपलब्ध नाही.
११ कंत्राटदाराने वसूल केलेल्या भाड्याबाबत पावती पुस्तकांचा लेखा लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेले नाही, त्यामुळे महानगरपालिकाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे कंत्राटदार भाडे वसूल करत आहेत किंवा कसे याची तपासणी करता आली नाही.

अमरावती महानगरपालिका बाजार व परवाना विभागाच्या सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन भाडेतत्वावर दिल्याबाबत कंत्राट नस्ती तपासणीत खालील अनियमितता निदर्शनास आलेली आहे.
प्रथम सर्वसाधारण ठराव क्रमांक २५ दिनांक १९.०१.२०१३ अन्वये व स्थायी समिती ठराव क्रमांक १५१ दिनांक २४.०१.२०१३ अन्वये देखभाल व देखरेख करिता अभिकर्ता नेमणे करिता मान्यता प्रदान केली आहे. संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन देखभाल व देखरेखीसाठी भाडे तत्वावर कंत्राटदार आनंद कॅटरर्स तर्फे श्रीमती लीलादेवी गौंड यांना देण्यास मंजुरी देण्यात होती. त्या अन्वये दिनांक २२/०५/२०१३ रोजी करारनामा करण्यात आला होता. त्यानंतर सांस्कृतिक भवनाची देखभाल यात मा.महापौर यांचे पाहणी दौरा आयोजित करून यांनी दिलेल्या निर्देश व सूचनांनुसार भवनात करावयाचे सुधारणा व दुरुस्ती करिता रु २,६५,४५,४९५/- खर्च आपेक्षित असल्याबाबत अंदाजपत्रक शहर अभियंता यांच्या कडून तयार केलेले आहे. व बांधकामावर झालेला खर्चाची रक्कम टप्प्याटप्प्याने पुढील २८ वर्षामध्ये भाड्यामधून कपात करून मनपा कंत्राटदारास देण्याबाबत व संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन ३० वर्षाकरिता भाडे तत्वावर देण्याबाबत सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक १९ दिनांक २०.०३.२०१५ नुसार मंजुरी घेण्यात आली आहे. त्यानुसार दिनांक ०८/०४/२०१५ रोजी सुधारित करारनामा करण्यात आला आहे.
याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे
१ महराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची 'ड' प्रकरण पाच मधील नियम १ पोटनियम २ अन्वये संविदेवर आणि लेखावर स्थायी समितीचे कोणतेही दोन सदस्य, नगरपालिका सचिव आणि आयुक्तांनी प्राधिकृत केलेला असेल असा, महानगरपालिका उपायुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही अधिकारी,त्यांच्यामधील कोणत्याही दोन व्यक्तींच्या संविदावर सह्या घेतले पाहिजेत. व दोन साक्षीदारांच्या सह्या हे नमूद दोन व्यक्तीपेक्षा वेगळ्या व्यक्तीच्या असल्या पाहिजेत असे नमूद आहे. सांस्कृतिक भवनाच्या मूळ संविदेवर (दिनांक २२/०५/२०१३) फक्त मा.आयुक्त व कंत्राटदार यांचेच स्वाक्षरी आहेत. अधिनियमातील कलम ७४ नुसार जी संविधा अधिनियमाच्या तरतुदी व नियम यांस अनुसरून केली नसेल अशी कोणतीही संविदा महानगरपालिकेस बंधनकारक असणार नाही असे नमूद आहे. त्यामुळे दिनांक २२/०५/२०१३ रोजी करण्यात आलेला मूळ करारनामा लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.
२. कंत्राटदार आनंद कॅटरर्स तर्फे श्रीमती लीलादेवी गौंड यांनी सन २०१३-२०१४ मध्ये ऑफर मुल्य रक्कम रु ५६,२०,३००/- स्वीकृत केले असून सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक २५ दिनांक १९.०१.२०१३ अन्वये दरवर्षी ५ %

PREVIEW

नैसर्गिक वाढ त्यांना मान्य आहे. त्यानुसार कंत्राटदारासोबत करण्यात आलेल्या करारनाम्यात ५% नैसर्गिक वाढीची अट नमूद करण्यात आले आहे. सन २०१५-२०१६ मध्ये करण्यात आलेल्या सुधारित करारनाम्यात पुन्हा मूळ ऑफर मुल्य रक्कम रु ५६,२०,३००/- नमूद करून पुढील वर्षापासून ५% नैसर्गिक वाढ करण्यात येईल असे नमूद करण्यात आले आहे. तरी सुधारित करारनाम्यात सन २०१५-२०१६ चे वार्षिक भाडे रक्कम रु ६१८२३३१/- (मागील दोन वर्षाचे ५% नैसर्गिक वाढसह) नमूद करून त्यावर प्रतिवर्षी ५% नैसर्गिक वाढ अनुज्ञेय राहील असे स्पष्ट उल्लेख करणे आपेक्षित असतांना तसे नमूद करण्यात आले नाही. त्यामुळे सुधारित करारनाम्यात बदल करणे आवश्यक आहे.

३. सन २०१५-२०१६ मध्ये करण्यात आलेल्या नवीन करारनाम्यातील मुद्दा क्रमांक ४ मध्ये नागरिकाकडून आकारण्यात येणारे भाड्याचे दर निर्धारित करण्यात आले आहे. त्यानुसार आर्ट गॅलरी व नाट्यगृह (स्थानिक/व्यवसायिक) चे भाडे दर वगळता ईतर गतीविधीचे दरामध्ये दर वर्षी १०% वाढ करण्यात येईल असे नमूद करण्यात आले आहे. परंतु सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक १९ दिनांक २०.०३.२०१५ मध्ये दरवाढीबाबत विषय नमूद नाही. तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक ५१ दिनांक १०.०५.२०१३ अन्वये आर्ट गॅलरी व नाट्यगृह (स्थानिक/व्यवसायिक) चे दर वगळता ईतर गतीविधीचे दरामध्ये दर वर्षी ५% वाढ करण्यास मंजुरी प्रदान केलेली आहे. त्यामुळे सुधारित करारनाम्यात दर वाढी बाबत नमूद करण्यात आलेल्या अटीत बदल करणे आवश्यक आहे. व सन २०१६-२०१७ पासून अतिरिक्त वाढीव दरापासून प्राप्त झालेले उत्पन्न महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात यावे.

४ करारनामा करण्यापूर्वी बाजार परवाना अधीक्षक यांनी करारनाम्यातील प्रत्येक अटी बारकाईने वाचून घेऊन नमूद चुकांची दुरस्ती करणे अभिप्रेत होते. परंतु मनपा प्रशासनाकडून करारनाम्याच्या अटीचा अभ्यास न करताच मा. आयुक्तांनी सुधारित करारनाम्यावर स्वाक्षरी केलेली आहे. त्यामुळे जबाबदार कर्मचारी/अधिकारी यांच्यावर महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६ पोटकलम १ व २ अन्वये प्रशासकीय चौकशी करून शास्ती लादणे आवश्यक आहे.

५ मागणी नोंदवही मध्ये घेण्यात आलेल्या नोंदीनुसार सन २०१५-२०१६ मध्ये माहे डिसे १५ ते फ्रेबु १६ च्या किस्त मध्ये देय मागणी भाड्याच्या रक्कमेत भवनाच्या बांधकामावर करण्यात आलेल्या खर्चाबाबत रक्कम रु २६३४७८/- सूट देण्यात आले आहे. पर्यंत कंत्राटदाराने नवीन व दुरुस्तीचे काम केल्याबाबत शहर अभियंत यांच्याकडून झालेल्या कामाच्या मुल्यांकन करून घेऊन , अंदाजपत्रकानुसार काम पूर्ण केल्याबाबत पूर्णत्वाचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले नाही, तसेच कामाच्या गुणवत्तेबाबत साहित्य तपासणी प्रयोगशाळा अहवाल नस्तीत उपलब्ध नसल्यामुळे सन २०१५-२०१६ मध्ये भाड्यात देण्यात आलेली सूट रक्कम रु २६३४७८/- लेखापरीक्षणास मंजूर नसून वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

६ तीन महिन्याच्या किस्तीची रक्कम निर्धारित कालावधीत न भरल्यास किस्तीचे रकमेवर २४ टक्के प्रतिवर्ष दराने किस्त रक्कमेवर थकीत तारखेपासून रक्कम भरे पर्यंत व्याज आकारण्यात येईल असे नमूद आहे. खाली नमूद केल्याप्रमाणे भाडे रक्कम विलंबाने भरणा करण्यात आल्यामुळे थकीत रक्कमेवर २४ टक्के दराने व्याज वसूल करण्यात यावे.

PREVIEW

| किस्तीचा कालावधी | मागणी रक्कम (थकीत रक्कमेसहित) | भरणा रक्कम | पावती क्रमांक व दिनांक | विलंब कालावधी |
|---|---|---|---|---|
| जून १४ ते ऑगस्ट १४ | २४८५८८५ | निरंक | निरंक | निरंक |
| सप्टे १४ ते नोव्हे १४ | ३९६१२१४ | १४,००,००० | ७४१/९९, ३१-१२-१४ | ४ महिने |
| डिसेंबर १४ ते फेब्रु १५ | ४०३६५४३ | १६००००० | ९५१/६४, ३०-०३-१५ | ७ महिने |
| मार्च-१५ ते मे १५ | ३९११८७२ | १५७२२१३ | ९६७/३५, १८-०५-१५ | ६ महिने |
| | | ८६४३३० | ९६७/७९, २३-०६-१५ | ४ महिने |
| | | १४७६००० | ९६७/८२, २३-०६-१५ | १ महिना |
| जून १५ ते ऑगस्ट १५ | १५४५५८३ | निरंक | निरंक | निरंक |
| सप्टे १५ ते नोव्हे १५ | ३०९११६६ | ८०२४२० | ९८५/०७, ३०-०९-१५ | ३ महिने |
| डिसे १५ ते फ्रेबु १६ | ३८३४३२९ | ११४१५९७ | ९८५/५४, ०४-०१-१६ | ४ महिने |
| | | ११८५०२१ | १११७/५४, ३१-०३-१६ | ४ महिने |
| मार्च १६ अखेर थकीत रक्कम | **१५,०७,७११** | | | |

तसेच मार्च १६ अखेर थकीत असलेली भाडे रक्कम रु १५,०७,७११/- व त्यावरील विलंब कालावधीचा व्याज कंत्राटदाराकडून वसूल करण्यात यावे.

७ केंद्र शासनाचे वित्तीय अधिनियम १९९४ मधील कलम ६५ (१०५)(ZZZ) नुसार अचल संपत्तीच्या भाडेमूल्यावर १२% केंद्र शासनाचा सेवाकर, व त्यावर ३% अधिभार लागू असतांना, महानगरपालिकेने कंत्राटदाराकडून भाड्याच्या रक्कमेवर सेवा कर वसूल आलेले नाही. तरी सन २०१३-२०१४ पासून सन २०१५-२०१६ पर्यंत सेवा कर व सेवा करावरील विलंब शुल्क कंत्राटदाराकडून वसूल करण्यात यावे.

८ करारनाम्यातील मुद्दा क्रमांक ९ नुसार इमारतीच्या विमाच्या हप्ता अभिकर्त्यास भरावे लागेल असे नमूद असून ते भरल्याबाबत पावती प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आले नाही.

९. करारनाम्यातील मुद्दा क्रमांक ७ नुसार दर दोन वर्षांनी संपूर्ण सांस्कृतिक भवनाची इमारतीची रंगरंगोटी करण्याची अट नमूद आहे त्यानुसार सन २०१५-२०१६ मध्ये रंगरंगोटी करणे आपेक्षित आहे. सांस्कृतिक भवनाची रंगरंगोटी केल्याबाबत नस्तीत पुरावे उपलब्ध नाहीत.

१०. सन २०१५-२०१६ मध्ये अग्निशमन विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेतल्याबाबत प्रमाणपत्राची छायांकित प्रत नस्तीत उपलब्ध नाही.

११ . करारनाम्यातील मुद्दा क्रमांक १३ नुसार दर महिन्याने लेखा पुस्तिका व पावती पुस्तिकाचा लेखा प्रत



PREVIEW

महानगरपालिकेस सादर करावे लागेल तसेच दरवर्षी महानगरपालिका संबंधित कंत्राटदाराने जतन केलेल्या लेख्याचे सनदी लेखापालाकडून लेखापरीक्षण करण्यात येईल असे नमूद असतांना, कंत्राटदाराचे झालेल्या लेखापरीक्षणाचे अभिलेखे सादर करण्यात आले नाही.

त्यामुळे महानगरपालिकाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे कंत्राटदार भाडे वसूल करत आहेत किंवा कसे याची तपासणी करता आली नाही.

उपरोक्त सर्व बाबीची पूर्तता होईपर्यंत सन २०१५-२०१६ मध्ये महानगरपालिकेस कंत्राटदाराकडून प्राप्त झालेले उत्पन्न रक्कम रु ७०४१५८१/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक १५२ दिनांक ०१/१०/२०२० देण्यात आले आहे. खुलासा अप्राप्त झाल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSGCF7501 (Ref No : 115, Hmm No : 152)

PREVIEW

## *14 महानगरपालिकेने मा.महापौरांना देण्यात येणाऱ्या अतिथी खर्चा करता ठराविक रक्कम निर्धारित न केल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 2**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 65240.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 65240.00/-

१ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १९ अ (२) नुसार महानगरपालिकेने राज्य शासन वेळोवेळी आदेशाव्दारे निर्धारित करतील एवढी रक्कम दरवर्षी अतिथी भत्ता म्हणून मा.महापौरांकडे सुपूर्द करणे आवश्यक असतांना, तशी कार्यवाही अमरावती महानगरपालिकेने केलेला नाही.

२ अतिथी भत्ता लेखाशीर्ष क्रमांक ९१ वर सन २०१५-२०१६ मध्ये झालेला प्रत्येक्ष खर्च व लेखा विभागाने सादर केलेल्या वार्षिक खर्चात मोठी तफावत आढळून आलेली आहे. नगर सचिव विभागाने अतिथी खर्चावर केलेला मोठ्या प्रमाणातील खर्च महानगरपालिका स्थायी समिती पासून लपविण्याकरिता, तो खर्च लेखा विभाग लेखाशीर्षबाहेर ठेवला आहे.

अमरावती महानगरपालिकेच्या नगर सचिव विभागाच्या सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात

खालील बाब निदर्शनास आलेली आहे.

१ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १९ अ (२) नुसार महानगरपालिकेने राज्य शासन वेळोवेळी आदेशाव्दारे निर्धारित करतील एवढी रक्कम दरवर्षी अतिथी भत्ता म्हणून मा.महापौरांकडे सुपूर्द करणे आवश्यक असतांना,सन २०१५-२०१६ मध्ये मनपाने मा. महापौरांना राज्य शासनाची मंजुरी घेऊन ठराविक रक्कम निर्धारित न करता सन २०१५-२०१६ मध्ये महापौर कार्यालयात वर्षभरात झालेल्या अतिथी चहा-पाणी व नाष्टावरील खर्च हा अतिथी खर्च या लेखाशीर्षावर (लेखाशीर्ष क्रमांक ९१ वर) खर्ची दर्शविण्यात आला आहे.

२ महानगरपालिकेच्या सन २०१५-२०१६ च्या वार्षिक खर्चात लेखाशीर्ष ९१ अतिथी खर्च या वर दर्शविलेला खर्च हा फक्त रक्कम रु ४२७२५/- व निवडक महिन्याच्या खालील प्रमाणकातील लेखाशीर्ष ९१ वरील खर्च हा रक्कम रु ६५२४०/- हा आहे. तसेच विभागाने ठेवलेल्या तरतूद व खर्च नोंदवहीत अतिथी खर्चाची नोंद घेण्यात आलेली नाही. यावरून असे निदर्शनास येत आहे की, नगर सचिव विभागाने अतिथी खर्चावर केलेला मोठ्या प्रमाणातील खर्च महानगरपालिका स्थायी समिती पासून लपविण्याकरिता, तो खर्च लेखा विभाग लेखाशीर्षबाहेर ठेवला आहे. तसेच लेखा विभाग अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जास्तीचा खर्च टाळण्याकरिता सदर अतिथी खर्च हा लेखाशीर्षा बाहेर ठेवला आहे.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | कोणास प्रदान | सविस्तर तपशील | लेखाशीर्ष |
|---|---|---|---|---|---|
| 8057 | 20-10-2015 | 13100 | मे रघुवीर मिठाई एवंम नमकीन | मा महापौर कार्यालय माहे ऑगस्ट-१५ | ९१- अतिथी खर्च |
| 7530 | 08-10-2015 | 12250 | मे रघुवीर मिठाई एवंम नमकीन | मा महापौर कार्यालय माहे जुलै-१५ | ९१- अतिथी खर्च |
| 7517 | 08-10-2015 | 6920 | न्यू बजरंग टी स्टॉल | मा महापौर कार्यालय माहे जून-१५ | ९१- अतिथी खर्च |
| 7518 | 08-10-2015 | 6760 | न्यू बजरंग टी स्टॉल | मा महापौर कार्यालय माहे मे-१५ | ९१- अतिथी खर्च |
| 7523 | 08-10-2015 | 9075 | मे रघुवीर मिठाई एवंम नमकीन | मा महापौर कार्यालय माहे मे-१५ | ९१- अतिथी खर्च |
| 7526 | 08-10-2015 | 8250 | मे रघुवीर मिठाई एवंम नमकीन | मा महापौर कार्यालय माहे जून -१५ | ९१- अतिथी खर्च |

PREVIEW

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 7205 | 08-10-2015 | 8885 | न्यू बजरंग टी स्टॉल | मा महापौर कार्यालय<br>माहे जुलै-१५ | ९१- अतिथी खर्च |
| | | 65240 | | | |

उपरोक्त सर्व बाबीची पूर्तता होई पर्यंत निवडक महिन्यातील खर्च रक्कम रु ६५२४०/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक ११३ दिनांक १६ /०९/२०२० देण्यात आले आहे.प्राप्त खुलासा संयुक्तिक नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSGCF7501 (Ref No : 113, Hmm No : 113)

PREVIEW

## *15 प्रभाग क्र १९ मध्ये आर.सी.सी.रोड व पेव्हिंग ब्लॉक बसविणे कामाबाबत*

**प्राथमिक सोयी सुविधा**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 03**

*शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 955455.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 955455.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 405.00/-

प्रभाग क्र १९ मध्ये आर.सी.सी.रोड व पेव्हिंग ब्लॉक बसविणे कामात झालेली अनियमितता

१ अंदाजपत्रकीय दरापेक्षा मोजमाप पुस्तकेत जादा दर दर्शवून बाब क्रमांक २ करता जादा प्रदान रक्कम रु ४०५/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

२ दोष निवारण कालावधी नमूद असलेला बी-१ करारनाम्यातील क्लॉज क्रमांक २० करिता शहर अभियंता व कंत्राटदार यांचे स्वाक्षरी जरुरी असतांना दोन्ही पक्षकारांच्या स्वाक्षरी नसल्यामुळे बी-१ करारनाम्यातील सर्व अटी कंत्राटदाराला मान्य असल्याची खात्री करता आलेली नाही.

३ कामाच्या मुद्रांक शुल्काच्या करारनाम्यावर मा.आयुक्त अथवा मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी आढळून आलेली नाही.

कामाचे नाव :- प्रभाग क्र १९ मध्ये आर.सी.सी.रोड व पेव्हिंग ब्लॉक बसविणे

प्रमाणक क्रमांक ५६३१ दिनांक ०१-०९-२०१५ रक्कम ९५५४५५/- धावते देयक श्री.राजेश वावरकर
अंदाजपत्रक क्रमांक :- १०/२०१४-१५ रक्कम ३२०००००/-
कंत्राटदाराचे नाव :- श्री.राजेश वावरकर (अंदाजपत्रकिय दराने)
कामाचा आदेश :- दिनांक ०९/०३/२०१५
कामाची मुदत :- १५० दिवस
कामाचे मुल्यांकन :- १३६१२५१.८८/-
काम पूर्णत्वाचा दिनांक :- ०८/०८/२०१५
मोजमाप पुस्तक क्रमांक :- बुक क्रमांक ६७ पान क्रमांक ३२५ ए ते ३२७ ए
याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे

१ कामाच्या अंदाजपत्रकातील बाब क्रमांक २ Excavation for road way in earth soil of all sorts --- अंदाजपत्रकात दर ६०.९०/- नमूद आहे. कामाचे मोजमाप पुस्तिका ६७ व प्रमाणक तपासले असता, सदर बाबीचे दर ६३.००/- नमूद करण्यात आले आहे. मोजमाप पुस्तकेत नमूद नोंदीनुसार बाब क्रमांक २ चे मोजमाप १९३.०७ घमी घेण्यात आले आहे. तरी सदर बाबी करता जादा प्रदान रक्कम रु ४०५/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

२ महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक सिएटी-१०८७/प्र.क्र.९४/इमा.२ दिनांक १४.०६.१९८९ अन्वये रस्त्यांच्या संदर्भात दोष निवारण कालावधी हा कामाच्या निविदेमध्ये तंतोतंत नमूद करणे आवश्यक आहे. मनपाने केलेल्या बी-१ करारनामा नस्तीत प्रत्येक पानावर कंत्राटदार व कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. किमान दोष निवारण कालावधी नमूद असलेला क्लॉज क्रमांक २० करिता तरी स्वाक्षरी जरुरी असतांना दोन्ही पक्षकारांच्या स्वाक्षरी नसल्यामुळे बी-१ करारनाम्यातील सर्व अटी कंत्राटदाराला मान्य असल्याची खात्री करता आलेली नाही.

३ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ अ नुसार मा.आयुक्त यांनी अथवा अधिनियमातील कलम ४६ नुसार शहर अभियंता यांनी कंत्राटदारासोबत संविदा करणे आवश्यक असतांना, उपरोक्त कामाच्या मुद्रांक शुल्काच्या करारनाम्यावर मा.आयुक्त अथवा मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी आढळून आलेली नाही.
उपरोक्त सर्व बाबीची पूर्तता होईपर्यंत प्रदान रक्कम रु ९५५४५५/-आक्षेपित ठेवण्यात येत आहे.
याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक १०७, दिनांक १५/०९/२०२० निर्गमित करण्यात आले असून संयुक्तिक अनुपालन प्राप्त झाले नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 121, Hmm No : 107)

## *16 प्रभाग क्र २७ पठाणपुरा वझीर पटेल लायब्ररी ते सलीमभाई टॅंकरवाले पर्यंत पूल बांधणे कामाबाबत*

**प्राथमिक सोयी सुविधा**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 03**

*शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1363851.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 1363851.00/-

| |
|---|
| प्रभाग क्र २७ पठाणपुरा वझीर पटेल लायब्ररी ते सलीमभाई टॅकरवाले पर्यंत पूल बांधणे कामातील अनियमितता खालील प्रमाणे<br>१ कामाचा मूळ अंदाजपत्रकातील उद्देश व प्रत्येक्षात झालेले काम यात मोठ्या प्रमाणात बदल दिसून येत असतांना देखील मनपाने महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम २६७ नुसार कार्यवाही करणे आवश्यक असतांना,कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही.<br>२ दोष निवारण कालावधी नमूद असलेला बी-१ करारनाम्यातील क्लॉज क्रमांक २० करिता शहर अभियंता व कंत्राटदार यांचे स्वाक्षरी जरुरी असतांना दोन्ही पक्षकारांच्या स्वाक्षरी नसल्यामुळे बी-१ करारनाम्यातील सर्व अटी कंत्राटदाराला मान्य असल्याची खात्री करता आलेली नाही.<br>३ कामाच्या मुद्रांक शुल्काच्या करारनाम्यावर मा.आयुक्त अथवा मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी आढळून आलेली नाही. |

PREVIEW

कामाचे नाव :- प्रभाग क्र २७ पठाणपुरा वझीर पटेल लायब्ररी ते सलीमभाई टॅकरवाले पर्यंत पूल बांधणे

प्रमाणक क्रमांक दिनांक रक्कम ८८१८६६/- श्री.शकील अहमद प्रथम धावते देयक

प्रमाणक क्रमांक १३९७९ दिनांक २४-०२-२०१६ रक्कम ४८१९८५/- श्री.शकील अहमद दुसरे व अंतिम देयक

अंदाजपत्रक क्रमांक :- ८६/७ ए /२०१३-१४ रक्कम १५०८१३७/-

कंत्राटदाराचे नाव :- श्री.शकील अहमद ( अधिक अंदाजपत्रकिय दराने)

कामाचा आदेश :- दिनांक ०५/०८/२०१४

कामाची मुदत :- १२० दिवस

कामाचे मुल्यांकन :- १५०६८५१.०१/-

काम पूर्णत्वाचा दिनांक :- ४/१२/२०१४

मोजमाप पुस्तक क्रमांक :- बुक क्रमांक ५३ पान क्रमांक ५७८१,५७९० ते ५७९१

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे

१ कामाच्या अंदाजपत्रकातील खाली नमूद बाबीवर २५% पेक्षा जास्त वाढ झाली आहे. तसेच मूळ कामातील १४ बाबीपैकी फक्त २ बाबी कार्यान्वित केले असून उर्वरित १२ बाबी ह्या पूर्णतः कार्यान्वित करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे कामाचा मूळ अंदाजपत्रकातील उद्देश व प्रत्येक्षात झालेले काम यात मोठ्या प्रमाणात बदल

दिसत आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम क्रमांक २६१,२६३ व २६५ मधील तरतुदीकडे पूर्णतः दुर्लक्ष करण्यात आल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम क्रमांक ३१३ नुसार कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करून महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम २६७ नुसार कार्यवाही करणे आवश्यक असतांना,कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही.

| बाब क्रमांक | बाबीचा तपशील | अंदाजपत्रकातील परिमाण | अंदाजपत्रकातील मुल्य | मोजमाप पुस्तकेतील परिमाण | मोजमाप पुस्तकेतील मुल्य | जादा परिमाण | जादा मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | Providing and casting M-15 | 87 cum | 467746.80 | 189.28cum | 1017644.99 | 102.28cum | 549898.19 |

२ महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक सिएटी-१०८७/प्र.क्र.९४/इमा.२ दिनांक १४.०६.१९८९ अन्वये रस्त्यांच्या संदर्भात दोष निवारण कालावधी हा कामाच्या निविदेमध्ये तंतोतंत नमूद करणे आवश्यक आहे. मनपाने केलेल्या बी-१ करारनामा नस्तीत प्रत्येक पानावर कंत्राटदार व कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. किमान दोष निवारण कालावधी नमूद असलेला क्लॉज क्रमांक २० करिता तरी स्वाक्षरी जरुरी असतांना दोन्ही पक्षकारांच्या स्वाक्षरी नसल्यामुळे बी-१ करारनाम्यातील सर्व अटी कंत्राटदाराला मान्य असल्याची खात्री करता आलेली नाही.

३  महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ अ नुसार मा.आयुक्त यांनी अथवा अधिनियमातील कलम ४६ नुसार शहर अभियंता यांनी कंत्राटदारासोबत संविदा करणे आवश्यक असतांना, उपरोक्त कामाच्या मुद्रांक शुल्काच्या करारनाम्यावर मा.आयुक्त अथवा मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी आढळून आलेली नाही. उपरोक्त सर्व बाबीची पूर्तता होईपर्यंत प्रदान रक्कम रु १३६३८५१/-आक्षेपित ठेवण्यात येत आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक १०७, दिनांक १५/०९/२०२० निर्गमित करण्यात आले असून संयुक्तिक अनुपालन प्राप्त झाले नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 122, Hmm No : 107)

## *17 प्रभाग क्रमांक ७ मध्ये टॉवर लाईन रोड च्या उजव्या बाजूस सिमेंट रोड बांधकाम करणे कामाबाबत*

**अतिवृष्टी रस्ते दुरुस्ती**

PREVIEW

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 03**

*शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1032186.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 1032186.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 6721.00/-

प्रभाग क्रमांक ७ मध्ये टॉवर लाईन रोड च्या उजव्या बाजूस सिमेंट रोड बांधकाम करणे कामातील अनियमितता खालील प्रमाणे
१ मोजमाप नोंदविताना झालेल्या अंकगणितीय चुकीच्या परिगनणामुळे कंत्राटदाराला जादा प्रदान रक्कम रु 6721/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.
२ दोष निवारण कालावधी नमूद असलेला बी-१ करारनाम्यातील क्लॉज क्रमांक २० करिता शहर अभियंता व कंत्राटदार यांचे स्वाक्षरी जरुरी असतांना दोन्ही पक्षकारांच्या स्वाक्षरी नसल्यामुळे बी-१ करारनाम्यातील सर्व अटी कंत्राटदाराला मान्य असल्याची खात्री करता आलेली नाही.
३ कामाच्या मुद्रांक शुल्काच्या करारनाम्यावर मा.आयुक्त अथवा मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी आढळून आलेली नाही.

कामाचे नाव :- प्रभाग क्रमांक ७ मध्ये टॉवर लाईन रोड च्या उजव्या बाजूस सिमेंट रोड बांधकाम करणे (अतिवृष्टी रस्ते दुरुस्ती)

प्रमाणक क्रमांक २५६ दिनांक १-०४-२०१५ रक्कम १०३२१८६/- संजय वाकोडे दुसरे व अंतिम

अंदाजपत्रक क्रमांक :- /२०१४-१५ रक्कम ५००१३०५/-

कंत्राटदाराचे नाव :- संजय वाकोडे (४.८८% अधिक अंदाजपत्रकिय दराने)

कामाचा आदेश :- दिनांक ०१/०३/२०१४

कामाची मुदत :- १८० दिवस

कामाचे मुल्यांकन :- १२२८७९८.८२/-

काम पूर्णत्वाचा दिनांक :- ०१/०९/२०१४

मोजमाप पुस्तक क्रमांक :- बुक क्रमांक १५७ पान क्रमांक १५६७४ ते १५६७९
बुक क्रमांक १५७ पान क्रमांक १५६८० ते १५६८४

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे

१ कामाचे मोजमाप पुस्तक १५७ पान क्रमांक १५६८० तपासले असता, मोजमाप नोंदविताना खाली दर्शविल्याप्रमाणे झालेल्या अंकगणितीय चुकीच्या परिगनणामुळे कंत्राटदाराला जादा प्रदान रक्कम रु 6721/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.



PREVIEW

| बाब क्रमांक | एम.बी.मधील मोजमाप | प्रत्येक्षात येणारे मोजमाप | दर /क्विंटल | प्रदान रक्कम | अनुज्ञेय प्रदान | जादा प्रदान |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ Prov.& cut. MS/HYSD bar 10mm स्टील | 3357.76kg | 3252.83 kg | 6405/- | 215064.52 | 208343.76 | 6721/- |

२ महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक सिएटी-१०८७/प्र.क्र.९४/इमा.२ दिनांक १४.०६.१९८९ अन्वये रस्त्यांच्या संदर्भात दोष निवारण कालावधी हा कामाच्या निविदेमध्ये तंतोतंत नमूद करणे आवश्यक आहे. मनपाने केलेल्या बी-१ करारनामा नस्तीत प्रत्येक पानावर कंत्राटदार व कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. किमान दोष निवारण कालावधी नमूद असलेला क्लॉज क्रमांक २० करिता तरी स्वाक्षरी जरुरी असतांना दोन्ही पक्षकारांच्या स्वाक्षरी नसल्यामुळे बी-१ करारनाम्यातील सर्व अटी कंत्राटदाराला मान्य असल्याची खात्री करता आलेली नाही.
३ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ अ नुसार मा.आयुक्त यांनी अथवा अधिनियमातील कलम ४६ नुसार शहर अभियंता यांनी कंत्राटदारासोबत संविदा करणे आवश्यक असतांना, उपरोक्त कामाच्या मुद्रांक शुल्काच्या करारनाम्यावर मा.आयुक्त अथवा मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी आढळून आलेली नाही.

उपरोक्त सर्व बाबीची पूर्तता होईपर्यंत प्रदान रक्कम रु 1217334/-आक्षेपित ठेवण्यात येत आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक १०७, दिनांक १५/०९/२०२० निर्गमित करण्यात आले असून प्राप्त अनुपालन संयुक्तिक नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 126, Hmm No : 107)

PREVIEW

## *18 विलासनगर येथील दलित वस्तीमध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविणे कामाबाबत*

**दलित वस्ती सुधार योजना**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 03**

*शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 261022.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 261022.00/-     अंतिम अमान्य रक्कम रु. 400.00/-

| |
|---|
| विलासनगर येथील दलित वस्तीमध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविणे कामातील अनियमितता खालील प्रमाणे<br>१ कमी मुद्रांक शुल्क कपात रक्कम रु ४००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.<br>२ दोष निवारण कालावधी नमूद असलेला बी-१ करारनाम्यातील क्लॉज क्रमांक २० करिता शहर अभियंता व कंत्राटदार यांचे स्वाक्षरी जरुरी असतांना दोन्ही पक्षकारांच्या स्वाक्षरी नसल्यामुळे बी-१ करारनाम्यातील सर्व अटी कंत्राटदाराला मान्य असल्याची खात्री करता आलेली नाही.<br>३ कामाच्या मुद्रांक शुल्काच्या करारनाम्यावर मा.आयुक्त अथवा मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी आढळून आलेली नाही. |

कामाचे नाव :- विलासनगर येथील दलित वस्तीमध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविणे (दलित वस्ती सुधार योजना)
प्रमाणक क्रमांक ४११६ दिनांक १७-०७-२०१५ रक्कम २६१०२२/- श्री.दाऊत खान धावते देयक
अंदाजपत्रक क्रमांक :- /२०१४ रक्कम १०५७४००/-
प्रशासकीय मंजुरी :- मा.आयुक्त यांचे मंजुरी दिनांक २९/०१/२०१४
कंत्राटदाराचे नाव :- श्री.दाऊत खान (५% अधिक अंदाजपत्रकिय दराने)
कामाचा आदेश :- दिनांक २८/०५/२०१५
कामाची मुदत :- १२० दिवस
कामाचे मुल्यांकन :- २९९४३६.९५/-(अपूर्ण काम)
करारनामा दिनांक :- दिनांक नमूद नाही.
काम पूर्णत्वाचा दिनांक :- अपूर्ण काम
मोजमाप पुस्तक क्रमांक :- बुक क्रमांक ६२ पान क्रमांक ३०५६ ते ३०५९
याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे

१ महाराष्ट्र मुद्रांक शुल्क (सुधारणा) अधिनियम २०१५, अधिसूचना दिनांक २४/०४/२०१५ मधील परिच्छेद ३४ व मूळ अधिनियमातील अनुसूची १ मधील अनुक्रमांक ६३ नुसार १० लाभापर्यंतचा कार्यकंत्राटाकरिता रक्कम रु ५००/- मुद्रांक शुल्क व त्यावरील रक्कमेकरिता ०.१% दराने मुद्रांक शुल्क आकारणे आवश्यक असतांना, वरील कामावर रक्कम रु २००/- मुद्रांक शुल्कावर करारनामा करण्यात आला आहे. कामाकरिता अधिसूचनेनुसार रक्कम रु ६००/- मुद्रांक शुल्कावर करारनामा करणे आवश्यक असतांना तरी रक्कम रु ४००/- कमी भरणा करण्यात आलेला मुद्रांक शुल्क वसूल करण्यात यावे.

२ महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्रमांक सिएटी-१०८७/प्र.क्र.९४/इमा.२ दिनांक १४.०६.१९८९ अन्वये रस्त्यांच्या संदर्भात दोष निवारण कालावधी हा कामाच्या निविदेमध्ये तंतोतंत नमूद करणे आवश्यक आहे. मनपाने केलेल्या बी-१ करारनामा नस्तीत प्रत्येक पानावर कंत्राटदार व कार्यकारी अभियंता यांच्या स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. किमान दोष निवारण कालावधी नमूद असलेला क्लॉज क्रमांक २० करिता तरी स्वाक्षरी जरुरी असतांना दोन्ही पक्षकारांच्या स्वाक्षरी नसल्यामुळे बी-१ करारनाम्यातील सर्व अटी



PREVIEW

कंत्राटदाराला मान्य असल्याची खात्री करता आलेली नाही.

३ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ अ नुसार मा.आयुक्त यांनी अथवा अधिनियमातील कलम ४६ नुसार शहर अभियंता यांनी कंत्राटदारासोबत संविदा करणे आवश्यक असतांना, उपरोक्त कामाच्या मुद्रांक शुल्काच्या करारनाम्यावर मा.आयुक्त अथवा मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी आढळून आलेली नाही.

उपरोक्त सर्व बाबीची पूर्तता होईपर्यंत प्रदान रक्कम रु २६१०२२/-आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक १०७, दिनांक १५/०९/२०२० निर्गमित करण्यात आले असून प्राप्त अनुपालन संयुक्तिक नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 128, Hmm No : 107)

PREVIEW

## *19 मालमत्ता कर वसुली व थकबाकीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 128 अन्वये 100 टक्के कराची वसुली करणे आवश्यक असतना, महानगरपालिकेने सन 2015-2016 मध्ये 100 टक्के कर वसुली केली नाही मनपा अमरावती कर विभागाने सन 2015-2016 मध्ये थकीत मागणीपैकी केवळ 69.16 टक्के व चालू मागणी पैकी 82.48 टक्के एवढी वसुली केली आहे. तसेच अंदाजपत्रक अपेक्षित धरलेल्या रकमेपेक्षा कमी .वसुली केली आहे. |

मनपा अमरावतीकडील एकूण उत्पनाच्या स्त्रोतापैकी मालमत्ता कर हा प्रमुख स्त्रोत असून त्यामध्ये पुढील घटकाचा समावेश आहे. त्या संबंधाने अंदाजित रमा व प्रत्यक्ष जमा महसूल खालील प्रमाणे आहे.

| कर | अपेक्षित वसुली रुपये (अंदाजपत्रकाप्रमाणे) | प्रत्यक्ष वसुली |
|---|---|---|
| सामान्य कर | 35,00,00,000/- | 22,90,01,717 /- |
| पथकर | 1,60,00,000/- | 1,87,35,910/- |
| अग्नीकर | 2.00.00.000/- | 1,29,40,261 /- |

| | | |
|---|---|---|
| वृक्ष कर | 80,00,000/- | 75,21,036/- |
| पाणी पट्टीकर | 30,00,000/- | 24,82,772/- |
| मोठ्या इमारतीवरील कर,शिक्षण कर ,रोजगार हमी कर | 15,00,000/- | 14,11,923/- |
| एकूण | 39,85,00,000/- | 27,20,93,619 /- |

या संदर्भात कर निर्धारक व कर संकलन अधिकारी यांनी सादर केलेल्या एकत्रित विवरणपत्रानुसार मालमत्ता कराची एकूण मागणी 42,79,35,707/- एवढी असून वसुली रुपये 32,62,04,662/- एवढी आहे.

यावरील अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

जुन्या थकीत मागणीनुसार कर विभागाकडील विवरणपत्रात थकीत मागणी व चालू मागणी स्वतंत्र पणे दर्शविली असून थकीत मालमत्ता करापैकी 69.16 टक्के इतकीच वसुली करण्यात आली आहे..पैकी झोन क्रमांक 5 मधील वसुली सर्वात कमी 42.50 टक्के इतकीच आहे.

चालू मागणी वसुली कर विभागाकडील विवरण पत्रानुसार सन 2015-2016 मधील चालू मागणी 22,70,11,842/- त्यापैकी रक्कम रुपये 18,72,42,273 /- एवढी आहे .82.48 टक्के आहे. त्यामध्ये पाश्चिम झोन क्रमांक 5 मधील वसुली 50.40.टक्के इतकीच आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 128 अन्वये 100 टक्के कराची वसुली करणे आवश्यक असतना, महानगरपालिकेने सन 2015-2016 मध्ये 100 टक्के करवसुली केली नाही

उपरोक्त अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 140/दिनांक 24/9/2020 नुसार अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन सादर न केल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATVDKM6401 (Ref No : 138, Hmm No : 140)

## *20 शालेय पोषण आहार प्रदानातील अनियमितताबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 8**

*लेखा शीर्ष : शिक्षण शालेय पोषण आह महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 1756488.00 /-

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 1756488.00/-

| |
|---|
| शासनाचे निकषाप्रमाणे आठवड्यातून एक दिवस पुरक पोषण आहार दिल्याची पडताळणी करता आली नाही, पोषण आहारामध्ये भाजीपाल्याचा समावेश केल्या बाबतची मुख्याध्यापकाची प्रमाणपत्रे आढळून आली नाही, |

| |
|---|
| मुख्याध्यापक व केंद्रप्रमुख यांनी प्रमाणीत केलेले प्रपत्र ब आढळून आले नाहीत, महानगरपालीका स्तरावरील समितीचे अहवाल दर्शवले नाही, शालेय व्यवस्थापन समितीची स्थापना केल्याबाबत पडताळणी करता आली नाही, देयकात दर्शवलेली विद्यार्थी संख्या व प्रत्यक्ष उपस्थीत विद्यार्थी संख्येची पडताळणी करता आली नाही, बचतगटांना रकमा प्राप्त झाल्याबाबत पोचपावत्या दर्शवल्या नाहीत. |

महानगरपालीका अमरावतीचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात खालील प्रमाणकान्वये शालेय पोषण आहारापोटी खर्च केल्याचे दिसुन आले.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| 14093 | 01.03.2016 | 405202 |
| 14094 | 01.03.2016 | 228587 |
| 14095 | 01.03.2016 | 719129 |
| 14096 | 01.03.2016 | 403570 |
| | एकुण | 1756488 |

लेखापरीक्षणात उपरोक्त प्रमाणकांची तपासणी केली असता त्यावर पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र.शापोआ 2010/प्र. क्र.18/प्राशि-4 दिनांक 02 फेब्रुवारी 2011 व महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र.शापोआ 2015/ प्र. क्र.177/एस.डी.-3 दिनांक 12 ऑक्टोबर 2015 अन्वये शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत खर्चाचे दर लागू करण्यात आले आहेत. त्याला अनुसरुन रुपये 1756488/- ऐवढा खर्च करण्यापुर्वी शासनाचे निकषाप्रमाणे इंधन व भाजीपाला यासाठी लागणारा खर्च अनुज्ञेय आहे या रकमेतून मुलांना अन्न शिजविण्याच्या यंत्रणेने आठवड्यातून किमान एक दिवस पुरक आहारात (उदाहरणार्थ फळे, सोयाबिस्कीट, दुध, चिक्की, राजगीरालाडू, गुळ शेंगदाणे, बेदाणे, चुरमुरे) असा पुरक आहार द्यावा असे आदेशीत आहे तथापी अशी कार्यवाही केल्याबाबत संबंधीत शाळांच्या अभिलेख्या अभावी पडताळणी करता आली नाही.

2. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र.शापोआ 2010/प्र. क्र.18/प्राशि-4 दिनांक 02 फेब्रुवारी 2011 मधील परि. क्र. 6 प्रमाणे दैनिक आहारात नियमितपणे पालक, मेथी,टोमॅटो, कोथिंबीर,बटाटे,राजगीरा,फ्लॉवर,कोबी,वटाणा,शेवगाशेंगा,वांगी,दुधीभोपळा,वाल,तोंडाले,गाजर ईत्यादी पाककृतीनुसार आहार शिजवण्याच्या काम करण्याच्या स्थानिक यंत्रणेने खरेदी कराव्यात आणि त्याचा आहारात समावेश करावा, स्थानिक यंत्रणेने चविष्ट आहार बनविण्याचे काम करावे. तसेच त्यामध्ये भाजीपाल्याचा समावेश न चुकता करावा व संबंधीत मुख्याध्यापकाने प्रत्येक महिन्याला आहारामध्ये आवश्यक भाजीपाल्याचा समावेश केला असल्याचे तसेच आहार चविष्ट असल्याची खात्री करुन आहार शिजवण्याच्या यंत्रणेस प्रमाणपत्र द्यावे सदर प्रमाणपत्राच्या आधारे संबंधित यंत्रणेस खर्च अदा करण्याची कार्यवाही करावी. तथापी लेखापरीक्षणात अशी प्रमाणपत्रे आढळून आली नाहीत त्यामुळे करण्यात आलेले प्रदान योग्य असल्याची पडताळणी करता आली नाही.

3. उपरोक्त प्रमाणकांची तपासणी केली असता त्यासोबत मुख्याध्यापक व केंद्रप्रमुख यांनी प्रमाणीत केलेले

PREVIEW

प्रपत्र ब आढळून आले नाहीत तसेच पंचायत समितीकडील सक्षम प्राधीकारी यांनी सदरील प्रपत्र ब तपासून त्याप्रमाणे पुरक आहार दिल्याबाबत तपासणी केल्याची पडताळणी करता आली नाही त्यामुळे योग्यरित्या खर्च होवून योजनेची फलश्रुती झाल्याची खात्री करता येत नाही.

4. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र.शापोआ 2004/(246/4)/प्राशि-4 दिनांक 31 मार्च 2005 मधील परि. क्र. 4 प्रमाणे नियुक्त केलेल्या महानगरपालीका स्तरावरील समितीचे अहवाल दर्शवले नाही.

5. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक पिआरई 2010/प्र.क्र.21 /प्रशि 1 दिनांक 17 जुन 2010 ला अनुसरुन बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2009 चे कलम 21 नुसार शाळेने शालेय व्यवस्थापन समिती स्थापन करुन आपले व्यवहार पारदर्शक असल्याबाबत खर्चास मंजुरी घेतल्याचे आढळून आले नाही.

6. लेखापरीक्षणात उपरोक्त प्रमाणकांची तपासणी केली असता त्यात प्रत्येक शाळेने महिन्यातील एकुण हजर विद्यार्थी दर्शवले आहेत तथापी महिन्यातील कार्यदिन व त्यादिवशी हजर असलेले विद्यार्थी नुसार सदरील विद्यार्थी संख्या असल्याबाबत उपस्थीतीपटाअभावी पडताळणी करता आली नाही.

7. उपरोक्त प्रमाणकान्वये विविध बचतगटांना रक्कमा प्रदान केल्या आहेत तथापी सदरील रकमा संबंधीतांना प्राप्त झाल्याबाबत पोचपावत्या दर्शवल्या नाहीत.

8. उपरोक्त उणीवाबाबत संबंधीत अभिलेख्यासह तात्काळ खुलासा करण्याबात अर्धसमासपत्र क्रमांक 193 दिनांक 27.11.2020 अन्वये कळवूनही खुलासा व अभिलेखे अप्राप्त असल्यामुळे परिच्छेद अंतिम करण्यात आला आहे.

DATVPWM6902 (Ref No : 148, Hmm No : 193)

PREVIEW

## *21 झेरॉक्स मशीन खरेदीतील अनियमितताबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 7**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन विभा महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 68250.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 68250.00/-

| |
|---|
| शासन निर्णय दिनांक 30 ऑक्टोबर 2015 मधील तरतुदीनुसार खरेदी समिती गठण केलेली नाही, मुळ संचीका लेखापरीक्षणास दर्शवली नाही, मुल्यवर्धीत कर कपात केलेला नाही, पुरवठादारांचे पॅन कार्ड प्रत घेतल्याचे आढळून आले नाही, जंगम मालमत्ता नोंदवही ठेवलेली नाही, प्रदानाची पोचपावती घेतलेली नाही, कपात |

| |
|---|
| केलेला आयकर भरणा चालान दर्शवले नाही. |

महानगरपालीका अमरावतीचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात प्रमाणक क्रमांक 14948 दि.09.03.2016 अन्वये एस.एस.एंटरप्रायजेस यांना कॅनन आयआर 3300 - 2 ट्रे झेरॉक्स मशीन खरेदीपोटी रक्कम रु.68250/- प्रदान केल्याचे दिसुन आले सदरील प्रमाणकाची तपासणी केली असता यावर पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/उद्योग-4 दिनांक 30 ऑक्टोबर 2015 मधील प्रकरण 2 मधील 2.9.3 नुसार खरेदी समितीचे गठण केल्याचे दिसुन आले नाही.

2. लेखापरीक्षणात सदर प्रमाणकाची तपासणी केली असता त्यासोबत जोडलेल्या झेरॉक्स टिपणीमध्ये ओम झेरॉक्स, प्रकाश झेरॉक्स व एस एस एंटरप्रायजेस यांचे कडून दरपत्रके मागवल्याचे नमुद केले आहे तथापी सदरील दरपत्रके असलेली संचीका लेखापरीक्षणास सादर केली नाही त्यामुळे शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/उद्योग-4 दिनांक 30 ऑक्टोबर 2015 मधील प्रकरण 3 चे पालन केल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

3. लेखापरीक्षणात सदरील प्रमाणकाची तपासणी केली असता त्यासोबत संबंधीत पुरवठादारांचे मुल्यवर्धीत कर नोंदणी प्रमाणपत्र घेण्यात आल्याचे दिसुन आले नाही तसेच मुल्यवर्धीत कराची कपातही केल्याचे आढळून आले नाही याबाबत खुलासा करावा.

4. शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/उद्योग-4 दिनांक 30 ऑक्टोबर 2015 मधील प्रकरण 3 मधील 3.2.3 (ड) नुसार संबधीत पुरवठादाराचे पॅन कार्ड घेतलेले आढळून आले नाही.

5. लेखापरीक्षणात सादर प्रमाणकाची तपासणी केली असता त्यासोबत जोडलेल्या ठरावाच्या प्रतीप्रमाणे "जुनी झेरॉक्स मशीन ब-याच कालावधीपासुन नादुरुस्त आहे" असे नमुद आहे. विभागाकडे जुनी झेरॉक्स मशीन उपलब्ध असताना ती दुरुस्तीसाठी किती खर्च आला असता याबाबत आढावा घेतल्याचे आढळून आले नाही तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील प्रकरण 5 नियम 62 व प्रकरण 12 नियम 191 प्रमाणे नमुना नंबर 17 मध्ये जंगम मालमत्ता नोंदवही ठेवल्याचे आढळून आले नाही.

6. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील प्रकरण 11 नियम 182 प्रमाणे प्रदानाची पोचपावती घेण्यात आलेली नाही.

7. सदरील देयकातून आयकरापोटी रक्कम रु.1529/- कपात केल्याचे दिसुन आले तथापी सदरील रक्कम आयकरखाती भरणा केल्याबाबतचे चालान पहावयास मिळाले नाही.

उपरोक्त उणीवाबाबत लेखापरीक्षणात अर्धसमासपत्र क्रमांक 203 दिनांक 16.12.2020 अन्वये अभिलेख्यासह तात्काळ खुलासा सादर करण्याबाबत कळवूनही कार्यवाही केलेली नाही.

DATVPWM6902 (Ref No : 153, Hmm No : 203)

PREVIEW

## *22 चहा पाणी व नास्ता खर्चातील अनियमितताबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 7**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन विभा महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9अ*
गुंतलेली रक्कम रु. 33595.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 33595.00/-

दरपत्रके मागवलेली नाहीत, प्रदानासाठी सक्षम प्राधीकारी यांची मंजुरी घेतलेली नाही, मुदतबाह्य मागण्यांना सक्षम समितीची मंजुरी घेतलेली नाही, ज्या कार्यक्रमासाठी/सभेसाठी खर्च करण्यात आला त्याचे उपस्थीतपट/ईतीवृत्त दर्शवले नाही, बिजके कालक्रमानुसार आढळून आली नाहीत, बिजकावर खरेदी केलेल्या वस्तुचा तपशील नोंदवलेला नाही, प्रदानाची पोचपावती घेतलेली नाही.

महानगरपालीका अमरावतीचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात निवड महिन्यातील सादर केलेल्या खालील प्रमाणकान्वये चहा पाणी व नास्तासाठी खर्च नोंदवून कॅफे सुंदरम यांना प्रदान केल्याचे दिसुन आले.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| 1 | 15057 | 14.03.2016 | 4785 | मा.उपायुक्त (सा) कार्यालयात माहे 01/16 |
| 2 | 15058 | 14.03.2016 | 5292 | मासिक सभा माहे 08/2014 व 09/2014 |
| 3 | 15059 | 14.03.2016 | 3394 | मध्य झोन येथे सभा माहे 12/2014 |
| 4 | 15060 | 14.03.2016 | 4308 | मासिक सभा माहे 10/2014 व 11/2014 |
| 5 | 15061 | 14.03.2016 | 6243 | मासिक सभा माहे 03/2015 |
| 6 | 15062 | 14.03.2016 | 9573 | मासिक सभा माहे 02/2015 |
| | | एकुण | 33595 | |

यावर पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस-1088/(2512)/उद्योग-6 दि.02 जानेवारी 1992 मधील 8.3 (इ) नुसार एकावेळी रु.500/- किंवा एखाद्या विशिष्ट वस्तुची खरेदी वार्षिक रु.20000/- पर्यंत असेल अशावेळी किमान 3 दरपत्रके व 8.3(फ) नुसार एखाद्या विशिष्ट वस्तुची एकुण खरेदी वार्षिक रु.20000/- पेक्षा जास्त असेल अशावेळी राजपत्रात निविदा प्रसिध्द करुन निविदा मागवणे आवश्यक आहे तथापी अशी कार्यवाही केल्याबाबत अभिलेखे आढळून आले नाहीत.

PREVIEW

2. देयकासोबत वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक विअप्र-10.8/प्र.क्र.70/2008/विनियम दि.15 मे 2009 मधील परिच्छेद 3 व 4 नुसार कार्यवाही करुन सक्षम प्राधीका-यांचे सदरील खर्चास मंजुरी दिल्याबाबतचे आदेश जोडलेले नाहीत.

3. लेखापरीक्षणात उपरोक्त प्रमाणकांची तपासणी केली असता अ.क्र. 2 ते 4 व 06 च्या मागण्या मुदतबाह्य असल्याचे दिसुन येते. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील प्रकरण 10 नियम 168 प्रमाणे मुदतबाह्य मागण्या सक्षम समितीच्या मंजुरी शिवाय देता येणार नाहीत परंतु प्रस्तुत प्रकरणात अशी मंजुरी घेतल्याचे आढळून आले नाही.

4. उपरोक्त खर्च ज्या सभेकरिता/कार्यक्रमाकरिता करण्यात आला त्या सभेचे इतिवृत्त अथवा उपस्थीतीपट पहावयास मिळाला नाही त्यामुळे केलेला खर्च योग्य असल्याची पडताळणी करता आली नाही.

5. लेखापरीक्षणात सदर प्रमाणकासोबतच्या बिजकांची तपासणी केली असता उपरोक्त पैकी अ.क्र. 2,3,4 व 5 च्या देयकासोबतच्या बिजकांवर दिनांक नमुद केलेला आढळून आला नाही तसेच बिजक क्रमांकही कालक्रमानुसार चढत्या क्रमानुसार नाहीत याबाबत खुलासा करावा.

6. लेखापरीक्षणात सदर प्रमाणकासोबतच्या बिजकांची तपासणी केली असता उपरोक्तपैकी अ.क्र. 2 मधील माहे 08/14, अ.क्र.3 मधील माहे 12/14, अ.क्र.4 मधील माहे 10/14 व 11/14, अ.क्र.5 मधील माहे 03/15 व अ.क्र.6 मधील माहे 02/2015 चे बिजकांवर किती नग व कोणत्या दराने चहा/कॉफी/नास्ता ई. खरेदी करण्यात आला याबाबत तपशिल नमुद केलेला नाही सदरील तपशिल दर्शवणे आवश्यक आहे.

7. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील प्रकरण 11 नियम 182 प्रमाणे प्रदानाची पोचपावती घेण्यात आलेली नाही.

उपरोक्त उणीवाबाबत लेखापरीक्षणात अर्धसमासपत्र क्रमांक 204 दिनांक 16.12.2020 नुसार अभिलेख्यासह खुलासा सादर करण्यास कळवूनही खुलासा केलेला नाही.

DATVPWM6902 (Ref No : 154, Hmm No : 204)

PREVIEW

# कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

PREVIEW

## *23 अमरावती मनपाने नियुक्त केलेल्या विधीज्ञांना अदा केलेल्या देयकातून आयकराची रक्कम वसूल न केले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 36750.00/-

आयकर अधिनियम 1961 मधील कलम 194 (जे) मधील तरतुदी नुसार ॲडव्होकेट फी ही व्यवसायिक फी मध्ये समाविष्ठ असल्याने 10% आयकर कपात करणे आवश्यक आहे. परंतु वरील नमूद ॲडव्होकेट फी ची देयके अदा करताना 10% आयकर कपात करणेत आली नाही. तरी कपात न करणेत आलेली आयकराची रक्कम संबंधिताकडून वसूल करण्यात येवून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

अमरावती महानगरपालिकेकडील विधी विभागाने न्यायालयीन प्रकरणी कार्यालयाची बाजू मांडण्यासाठी पॅनलवर विविध विधीज्ञांची नियुक्ती करून स्थायी समितीच्या ठरावाद्वारे निश्चित केलेल्या दराने त्यांना शुल्क प्रदान करण्यात येते सन 2015-2016 या आर्थिक वर्षात विधी विभागाकडुन खर्च करणेत आलेल्या रकमांची रोख पुस्तकावरून पडताळणी केली असता खालील विधीज्ञांना ॲडव्हॊकेट फीची देयके अदा करण्यात आली असून देयक माधनाची देयके अदा करताना आयकर कपात करण्यात आला नाही.

| .क्र,. | प्र.क्र | दिनांक | विधीज्ञांचे नाव | प्रदान केलेली रक्कम | कपात करावयाची आयकराची रक्कम | प्रत्यक्षात केलेली कपात | कपात करावयची आयकराची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3159 | 29/6/2015 | ॲड.बी.जी.कासट | 50000 | 5000 | 0 | 5000 |
| 2 | 3160 | 29/6/2015 | ॲड.नइम अहमद | 20000 | 2000 | 0 | 2000 |
| 3 | 3161 | 29/6/2015 | ॲड.डी.एम.श्रीमाळी | 29500 | 2950 | 0 | 2950 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 3162 | 29/6/2015 | ॲड काळमेघ अंकुश. | 25000 | 2500 | 0 | 2500 |
| 5 | 3163 | 29/6/2015 | ॲड. शिगणे.एस.एस. | 50000 | 5000 | 0 | 5000 |
| 6 | 11308 | 17/12/2015 | ॲड. कदम.एस.एस . | 150000 | 15000 | 0 | 15000 |
| 7 | 14146 | 2016/03/03 | ॲड. दर्डा रमेश . | 15000 | 1500 | 0 | 1500 |
| 8 | 14147 | 2016/03/03 | ॲड.नइम अहमद | 28000 | 2800 | 0 | 2800 |
| | | | एकूण | 367500 | 36750 | 0 | 36750 |

1) आयकर अधिनियम 1961 मधील कलम 194 (जे) मधील तरतुदीनुसार अडव्हॊकेट फी ही व्यावसायिक फी मध्ये समाविष्ठ असल्याने 10% आयकर कपात करणे आवश्यक आहे. परंतु वरील नमुद ॲडव्होकेट फी ची देयके अदा करताना 10% कपात करणेत आलेली नाही. तरी कपात न करणेत आलेली आयकराची रक्कम 36750/- संबंधीताकडुन वसुल करण्यात येवून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

2) दावे व खटले नोंदवही पाहता नोंदवहितील नोंदी अपूर्ण आहेत. नोंदवही मध्ये अधिकृत अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली नाही तरी नोंदवही पूर्ण करून अनुपालन सादर करावे.

3) विधीज्ञांची नेमणूक व त्यांना दिलेले मानधन कोणत्या ठरावानुसार अदा केले जाते या बाबत ठरावाची प्रत लेखा परीक्षणास सादर केली नाही त्यामुळे विधीज्ञांची नेमणूक व त्यांना दिलेले मानधन याची खात्री करता आली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत विधी विभागास अर्धासामास पत्र क्रमांक 54 दिनांक 05/02/2020 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन सादर केले नाही. त्यामुळे सदरचा परिच्छेद कायम करणेत येत आहे

DATVDKM6401 (Ref No : 7, Hmm No : 54)

PREVIEW

## *24 अमरावती महानगरपालीकेच्या अग्नीशमन विभागातील अग्नीशमन बळकटीकरण योजनेवरील खर्च प्रमाणकातील अनियमीतता बाबत.*

**अग्नीशमन विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : लेखा विभाग महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 6227912.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 6183086.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 44826.00/-

| |
|---|
| अमरावती महानगरपालीका अग्नीशमन विभागाकडील सन 2015-16 या वर्षात अग्नीशमन बळकटीकरणासाठी आलेल्या निधीच्या खर्चाचे अनुषंगाने खर्च प्रमाणकात खर्च मंजूरी आदेश, कार्यादेश, व देयकातील आयकर रक्कम कपात तसेच साठा नोंदवहीतील विहित नोंदी इत्यादीच्या अनुषंगाने झालेल्या अनियमीतता खालीलप्रमाणे आहेत. |

अमरावती महानगरपालीकेच्या अग्नीशमन विभागासाठी सन 2015-16 मधील एकूण प्राप्त अनुदान रू. 1,80,00,000/- असून सदर अनुदान ध.क्र.036323 दि.10/09/2015 व ध.क्र. 013984 दि. 19/01/2016 अन्वये प्राप्त झाले आहे. यापैकी सन 2015-16 मध्ये अग्नीशमन बळकटीकरणासाठी खालील प्रमाणकातून रू. 62,27,912/- एवढा खर्च करण्यात आल्याचे दिसून आले. परंतु सदर खर्च करताना खालील अनियमीतता दिसून आलेल्या आहेत.

**प्रमाणक क्रमांक 11611 दि.01/01/2016 रू. 39,86,600/- (निव्वळ देय 37,77,303/-) चे अनुषंगाने त्रुटी:**

१. सदर देयकावर प्रदान आदेश नमूद नसताना देयकाचे प्रदान करण्यात आलेले आहे.

२. देयकासोबत खर्च मंजूरीचे सक्षम प्राधीकारी यांचे मंजूरी आदेश संलग्न नसताना देयक पारीत करण्यात आले आहे.

३. देयकासोबत संबंधीत पुरवठा धारकास देण्यात आलेल्या कार्यादेशाची प्रत संलग्न नसताना देयक पारीत करण्यात आले आहे.

४. देयकामधून रक्कम रूपये 79732+9966 =89698/- आयकर कपात दर्शविण्यात आलेली आहे. परंतु सदर कपातीचे अनुषंगाने देयकासोबत कपातीचे विवरणपत्र जोडण्यात आलेले नाही. तसेच सदर आयकराची रक्कम कोणत्या लेखाशीर्षाखाली जमा करण्यात आलेली आहे याबाबत लेखापरीक्षणास अभीलेखे उपल्बध करून देण्यात आलेले नाहीत.

५. देयकामधील नमूद बाब ज्यावर खर्च करण्यात आला आहे ती बाब अग्नीशमन विभागास सुस्थीतीत प्राप्त झाली व त्याबाबतची रीतसर नोंद साठा नोंदवहीत घेण्यात आल्याचे प्रमाणपत्र देयकासोबत संलग्न नाही.

**प्रमाणक क्रमांक 12525 दि. 20/01/2016 रू. 21,88,268/- (निव्वळ देय 21,88,268/-) चे अनुषंगाने त्रुटी:**

१. देयकासोबत खर्च मंजूरीचे सक्षम प्राधीकारी यांचे मंजूरी आदेश संलग्न नसताना देयक पारीत करण्यात आले आहे.



PREVIEW

२. देयकासोबत संबंधीत पुरवठा धारकास देण्यात आलेल्या कार्यादेशाची प्रत संलग्न नसताना देयक पारीत करण्यात आले आहे.

३. देयकामध्ये नमूद धारकासोबत दर करार झाल्याबाबत अभीलेखे उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत.

४. सदर देयकामधून नियमानुसार पुरवठाधारकाकडून २ टक्के आयकराची वसूली दर्शविण्यात आलेली नसल्याने नियमानुसार २ टक्के रू ४३७६५/- ची वसूली करण्यात आलेली नाही. सदर रक्कम वसूलपात्र ठरते.

५. संबंधीत पुरवठाधारकाचे उपप्रमाणकावर TAN/TIN क्रमांक नमूद नसताना देयकावर प्रदान करण्यात आलेले आहे.

६. देयकामधील नमूद बाब ज्यावर खर्च करण्यात आला आहे ती बाब अग्नीशमन विभागास सुस्थीतीत प्राप्त झाली व त्याबाबतची रीतसर नोंद साठा नोंदवहीत घेण्यात आल्याचे प्रमाणपत्र देयकासोबत संलग्न नाही.

**प्रमाणक क्रमांक 12493 दि. 20/01/2016 रू. 53044/- (निव्वळ देय 53044/-) चे अनुषंगाने त्रुटी:**

१. देयकासोबत खर्च मंजूरीचे सक्षम प्राधीकारी यांचे मंजूरी आदेश संलग्न नसताना देयक पारीत करण्यात आले आहे.

२. देयकासोबत संबंधीत पुरवठा धारकास देण्यात आलेल्या कार्यादेशाची प्रत संलग्न नसताना देयक पारीत करण्यात आले आहे.

३. सदर प्रमाणकामध्ये नमूद खरेदी दरपत्रके न मागवताच करण्यात आलेली आहे.

४. देयकामधून नियमानुसार २ टक्के प्रमाणे आयकराची रक्कम रू 1061/- कपात करण्यात आलेली नाही. रू.1061/- रक्कम वसूलपात्र ठरते.

५. देयकामध्ये नमूद टायर टयूब खरेदीसाठीची मा.आयुक्त अमरावती महानगरपालीका यांची मंजूरी दिनांक 21/01/2016 रोजीची असताना देयकासोबत संलग्न उपप्रमाणक हे दिनांक 17/10/2015 रोजीचे दिसून येते. त्यामुळे मा.आयुक्त यांची खरेदीस मंजूरी मिळवणेपूर्वीच उपप्रमाणक प्राप्त करून त्यावर प्रदान झाले आहे.

याबाबत अग्नीशमन विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 50, दि. 23/01/2020 अन्वये तीन दिवसांत अनुपालन दर्शविण्यास कळविले असता अग्नीशमन विभागाने अनुपालन सादर न केल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATBPKM7901 (Ref No : 10, Hmm No : 50)

PREVIEW

## *25 अमरावती मनपाच्या हद्दीतधील मोठया निवासी इमारतीवर शासकीय कराची वसूली करताना प्रभाग ५ मध्ये झालेली अनियमिततेबाबत.*

**प्रभाग कार्यालय**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष : लेखा विभाग महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 49764.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 49764.00/-

| मोठया निवासी इमारतीवर शासकीय कराची वसूली प्रकरणी झालेल्या अनियमीतता बाबत. |
|---|

अमरावती महानगरपालिकेच्या सन 2015-16 आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणादरम्यान प्रभाग ५ भाजीबजार अंतर्गत येणाऱ्या मनपा हददीतील खालील मोठया निवासी इमारत मालमत्ताधारकाकडून शासकीय कराची वसूली करण्यात आलेली नाही.

| अ.क्र. | मालमत्ता क्रमांक | निवासी मालमत्ता धारकाचे नांव | वसूली मागणी रक्कम रू. | वसूल केलेली रक्कम | सन 2015-16 ए थकबाकी रू. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1387 | शेख दादु शेख गुलजार | 14501 | निरंक | |
| 2 | 1388 | शेख कय्युम शेख कल्लब | 7290 | निरंक | |
| 3 | 0046 | रामेश्वरप्रसाद ब पांडे | 8193 | निरंक | |
| 4 | 0335 | श्री.विठठल दे राऊत | 4578 | निरंक | |
| 5 | 0372 | श्रीमती इंदुबाई मानेकर | 15202 | निरंक | |
| | | एकूण | 49764 | निरंक | |

उपरोक्त प्रमाणे नमूद एकूण रू 49764/- ची वसूली सन 2015-16 अखेर होणे आवश्यक असताना रू **49764**/- ची वसूली सन 2015-16 अखेर न झाल्याने महापालीकेच्या उत्पन्नात सन 2015-16 अखेर घट झाल्याचे निदर्शनास येते. सदर मालमत्ता धारकाकडून दंडनीय व्याजासह रक्कम आकारणी करून अनुपालन दर्शवावे.

याबाबत सहा.आयुक्त प्रभाग 5 यांना अर्धसमास पत्र क्रमांक 47, दि. 23/01/2020 अन्वये तीन दिवसांत अनुपालन दर्शविण्यास कळविले असता अनुपालन सादर न केल्याने आक्षेप नोंदविण्यात



PREVIEW

येत आहे.

DATBPKM7901 (Ref No : 18, Hmm No : 47)

## *26 अमरावती महानगरपालीकेच्या अतीक्रमण विभागाकडील समायोजन देयक नोंदवहीतील, जप्ती नोंदवहीतील व कुली , वाहन चालक यांचे हजेरीपटातील अनियमीतता बाबत.*

**अतिक्रमण विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष : लेखा विभाग महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 6955.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 6955.00/-

| |
|---|
| अतीक्रमण विभागाकडील समायोजन देयक नोंदवहीतील, जप्ती नोंदवहीतील व कुली , वाहन चालक यांचे हजेरीपटातील अनियमीतता बाबत. |

१.अतिक्रमण विभागाची सन २०१५-१६ ची समायोजन देयक नोंदवही तपासली असता सदर नोंदवहीत महापालीकेची गोल मुद्रा उमटविण्यात आलेली नसून सदर नोंदवही अतिक्रमण विभागाचे सक्षम अधीकारी यांनी प्रमाणीत केलेली नाही.

२. अतिक्रमण विभागाने दि. २७/०५/२०१५ रोजी प्रमाणक क्रमांक १८२७ दि. २७/०५/२०१५ अन्वये रू १०००००/- व अग्रीम धन घेतल्याची नोंद आहे. अग्रीम धन घेतल्यानंतरच्या कामाकरीता सदर अग्रीम धनाचा वापर होणे अपेक्षीत असताना अग्रीम धन उचलण्यापूर्वीच्या म्हणजेच दि ५/०३/२०१५ ते ३१/०३/२०१५ या कालावधीचे मजूर व वाहन चालक यांचे वेतन देण्यासाठी रू.७७७६०/- रक्कम खर्ची घालण्यात आलेली आहे. त्यामुळे अग्रीम धनाचा वापर अनियमीतपणे प्रयोजनासाठी नियमबाहयपणे केल्याचे दिसून येते.

३. अमरावती मनपाची वाहन कार्यशाळा अस्तीत्वात असताना नोंदवहीत नोंदविण्यात आलेनुसार सदर अग्रीमातून अनुक्रमे रू १६५०/-, २१९०/-, १७९०/-, १३२५/-, इत्यादी खर्च हा वाहन दुरूस्तीवर केल्याचे दिसून येते. सदर खर्चाचे अनुषंगाने लेखापरीक्षणास मंजूर ठरावाची प्रत सादर करण्यात आलेली नाही.



PREVIEW

तसेच सदर वाहनावर कार्यशाळेत दूरूस्ती होणे अपेक्षीत असताना नियमबाहयपणे खाजगीरीत्या दूरूस्ती करून घेतल्याचे दिसून येते. त्यामुळे एकूण रक्कम रूपये ६९५५/-वसूलपात्र ठरते.

४. समायोजन नोंदवहीत अग्रीम धन घेतल्यानंतर सदर अग्रीमातून वजावट दर्शविताना कोणत्या दिनांकास रक्कम अदा केली जाते तो दिनांक नमूद केला जात नाही. सदर नोंदीसमोर अतिक्रमण पथक प्रमुख यांची स्वाक्षरी करण्यात आलेली नाही. संबंधीत धारक यांची अग्रीम स्वीकारल्याबाबत मुद्रांकीत पोहच घेतली नाही.

५. सदर अग्रीम रकमेतून मजूराच्या वेतनाची रक्कम शा.नि. वि .वि . दिनांक ०७/०४/२००८ नुसार धारकाचे बँक खात्यात जमा करणे आवश्यक असताना सदर रक्कम रोखीने प्रदान करण्यात आल्याचे दिसून येते.

६. सन २०१५-१६ चे जप्ती नोंदवही तपासली असता अतीक्रमण अधीकारी यांनी सदर नोंदवहीनुसार शील्लक साठा प्रत्यक्ष तपासणी केल्याचे कुठेही प्रमाणीत केलेले नाही. तसेच अतिक्रमण विभागाकडील शील्लक साठा निर्लेखीत केल्याबाबत नोंद दिसून येत नाही. शील्लक साठा निर्लेखन केल्याबाबत अभीलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत. त्यामुळे निर्लेखन न झाल्याने निर्लेखनातून महापालीकेस मिळणारे उत्पन्न बुडाल्याची लेखापरीक्षणाचे मत आहे.

७. अतीक्रमण विभागाकडील सन २०१५-१६ ची जप्ती नोंदवही तपासली असता सदर नोंदवहीत नियमीतरीत्या केवळ टेबल,खुर्च्या,गॅस भटटी अशा किरकोळ साहीत्याची जप्ती वारंवार नोंदविण्यात आल्याने महापालीका क्षेत्रातील अनाधीकृत होर्डीग्ज, बॅनर इत्यादीवर कार्यवाही होत नसल्याने अशा प्रकारच्या वसलीतून महापालीकेचे होणारे उत्पन्न घटत आहे.

८. अतिक्रमण विभागाकडील मजूरांचे हजेरी पट सन २०१५-१६ तपासले असता सदर हजेरी पट सक्षम प्राधीकारी यांचे स्वाक्षरीने प्रमाणीत करण्यात आलेले नसून संबंधीत वाहन चालक, कुली यांची हजेरी नियमीतरीत्या तपासल्या बाबत अतीक्रमण पथक प्रमुख यांनी स्वाक्षरी केलेली नाही.

याबाबत अतिक्रमण विभाग यांना अर्धसमास पत्र क्रमांक 60, दि. 12/02/2020 अन्वये तीन दिवसांत अनुपालन दर्शविण्यास कळविले असता अनुपालन सादर न केल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATBPKM7901 (Ref No : 20, Hmm No : 60)

## *27 विवाह नोंदणी फी व दंडाची रक्कम शासनखाती जमा न केल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 01**

*महानगरपालिका स्व- निधी*



PREVIEW

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 225270.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 225270.00/-

| |
|---|
| १.महानगरपालिकेने विवाह नोंदणी फी व दंडाची/शास्तीची रक्कम रु २२५२७०/- शासन खाती जमा केलेली नाही.<br>२.विवाह नोंदणी प्रमाणपत्राची दुसरी पत्र महानिबंधक पुणे यांच्याकडे पाठविण्यात आलेले नाही. |

महानगरपालिका यांनी सन २०१५-२०१६ मध्ये प्रत्येक प्रभाग निहाय खालील प्रमाणे विवाह नोंदणी फी व दंडाची रक्कम वसूल केलेली आहे.

१.महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम १९९९ चे नियम १२ नुसार निबंधकाकडे आलेली सर्व फी व दंडाची रक्कम शासकीय कोषागारात जमा करणे आवश्यक असतांना महानगरपालिकेने शासकीय महसूलीची रक्कम रु २२५२७०/- शासन खाती जमा न करता नियमबाह्य मनपा निधीत जमा केलेली आहे. विवाह नोंदणीचे काम दिनांक १/५/२००८ पासून महानगरपालिकाकडे हस्तांतरित झालेले आहे.तरी दिनांक १/५/२००८ पासून ३१/०३/२०१६ पर्यंतची वसूल करण्यात आलेली विवाह नोंदणी फी व दंडाची रक्कम परिगणीत करून शासन खाती भरणा करण्यात यावे.

२. महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम १९९८ चे कलम १६ नुसार जेव्हा निबंधकाने या अधिनियमाखाली विवाह नोंदणी करील तेव्हा,तो त्यानंतर तात्काळ नोंदणी प्रमाणपत्राची दुसरी पत्र महानिबंधक पुणे यांच्याकडे पाठविणे आवश्यक आहे,परंतु महानगरपालिकेने अशी कार्यवाही केलेली नाही.

अर्धसमासपत्र क्रमांक ६७ दिनांक १७/०२/२०२० निर्गमित करण्यात आले आहे. संयुक्तिक खुलासा प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 33, Hmm No : 67)

PREVIEW

## *28 अग्रीम रकमेचे समायोजन केले नसल्यामुळे रक्कमा लेख्याबाहेर राहिल्या बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 2**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3026185.00 /-

मुंबई वित्तीय नियम मधील नियम 142 (अ) नुसार 3 तीन महिन्याचे आत समायोजन होणे आवश्यक आहे. मात्र विहित मुदतीच्या अग्रीमापोटी घेतलेल्या रकमांचे प्रत्यक्ष खर्चाच्या पुराव्यासह समायोजन न झालेने अग्रीम रकमेचा गैर विनियोग, महापालिकेच्या निधीची हानी झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

मनपा अमरावती सन 2015-2016 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणाचे वेळी अग्रीम नोंदवहीची व विभागाने सादर केलेल्या विवरण पत्रानुसार पडताळणी केली असता अधिकारी/ कर्मचारी यांचे कडून अग्रीम रकमेचे समायोजन न झाल्यामुळे रकमा लेख्या बाहेर राहिल्या आहेत.

समायोजित न झालेल्या अग्रीम रकमेचा तपशील खालील प्रमाणे

| आ क्र | कर्माचा-याचे नाव | प्रमाणक क्रमांक व दिनांक | प्रयोजन | प्रलंबित अग्रीम |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री डी.ए मिसाळ, का.अभियांता | 1572-3/6/30/14 | मेमरी बॉक्स मुंबई येथे पाठविणे | 3000.00 |
| 2 | श्री प्रभाकर देवपुजारी | 1607-6/6/2014 | मुंबई प्रवास जात निहाय जनगणना | 5000.00 |
| 3 | श्री.डी.एच .जयस्वाल | 1917- 20/6/2014 | अतिक्रमण हटवणे | 100000.00 |
| 4 | श्री.आर.एम पवार, उपअभियंता | 2441- 10/7/2014 | प्राथमिक शाळा दुरुस्ती | 200000.00 |
| 5 | श्री.मिलिंद बल्लाळ | 3833- 16/8/2014 | लोकसभा निवडणूक11 मतदान केंद्रावर सुविधा पुरवणे | 100000.00 |
| 6 | डॉ सचिन बोंद्रे,पशु चिकित्सक | 5436-25/9/2014 | औषद खरेदी | 200000.00 |
| 7 | श्री .पी.व्ही.इंगोले | 8330- 3/12/2014 | पोलीस मुख्यालय येथे प्रवेश द्वार उभारणे | 299000.00 |
| 8 | श्रीमती अरुणा डांगे | 9651-9/1/2015 | कला मोहत्सवाकरिता | 200000.00 |
| 9 | सौ.चरण सिंगाकर नंदा उप महापौर | 13/242-20/3/15 | मुंबई प्रवासाठी | 50000.00 |
| | | | **सन 2014-2015** | **1157000.00** |
| 10 | श्री विलास इंगोले सभापती (स्पास) | 248-1/4/15 | प्रवास खर्चाकरिता | 20000.00 |
| 11 | श्री.जे.एस काळमेघ , | 1679-25/5/2015 | शिव टेकडी येथे | 300000.00 |

PREVIEW

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सहा.अभियंता | | मातीचा ट्रक करिता | |
| 12 | भारत सिंह चव्हाण फायर मन | 3069-26/6/2015 | वाहन दुरुस्ती करता | 50000.00 |
| 13 | श्रीमती अरुणा डांगे शिक्षणाधिकारी | 3248-30/6/2015 | गुणवंत विधार्य्थाचा सत्कार सभारंभ | 100000.00 |
| 14 | श्री सुनील त्रयसराव वाहन चालक | 4818-4/8/2015 | acceseri खरेदी करीता | 60000.00 |
| 15 | श्री एस.व्ही भांडवे | 5092-12/08/2015 | फिटिंग एम.एस. जाळी | 15000.00 |
| 16 | श्री.डी.जी असुर्डे .का. अधिक्षक | 5252-19/8/2015 | महिला हक्क समिती दौऱ्या करिता | 50000.00 |
| 17 | श्री.एम व्ही गोटे | 5325-24/8/2015 | साहित्य खरेदी करिता | 10000.00 |
| 18 | श्री.सचिन बोंद्रे | 5506-27/8/2015 | | 250000.00 |
| 19 | श्री भारतशीह चव्हाण | 5889- 3/9/2015 | अतिवृष्टी मधील कुलींचा पगार | 330362.00 |
| 20 | श्री.जी.एस गेडाम स्वा.अ | 6514-15/9/2015 | ब्लिचिंग पावडर खरेदी | 100000.00 |
| 21 | श्री भरतसिह चव्हाण | 7188-8/10/2015 | | 25000.00 |
| 22 | श्री भरतसिह चव्हाण | 8266-27/10/2015 | | 304083.00 |
| 23 | श्री ई.टी .तिजारे | 8470-30/10/2015 | ब्लिचिंग पावडर खरेदी | 100000.00 |
| 24 | प्रमोद येवतीकर | 8930-7/11/2015 | माळीपद भरती करता | 40000.00 |
| 25 | श्री दि.जी अलुडे, .का.अधीक्षक | 9042-21/11/2015 | सिस्टीम मॅनेजर पदाचे भरती करता | 30000.00 |
| 26 | श्री .प्रमोद इंगोले | 9641-1/12/2015 | | 18000.00 |
| 27 | श्री.डी.एस.एस.हंबर्डे | 1166-4/12/2015 | | 12505.00 |
| 28 | श्री.श्री.आमित डेगरे | 11432-19/12/2015 | मुंबईला जाण्याकरिता. | 6000.00 |
| 29 | श्री.डी.एस.एस.हंबर्डे | 12104-12/1/2016 | | 8235.00 |
| 30 | श्री.अनुप सारवान | 12267-25/1/2016 | | 10000.00 |
| 3 | डॉ.सिमा नीताम | 13780-20/2/2016 | | 30000.00 |
| | | | एकूण 2015-2016 | 1869185.00 |
| | | | एकूण | 3026185.00 |

2) मुंबई वित्त्तीय नियम मधील नियम 142 ( अ) नुसार 3 तीन महिन्याचे आत समायोजन होणे आवश्यक आहे. मात्र विहित मुदतीच्या अग्रीमापोटी घेतलेल्या रकमांचे प्रत्यक्ष खर्चाच्या पुराव्यासह समायोजन न झालेने अग्रीम रकमेचा गैरविनियोग, महापालिकेच्या निधीची हानी झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

PREVIEW

3) सन 2015-2016 या वर्षा अखेर समायोजना अभावी रक्कम लेख्या बाहेर असून संपूर्ण रकमेचे समायोजन होण्यासाठी ठोस उपाय योजना राबवून, समायोजन न होणारी रक्कम संबंधिताकडून वसूल वसूल होणे आवश्यक आहे.

उपरोक्त अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 96 दिनांक 17/03/2020 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविण्यात आले असतना, विभागाने अनुपालन सादर केले नाही त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVDKM6401 (Ref No : 79, Hmm No : 96)

## *29 सन्मा. पदाधिकारी यांना देण्यात येत असलेल्या वैयक्तिक मोबाईल रिचार्ज खर्चाबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 0**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 18643.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 18643.00/-

| |
|---|
| राज्य शासनाच्या मंजुरीशिवाय सन्मा. पदाधिकारी यांना देण्यात येत असलेल्या वैयक्तिक मोबाईल रिचार्ज खर्च लेखापरीक्षणास मान्य नसून वसूलपात्र ठरविण्यात येत आहे. निवडक महिन्यात प्रदान करण्यात आलेली रक्कम रु १८६४३/- लेखापरीक्षणास मान्य नसून वसूलपात्र ठरविण्यात येत आहे. |

अमरावती महानगरपालिकेच्या नगर सचिव विभागाच्या सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात खालील बाब निदर्शनास आलेली आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १०/२००१/प्र.क्र.१२५/नवि-२७ दिनांक १६/०८/२००१ नुसार महानगरपालिकेच्या पदाधिकाऱ्याना देण्यात येणारे मानधनात दूरध्वनी खर्च समाविष्ठ आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १९-अ (१) मधील तरतूदीनुसार पक्षनेता,गटनेता,उपमहापौर यांना वैयक्तिक मोबाईल खर्च प्रतिपूर्ती देण्याबाबत राज्य शासनाची मंजुरी घेण्यात आलेले नाही. त्यामुळे सन २०१५-२०१६ मध्ये वैयक्तिक मोबाईल रिचार्ज देयकावरील खर्च लेखापरीक्षणास मान्य नसून वसूलपात्र ठरविण्यात येत आहे. निवडक महिन्याच्या लेखापरीक्षणात खालील देयकात प्रदान खर्च रक्कम रु १८६४३/- लेखापरीक्षणास मान्य नसून वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

| प्रमाणक | दिनांक | रक्कम | कोणास प्रदान | तपशील |
|---|---|---|---|---|

| क्रमांक | | | | |
|---|---|---|---|---|
| 9083 | 21-11-2015 | 1217 | भाजपा गटनेता | वैयक्तिक मोबाईल खर्च |
| 9085 | 21-11-2015 | 5100 | बबलू शेखावत पक्षनेता | वैयक्तिक मोबाईल खर्च |
| 12311 | 19-01-2016 | 1900 | प्रकाश बनसोड गटनेता | वैयक्तिक मोबाईल खर्च |
| 12342 | 19-01-2016 | 1531 | शेख जफर शेख जब्बार उपमहापौर | वैयक्तिक मोबाईल खर्च |
| 12363 | 19-01-2016 | 1293 | संजय अग्रवाल भाजपा गटनेता | वैयक्तिक मोबाईल खर्च |
| 12364 | 19-01-2016 | 5097 | बबलू शेखावत पक्षनेता | वैयक्तिक मोबाईल खर्च |
| 15032 | 14-03-2016 | 2505 | बबलू शेखावत पक्षनेता | वैयक्तिक मोबाईल खर्च |
| | | 18643 | | |

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक ११३ दिनांक १६ /०९/२०२० देण्यात आले आहे.प्राप्त खुलासा संयुक्तिक नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 37, Hmm No : 113)

PREVIEW

## *30 महानगरपालिकेने सन्मा.पदाधिकारी यांचे खाजगी सचिवाना प्रदान केलेल्या मानधनाबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 1**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 120000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 120000.00/-

राज्य शासनाच्या मंजुरीशिवाय मनपा अमरावतीचे पदाधिकारी महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती व विरोधी पक्षनेता यांच्या खाजगी सचिवांना सन २०१५-२०१६ मध्ये प्रदान करण्यात आलेले मानधन रक्कम रु १२००००/- लेखापरीक्षणास मान्य नसून वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

अमरावती महानगरपालिकेच्या नगर सचिव विभागाच्या सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात खालील बाब निदर्शनास आलेली आहे.

१ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १९-अ (१) मधील तरतूदीनुसार महानगरपालिकेने केलेल्या नियमाव्दारे राज्य शासनाच्या पूर्वमंजूरीने पालिका सदस्यांना मानधन, फी व भत्ते देण्याबाबत तरतूद आहे. परंतु पदाधिकारी यांनी त्यांचे स्तरावर खाजगी सचिवाची नेमणूक करून मनपा निधीतून मानधनाचे प्रदान करण्याबाबत अधिनियमात व महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात कुठलीही तरतूद नसताना मनपा अमरावतीचे पदाधिकारी महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती व विरोधी पक्षनेता यांनी खाजगी सचिवाची मानधनावर प्रतीमाह रु.2500/- प्रमाणे नियमबाह्यपणे नेमणूक केली. तरी सन २०१५-२०१६ मध्ये खाजगी सचिवाच्या मानधनावर करण्यात आलेला खर्च  रक्कम रु १२०,०००/- लेखापरीक्षणास मान्य नसून वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

| अ.क्र. | खाजगी सचीवाचे नाव | पदाधिकारी यांचे नाव | मानधनाची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | श्री. देवचंद शेंडे | मा. महापौर यांचे खाजगी सचिव | ३०,०००/- |
| २ | श्री. निलेश रंगारी | मा. उपमहापौर यांचे खाजगी सचिव | ३०,०००/- |
| ३ | श्री. सुधीर बिलबिले | मा. सभापती स्थायी समिती यांचे खाजगी सचिव | ३०,०००/- |
| ४ | श्री.योगेश गावंडे/ गोविंद रामचंद्र दायमा | मा. विरोधी पक्ष नेता यांचे खाजगी सचिव | ३०,०००/- |
| | | | १२०,०००/- |

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक ११३ दिनांक १६ /०९/२०२० देण्यात आले आहे.प्राप्त खुलासा संयुक्तिक नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSGCF7501 (Ref No : 108, Hmm No : 113)

PREVIEW

## ***31 महानगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांना देण्यात येत असलेल्या वैकल्पिक वाहन भत्ताबाबत***

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 2571151.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 2571151.00/-

| |
|---|
| महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १९ अ (१) नुसार राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, महानगरपालिकेस या कलमान्वये महानगरपालिकने केलेल्या नियमाव्दारे विहित करण्यात येईल असे, असे भत्ते प्रत्येक पालिका सदस्याला देता येतील, असे नमूद असतांना महानगरपालिकेने वैकल्पिक वाहन भत्ता पदाधिकार्यांना प्रदान करण्यापूर्वी राज्य शासनाची मंजुरी घेतलेली नसल्यामुळे सन २०१५-२०१६ मध्ये झालेला खर्च २५७११५१/- लेखापरीक्षणास मान्य नसून वसूलपात्र ठरविण्यात येत आहे. |

अमरावती महानगरपालिकेच्या नगर सचिव विभागाच्या सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात खालील बाब निदर्शनास आलेली आहे.

महानगरपालिकेने महानगरपालिकेच्या सर्व सन्मा.पदाधिकार्यांना अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार रक्कम रु २५७११५१/- वैकल्पिक वाहन भत्ता प्रदान केलेला आहे याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १९ अ (१) नुसार राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, महानगरपालिकेस या कलमान्वये महानगरपालिकने केलेल्या नियमाव्दारे विहित करण्यात येईल असे, असे भत्ते प्रत्येक पालिका सदस्याला देता येतील, असे नमूद आहे. तसेच महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वाहन १००७/प्र.क्र.४८/२००७ विनियम दिनांक ३१/१२/२००७ नुसार शासकीय कामकाजासाठी खाजगी वाहन वापराची योजना बंद करण्यात आली आहे. अमरावती महानगरपालिकेने सन २०१५-२०१६ मध्ये वैकल्पिक वाहन भत्तावर २५,७१,१५१/- खर्च केले आहे. तरी सदर भत्ता अनुज्ञेय करण्याबाबत महानगरपालिकेने राज्य शासनाची मंजुरी घेण्यात आली नसल्यामुळे सन २०१५-२०१६ मध्ये वैकल्पिक वाहन भत्तावर करण्यात आलेला खर्च रक्कम रु २५७११५१/- लेखापरीक्षणास मान्य नसून वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक ११३ दिनांक १६ /०९/२०२० देण्यात आले आहे.प्राप्त खुलासा संयुक्तिक नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSGCF7501 (Ref No : 114, Hmm No : 113)

PREVIEW

## *32 स्थानिक संस्था कर विभागाच्या लेखापरीक्षणात आढळून आलेल्या अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 09**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 8229970.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 8229970.00/-

सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाच्या स्थानिक संस्था कर विभागाच्या लेखापरीक्षणात विभागाने सादर केलेल्या निवडक व्यापारांचे कर निर्धारण नस्ती तपासले असता, खालील अनियमितता निदर्शनास आलेली आहे.

१ मे. विनायक इंडस्ट्रीज, एफ-४० एम.आय.डी.सी. अमरावती. यांच्याकडून रक्कम रु ८२८३/- वसूल करण्यात यावे.

२ मे. शुभम स्टील, अक्षय आदित्य कॉम्पलेक्स, साई नगर, अमरावती यांच्याकडून रक्कम रु १६०५०६६/- वसूल करण्यात यावे.

३ मे. गोयाल मेडिकल, राज कमल चौक, अमरावती यांच्याकडून रक्कम रु १०२१७४३/- वसूल करण्यात यावे.

४ मे. शुभम एजन्सीज,महावीर प्लाझा रॅलीज प्लॉटस अमरावती यांच्याकडून रक्कम रु ४९८३८१९/- वसूल करण्यात यावे.

५ मे. प्रवीण मेडिकल एजन्सीज,गुलशन टॉवर अमरावती यांच्याकडून रक्कम रु ५९८००८/- वसूल करण्यात यावे.

६ सदाशिव भगवंत गोंगटे, सराफ बाजार अमरावती,यांनी सन २०१४-२०१५ च्या कर निर्धारण विवरणपत्रात भरणा केलेल्या रक्कमेतील तफावत रक्कम रु १०१५०/- चे चालन लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही, त्यामुळे रक्कम रु १०१५०/- व त्यावरील व्याजाची रक्कम संबंधीत व्यापाऱ्याकडून वसूल करण्यात यावे.

७ ऐश्वर्या मार्केटिंग अमरावती यांचे सन २०१२-२०१३ व एप्रिल-१५ ते जुलै-१५ चे कर निर्धारण विवरणपत्रातील वार्षिक खरेदी रक्कम व वॅट विभागाच्या विवरणपत्रातील वार्षिक उलाढाली यात तफावत आढळून येत आहे.

८ प्रियंका नॉव्हेल्टीज गौरक्षण अमरावती यांनी सन २०१२-२०१३ ते २०१४-२०१५ च्या कर निर्धारण विवरणपत्रात स्थानिक बाजारातून माल खरेदी केल्याबाबत सूट घेतलेली आहे, तरी स्थानिक बाजारातून माल खरेदी केल्याचे देयके व स्थानिक पुरवठाधारकांचे एल.बी.टी.नोंदणी क्रमांक नस्तीत उपलब्ध नसल्यामुळे प्रियंका नॉव्हेल्टीज गौरक्षण अमरावती यांना देण्यात आलेली सूट लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

९ रतनलाल ॲन्ड ब्रदर्स सराफ बाजार अमरावती यांचे सन २०१५-२०१६ च्या कर निर्धारण विवरणपत्रानुसार एल.बी.टी. रक्कम रु १३६७२/- देय ठरत असून त्यापैकी रक्कम रु २९०१/- भरणा केल्याचे दर्शविले आहे. परंतु नस्तीसोबत चालन दर्शविण्यात आले नाही. त्यामुळे रक्कम रु २९०१/- व त्यावरील व्याजाची रक्कम संबंधीत व्यापाऱ्याकडून वसूल करण्यात यावे.

सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाचे अमरावती महानगरपालिकेचे स्थानिक संस्था कर विभागाचे लेखापरीक्षणात विभागाने सादर केलेल्या निवडक व्यापारांचे कर निर्धारण नस्ती तपासले असता, खालील अनियमितता निदर्शनास आलेली आहे.

PREVIEW

१ मे. विनायक इंडस्ट्रीज, एफ-४० एम.आय.डी.सी. अमरावती. एल.बी.टी. नोंदणी क्रमांक AMT ०३०२००२३६, यांचे सन २०१४-२०१५ मध्ये एल.बी.टी. कर निर्धारण तपासले असता,

मनपाला प्रतिष्ठानधारकांकडून विहित कालावधीत दस्ताऐवज/अभिलेखे प्राप्त न झाल्यामुळे संबंधित प्रतीष्ठानाचे वार्षिक उलाढालाची माहिती वॅट विभागाकडून प्राप्त करून घेऊन त्यानुसार कर निर्धारण केले असता, सन २०१४-२०१५ मध्ये प्रतिष्ठानधारकांना रक्कम रु ११७४२/- एल.बी.टी.देय ठरत आहे. व प्रतिष्ठानधारकाने सन २०१४-२०१५ मध्ये रक्कम रु ९५७२/- भरणा केलेला आहे. तरी फरकाची रक्कम ही २१७०/- येत असून ही रक्कम देय रक्कमेच्या १०% पेक्षा अधिक असल्यामुळे प्रतीष्ठानाला महाराष्ट्र शासन अधिसूचना नगर विकास विभाग क्रमांक स्थासंक-२०१५/प्र.क्र.८२/२०१५ नवि-३२ दिनांक ०३/०६/२०१५ अन्वये सुरु करण्यात आलेली अभय योजना २०१५ चा लाभ देय ठरत नसून, फरकाची रक्कम रु २१७०,व्याजाची रक्कम १७७३/- व दंडाची रक्कम रु ४३४०/- असे एकूण रक्कम रु ८२८३/- स्थानिक संस्था कर देय ठरत आहे. तरी महानगरपालिकेने संबंधित प्रतिष्ठानधारकाकडून रक्कम रु ८२८३/- वसूल करण्यात यावे. तसेच माहे एप्रिल-२०१५ ते जुलै-२०१५ या कालावधीचे कर निर्धारण करण्यात आले नाही, तरी सहामाही उलाढालाची माहिती वॅट विभागाकडून प्राप्त करून माहे जुलै-२०१५ अखेर पर्यंतचे कर निर्धारण करून सदर कालावधीचे स्थानिक संस्था कर वसूल करण्यात यावे.

२ मे. शुभम स्टील, अक्षय आदित्य कॉम्पलेक्स, साई नगर, अमरावती. एल.बी.टी. नोंदणी क्रमांक AMT ०३०२००३१६

सन २०१२-२०१३ चे स्थानिक संस्था कर निर्धारण तपासले असता,

मनपाने प्रतीष्ठानाचे वार्षिक उलाढालाची माहिती वॅट विभागाकडून प्राप्त करून घेऊन त्यानुसार कर निर्धारण केले असता, सन २०१२-२०१३ मध्ये प्रतिष्ठानधारकांना रक्कम रु ६५७६८७/- एल.बी.टी.(व्याज व दंडासह) देय ठरत आहे. व प्रतिष्ठानधारकाने सन २०१२-२०१३ मध्ये रक्कम रु ६०४८९/- भरणा केलेला आहे. तरी फरकाची रक्कम ही ५९७१९८/- वसूल करण्यात यावे.

सन २०१३-२०१४ चे स्थानिक संस्था कर निर्धारण तपासले असता,

प्रतीष्ठानाचे वार्षिक उलाढालाची माहिती वॅट विभागाकडून प्राप्त करून घेऊन त्यानुसार कर निर्धारण केले असता, सन २०१३-२०१४ मध्ये प्रतिष्ठानधारकांना रक्कम रु २८५०३१/- एल.बी.टी. देय ठरत आहे. व प्रतिष्ठानधारकाने सन २०१३-२०१४ मध्ये रक्कम रु १३६७८३/- भरणा केलेला आहे. तरी फरकाची रक्कम ही १४८२४८/- येत असून ही रक्कम देय रक्कमेच्या १०% पेक्षा अधिक असल्यामुळे प्रतीष्ठानाला अभय योजनेचा लाभ देय ठरत नसून, फरकाची रक्कम रु १४८२४८,व्याजाची रक्कम १६६८२७/- व दंडाची रक्कम रु ३०१४९६/- असे एकूण रक्कम रु ६१६५७१/- स्थानिक संस्था कर देय ठरत आहे. तरी महानगरपालिकेने संबंधित प्रतिष्ठानधारकाकडून रक्कम रु ६१६५७१/- वसूल करण्यात यावे.

सन २०१४-२०१५ चे एल.बी.टी. कर निर्धारण तपासले असता,

मनपाला प्रतिष्ठानधारकांकडून विहित कालावधीत दस्ताऐवज/अभिलेखे प्राप्त न झाल्यामुळे संबंधित प्रतीष्ठानाचे वार्षिक उलाढालाची माहिती वॅट विभागाकडून प्राप्त करून घेऊन त्यानुसार कर निर्धारण केले

PREVIEW

असता, सन २०१४-२०१५ मध्ये प्रतिष्ठानधारकांना रक्कम रु १७७६११/- एल.बी.टी.देय ठरत आहे. व प्रतिष्ठानधारकाने सन २०१४-२०१५ मध्ये रक्कम रु ७५७१२/- भरणा केलेला आहे. तरी फरकाची रक्कम ही १०१८९९/- येत असून ही रक्कम देय रक्कमेच्या १०% पेक्षा अधिक असल्यामुळे प्रतीष्ठानाला अभय योजनेचा लाभ देय ठरत नसून, फरकाची रक्कम रु १०१८९९,व्याजाची रक्कम ८५६००/- व दंडाची रक्कम रु २०३७९८/- असे एकूण रक्कम रु ३९१२९७/- स्थानिक संस्था कर देय ठरत आहे. तरी महानगरपालिकेने संबंधित प्रतिष्ठानधारकाकडून रक्कम रु ३९१२९७/- वसूल करण्यात यावे. तसेच माहे एप्रिल-२०१५ ते जुलै-२०१५ या कालावधीचे कर निर्धारण करण्यात आले नाही, तरी सहामाही उलाढालाची माहिती वॅट विभागाकडून प्राप्त करून माहे जुलै-२०१५ अखेर पर्यंतचे कर निर्धारण करून सदर कालावधीचे स्थानिक संस्था कर वसूल करण्यात यावे.

3 मे. गोयाल मेडिकल, राज कमल चौक, अमरावती. एल.बी.टी. नोंदणी क्रमांक AMT ०२०१००२८४ यांचे सन २०१२-२०१३ ते माहे जुलै-२०१५ अखेर पर्यंतचे कर निर्धारण विवरणपत्र तपासले असता,

| सन | कर निर्धारणानुसार देय रक्कम | भरणा केलेली रक्कम | तफावत रक्कम | व्याजाची रक्कम | दंडाची रक्कम | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१२-२०१३ | ५६६२३ | ० | ५६६२३ | ५६६२३ | २८८११५ | ४०१३६१ |
| २०१३-२०१४ | ५३६६१ | ० | ५३६६१ | ३४३४३ | ११२३२२ | २००३२६ |
| २०१४-२०१५ | १२३५४६ | ० | १२३५४६ | ४९४१८ | २४७०९२ | ४२००५६ |
| जुलै-२०१५ | आकारणी करण्यात आली नाही. | | | | | |

वरील प्रमाणे संबंधित प्रतिष्ठानाकडून स्थानिक संस्था कर वसूल करण्यात यावे.

४ शुभम एजन्सीज,महावीर प्लाझा रॅलीज प्लॉटस अमरावती, एल.बी.टी. नोंदणी क्रमांक AMT ०२०१००१०५ यांचे सन २०१२-२०१३ ते माहे जुलै-२०१५ अखेर पर्यंतचे कर निर्धारण विवरणपत्र तपासले असता,

| सन | कर निर्धारणानुसार देय रक्कम | भरणा केलेली रक्कम | तफावत रक्कम | व्याजाची रक्कम | दंडाची रक्कम | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१२-२०१३ | ६८२४५५ | ५२७८९९ | १५४५५६ | १६२३५६ | ७७७७८० | १०९४६९२ |
| २०१३-२०१४ | ९९३९३५ | ६२०६६७ | ३७३२६८ | २७०६८५ | ७५१५३६ | १३९५४८९ |
| २०१४-२०१५ | १२९६४८६ | ५९९२५४ | ६९७२३२ | ३९६९३९ | १३९९४६४ | २४९३६३५ |
| जुलै-२०१५ | आकारणी करण्यात आली नाही. | | | | | |

वरील प्रमाणे संबंधित प्रतिष्ठानाकडून स्थानिक संस्था कर वसूल करण्यात यावे.

५ प्रवीण मेडिकल एजन्सीज,गुलशन टॉवर अमरावती, एल.बी.टी. नोंदणी क्रमांक AMT ०२०१००२५९ यांचे सन २०१२-२०१३ ते माहे जुलै-२०१५ अखेर पर्यंतचे कर निर्धारण विवरणपत्र तपासले असता,

PREVIEW

| सन | कर निर्धारणानुसार देय रक्कम | भरणा केलेली रक्कम | तफावत रक्कम | व्याजाची रक्कम | दंडाची रक्कम | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१२-२०१३ | १५४९०० | १४२१८० | १२७२० | १३३३८ | ६८६०० | ९४६५८ (अभय योजनेची मुदत संपल्यामुळे) |
| २०१३-२०१४ | २८३१७७ | १४६३५० | १३६८२७ | ८७८६९ | २७८६५४ | ५०३३५० |
| २०१४-२०१५ | आकारणी करण्यात आली नाही. | | | | | |
| जुलै-२०१५ | आकारणी करण्यात आली नाही. | | | | | |

PREVIEW

वरील प्रमाणे संबंधित प्रतिष्ठानाकडून स्थानिक संस्था कर वसूल करण्यात यावे.

६ सदाशिव भगवंत गोंगटे, सराफ बाजार अमरावती, एल.बी.टी. नोंदणी क्रमांक AMT ०२०३००३५५ सन २०१२-२०१३ ते माहे जुलै-२०१५ अखेर पर्यंतचे कर निर्धारण विवरणपत्र तपासले असता,

सदाशिव भगवंत गोंगटे, यांना सन २०१४-२०१५ मध्ये स्थानिक संस्था कर रक्कम रु २८८५७/- असून त्यावर व्याज रक्कम रु १५९६१/- असे एकूण रक्कम रु ४४८१८/- स्थानिक संस्था कर देय ठरत आहे. त्यानुसार कर निर्धारण करण्यापूर्वी व्यापाराने रक्कम रु ४३५५९/- भरणा केल्याचे दर्शविले आहे. त्यानुसार बँक चलनाची तपासणी केली असता,दिनांक १६/०७/२०१८ रोजी रक्कम रु ३३४०९/- भरणा केल्याचे दिसून येत आहे. तरी भरणा केलेल्या रक्कमेतील तफावत रक्कम रु १०१५०/- चे चालन लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही, त्यामुळे रक्कम रु १०१५०/-व त्यावरील व्याजाची रक्कम संबंधीत व्यापाऱ्याकडून वसूल करण्यात यावे.

तसेच सन २०१४-२०१५ चे वॅट विभागाकडून वार्षिक उलाढालीचे विवरणपत्र प्राप्त न करता कर निर्धारण केल्याचे दिसून येत आहे. तरी वॅट विभागाकडून वार्षिक उलाढालीचे विवरणपत्र प्राप्त करून त्यानुसार सुधारित कर निर्धारण करण्यात यावे, थकीत स्थानिक संस्था कर वसूल करण्यात यावे.

७ ऐश्वर्या मार्केटिंग अमरावती एल.बी.टी. नोंदणी क्रमांक AMT ०२०३००७९७ सन २०१२-२०१३ ते माहे जुलै-२०१५ अखेर पर्यंतचे कर निर्धारण विवरणपत्र तपासले असता,

खाली दर्शविल्याप्रमाणे वॅट विभागाकडून वार्षिक उलाढालीचे विवरणपत्रातील वार्षिक खरेदी व कर निर्धारण विवरणपत्रातील वार्षिक खरेदी मुल्य यात मोठी तफावत दिसून येत आहे. तरी संबंधीत व्यापाराचे सुधारित कर निर्धारण करून थकीत स्थानिक संस्था कर वसूल करण्यात यावे.

| सन | वॅट विभागाकडून वार्षिक उलाढालीचे विवरणपत्रानुसार | कर निर्धारण विवरणपत्रातील रक्कम | तफावत |
|---|---|---|---|
| २०१२-२०१३ | २६०५५२२/- | १७६२८४५/- | ८४२६७७/- |
| एप्रिल-१५ ते | १८६२४५५/- | ९६५९२८/- | ८९६५२७/- |

| | | | |
|---|---|---|---|
| जुलै-१५ | | | |

८ प्रियंका नॉव्हेल्टीज गौरक्षण अमरावती एल.बी.टी. नोंदणी क्रमांक AMT ०२०३०१०३५ सन २०१२-२०१३ ते माहे जुलै-२०१५ अखेर पर्यंतचे कर निर्धारण विवरणपत्र तपासले असता,

सादर करण्यात आलेले कर निर्धारण विवरणपत्र हे वॅट विभागाकडून वार्षिक उलाढालीचे विवरणपत्र प्राप्त न करताच व्यापाऱ्याकडून प्राप्त माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेली आहे. तरी कर निर्धारण पत्रात दर्शविण्यात आलेली वार्षिक खरेदी/विक्री योग्य असल्याचे लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही, त्यामुळे वॅट विभागाकडून वार्षिक उलाढालीचे विवरणपत्र प्राप्त करून घेऊन सुधारित कर निर्धारण करण्यात यावे. तसेच सन २०१२-२०१३ ते २०१४-२०१५ च्या कर निर्धारण विवरणपत्रात दर्शविण्यात आलेली स्थानिक खरेदी बाबत देयके सादर करण्यात यावे,तसेच स्थानिक पुरवठा धारकांचे स्थानिक संस्था कर क्रमांक लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात यावे. अन्यथा देण्यात आलेली स्थानिक खरेदीवरील सूट लेखापरीक्षणास मान्य करता येणार नाही. सादर करण्यात आलेले खरेदी मालाची नोंदवही नुसार खालील रक्कमेचे देयके नोंदवहीत उपलब्ध आहेत.

| सन | स्थानिक खरेदी रक्कम | खरेदी नोंदवही नुसार उपलब्ध देयके |
|---|---|---|
| २०१२-२०१३ | १४०६०९९/- | ६५०२१/- |
| २०१३-२०१४ | १४८९८९१/- | १४१८१९/- |
| २०१४-२०१५ | १६५३६९१/- | निरंक |

९ रतनलाल ॲन्ड ब्रदर्स सराफ बाजार अमरावती एल.बी.टी. नोंदणी क्रमांक AMT ०२०३०००३४ सन २०१२-२०१३ ते माहे जुलै-२०१५ अखेर पर्यंतचे कर निर्धारण विवरणपत्र तपासले असता,

सादर करण्यात आलेले कर निर्धारण विवरणपत्र हे वॅट विभागाकडून वार्षिक उलाढालीचे विवरणपत्र प्राप्त न करताच व्यापाऱ्याकडून प्राप्त माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेली आहे. तरी कर निर्धारण पत्रात दर्शविण्यात आलेली वार्षिक खरेदी/विक्री योग्य असल्याचे लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही, त्यामुळे वॅट विभागाकडून वार्षिक उलाढालीचे विवरणपत्र प्राप्त करून घेऊन सुधारित कर निर्धारण करण्यात यावे.

तसेच सन २०१५-२०१६, माहे जुलै-१५ अखेर पर्यंतचे कर निर्धारण तपासले असता, जुलै-१५ अखेर पर्यंत एल.बी.टी. रक्कम ४४४०/-, व्याज रक्कम ११५४/-, दंडाची रक्कम ८०७८/- एकूण एल.बी.टी. रक्कम रु १३६७२/- देय ठरत असून त्यापैकी रक्कम रु २९०१/- भरणा केल्याचे दर्शविले आहे.परंतु नस्तीसोबत चालन दर्शविण्यात आले नाही. त्यामुळे रक्कम रु २९०१/- व त्यावरील व्याजाची रक्कम संबंधीत व्यापाऱ्याकडून वसूल करण्यात यावे.

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक १२२ दिनांक १८ /०९/२०२० देण्यात आले आहे.संयुक्तिक खुलासा अप्राप्त

झाल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 39, Hmm No : 122)

## ***33 रात्र निवारा केंद्र (बडनेरा) संचलन व देखभाल खर्चाबाबत***

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 05**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 182433.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 182433.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 20433.00/-

रात्र निवारा केंद्र संचलन व देखभालीकरिता करण्यात आलेल्या खर्चाच्या नस्तीत खालील अनियमितता आढळून आलेली आहे.

१ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण ५ मधील नियम २ मधील खंड (१) मनपाने निविदा बोलावून संविदा न करता पब्लिक एज्युकेशन वेल.सोसायटी यांनाच मुदतवाढ देण्यात येत आहे.

२ पब्लिक एज्युकेशन वेल.सोसायटी यांना फक्त सुरक्षा रक्षक व काळजी वाहक यांचे मानधन देय ठरते. परंतु सादर देयकात सुरक्षा रक्षक व काळजी वाहक यांच्या मानधनाव्यतिरिक्त प्रदान रक्कम रु २०४३३/- लेखापरीक्षणास मान्य नसून वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

३ रात्र निवारा केंद्रात राहणाऱ्याची नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. लेखापरीक्षणास सदर नोंदवही सादर करण्यात आले नाही.

४ महानगरपालिकेने बडनेरा येथे रात्र निवारा केंद्राची स्थापना केलेली आहे, तरी या करिताचा सर्वेक्षण अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही.

५. पब्लिक एज्युकेशन वेल.सोसायटी ही संस्था सुरक्षा रक्षकांची सेवा देणारी संस्था असल्याबाबत नोंदणी प्रमाणपत्र उपलब्ध नाही. तसेच सुरक्षा रक्षकांची माहिती देखील उपलब्ध करून देण्यात आले नाही. त्यामुळे प्रदान रक्कम रु १८२४३३/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

अमरावती महानगरपालिकेच्या सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाच्या महिला व बालकल्याण विभागाच्या निवडक महिन्याच्या लेखापरीक्षणात रात्र निवारा केंद्र संचलन व देखभालीकरिता पब्लिक एज्युकेशन वेल.सोसायटी यांना रक्कम रु १८२४३३/- प्रदान करण्यात आले आहे.

प्रमाणक.क्र.२९४२ दिनांक २५-०६-२०१५ रक्कम ९६७८०/- पब्लिक एज्युकेशन वेल.सोसायटी(१ जुलै १४ ते ३०

PREVIEW

नोव्हेंबर २०१४)

देयकात मानधनाव्यतिरिक्त खालील बाबी समाविष्ठ आहेत.

फ्लेक्स (होर्डिंग) ३ नग १७००/-

झाडू खराटे ३८०/-

सफाई कामगार १२००/-

कार्यालयीन किरकोळ खर्च ३५००/-

प्र.क्र.९६२३ दिनांक २७-११-२०१५ रक्कम ८५६५३/- पब्लिक एज्युकेशन वेल.सोसायटी (१ डिसेंबर १४ ते ३१ मार्च २०१५)

देयकात मानधनाव्यतिरिक्त खालील बाबी समाविष्ठ आहेत.

मल्टी कलर पोस्टर १२९००/-

फिनाइल ५ लिटर २८०/-

ॲसिड ५ लिटर ३८५/-

झेरॉक्स २८/-

कॉम्प्यूटर कॉपी २०/-

कॅश व्हाऊचर ४०/-

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे

१ सन २०१५-२०१६ मध्ये पब्लिक एज्युकेशन वेल.सोसायटी यांना रात्र निवारा केंद्र (बडनेरा) संचलन व देखभाल करण्याकरिता काम देण्यात आले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण ५ मधील नियम २ मधील खंड (१) मनपाने निविदा बोलावून संविदा न करता वर्षोनवर्ष पब्लिक एज्युकेशन वेल.सोसायटी यांनाच मुदतवाढ देण्यात येत आहे.

२ रात्र निवारा केंद्राकरिता जागा, सर्व साहित्य, व्यवस्था ही महानगरपालिका स्वतः उपलब्ध करून देण्यात आले आहे. रात्र निवारा केंद्राच्या संचलनाकरिता पब्लिक एज्युकेशन वेल.सोसायटी यांची निवड करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१०/प्र.क्र.४५/नवि-२० दिनांक १४ जुलै २०११ मधील तरतुदीनुसार बेघरांना राहण्याची व्यवस्था ही महानगरपालिका स्वतः केलेली आहे. पब्लिक एज्युकेशन वेल.सोसायटी यांनी फक्त सुरक्षा रक्षक व काळजी वाहक पुरवठा केलेला आहे. त्यामुळे पब्लिक एज्युकेशन वेल.सोसायटी यांना फक्त सुरक्षा रक्षक व काळजी वाहक यांचे मानधन देय ठरते. परंतु उपरोक्त देयक क्रमांक १ मध्ये सुरक्षा रक्षक व काळजी वाहक यांच्या मानधनाव्यतिरिक्त प्रदान रक्कम रु ६७८०/- लेखापरीक्षणास मान्य नसून वसूलपात्र ठरविण्यात येत आहे. तसेच देयक क्रमांक २ मध्ये मानधनाव्यतिरिक्त प्रदान रक्कम रु १३६५३/- लेखापरीक्षणास मान्य नसून वसूल पात्र ठरविण्यात येत आहे.

३ पब्लिक एज्युकेशन वेल.सोसायटी यांनी सुरक्षा रक्षकांचे मानधन उचल केलेली आहे, तरी पब्लिक एज्युकेशन वेल.सोसायटी ही संस्था सुरक्षा रक्षकांची सेवा देणारी संस्था असल्याबाबत नोंदणी प्रमाणपत्र उपलब्ध नाही.

PREVIEW

तसेच सुरक्षा रक्षकांची माहिती देखील उपलब्ध करून देण्यात आले नाही. त्यामुळे प्रदान रक्कम रु १८२४३३/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

४. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१०/प्र.क्र.४५/नवि-२० दिनांक १४ जुलै २०११ मधील परिशिष्ठ ५ नुसार रात्र निवारा केंद्रात राहणाऱ्याची नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. लेखापरीक्षणास सदर नोंदवही सादर करण्यात आले नाही.

५. शासन निर्णयातील परिशिष्ठ क्रमांक १.३ नुसार महानगरपालिकेने आपल्या क्षेत्रातील बेघर व निराश्रित व्यक्तींचे व्यवस्थीत सर्वेक्षण करून त्यानुसार रात्र निवारा केंद्राची संख्या,ठिकाण,क्षमता निश्चित करणे आवश्यक आहे. तरी महानगरपालिकेने बडनेरा येथे रात्र निवारा केंद्राची स्थापना केलेली आहे, तरी या करिताचा सर्वेक्षण अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही.

उपरोक्त सर्व बाबीची पूर्तता होईपर्यंत प्रदान रक्कम रु १८२४३३/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक ७१ दिनांक १७/०२/२०२० देण्यात आले आहे.खुलासा अप्राप्त झाल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 42, Hmm No : 71)

PREVIEW

## *34 मनपा अमरावती क्षेत्रा अंतर्गत मोकाट जनावरे पकडण्याकरिता केलेल्या खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 5**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 651800.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 441000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 14400.00/-

मनपा अमरावती क्षेत्रा अंतर्गत मोकाट जनावरे पकडण्याच्या कामात खालील अनियमितता निदर्शनास आली आहे.

१. सन २०१५-२०१६ मध्ये ई-निविदा न करता शांतु नागरी सेवा सहकारी संस्था अमरावती यांनाच मुदतवाढ देण्यात आली आहे.

२ कंत्राटदाराने अट क्रमांक १८ चे पालन न करता पशुपालकाकडून दंड वसूल न करता जनावरांना परस्पर सोडण्यात आले असल्याचे, असे लेखापरीक्षणाचे अभिप्राय आहे.

३ कंत्राटदाराचे कामगार वयाची अट पूर्ण करीत असल्याबाबत पुरावे,तसेच त्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन व वेतनातून ईपीएफ कपात करीत असल्याबाबत पुरावे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

४ करारनाम्यातील अट क्रमांक १३ नुसार कंत्राटदराने पशुसंवर्धन विभागास केलेल्या कार्यवाहीची माहिती प्रती

| |
|---|
| दिनी सादर न केल्यास रु ३००/- प्रती दिवस या प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्याची अट नमूद आहे. तरी निवडक महिन्याच्या लेखापरीक्षणातील देयकात दंडात्मक रक्कम रु १४४००/- वसूल करणे आवश्यक आहे.<br>५ कोणतेही मोकाट जनावर न पकडता तसेच कोणत्याही जनावरांची वाहतूक न करता एकूण १९४ दिवस वाहन नुसते मोकाट जनावरांच्या शोधात फिरले तसेच एकाच दिवशी एकाच मार्गाने दोन दोन वाहने फिरली,असे अभिलेख्यावरून दिसते. त्यामुळे वाहतूक न करता झालेल्या एकूण १९४ दिवसाचे वाहन भाडे यावरील खर्च रु.४४१०००/- निरर्थक असल्यामुळे सदर खर्च आक्षेपित ठेवण्यात येत आहे. |

अमरावती महानगरपालिकेच्या सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाच्या पशुसंवर्धन विभागाच्या लेखापरीक्षणात खालील अनियमितता निदर्शनास आलेली आहे.

सन २०१५-१६ या वित्तीय लेखापरीक्षणाच्या निवडक महिन्यात खालील प्रमाणकानुसार शहरातील मोकाट जनावरे पकडण्याकरिता शांतु नागरी सेवा सहकारी संस्था अमरावती यांचे रक्कम रु ६५१८००/- मंजूर करून शासकीय कपाती अंती रक्कम रु ५९७७६५/- प्रदान केले आहे.

प्र.क्र. १२५०१ दिनांक २०-०१-२०१६ रक्कम ७२०००/- दिनांक १६-९-१५ ते २७-९-१५ गणेशोत्सव

प्र.क्र. १२५०२ दिनांक २०-०१-२०१६ रक्कम १६५५००/- नोव्हे-१५

प्र.क्र. १२५०३ दिनांक २०-०१-२०१६ रक्कम २०१४००/- डिसेंबर-१५

प्र.क्र. १४५७२ दिनांक ०३-०३-२०१६ रक्कम २१२९००/- जानेवारी-१६

यावर लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे

१. शांतु नागरी सेवा सहकारी संस्था यांच्या सोबत करण्यात आलेला करारनामाची मुदत फेब्रुवारी-२०१५ मध्ये संपली असतांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण ५ मधील नियम २ मधील खंड (१) मनपाने ई-निविदा बोलावून संविदा केलेली नाही.

२. करारनाम्यातील अट क्रमांक १८ नुसार कंत्राटदाराला मोकाट जनावरे एकदा ताब्यात घेतल्यानंतर परस्पर त्यांना सोडता येणार नाही. अशी अट नमूद आहे. तरी उपरोक्त देयकात ३९ मध्यम व ४३ मोठी असे एकूण ८२ जनावरे पकडले असल्याचे नमूद आहे. त्यांनी पकडलेल्या जनावरांचे काय केले याबाबत लेखापरीक्षणास माहिती सादर करण्यात आली नाही. तरी कंत्राटदाराने अट क्रमांक १८ चे पालन न करता पशुपालकाकडून दंड वसूल न करता जनावरांना परस्पर सोडण्यात आले असल्याचे, असे लेखापरीक्षणाचे अभिप्राय आहे.

३ करारनाम्यातील अट क्रमांक २२,२५,२८ नुसार कंत्राटदाराच्या कामगाराचे वय १८ पेक्षा जास्त व ६० पेक्षा कमी, त्यांचे नियमित ईपीएफ जमा करणे, तसेच कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन प्रदान करीत असल्याबाबत कोणतेही अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे कंत्राटदाराने उपरोक्त अटीचे पालन केले किंवा कसे हे तपासता आले नाही.

४ करारनाम्यातील अट क्रमांक १३ नुसार भरारी पथकाने प्रती दिनी काय कार्यवाही केली याबाबत चे रीतसर गोषवारा प्रती दिनी प्रपत्र-अ मध्ये पशु वैद्यक विभागास सादर करणे आवश्यक आहे. माहिती सादर न केल्यास रु ३००/- प्रती दिवस या प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्याची अट नमूद आहे. तरी खालील प्रमाणे दंडात्मक

PREVIEW

रक्कम रु १४४००/- वसूल करण्यात यावे.

| महिना | वाहन क्रमांक | अहवाल सादर केलेले दिवस | अहवाल सादर न केलेले दिवस | दंडात्मक रक्कम |
|---|---|---|---|---|
| नोव्हेंबर-१५ | MH31-5106 | 22 | 8 | 2400 |
| | MH20 CT-4023 | 22 | 8 | 2400 |
| | MH02 CE 1203 | 22 | 8 | 2400 |
| डिसेंबर-१५ | MH02 CE 1203 | 22 | 9 | 2700 |
| | MH31-5106 | 28 | 3 | 900 |
| | MH20 CT-4023 | 28 | 3 | 900 |
| जानेवारी-१६ | MH31-5106 | 29 | 2 | 600 |
| | MH20 CT-4023 | 29 | 2 | 600 |
| | MH02 CE 1203 | 26 | 5 | 1500 |
| | **एकूण** | **228** | **48** | **14400** |

५ उपरोक्त प्रमाणकात ३ वाहनांचे २६४ दिवसाचे वाहन भाडे रक्कम रु ६०७०००/- प्रदान करण्यात आले आहे. २६४ दिवसापैकी फक्त ७० दिवसातच जनावर पकडणे व वाहतूक करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. तरी उर्वरित १९४ दिवस कोणतेही मोकाट जनावर पकडले किंवा वाहतूक करण्यात आली नाही असे असतानाही वाहनाच्या भाडेपोटी मनपा यांनी रु. ४४१०००/- एवढा खर्च करण्यात आला. कोणतेही मोकाट जनावर न पकडता तसेच कोणत्याही जनावरांची वाहतूक न करता एकूण १९४ दिवस वाहन नुसते मोकाट जनावरांच्या शोधात फिरले तसेच एकाच दिवशी एकाच मार्गाने दोन दोन वाहने फिरली,असे अभिलेख्यावरून दिसते. याप्रमाणे मोकाट जनावरे न पकडता तसेच त्यांची वाहतूक न करता झालेल्या एकूण १९४ दिवसाचे वाहन भाडे यावरील खर्च रु.४४१०००/- निरर्थक असल्यामुळे सदर खर्च आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक ६८ दिनांक १७ /०२/२०२० देण्यात आले आहे.खुलासा अप्राप्त झाल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 44, Hmm No : 68)

## *35 सन २०१५-२०१६ च्या वृक्ष प्राधिकरण निधीच्या लेखापरीक्षणातील अनियमितताबाबत*

**वृक्ष प्राधिकरण निधी**

PREVIEW

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 06**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 36100.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 36100.00/-

| |
|---|
| मनपा अमरावतीच्या वृक्ष प्राधिकरण निधीच्या लेखापरीक्षणात खालील अनियमितता निदर्शनास आलेली आहे.<br>१ समितीपुढे सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पातील ३०/१०/२०१५ पर्यंतचा जमा व खर्च व प्रत्येक्षातील जमा व खर्च याचा ताळमेळ जुळत नाही. तरी अर्थसंकल्पात दर्शविण्यात आलेली आकडेवारी योग्य असल्याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आलेली नाही.<br>२ मनपाने वृक्ष प्राधिकरण निधीच्या तुटीची रक्कम रु ७४६४८२८/- वृक्ष प्राधिकरण निधीत जमा करणे आवश्यक असतांना मनपाने सन २०१५-२०१६ मध्ये तुटीची रक्कम रु ७४६४८२८/- वृक्ष प्राधिकरण निधीत जमा केलेली नाही.<br>३ झाडे तोडण्यासाठी दिलेल्या परवानगीचे सहामाही अहवाल तयार करणे आवश्यक असतांना, विभागाने वृक्ष तोड परवानगीचा अहवाल तयार केलेला नाही.<br>४ ठराव पारित झाल्याप्रमाणे वृक्ष तोडणीसाठी देण्यात आलेल्या परवानगी अनामत ट्री गार्ड शुल्क वसूल करणे आवश्यक असतांना ते वसूल करण्यात आलेले नाही.अथवा अवैध वृक्ष तोडीबाबत दंडात्मक कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे वृक्ष प्राधिकरण निधीचे नुकसान झालेले आहे.<br>५ सन २०१३-१४ मध्ये वृक्ष गणना होणे आपेक्षित असतांना विभागाने सन २०१३-१४ पासून सन २०१५-२०१६ पर्यंत शहरातील वृक्ष गणना केलेली नाही.<br>६ विभागाने वृक्ष प्राधिकरण निधीचे सन २०१५-१६ चा वार्षिक लेखा तयार केलेला नाही. |

PREVIEW

महानगरपालिका अमरावतीच्या सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात उद्यान विभागाअंतर्गत वृक्ष प्राधिकरण निधी चे लेखापरीक्षण केले असता, खालील अनियमितता आढळून आलेली आहे.

१ .विभागाने वृक्ष प्राधिकरण निधीचे सन २०१५-१६ चे वार्षिक अर्थसंकल्प तयार करून ठराव क्रमांक ३ दिनांक १७.१२.२०१५ नुसार अर्थसंकल्पात मंजुरी घेण्यात आली आहे. परंतु सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पातील ३०/१०/२०१५ पर्यंतचा जमा व खर्च व प्रत्येक्षातील जमा व खर्च याचा ताळमेळ जुळत नाही. तरी अर्थसंकल्पात दर्शविण्यात आलेली आकडेवारी योग्य असल्याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आलेली नाही.

२. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ मधील कलम १५ नुसार वृक्ष प्राधिकरणाला वर विनीद्रिष्ट केलेल्या सर्व मार्गांनी मिळालेल्या एकूण जमा रकमा नागरी स्थानिक प्राधिकरणाच्या एकूण जमा रकमांच्या अर्धा टक्कापेक्षा कमी असतील तर नागरी स्थानिक प्राधिकरण प्रत्येक वित्तीय वर्षाच्या शेवटी

तुटीची रक्कम वृक्ष प्राधिकरण निधीकडे जमा खाती घालील अशी तरतूद असतांना, सन २०१५-२०१६ मधील मनपाची एकूण महसुली जमा रक्कम रु २०८६१४७२०१/- असून वृक्ष प्राधिकरणाला सर्व मार्गांनी मिळालेल्या एकूण जमा रक्कम २९६५९०८/- असून तुटीची रक्कम रु ७४६४८२८/- वृक्ष प्राधिकरण निधीत जमा करणे आवश्यक असतांना मनपाने सन २०१५-२०१६ मध्ये तुटीची रक्कम रु ७४६४८२८/- वृक्ष प्राधिकरण निधीत जमा केलेली नाही.

३ महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ मधील कलम ८(३)(ख) नुसार झाडे तोडण्यासाठी दिलेल्या परवानगीचा व प्राप्त रक्कमेचा दर सहामाही अहवाल तयार करणे आवश्यक असतांना विभागाने तसा अहवाल तयार केलेला नाही.

४ वृक्ष प्राधिकरण समितीच्या मासिक सभा इतिवृत्त तपासले असता,खालील प्रमाणे ट्री गार्ड फी जमा करण्याच्या आधीन राहून झाडे तोडण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे.परंतु खालील प्रकरणात सदर रक्कम वृक्ष प्राधिकरण निधीत भरणा करण्यात आलेले नाही.जर वृक्ष मालकाने अवैधरित्या झाड तोडले असेल तर अधिनियमातील कलम २१ नुसार द्रव्यदंडाची कार्यवाही होणे आवश्यक आहे.परंतु उपरोक्त दोन्ही पैकी एकही बाब कार्यान्वित झालेली नाही. त्यामुळे निधीचे झालेले नुकसानी बाबत जबाबदारी निश्चित करून संबंधिताकडून रक्कम रु ३६१००/- वसूल करण्यात यावे. उदा.

| सभा दिनांक | ठराव क्रमांक | वृक्ष पालकाचे नाव | अनामत रक्कम | झोन क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १७.०४.२०१५ | ७ | श्रीमती प्रमिलाबाई यादवराव इंगळे | १०५०/- | २ |
| १७.०४.२०१५ | ८ | श्री. गणेश काकडे | ६३००/- | २ |
| १७.०४.२०१५ | ८ | श्री. इफतेखान अहमद खान गुलाम | १०५००/- | ३ |
| १७.०४.२०१५ | ९ | श्री. संजय विनायकराव शेरेकर | ९००/- | ३ |
| १७.०४.२०१५ | १३ | श्री. विजय खंडेलवाल | ५२५०/- | ३ |
| १७.१२.२०१५ | ६ | श्री. सुधाकर जानरावजी सगणे | २२००/- | १ |
| १७.१२.२०१५ | ८ | श्री. शशिकांत जी. रोडे | २२००/- | १ |
| १७.१२.२०१५ | ६ | श्री. विक्रम रामगोपाल गुप्ता | २२००/- | २ |
| १७.१२.२०१५ | १ | श्री. शेख मकसूद | ५५००/- | ५ |

५ महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ मधील कलम ७ (ख) नुसार दर पाच वर्षातून एकदा वृक्ष गणना करणे आवश्यक असतांना सन २००८-०९ नंतर सन २०१३-१४ मध्ये वृक्ष गणना होणे आवश्यक असतांना सन २०१५-२०१६ पर्यंत वृक्ष गणना करण्यात आलेली नाही.

६ विभागाने वृक्ष प्राधिकरण निधीचे सन २०१५-१६ चा वार्षिक लेखा तयार केलेला नाही.

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक ११९ दिनांक १८ /०९/२०२० देण्यात आले आहे. प्राप्त खुलासा संयुक्तिक नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.



PREVIEW

### *36 मे.ए.बी.एम.नॉलेजवेअर लि.मुंबई व डी.एस.एस.वर्ड प्रा.लि. यांच्या देयकावर कमी आयकर कपात केल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 1**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1600977.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 129666.00/-

| |
|---|
| मे.ए.बी.एम.नॉलेजवेअर लि.मुंबई , पोस्ट इम्पलीमेंट सपोर्ट माहे नोव्हे-२०१३ ते डिसेंबर-२०१४ या कालावधीच्या देयकावर तसेच डी.एस.एस.वर्ड प्रा.लि. यांच्या देयकावर १०% आयकर कपात करणे आवश्यक असतांना देयकातून २% आयकर कपात करण्यात आली आहे. तरी कमी कपात करण्यात आलेली आयकर रक्कम रु १२९६६६/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे. |

अमरावती महानगरपालिका संगणक विभागाचे सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील निवडक महिन्यातील देयकांची तपासणी केली असता, खालील देयकाबाबत अनियमितता लेखापरीक्षणास आढळून आलेली आहे.

प्र.क्र. ८९६७ दिनांक ७-११-२०१५ रक्कम ११४०९७७/- कपाती नंतर १११५४१९/- मे.ए.बी.एम.नॉलेजवेअर लि.मुंबई , पोस्ट इम्पलीमेंट सपोर्ट नोव्हे-२०१३ ते डिसेंबर-२०१४

प्र.क्र. १५५२७ दिनांक २९-०३-२०१६ रक्कम ४६००००/- कपाती नंतर ४४९६५०/- डी.एस.एस.वर्ड प्रा.लि. इंटीग्रेटेड हेल्पडेस्क सिस्टीम सर्व्हिस

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे

1 आयकर अधिनियम १९४ जे नुसार तांत्रिक सेवेकरिता १०% आयकर कपात करणे आवश्यक असतांना देयकातून २% आयकर कपात करण्यात आले आहे. तरी आयकराची ८% रक्कम व त्यावरील अधिभारासह ए.बी.एम.नॉलेजवेअर यांच्याकडून रक्कम रु ९४०१६/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे. तसेच डी.एस.एस.वर्ड प्रा.लि.यांच्या देयकातून कमी कपात करण्यात आलेला आयकर रक्कम रु ३५६५०/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे. तरी दोन्ही देयकातून कमी कपात करण्यात आलेली आयकर रक्कम रु १२९६६६/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक १३७ दिनांक २३/०९/२०२० देण्यात आले आहे. प्राप्त खुलासा संयुक्तिक नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

PREVIEW

## *37 फायरवॉल युटीएम हार्डवेअर खरेदीबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 1**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 170188.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 15174.00/-

संगणक विभागाने मे. कॉमसोलव्ह प्रा.लि.पुणे यांना खालील प्रमाणकानुसार फायरवॉल युटीएम हार्डवेअर (Firewell UTM hardware) खरेदीबाबत देयकाबाबत आयकर अधिनियम १९४ जे नुसार तांत्रिक सेवेकरिता १०% आयकर कपात करणे आवश्यक असतांना देयकातून २% आयकर कपात करण्यात आले आहे. तसेच देयकात गणितीय परिगणना चुकली आहे. त्यामुळे देयकात कंत्राटदाराला जादा प्रदान रक्कम रु १५१७४/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

संगणक विभागाने मे. कॉमसोलव्ह प्रा.लि.पुणे यांना खालील प्रमाणकानुसार फायरवॉल युटीएम हार्डवेअर (Firewell UTM hardware) खरेदीबाबत देयक अदा केलेले आहे. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे

| Sr.No. | बाब | देयकातील रक्कम | अनुज्ञेय रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | UTM hardware खरेदी | 117500 | 117500 |
| 2 | Installation,Commissioning and training | 10000 | 10000 |
| 3 | Three year onsite support | 34000 | 34000 |
| | Total | **162000** | **161500** |
| | VAT 5% | 5250 | 5875 |
| | Service Tax 12.36% | 6230 | 5438 |
| | Total amount | 174105 | 172813 |
| | Income tax deduction | 3482 | 17281 |
| | Surcharge | 435 | 518 |
| | Total | 170188 | 155014 |

PREVIEW

आयकर अधिनियम १९४ जे नुसार तांत्रिक सेवेकरिता १०% आयकर कपात करणे आवश्यक असतांना देयकातून २% आयकर कपात करण्यात आले आहे. तसेच देयकात गणितीय परिगणना चुकली आहे. त्यामुळे देयकात कंत्राटदाराला जादा प्रदान रक्कम रु १५१७४/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.
सदर खरेदीबाबतची ई-निविदा नस्ती,प्राप्त निविदा,निविदाधारकांचे प्रमाणपत्र,लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही.

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक १४३ दिनांक २५/०९/२०२० देण्यात आले आहे. खुलासा अप्राप्त झाल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे

DATPKWM8301 (Ref No : 51, Hmm No : 143)

## *38 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कार्यवाहीच्या अनुषंगाने स्वच्छता विभागाकरिता ४० नग अॅपे (ऑटो) खरेदी व त्यावर हायड्रोलिक हॉपर बसविणे बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 19**

*शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 9790400.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 204708.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 9790400.00/-

अमरावती महानगरपालिका स्वच्छता विभागाने सन २०१५-२०१६ मध्ये शहरातील कचरा वाहतुकी करिता १४ वित्त आयोग निधीतून ४० नग अॅपे (ऑटो) खरेदी करून त्यावर हायड्रोलिक हॉपर बसविण्यात आले आहेत. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे

**४० नग APE PIAGGIO XTRA LD खरेदी बाबत**

१ स्थायी समिती ठराव क्रमांक २०७ दिनांक ०३.१२.२०१५ नुसार स्थायी समितीने साई ऑटो एजन्सीसोबत करारनामा करण्यास मंजुरी दिलेली असतांना देखील, मा. आयुक्तांनी संबंधित कंत्राटदारासोबत करारनामा केलेला नाही.

२ महानगरपालिकेने ४० नग APE PIAGGIO XTRA LD (अॅटो) खरेदी करिता ई-निविदा बोलाविण्यात आलेले नाही.

३ मनपाने करारनामा न केल्यामुळे शासनास रक्कम रु ६४००/- मुद्रांक शुल्काचे नुकसान झालेले आहे. तरी पुरवठाधारकाकडून रक्कम रु ६४००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

४ महानगरपालिकेने शहरातील घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्यासाठी विविध बेरोजगार संस्था, बचत गट

PREVIEW

यांच्यासोबत व कचरा वाहतुकीसाठी पूजा कंन्ट्रक्शन वर्धा यांच्यासोबत करारनामा केले असतांना एवढ्या मोठ्या प्रमाणात कचरा वाहतुकीसाठी हायड्रोलिक हॉपर (ॲटो) खरेदी करण्याची आवश्यक दिसून येत नसतांना देखील मनपाने हायड्रोलिक ॲटो खरेदी केलेली आहे.

५ हॉपर कीट बसविण्याकरिता वाहन बारामती ते सांगली ते अमरावती असा प्रती वाहन खर्च रक्कम रु ३०००/- केला आहे. जर वाहन सांगलीवरूनच खरेदी केली असती अथवा हॉपर कीट अमरावतीमध्येच बसविण्यात आली असती तर वाहन वाहतूक खर्च रक्कम रु १,२०,०००/- बचत झाली असती. तरी विनाकारण वाहन वाहतुकीवरील खर्च रक्कम रु १,२०,०००/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

६ नस्तीत वाहनाचे विमा प्रमाणपत्र, आरटीओ नोंदणी प्रमाणपत्र उपलब्ध नाहीत.

७ संपूर्ण देयक रक्कम रु ६८,५०,४००/- चे असून देयकातून आयकर रक्कम १,३७,००८/- कपात करणे आवश्यक असतांना, देयकातून आयकर रक्कम रु १,३७,००८/- कपात करण्यात आले नाही.तरी आयकर रक्कम रु १३७००८/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

८ पुरवठाधारकाकडून पुवरठा आदेशाच्या अनुषंगाने सुरक्षा ठेव सुरक्षा ठेव १०% रक्कम रु ६८५०४/- कपात करण्यात आले नाही.

९ वाहन प्राप्त झाल्यानंतर वाहन योग्य स्थितीत असल्याबाबत, महानगरपालिका यांत्रिकी विभागाकडून प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

१० प्राप्त झालेले वाहन कोठे वापरण्यात येत आहेत किंवा येणार आहेत याबाबत नस्तीत कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही.

११ हायड्रोलिक हॉपर ऑटो ४० नग चालविण्याकरिता महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या वाहन चालकांची माहिती नस्तीत उपलब्ध नाही.

१२ ४० नग हायड्रोलिक हॉपर ऑटोचे लॉग बुक लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही.

१३ हायड्रोलिक हॉपर ऑटो वापराबाबत महानगरपालिकेने धोरण/नियोजन निश्चित केलेले नाही.

**४० नग ॲपे (ऑटो) वर स्पेशिफिकेशन नुसार हायड्रोलिक हॉपर कीट बसविणे बाबत**

१ स्थायी समिती ठराव क्रमांक २०७ दिनांक ०३.१२.२०१५ नुसार स्थायी समितीने साई ऑटो एजन्सीसोबत करारनामा करण्यास मंजुरी दिलेली असतांना देखील, मा. आयुक्तांनी संबंधित कंत्राटदारासोबत करारनामा केलेला नाही.

२ मनपाने करारनामा न केल्यामुळे शासनास रक्कम रु २५००/- मुद्रांक शुल्काचे नुकसान झालेले आहे. तरी पुरवठाधारकाकडून रक्कम रु २५००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

३ ॲपे (ऑटो) वर स्पेशिफिकेशन नुसार हायड्रोलिक हॉपर कीट बसविण्याच्या कामाकरिता ई-निविदा बोलाविण्यात आली नाही.

४ देयकातून कपात न केलेली आयकर रक्कम रु ५८८००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

५ पुरवठाधारकाकडून पुवरठा आदेशाच्या अनुषंगाने सुरक्षा ठेव १०% रक्कम रु २९४००/- कपात करण्यात आले नाही.

PREVIEW

६ हॉपर कीट बसवून वाहन प्राप्त झाल्यानंतर वाहन योग्य स्थितीत असल्याबाबत, महानगरपालिका यांत्रिकी विभागाकडून प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

अमरावती महानगरपालिका स्वच्छता विभागाने सन २०१५-२०१६ मध्ये शहरातील कचरा वाहतुकी करिता १४ वित्त आयोग निधीतून ४० नग APE PIAGGIO XTRA LD (ॲटो) खरेदी करून त्यावर हायड्रोलिक हॉपर बसविण्यात आले आहेत. सदर कामात खालील प्रमाणे अनियमितता झालेली आहे.

**४० नग APE PIAGGIO XTRA LD खरेदी बाबत**

प्रमाणक क्रमांक ११५३५ दिनांक २८/१२/२०१५ रक्कम ३४,४०,०००/- साई ऑटो एजन्सीज अमरावती १४ वित्त आयोग (५०% अग्रिम)

प्रमाणक क्रमांक १४९४९ दिनांक ०९/०३/२०१६ रक्कम ३४,१०,४००/- साई ऑटो एजन्सीज अमरावती १४ वित्त आयोग

प्रशासकीय मान्यता :- स्थायी समिती ठराव क्रमांक २०७ दिनांक ०३/१२/२०१५ नुसार

APE PIAGGIO XTRA LD वाहन खरेदी किंमत १७२,०००/- (वाहन वाहतूक व वाहन विमा सह खर्च) ४० वाहनकरिता ६८,८०,०००/-

वाहन किंमत – १६०,०००/-

हॉपर कीट बसविणे करिता वाहतूक खर्च – ३०००/-

आरटीओ/विमा खर्च – ९०००/-

एकूण खर्च – १७२०००/- प्रती वाहन

कामाचा आदेश :- मा. आयुक्त यांचे आदेश अमनपा/आयुक्त/स्ववि/४९७/२०१५ दिनांक ०९/१२/२०१५

पुरवठा धारक :- साई ऑटो एजन्सीज अमरावती

उपरोक्त प्रमाणकानुसार याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे

१ स्थायी समिती ठराव क्रमांक २०७ दिनांक ०३.१२.२०१५ नुसार स्थायी समितीने साई ऑटो एजन्सीसोबत करारनामा करण्यास मंजुरी दिलेली असतांना देखील, मा. आयुक्तांनी संबंधित कंत्राटदारासोबत करारनामा केलेला नाही. त्यामुळे पुरवठाधारकास वाहन पुरवठा करण्याबाबत कोणत्याही अटी व शर्ती बंधनकारक झालेली नाही. त्यामुळे झालेली खरेदी प्रक्रिया लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

२ महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती-२०१२/प्र.क्र.२७३/३९ दिनांक २६/११/२०१४ नुसार ई-निविदा बोलाविणे आवश्यक असतांना महानगरपालिकेने ४० नग हायड्रोलिक हॉपर (ॲटो) खरेदी करिता ई-निविदा बोलाविण्यात आलेले नाही.

३ मनपाने करारनामा न केल्यामुळे शासनास रक्कम रु ६४००/- मुद्रांक शुल्काचे नुकसान झालेले आहे. तरी पुरवठाधारकाकडून रक्कम रु ६४००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

४ महानगरपालिकेने शहरातील घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्यासाठी विविध बेरोजगार संस्था, बचत गट यांच्यासोबत व कचरा वाहतुकीसाठी पूजा कंन्ट्रक्शन वर्धा यांच्यासोबत करारनामा केले असतांना एवढ्या



PREVIEW

मोठ्या प्रमाणात कचरा वाहतुकीसाठी हायड्रोलिक हॉपर (ॲटो) खरेदी करण्याची आवश्यक दिसून येत नसतांना देखील मनपाने हायड्रोलिक ॲटो खरेदी केलेली आहे.

५ महानगरपालिकेने ४० नग PIAGGIO XTRA LD (ॲटो) खरेदी अधिकृत विक्रीता साई ऑटो एजन्सीज अमरावती यांच्याकडून करून हॉपर कीट बसविण्याकरिता वाहन अमरावती ते सांगली ते अमरावती असा प्रती वाहन खर्च रक्कम रु ३०००/- केला आहे. जर वाहन सांगलीवरूनच खरेदी केली असती अथवा हॉपर कीट अमरावती येथेच बसविण्यात आली असती तर वाहन वाहतूक खर्च रक्कम रु १,२०,०००/- बचत झाली असते. तरी विनाकारण वाहन वाहतुकीवरील खर्च रक्कम रु १,२०,०००/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

६ ४० हायड्रोलिक हॉपर (ॲटो) नग वाहनाचा विमा काढून त्याचे रजिस्टेशन अमरावती येथील प्रादेशिक परिवहन विभागाकडून उपायुक्त, मनपा अमरावती यांचे नावे रजिस्ट्रेशन करून देणे बंधनकारक राहील असे नमूद असतांना, नस्तीत वाहनाचे विमा प्रमाणपत्र, आरटीओ नोंदणी प्रमाणपत्र उपलब्ध नाहीत.

७ आयकर अधिनियमातील कलम १९४ सी नुसार देयकातून २% आयकर कपात करणे आवश्यक असतांना, संपूर्ण देयक रक्कम रु ६८,५०,४००/- चे असून देयकातून आयकर रक्कम १,३७,००८/- कपात करणे आवश्यक असतांना, देयकातून आयकर रक्कम रु १,३७,००८/- कपात करण्यात आले नाही. तरी आयकर कपात रक्कम रु १३७००८/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

८ महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता २०११ मधील नियम १४१ व मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या मार्गदर्शक सुचने नुसार १०% सुरक्षा ठेव कपात करणे आहे. परंतु महानगरपालिकेने कंत्राटदाराकडून सुरक्षा ठेव प्राप्त केले आहे. तरी देयकातून १०% रक्कम रु ६८५०४/- कपात करून कामाचा दोष दायित्व कालावधी १ वर्ष पूर्ण झाल्यानंतर परत करणे आवश्यक असतांना, महानगरपालिकेकडून सुरक्षा ठेव कपात करण्यात आली आहे.

९ वाहन प्राप्त झाल्यानंतर वाहन योग्य स्थितीत असल्याबाबत, महानगरपालिका यांत्रिकी विभागाकडून प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

१० प्राप्त झालेले वाहन कोठे वापरण्यात येत आहेत किंवा येणार आहेत याबाबत नस्तीत कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही.

११ हायड्रोलिक हॉपर ऑटो ४० नग चालविण्याकरिता महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या वाहन चालकांची माहिती नस्तीत उपलब्ध नाही. अथवा ऑटो चालविण्याकरिता ईतर कंत्राटदाराला कंत्राट दिल्याबाबत देखील नस्तीत कोठेही उल्लेख नाही.

१२ ४० नग हायड्रोलिक हॉपर ऑटोचे लॉग बुक लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही.

१३ हायड्रोलिक हॉपर ऑटो वापराबाबत महानगरपालिकेने धोरण निश्चित केलेले नाही,जसे वाहन चालकांची उपलब्धता,वाहन पार्किंगची उपलब्धता, प्रभागनिहाय वाहनांचे गरज, कचरा उचलणारे कंत्राटदार व वाहतूक कंत्राटदारासोबत कामाचे ताळमेळ याबाबत महानगरपालिकेने हायड्रोलिक हॉपर (ॲटो) वाहन खरेदी करण्यापूर्वी कोणतेही नियोजन केलेले नस्तीत नमूद नाही.

तरी महानगरपालिकेने सन २०१५-२०१६ मध्ये केलेला ४० नग हायड्रोलिक हॉपर (ॲटो) खरेदीवरील खर्च रक्कम रु ६८,५०,४००/- लेखापरीक्षणास मान्य नसून संपूर्ण खर्च आक्षेपित ठेवण्यात येत आहे.



PREVIEW

तसेच प्रदान देयकातून रक्कम रु १,४३,४०८/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

**४० नग अॅपे (ऑटो) वर स्पेशिफिकेशन नुसार हायड्रोलिक हॉपर कीट बसविणे बाबत**

प्रमाणक क्रमांक १३४६६ दिनांक १५/०२/२०१६ रक्कम १४,७०,०००/- श्री.चिंतामणी मोटर्स सांगली १४ वित्त आयोग (५०% अग्रिम)

प्रमाणक क्रमांक १४९५० दिनांक ०९/०३/२०१६ रक्कम १४,७०,०००/- श्री.चिंतामणी मोटर्स सांगली १४ वित्त आयोग

प्रशासकीय मान्यता :- स्थायी समिती ठराव क्रमांक २०७ दिनांक ०३/१२/२०१५

कामाचा आदेश :- मा. आयुक्त यांचे आदेश अमनपा/आयुक्त/स्ववि/४९४/२०१५ दिनांक ०९/१२/२०१५

४० नग APE PIAGGIO XTRA LD  वाहनावर हॉपर कीट बसविणे किंमत ७३,५००/- ४० वाहनकरिता २९,४०,०००/-

पुरवठा धारक :- श्री.चिंतामणी मोटर्स सांगली

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे

१ स्थायी समिती ठराव क्रमांक २०७ दिनांक ०३.१२.२०१५ नुसार स्थायी समितीने साई ऑटो एजन्सीसोबत करारनामा करण्यास मंजुरी दिलेली असतांना देखील, मा. आयुक्तांनी संबंधित कंत्राटदारासोबत करारनामा केलेला नाही. त्यामुळे पुरवठाधारकास वाहनावर बसविण्यात येणाऱ्या हॉपर कीट करिता कोणत्याही अटी व शर्ती बंधनकारक झालेली नाही. त्यामुळे झालेली खरेदी प्रक्रिया लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

२ मनपाने करारनामा न केल्यामुळे शासनास रक्कम रु २५००/- मुद्रांक शुल्काचे नुकसान झालेले आहे. तरी पुरवठाधारकाकडून रक्कम रु २५००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

३ महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती-२०१२/प्र.क्र.२७३/३९ दिनांक २६/११/२०१४ नुसार ई-निविदा बोलाविणे आवश्यक असतांना, महानगरपालिकेने ४० नग हायड्रोलिक हॉपर (अॅटो) वर हॉपर कीट बसविण्याकरिता ई-निविदा बोलाविण्यात आलेले नाही.

४ आयकर अधिनियमातील कलम १९४ सी नुसार देयकातून २% आयकर कपात करणे आवश्यक असतांना, संपूर्ण देयक रक्कम रु २९४०,०००/- चे असून देयकातून आयकर रक्कम ५८८००/- कपात करणे आवश्यक असतांना, देयकातून कपात न केलेली आयकर रक्कम रु ५८८००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

५ महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता २०११ मधील नियम १४१ व मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या मार्गदर्शक सुचने नुसार नुसार १०% सुरक्षा ठेव कपात करणे आहे. परंतु महानगरपालिकेने कंत्राटदाराकडून कामासाठी सुरक्षा ठेव प्राप्त केले आहे. तरी देयकातून १०% रक्कम रु २९४००/- कपात करून कामाचा दोष दायित्व कालावधी १ वर्ष पूर्ण झाल्यानंतर परत करणे आवश्यक असतांना, महानगरपालिकेकडून कमी सुरक्षा ठेव कपात करण्यात आली आहे.

६ हॉपर कीट बसवून वाहन प्राप्त झाल्यानंतर वाहन योग्य स्थितीत असल्याबाबत, महानगरपालिका यांत्रिकी विभागाकडून प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.



PREVIEW

APE PIAGGIO XTRA LD (अॅटो) खरेदीवरील सर्व रक्कम आक्षेपित ठेवण्यात आल्यामुळे सदर हॉपर कीट बसविण्यावरील खर्च रक्कम रु २९,४०,०००/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे. तसेच देयकातून रक्कम रु ६१३००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक १७८, दिनांक २० /१० /२०२० निर्गमित करण्यात आले असून प्राप्त अनुपालन संयुक्तिक नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 53, Hmm No : 178)

## *39 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कार्यवाहीच्या अनुषंगाने स्वच्छता विभागाकरिता ५० नग अॅपे (ऑटो) खरेदी व त्यावर हायड्रोलिक हॉपर बसविणे बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 16**

*शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 12245000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 256000.00/- तात्पुरती अमान्य रक्कम रु. 12245000.00/-

अमरावती महानगरपालिका स्वच्छता विभागाने सन २०१५-२०१६ मध्ये शहरातील कचरा वाहतुकी करिता १३ वा वित्त आयोग व १४ वा वित्त आयोग निधीतून ५० नग अॅपे (ऑटो) खरेदी करून त्यावर हायड्रोलिक हॉपर बसविण्यात आले आहेत. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे

**५० नग APE PIAGGIO XTRA LD खरेदी बाबत**

१ महानगरपालिकेने शहरातील घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्यासाठी विविध बेरोजगार संस्था, बचत गट यांच्यासोबत व कचरा वाहतुकीसाठी पूजा कंन्ट्रक्शन वर्धा यांच्यासोबत करारनामा केले असतांना एवढ्या मोठ्या प्रमाणात कचरा वाहतुकीसाठी हायड्रोलिक हॉपर (अॅटो) खरेदी करण्याची आवश्यक दिसून येत नसतांना देखील मनपाने हायड्रोलिक अॅटो खरेदी केलेली आहे.

२ महानगरपालिकेने ५० नग APE PIAGGIO XTRA LD (अॅटो) खरेदी करिता ई-निविदा बोलाविण्यात आलेले नाही.

३ रक्कम रु ८१००/- चे मुद्रांक शुल्कावर करारनामा करणे आवश्यक असतांना, रक्कम रु १००/- वर करारनामा करण्यात आला आहे. तरी कमी भरणा करण्यात आलेली मुद्रांक शुल्क रक्कम रु ८०००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

४ संपूर्ण देयक रक्कम रु ८५,७०,०००/- चे असून देयकातून आयकर रक्कम १७१४००/- कपात करणे आवश्यक

PREVIEW

असतांना, देयकातून आयकर रक्कम रु १७१४००/- कपात करण्यात आले नाही. तरी आयकर रक्कम रु १७१४००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

५ देयकातून सुरक्षा ठेव ८% रक्कम रु ६८५६००/- कपात करण्यात आलेले नाही.

६ हॉपर कीट बसविण्याकरिता वाहन अमरावती ते सांगली ते अमरावती असा प्रती वाहन खर्च रक्कम रु ३०००/- केला आहे. जर वाहन सांगलीवरूनच खरेदी केली असती अथवा हॉपर कीट अमरावतीमध्येच बसविण्यात आली असती तर वाहन वाहतूक खर्च रक्कम रु १,५०,०००/- बचत झाली असती. तरी विनाकारण वाहन वाहतुकीवरील खर्च रक्कम रु १,५०,०००/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

७ नस्तीत वाहनाचे विमा प्रमाणपत्र, आरटीओ नोंदणी प्रमाणपत्र उपलब्ध नाहीत.

८ वाहन प्राप्त झाल्यानंतर वाहन योग्य स्थितीत असल्याबाबत, महानगरपालिका यांत्रिकी विभागाकडून प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

९ प्राप्त झालेले वाहन कोठे वापरण्यात येत आहेत किंवा येणार आहेत याबाबत नस्तीत कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही.

१० हायड्रोलिक हॉपर ऑटो ५० नग चालविण्याकरिता महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या वाहन चालकांची माहिती नस्तीत उपलब्ध नाही.

११ ५० नग हायड्रोलिक हॉपर ऑटोचे लॉग बुक लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही.

१२ हायड्रोलिक हॉपर ऑटो वापराबाबत महानगरपालिकेने धोरण/नियोजन निश्चित केलेले नाही.

**५० नग अॅपे (ऑटो) वर स्पेशिफिकेशन नुसार हायड्रोलिक हॉपर कीट बसविणे बाबत**

१ मुद्रांक शुल्क रक्कम रु ३२००/- चे मुद्रांक शुल्कावर करारनामा करणे आवश्यक असतांना, रक्कम रु १००/- वर करारनामा करण्यात आला आहे. तरी कमी भरणा करण्यात आलेली मुद्रांक शुल्क रक्कम रु ३१००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

२ देयकातून २% आयकर रक्कम ७३५००/- कपात करण्यात आले नाही.

३ देयकातून सुरक्षा ठेव किमान ८% रक्कम रु २९४०००/- कपात करण्यात आले नाही.

४ हॉपर कीट बसवून वाहन प्राप्त झाल्यानंतर वाहन योग्य स्थितीत असल्याबाबत, महानगरपालिका यांत्रिकी विभागाकडून प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

PREVIEW

अमरावती महानगरपालिका स्वच्छता विभागाने सन २०१५-२०१६ मध्ये शहरातील कचरा वाहतुकी करिता १३ वा वित्त आयोग व १४ वा वित्त आयोग निधीतून ५० नग अॅपे (ऑटो) खरेदी करून त्यावर हायड्रोलिक हॉपर बसविण्यात आले आहेत. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे

**५० नग APE PIAGGIO XTRA LD खरेदी बाबत**

प्र.क्र. ४५७७ दिनांक ३०/०७/२०१५ रक्कम ४३,००,०००/- साई ऑटो एजन्सीज अमरावती (अग्रिम १३ वित्त आयोग)

प्र.क्र.६९४८ दिनांक २९/०९/२०१५ रक्कम १२,००,०००/- साई ऑटो एजन्सीज अमरावती (१३ वि.आयोग)

प्र.क्र. ९०३७ दिनांक १८/११/२०१५ रक्कम २१,२०,०००/- साई ऑटो एजन्सीज अमरावती (१४ वि.आ.)
प्र.क्र. ६९९३ दिनांक ०५/१०/२०१५ रक्कम ९,५०,०००/- साई ऑटो एजन्सीज अमरावती (१४ वि.आ.)
प्रशासकीय मान्यता :- स्थायी समिती ठराव क्रमांक २०७ दिनांक ०३/१२/२०१५ नुसार
APE PIAGGIO XTRA LD वाहन खरेदी किंमत १७२,०००/- (वाहन वाहतूक व वाहन विमा सह खर्च) ५० वाहनकरिता ८६,००,०००/-
वाहन किंमत – १६०,०००/-
हॉपर कीट बसविणे करिता वाहतूक खर्च – ३०००/-
आरटीओ/विमा खर्च – ९०००/-
एकूण खर्च – १७२०००/- प्रती वाहन
कामाचा आदेश :- मा. आयुक्त यांचे आदेश अमनपा/आयुक्त/स्ववि/२९०/२०१५ दिनांक २२/०७/२०१५
पुरवठा धारक :- साई ऑटो एजन्सीज अमरावती
करारनामा :- दिनांक २३/०७/२०१५ (१००/- करारपत्र)
याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे

१ महानगरपालिकेने शहरातील घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्यासाठी विविध बेरोजगार संस्था, बचत गट यांच्यासोबत व कचरा वाहतुकीसाठी पूजा कंन्ट्रक्शन वर्धा यांच्यासोबत करारनामा केले असतांना एवढ्या मोठ्या प्रमाणात कचरा वाहतुकीसाठी हायड्रोलिक हॉपर (ॲटो) खरेदी करण्याची आवश्यकता दिसून येत नसतांना देखील मनपाने हायड्रोलिक ॲटो खरेदी केलेली आहे.

२ महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मातंस/नस्ती-२०१२/प्र.क्र.२७३/३९ दिनांक २६/११/२०१४ नुसार ई-निविदा बोलाविणे आवश्यक असतांना महानगरपालिकेने ५० नग APE PIAGGIO XTRA LD (ॲटो) खरेदी करिता ई-निविदा बोलाविण्यात आलेले नाही.

३ महाराष्ट्र मुद्रांक शुल्क (सुधारणा) अधिनियम २०१५, अधिसूचना दिनांक २४/०४/२०१५ मधील परिच्छेद ३४ व मूळ अधिनियमातील अनुसूची १ मधील अनुक्रमांक ६३ नुसार १० लाभापर्यंतचा कार्यकंत्राटाकरिता रक्कम रु ५००/- मुद्रांक शुल्क व त्यावरील रक्कमेकरिता ०.1% दराने मुद्रांक शुल्क रक्कम रु ८१००/- चे मुद्रांक शुल्कावर करारनामा करणे आवश्यक असतांना, रक्कम रु १००/- वर करारनामा करण्यात आला आहे. तरी कमी भरणा करण्यात आलेली मुद्रांक शुल्क रक्कम रु ८०००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

४ आयकर अधिनियमातील कलम १९४ सी नुसार देयकातून २% आयकर कपात करणे आवश्यक असतांना, संपूर्ण देयक रक्कम रु ८५,७०,०००/- चे असून देयकातून आयकर रक्कम १७१४००/- कपात करणे आवश्यक असतांना, देयकातून आयकर रक्कम रु १७१४००/- कपात करण्यात आले नाही. तरी आयकर रक्कम रु १७१४००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

५ महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता २०११ मधील नियम १४१ व मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या मार्गदर्शक सुचने नुसार १०% सुरक्षा ठेव कपात करणे आहे. परंतु महानगरपालिकेने फक्त २% सुरक्षा ठेव कामाच्या

PREVIEW

आदेशाच्या सुरुवातीला प्राप्त केले आहे. तरी देयकातून ८% रक्कम रु ६८५६००/- कपात करून करारनाम्यातील अटीनुसार कामाचा दोष दायित्व कालावधी १ वर्ष पूर्ण झाल्यानंतर परत करणे आवश्यक असतांना, महानगरपालिकेकडून कमी सुरक्षा ठेव कपात करण्यात आली आहे.

६ महानगरपालिकेने ५० नग PIAGGIO XTRA LD  (ॲटो) खरेदी अधिकृत विक्रीता साई ऑटो एजन्सीज अमरावती यांच्याकडून करून हॉपर कीट बसविण्याकरिता वाहन बारामती ते सांगली ते अमरावती असा प्रती वाहन खर्च रक्कम रु ३०००/- केला आहे. जर हायड्रोलिक हॉपर अमरावती येथे बसविण्यात आले असते तर वाहन वाहतूक खर्च रक्कम रु १,५०,०००/- बचत झाली असती. तरी विनाकारण वाहन वाहतुकीवरील खर्च रक्कम रु १,५०,०००/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

७ महानगरपालिकेच्या करारनाम्यातील अट क्रमांक ६ नुसार वाहनाचा विमा काढून त्याचे रजिस्टेशन अमरावती येथील प्रादेशिक परिवहन विभागाकडून उपायुक्त, मनपा अमरावती यांचे नावे रजिस्ट्रेशन करून देणे बंधनकारक राहील असे नमूद असतांना, नस्तीत वाहनाचे विमा प्रमाणपत्र, आरटीओ नोंदणी प्रमाणपत्र उपलब्ध नाहीत.

८ वाहन प्राप्त झाल्यानंतर वाहन योग्य स्थितीत असल्याबाबत, महानगरपालिका यांत्रिकी विभागाकडून प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

९ प्राप्त झालेले वाहन कोठे वापरण्यात येत आहेत किंवा येणार आहेत याबाबत नस्तीत कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही.

१० PIAGGIO XTRA LD  हायड्रोलिक हॉपर (ॲटो) ५० नग चालविण्याकरिता महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या वाहन चालकांची माहिती नस्तीत उपलब्ध नाही. अथवा ऑटो चालविण्याकरिता ईतर कंत्राटदाराला कंत्राट दिल्याबाबत देखील नस्तीत कोठेही उल्लेख नाही.

११ ५० नग हायड्रोलिक हॉपर ऑटोचे लॉग बुक लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही.

१२ हायड्रोलिक हॉपर ऑटो वापराबाबत महानगरपालिकेने धोरण निश्चित केलेले नाही,जसे वाहन चालकांची उपलब्धता,वाहन पार्किंगची उपलब्धता, प्रभागनिहाय वाहनांचे गरज, कचरा उचलणारे कंत्राटदार व वाहतूक कंत्राटदारासोबत कामाचे ताळमेळ याबाबत महानगरपालिकेने हायड्रोलिक हॉपर (ॲटो) वाहन खरेदी करण्यापूर्वी कोणतेही नियोजन केलेले नस्तीत नमूद नाही.

तरी महानगरपालिकेने सन २०१५-२०१६ मध्ये केलेला ५० नग PIAGGIO XTRA LD  (ॲटो) खरेदीवरील खर्च रक्कम रु ८५,७०,०००/- लेखापरीक्षणास मान्य नसून संपूर्ण खर्च आक्षेपित ठेवण्यात येत आहे. तसेच प्रदान देयकातून रक्कम रु १७९४००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

**५० नग ॲपे (ऑटो) वर स्पेशिफिकेशन नुसार हायड्रोलिक हॉपर कीट बसविणे बाबत**

प्र.क्र. ४६०१ दिनांक ३१/०७/२०१५ रक्कम १८,३७,५००/- श्री.चिंतामणी मोटर्स सांगली १३ वित्त आयोग (५०% अग्रिम)

प्र.क्र. ९०३८ दिनांक १८/११/२०१५ रक्कम १८,३७,५००/- श्री.चिंतामणी मोटर्स सांगली १४ वित्त आयोग

प्रशासकीय मान्यता :- स्थायी समिती ठराव क्रमांक २०७ दिनांक ०३/१२/२०१५

PREVIEW

कामाचा आदेश :- मा. आयुक्त यांचे आदेश अमनपा/आयुक्त/स्ववि/४९७/२०१५ दिनांक ०९/१२/२०१५

५० नग APE PIAGGIO XTRA LD वाहनावर हॉपर कीट बसविणे किंमत ७३,५००/- ५० वाहनकरिता ३६,७५,०००/-

पुरवठा धारक :- श्री.चिंतामणी मोटर्स सांगली

करारनामा :- दिनांक २३/०७/२०१५ (१००/- करारपत्र)

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे

१ महाराष्ट्र मुद्रांक शुल्क (सुधारणा) अधिनियम २०१५,अधिसूचना दिनांक २४/०४/२०१५ मधील परिच्छेद ३४ व मूळ अधिनियमातील अनुसूची १ मधील अनुक्रमांक ६३ नुसार १० लाभापर्यंतचा कार्यकंत्राटाकरिता रक्कम रु ५००/- मुद्रांक शुल्क व त्यावरील रक्कमेकरिता ०.१% दराने मुद्रांक शुल्क रक्कम रु ३२००/- चे मुद्रांक शुल्कावर करारनामा करणे आवश्यक असतांना, रक्कम रु १००/- वर करारनामा करण्यात आला आहे. तरी कमी भरणा करण्यात आलेली मुद्रांक शुल्क रक्कम रु ३१००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

२ आयकर अधिनियमातील कलम १९४ सी नुसार देयकातून २ % आयकर कपात करणे आवश्यक असतांना, संपूर्ण देयक रक्कम रु ३६,७५,०००/- चे असून देयकातून आयकर रक्कम ७३५००/- कपात करणे आवश्यक असतांना, देयकातून आयकर रक्कम रु ७३५००/- कपात करण्यात आले नाही.

३ महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता २०११ मधील नियम १४१ व मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या मार्गदर्शक सुचने नुसार १०% सुरक्षा ठेव कपात करणे आहे. परंतु महानगरपालिकेने फक्त २% सुरक्षा ठेव कामाच्या आदेशाच्या सुरुवातीला प्राप्त केले आहे. तरी देयकातून ८% रक्कम रु २९४०००/- कपात करून करारनाम्यातील अटीनुसार कामाचा दोष दायित्व कालावधी १ वर्ष पूर्ण झाल्यानंतर परत करणे आवश्यक असतांना, महानगरपालिकेकडून कमी सुरक्षा ठेव कपात करण्यात आली आहे.

४ हॉपर कीट बसवून वाहन प्राप्त झाल्यानंतर वाहन योग्य स्थितीत असल्याबाबत, महानगरपालिका यांत्रिकी विभागाकडून प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

हायड्रोलिक हॉपर (ॲटो) खरेदीवरील सर्व रक्कम आक्षेपित ठेवण्यात आल्यामुळे सदर हॉपर कीट बसविण्यावरील खर्च रक्कम रु ३६,७५,०००/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे. तसेच प्रदान देयकातून रक्कम रु ७६६००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक १७७ , दिनांक २० /१० /२०२० निर्गमित करण्यात आले प्राप्त अनुपालन संयुक्तिक नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 54, Hmm No : 177)

PREVIEW

## *40 कचरा वाहतूकीकरिता देण्यात आलेल्या कंत्राटबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 8**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 5565275.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 5565275.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 24000.00/-

अमरावती महानगरपालिकेने शहरातील चार प्रभागातील कचरा वाहतुकांच्या देयकाची रक्कम मे.पूजा कन्स्ट्क्शन वर्धा यांना अदा करण्यात आली आहे. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे
१ सन २०१५-२०१६ मध्ये नवीन करारनामा न करता मे.पूजा कन्स्ट्क्शन वर्धा यांना कामाची स्थायी समिती ठराव क्रमांक २३० दिनांक १३/०९/२०१४ व कार्यारंभा आदेश क्रमांक २९४ दिनांक २०/०८/२०१५ अन्वये दिनांक १६/०९/२०१५ ते १५/०९/२०१६ या कालावधी करिता मुदतवाढ देण्यात आली आहे.
२ प्रभागनिहाय कचरा संकलन ठिकाणाची माहिती नस्तीत दिसून येत नाही.
३ कंपोस्ट डेपोवर कचऱ्याचे आकारमान मोजून त्याप्रमाणे नोंद घेतल्याबाबत नोंदवही ठेवणे गरजेचे आहे. परंतु तशी नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही.
४ देयकात कंटेनर/ट्रक ट्रीप मधील कचराचे वजन १०० घनफुटापेक्षा कमी असल्यामुळे एकही ट्रीप निरंक केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे १०० घनफुट पेक्षा कमी कचरा असलेला ट्रीप करिता कंत्राटदाराला किमान अर्धा ट्रीपचे रक्कम अदा झाल्याचे दिसून येत आहे.
५ कंत्राटदाराने सदर वाहनाचे आर.सी.बुक तसेच २०१५-२०१६ करिता वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र, वाहनाचे विमा उतरविला असल्याबाबतचे विमा प्रमाणपत्र नस्तीत उपलब्ध नाहीत.
६ कामगारांचे वेतन रजिस्टर ठेवण्यात येऊन प्रतिमाह देयके अदा करण्यापूर्वी मनपास सादर करणे आवश्यक असतांना, कामगारांचे वेतन रजिस्टर लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही.
७ कंत्राटदाराकडील सर्व कर्मचाऱ्यांचे नियमित ई.पी.एफ. भरणा करीत असल्याबाबत ई.पी.एफ. चालन देयकासोबत जोडण्यात आले नाही.
८ जानेवारी-२०१६ मध्ये दिनांक २६/०१/२०१६ रोजी काम बंद असल्यामुळे चार झोन करिता कंत्राटदाराचे २४ वाहनावरील प्रती वाहन १०००/- दंडाप्रमाणे रक्कम रु २४०००/- दंडाची रक्कम देयकातून वसूल करण्यात आलेली नाही. तरी दंडाची रक्कम रु २४०००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

PREVIEW

प्रमाणक क्रमांक ११८५२ दिनांक ०७/०१/२०१६ रक्कम ६३१८०७/- माहे डिसेंबर-१५ झोन क्रमांक १
प्रमाणक क्रमांक ११८५३ दिनांक ०७/०१/२०१६ रक्कम ९१०२०८/- माहे डिसेंबर-१५ झोन क्रमांक २

प्रमाणक क्रमांक १३२५० दिनांक ०५/०२/२०१६ रक्कम ७४५२३९/- माहे डिसेंबर-१५ झोन क्रमांक ३
प्रमाणक क्रमांक १४०८४ दिनांक २९/०२/२०१६ रक्कम ५१५५८९/- माहे डिसेंबर-१५ झोन क्रमांक ४
प्रमाणक क्रमांक १४०८५ दिनांक २९/०२/२०१६ रक्कम ६७३८०१/- माहे जानेवारी-१६ झोन क्रमांक १
प्रमाणक क्रमांक १४०८६ दिनांक २९/०२/२०१६ रक्कम ९६४९६५/- माहे जानेवारी-१६ झोन क्रमांक २
प्रमाणक क्रमांक १४०८७ दिनांक २९/०२/२०१६ रक्कम ६६५९०२/- माहे जानेवारी-१६ झोन क्रमांक ३
प्रमाणक क्रमांक १४०८८ दिनांक २९/०२/२०१६ रक्कम ४५७७६४/- माहे जानेवारी-१६ झोन क्रमांक ४
उपरोक्त निवडक महिन्याच्या देयकानुसार अमरावती महानगरपालिकेने शहरातील चार प्रभागातील कचरा वाहतुकांच्या देयकाची रक्कम मे.पूजा कन्स्ट्क्शन वर्धा यांना अदा करण्यात आली आहे. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे

१ सन २००८ मध्ये करण्यात आलेला करारनाम्याची मुदत सन २०१३ मध्ये संपुष्ठात आली असतांना देखील, नव्याने ई-निविदा पद्धतीचा अवलंब करून कचरा वाहतूक कंत्राट देणे आपेक्षित असतांना महानगरपालिकेने सन २०१५-२०१६ मध्ये नवीन करारनामा न करता मे.पूजा कन्स्ट्क्शन वर्धा यांना कामाची स्थायी समिती ठराव क्रमांक २३० दिनांक १३/०९/२०१४ व कार्यारंभा आदेश क्रमांक २९४ दिनांक २०/०८/२०१५ अन्वये दिनांक १६/०९/२०१५ ते १५/०९/२०१६ या कालावधी करिता मुदतवाढ देण्यात आली आहे. परंतु नस्तीत ठरावाची प्रत व कार्यादेशाची प्रत नस्तीत उपलब्ध नाही.
२ मूळ करारनाम्यातील अट क्रमांक ७ नुसार सन २०१५-२०१६ मध्ये प्रशासकीय झोन नुसार उचलावयाचे कंटेनर, कुड्यांची यादी प्रभागाने देणे आवश्यक आहे त्यानुसार प्रभागनिहाय कचरा संकलन ठिकाणाची माहिती नस्तीत दिसून येत नाही.
३ करारनाम्यातील अट क्रमांक ७ नुसार कंपोस्ट डेपोवर कचऱ्याचे आकारमान मोजून त्याप्रमाणे नोंद घेतल्याबाबत नोंदवही ठेवणे गरजेचे आहे. परंतु तशी नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही.
४ करारनाम्यातील अट क्रमांक ७ नुसार १०० घनफुट पेक्षा कमी असलेल्या ट्रीप “निरंक” समजण्या बाबतच्या अटीची पूर्तता झाली नसल्याचे दिसून येते. देयकात कंटेनर/ट्रक ट्रीप मधील कचराचे वजन १०० घनफुटापेक्षा कमी असल्यामुळे एकही ट्रीप निरंक केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे १०० घनफुट पेक्षा कमी कचरा असलेला ट्रीप करिता कंत्राटदाराला किमान अर्धा ट्रीपचे रक्कम अदा झाल्याचे दिसून येत आहे.
५ मूळ करारनाम्यातील अट क्रमांक १२ नुसार कंटेनर/ट्रक कंत्राटदाराला नवीन चेसीस असलेले म्हणजे दिनांक १/१/२००७ नंतरचे उत्पादन असावेत तसेच दरवर्षी आर.टी.ओ.कडून वाहन सुस्थितीत असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करावे लागेल,असे नमूद आहे. कंत्राटदाराचे ४ प्रशासकीय झोननिहाय प्रत्येकी ४ डंम्पर प्लेसर व २ ट्रक याप्रमाणे एकूण १६ डंम्पर प्लेसर व ८ खुले ट्रक उपलब्ध असल्याचे अहवालावरून दिसून येत आहे. परंतु नस्तीत कंत्राटदाराने सदर वाहनाचे आर.सी.बुक तसेच २०१५-२०१६ करिता वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र, वाहनाचे विमा उतरविला असल्याबाबतचे विमा प्रमाणपत्र नस्तीत उपलब्ध नाही. त्यामुळे प्रत्येक्ष कामावर किती वाहनांच्या वापर केला जात होता हे समजणे शक्य नाही.

PREVIEW

६ मूळ करारनाम्यातील अट क्रमांक ३३ नुसार किमान वेतन कायदानुसार कामगारांना वेतन अदा करीत असल्याबाबत वेतन रजिस्टर ठेवण्यात येऊन प्रतिमाह देयके अदा करण्यापूर्वी सादर करणे आवश्यक असतांना, कामगारांचे वेतन रजिस्टर लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही.
७ मूळ करारनाम्यातील अट क्रमांक ३० नुसार कंत्राटदाराकडील सर्व कर्मचाऱ्यांचे नियमित ई.पी.एफ. भरणा करीत असल्याबाबत ई.पी.एफ. चालन देयकासोबत जोडणे आवश्यक असतांना, देयकासोबत कामगारांचे ई.पी.एफ. भरणा चालन उपलब्ध नाही. कामावर काम करणाऱ्या कामगाराबाबत कोणतीही माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिली नसल्यामुळे प्रत्येक्षात कामावर किती व्यक्ती/कामगार काम करीत होते हे समजणे शक्य झाले नाही.
८. मूळ करारनाम्यातील अट क्रमांक ८ नुसार कचरा उचलण्याचे काम नियमित करावे लागेल,जर कचरा नियमितपणे उचलला गेला नसल्यास प्रती ट्रीप/कंटेनर रु १०००/- प्रमाणे दंड म्हणून कपात करण्यात येईल अशी अट नमूद आहे. जानेवारी-२०१६ मध्ये दिनांक २६/०१/२०१६ रोजी काम बंद असल्यामुळे चार झोन करिता कंत्राटदाराचे २४ वाहनावरील प्रती वाहन १०००/- दंडाप्रमाणे रक्कम रु २४०००/- दंडाची रक्कम देयकातून वसूल करण्यात आलेली नाही. तरी दंडाची रक्कम रु २४०००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.
उपरोक्त सर्व बाबीची पूर्तता होईपर्यंत सन २०१५-२०१६ मधील निवडक महिन्यातील मे.पूजा कन्स्ट्क्शन वर्धा यांना प्रदान केलेली रक्कम रु ५५६५२७५/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे. तसेच सन २०१५-२०१६ मधील पूजा कन्स्ट्क्शन वर्धा यांना प्रदान केलेल्या रक्कमा देखील आक्षेपित ठेवण्यात येत आहे.
याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक १७१, दिनांक १६/१०/२०२० निर्गमित करण्यात आले असून प्राप्त खुलासा संयुक्तिक नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 55, Hmm No : 171)

PREVIEW

## *41 लेखा विभागाने कामाचा आदेश नसतांना दैनिक साफ सफाईचे देयके पारित केल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 1**

*महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ब*
गुंतलेली रक्कम रु. 1029092.00 /-
वसूलपात्र रक्कम रु. 1029092.00/-

मा.उपायुक्त यांचे कार्यारंभ आदेशात दैनिक साफ-सफाई कामाची मुदत जास्तीत जास्त दिनांक ३१/०८/२०१४ पर्यंत स्थायी समितीचे ठराव क्रमांक ११९ दिनांक ३१/०८/२०१३ अन्वये देण्यात येत असल्याचे नमूद आहे. त्यामुळे सागर नागरी सेवा.सह.संस्था, प्रभाग क्रमांक ८ जमील कॉलनी, व साई वैभव कंन्स्ट्रक्शन अमरावती, प्रभाग क्रमांक ७ नवसारी यांना आदेशाशिवाय प्रदान केलेले माहे सप्टेंबर-२०१४ व माहे ऑक्टोबर-१४ चे देयक लेखापरीक्षणास मान्य नसून प्रदानाची संपूर्ण रक्कम रु १०२९०९२/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

अमरावती शहरातील विविध भागातील दैनिक साफ-सफाई बाबत महानगरपालिकेने कंत्राट विविध कंत्राटदाराला दिलेले आहे. त्यापैकी निवडक देयकांच्या तपासणीत खालील अनियमितता आढळून आलेली आहे.
सागर नागरी सेवा.सह.संस्था प्रभाग, क्रमांक ८ जमील कॉलनी
प्र.क्र. ७१६२ दिनांक ०८/१०/२०१५ रक्कम २६७०५८/- माहे सप्टेंबर १४
प्र.क्र. ८८३९ दिनांक ०५/११/२०१५ रक्कम २६७०५८/- माहे ऑक्टोबर १४
साई वैभव कंन्स्ट्रक्शन अमरावती, प्रभाग क्रमांक ७ नवसारी
प्र.क्र. ३५९२ दिनांक ०९/०७/२०१५ रक्कम २४७२३८/- माहे सप्टेंबर १४
प्र.क्र. ३५९३ दिनांक ०९/०७/२०१५ रक्कम २४७७३८/- माहे ऑक्टोबर १४

उपरोक्त देयकांची तपासणी केली असता, सदर देयक स्थायी समिती ठराव क्रमांक ११९ दिनांक ३०/८/२०१३ व कार्यारंभ आदेश क्रमांक ६०९/१ दिनांक ३१/०८/२०१३ अन्वये सादर केल्याचे नमूद आहे. परंतु मा.उपायुक्त यांचे कार्यारंभ आदेशात कामाची मुदत जास्तीत जास्त दिनांक ३१/०८/२०१४ पर्यंत स्थायी समितीचे ठराव क्रमांक ११९ दिनांक ३१/०८/२०१३ अन्वये देण्यात येत असल्याचे नमूद आहे. त्यामुळे सागर नागरी सेवा.सह.संस्था, प्रभाग क्रमांक ८ जमील कॉलनी, व साई वैभव कंन्स्ट्रक्शन अमरावती, प्रभाग क्रमांक ७ नवसारी यांना आदेशाशिवाय प्रदान केलेले माहे सप्टेंबर-२०१४ व ऑक्टोबर-१४ चे देयक लेखापरीक्षणास मान्य नसून प्रदानाची संपूर्ण रक्कम रु १०,२९,०९२/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.
याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक १४७, दिनांक २५/०९/२०२० निर्गमित करण्यात आले असून प्राप्त खुलासा संयुक्तिक नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 56, Hmm No : 147)

## *42 अमरावती महानगरपालिकेने नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० चे प्रभावी अंमलबजावणी न करणेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 6**



PREVIEW

*महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 161457768.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 161457768.00/-

नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० व महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक घकव्य/१००६/प्र.क्र.५३/नवि.१६ दिनांक २६/ऑक्टो/२००६ मधील नमूद कृती नुसार अमरावती महानगरपालिकेने काम केलेले नाही.

1 कृती मुद्दा १ डेब्री व मोठे कचरा उत्पादकांकडील स्वतंत्र संकलन व विल्हेवाट

2 कृती मुद्दा २ कचरा निर्मात्यांनी महानगरपालिकेकडे कचरा कशा पद्धतीने गोळा करावे.

३ कृती मुद्दा ३ घरोघरी कचरा संकलन करावे/वर्गीकृत कचरा दिला जाईल याची खात्री करणे.

४ कृती मुद्दा ७ कचराचे शास्त्रोक्त प्रक्रिया

५ शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ६७ नुसार कंत्राटदाराने कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन प्रदान करीत असल्याचे, कामगाराविषयक कायद्यानुसार कामगारांना आवश्यक त्या सुविधा पुरविले जात आहे किंवा नाही. तसेच सर्व कामगारांचा तसेच वाहन व उपकरणाचा विमा कंत्राटदाराला उतरविणे बंधनकारक असतांना, या सर्व बाबीची पालन कंत्राटदार करीत असल्याची खातरजमा महानगरपालिकेने करणे आवश्यक अशी कार्यवाही मनपाने केलेली नाही.

६ शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक २० नुसार शहरातील कचरा संकलन व वाहतुकीसाठी वेगवेगळे कंत्राटे दिल्यास, कामाची जबाबदारी विभागली गेल्याने कचरा संकलना वेळी मिश्र होता, की वाहतुकी दरम्यान मिश्र झाला यासाठी एकमेकावर दोषारोप होतात. त्यामुळे अशी वेगवेगळी कंत्राटे देण्यात येऊ नये असे स्पष्ट नमूद असतांना देखील अमरावती मनपाने संकलन व वाहतूक करिता वेगवेगळी कंत्राटे देऊन नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० चे प्रभावी अंमलबजावणी केली नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे सन २०१५-२०१६ मध्ये घनकचरा व्यवस्थापन कामावर रोखपु स्तकावरून काढण्यात आलेला खर्च रक्कम रु १६,१४,५७,७६८/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

PREVIEW

अमरावती महानगरपालिकेचे सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाच्या स्वच्छता विभागाच्या लेखापरीक्षणात खालील अनियमितता निदर्शनास आलेली आहे.

अमरावती महानगरपालिकेने सन २०१५-२०१६ मध्ये शहरातील घरोघरी जाऊन कचरा गोळा करणे,बाबत कंत्राट विविध स्वंयसेवी संघटनेला करारनामा करून कामाचे आदेश देण्यात आले आहे. तसेच दैनिक कचरा वाहतुकी करिता पुजा कन्स्ट्रक्शन यांच्या सोबत करारनामा करून काम देण्यात आले आहे. सन २०१५-२०१६ मध्ये महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापनेवर रक्कम रु १६,१४,५७,७६८/- खर्च केलेला आहे. तरी याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे

**१. कृती मुद्दा १ डेब्री व मोठे कचरा उत्पादकांकडील स्वतंत्र संकलन व विल्हेवाट**

शहरातील मोठ्या उत्पादकांकडून वेगळ्या पद्धतीने कचरा गोळा करणे व त्याची स्वतंत्र विल्हेवाट लावणे, त्याचप्रमाणे डेब्रीची स्वतंत्र विल्हेवाट लावण्याचे प्रयोजन करणे आवश्यक असतांना अमरावती महानगरपालिकेने स्वतंत्र कचरा संकलन व विल्हेवाटची कार्यवाही केलेली नाही.

**२. कृती मुद्दा २ कचरा निर्मात्यांनी महानगरपालिकेकडे कचरा कशा पद्धतीने गोळा करावे.**

नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० मधील कलम ६ नुसार शहरात प्रत्येक ठिकाणी दोन स्वतंत्र्य कुंड्यांची (विघटनशील व अविघटनशील कचऱ्यासाठी) तरतूद करणे व अशा कचराकुंड्या सुस्थितीत ठेवणे व त्यानंतर निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे वर्गीकरण करून साठवणे बंधनकारक असतांना अमरावती महानगरपालिकेने घनकचरा वर्गीकरण करून ठेवलेला नाही.

**३ .कृती मुद्दा ३ घरोघरी कचरा संकलन करावे/वर्गीकृत कचरा दिला जाईल याची खात्री करणे.**

मनपाने शहरातील घरोघरी कचरा संकलनाची कंत्राटे अशासकीय संघटना किंवा स्वंयसहायता गटांना देण्यात आले आहे. परंतु घरोघरी कचरा संकलनाचे नियोजन योग्य पद्धतीने करण्यात आले नाही. जसे घरोघरी कचरा संकलन करण्यासाठी मोठ-मोठ्या गृहसंकुलासाठी व गृह निर्माण संस्थासाठी,तसेच स्वतंत्र घरे व झोपडपट्टी भागात व व्यापारी संकुले/कार्यालया साठी वेगवेगळे नियोजन करणे,लोकवस्तीच्या आधारे नियोजन करणे आवश्यक आहे. ओला कचरा घराघरातून दररोज गोळा करणे,सुका कचरा आठवड्यातून एकदा/दोनदा किंवा मनपाने सूचित केलेल्या पद्धतीने संकलित करणे आवश्यक असतांना, अशासकीय संघटना किंवा स्वंयसहायता गटांनी कचरा निर्मात्यांकडून वर्गीकृत कचरा स्वीकारलेले नाहीत.

**४ . कृती मुद्दा ७ कचराचे शास्त्रोक्त प्रक्रिया**

मागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० नुसार कचऱ्यावर प्रक्रिया करणे व घनकचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावणे ही नागरी संस्थाची वैधानिक जबाबदार आहे. परंतु अमरावती महानगरपालिकेने शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ३३ ते ४३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शहरातील कचरावर प्रक्रिया करणारे प्रकल्प उभारणे गरजेचे असतांना महानगरपालिकेने अशी कार्यवाही केलेली नाही.

५ . शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ६७ नुसार कंत्राटदाराने कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन प्रदान करीत असल्याचे, कामगाराविषयक कायद्यानुसार कामगारांना आवश्यक त्या सुविधा पुरविले जात आहे किंवा नाही. तसेच सर्व कामगारांचा तसेच वाहन व उपकरणाचा विमा कंत्राटदाराला उतरविणे बंधनकारक असतांना, या सर्व बाबीची पालन कंत्राटदार करीत असल्याची खातरजमा महानगरपालिकेने करणे आवश्यक आहे. परंतु महानगरपालिकेने बहुतंश कंत्राटदाराची उपरोक्त बाबीची खातरजमा न करता यांचे देयके पारित केलेले आहेत.

६. शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक २० नुसार शहरातील कचरा संकलन व वाहतुकीसाठी वेगवेगळे कंत्राटे दिल्यास, कामाची जबाबदारी विभागली गेल्याने कचरा संकलना वेळी मिश्र होता, की वाहतुकी दरम्यान मिश्र

PREVIEW

झाला यासाठी एकमेकावर दोषारोप होतात. त्यामुळे अशी वेगवेगळी कंत्राटे देण्यात येऊ नये असे स्पष्ट नमूद असतांना देखील अमरावती मनपाने संकलन व वाहतूक करिता वेगवेगळी कंत्राटे देऊन नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० चे प्रभावी अंमलबजावणी केली नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे सन २०१५-२०१६ मध्ये घनकचरा व्यवस्थापन कामावर रोखपुस्तकावरून काढण्यात आलेला खर्च रक्कम रु १६,१४,५७,७६८/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक ११२ दिनांक १५/०९/२०२० निर्गमित करण्यात आले असून संयुक्तिक खुलासा प्राप्त नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 57, Hmm No : 112)

PREVIEW

## *43 तथागत महिला बचत गट अमरावती यांना देण्यात आलेल्या दैनिक साफसफाई च्या देयकाबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 4**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 723607.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 723607.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 82000.00/-

तथागत महिला बचत गट अमरावती यांचे दैनिक साफ-सफाईचे निवडक देयकांच्या तपासणीत खालील अनियमितता आढळून आलेली आहे.

१ कामगार कामावर गैरहजर कालावधीचे करारनामा अट क्रमांक १५ नुसार दंडात्मक रक्कम रु ७७०००/- देयकातून कपात करण्यात आलेली नाही. त्यामुळे रक्कम रु ७७०००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

२ करारनाम्यातील अट क्रमांक ५० प्रमाणे ज्या दिवशी एकही कामगार कामावर उपस्थित राहणार नाही.त्या दिवशी गैरहजर कामगार कपाती व्यतिरिक्त रु १०००/- प्रतिदिवस अतिरिक्त दंड आकारण्याची तरतूद आहे. असतांना देयकातून ५ दिवसांचे अतिरिक्त दंड ५,०००/- वसूल करण्यात आलेला नाही. त्यामुळे रक्कम रु ५,०००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

३. करारनाम्यातील अट क्रमांक १५ नुसार कंत्राटदाराने कामगाराचे ई.पी.एफ. भरल्याची पावती, ई.एस.आय.सी.प्रत्येक महिन्यात नियमितपणे द्यावीच लागेल व भरल्याची चालन नियमित प्रतिमाह सादर करावी लागेल.त्याशिवाय देयक अदा करण्यात येणारा नाही. अशी अट नमूद असतांना लेखा विभागाने अटीचे काटेकोर पालन न करता देयके पारित केलेले आहे.

४ . करारनाम्यातील अट क्रमांक ५१ नुसार कंत्राटदाराला कामगाराचे महावारी वेतन हे राष्ट्रीयकृत बँकेत अदा करावे लागेल.कामगाराच्या बँक खात्यात वेतन अदा झाल्याचा पुरावा जोडल्यानंतरच महानगरपालिका अमरावती तर्फे पुढील देयक अदा करण्यात येईल. अशी अट नमूद असतांना लेखा विभागाने अटीचे काटेकोर पालन न करता देयके पारित केलेले आहे.

अमरावती शहरातील विविध भागातील दैनिक साफ-सफाई बाबत महानगरपालिकेने कंत्राट विविध कंत्राटदाराला दिलेले आहे. त्यापैकी तथागत महिला बचत गट अमरावती यांचे निवडक देयकांच्या तपासणीत खालील अनियमितता आढळून आलेली आहे.

प्रभाग क्रमांक १० विलास नगर येथील दैनिक कचरा संकलन करण्याकरिता ठराव क्रमांक ११९ दिनांक ३०/०८/२०१३ आदेश क्रमांक ६०९११ दिनांक ३०/०८/२०१३ नुसार तथागत महिला बचत गट अमरावती यांना काम देण्यात आले आहे. निवडक देयकांची तपासणी केली असता देयकानिहाय खालील अनियमितता निदर्शनास आलेली आहे.

१. प्र.क्र. १९०४ दिनांक ०४-०६-२०१५ रक्कम २४०८६९/- माहे मे-१४ चे दैनिक कचरा संकलन

२. प्र.क्र. २८९६ दिनांक २५-०६-२०१५ रक्कम २४१३६९/- माहे जून-१४ चे दैनिक कचरा संकलन

३. प्र.क्र. ४६८ दिनांक १०-०४-२०१५ रक्कम २४१३६९/- माहे जुलै-१४ चे दैनिक कचरा संकलन

१. माहे जून-१४ च्या देयकातील कामगाराचे हजरीपत्रक तपासले असता, दिनांक ०१/०६/२०१४,०८/०६/२०१४,१५/०६/२०१४,२२/०६/२०१४,२९/०६/२०१४ असे एकूण ५ दिवस सर्व कामगार कामावर गैरहजर असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे करारनाम्यातील अट क्रमांक १० नुसार कामगार कामावर गैरहजर असल्यास प्रतिदिनी प्रती व्यक्ती ५००/- प्रमाणे ३० कामगार*५ दिवस प्रमाणे रक्कम रु ७५०००/- दंडाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे. परंतु देयकातून दंडाची रक्कम रु ७५०००/- वसूल करण्यात आले नसल्यामुळे करारनाम्यातील अटीप्रमाणे रक्कम रु ७५०००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

करारनाम्यातील अट क्रमांक ५० प्रमाणे ज्या दिवशी एकही कामगार उपस्थित राहणार नाही.त्या दिवशी वरील प्रमाणे गैरहजर कामगार कपाती व्यतिरिक्त रु १०००/- प्रतिदिवस अतिरिक्त दंड आकारण्याची तरतूद आहे. त्यानुसार ५ दिवसाचे रक्कम रु १०००/- प्रमाणे एकूण ५,०००/- अतिरिक्त दंडाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

२ .माहे जुलै-१४ च्या देयकातील कामगाराचे हजरीपत्रक तपासले असता, दिनांक ६/०७/२०१४, १३/०७/२०१४,२०/०७/२०१४,२७/०७/२०१४, असे एकूण ४ दिवस कामावर १ कामगार गैरहजर असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे करारनाम्यातील अट क्रमांक १० नुसार कामगार कामावर गैरहजर असल्यास प्रतिदिनी प्रती व्यक्ती ५००/- प्रमाणे १ कामगार*४ दिवस प्रमाणे रक्कम रु २०००/- दंडाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे. परंतु देयकातून दंडाची रक्कम रु २०००/- वसूल करण्यात आले नसल्यामुळे करारनाम्यातील

अटीप्रमाणे रक्कम रु २०००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

३. करारनाम्यातील अट क्रमांक १५ नुसार कंत्राटदाराने कामगाराचे ई.पी.एफ. भरल्याची पावती, ई.एस.आय.सी.प्रत्येक महिन्यात नियमितपणे द्यावीच लागेल व भरल्याची चालन नियमित प्रतिमाह सादर करावी लागेल.त्याशिवाय देयक अदा करण्यात येणारा नाही. अशी अट नमूद असतांना लेखा विभागाने अटीचे काटेकोर पालन न करता देयके पारित केलेले आहे.

४. करारनाम्यातील अट क्रमांक ५१ नुसार कंत्राटदाराला कामगाराचे महावारी वेतन हे राष्ट्रीयकृत बँकेत अदा करावे लागेल.कामगाराच्या बँक खात्यात वेतन अदा झाल्याचा पुरावा जोडल्यानंतरच महानगरपालिका अमरावती तर्फे पुढील देयक अदा करण्यात येईल. अशी अट नमूद असतांना लेखा विभागाने अटीचे काटेकोर पालन न करता देयके पारित केलेले आहे

उपरोक्त बाबीची पूर्तता होईपर्यंत तथागत महिला बचत गट अमरावती यांना वरील देयकानुसार प्रदान करण्यात आलेली रक्कम रु ७२३६०७/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे. तसेच रक्कम रु ८२०००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक १४५, दिनांक २५/०९/२०२० निर्गमित करण्यात आले असून प्राप्त खुलासा संयुक्तिक नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 58, Hmm No : 145)

PREVIEW

## *44 श्री. जगदंबा स्वंय रोजगार नागरिक सेवा सहकारी संस्था अमरावती यांना देण्यात आलेल्या दैनिक साफसफाई च्या देयकाबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 4**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1396469.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1396469.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 159500.00/-

श्री.जगदंबा स्वंय रोजगार नागरिक सेवा सहकारी संस्था अमरावती यांचे दैनिक साफ-सफाईचे निवडक देयकांच्या तपासणीत खालील अनियमितता आढळून आलेली आहे.
१ कामगार कामावर गैरहजर कालावधीचे करारनामा अट क्रमांक १५ नुसार दंडात्मक रक्कम रु ११७५००/-

देयकातून कपात करण्यात आलेली नाही. त्यामुळे रक्कम रु ११९५००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.
२ करारनाम्यातील अट क्रमांक ५६ प्रमाणे ज्या दिवशी एकही कामगार कामावर उपस्थित राहणार नाही.त्या दिवशी गैरहजर कामगार कपाती व्यतिरिक्त रु ५०००/- प्रतिदिवस अतिरिक्त दंड आकारण्याची तरतूद आहे. असतांना देयकातून ८ दिवसांचा अतिरिक्त दंड रक्कम रु ४०,०००/- वसूल करण्यात आलेला नाही. त्यामुळे रक्कम रु ४०,०००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.
३. करारनाम्यातील अट क्रमांक १५ नुसार कंत्राटदाराने कामगाराचे ई.पी.एफ. भरल्याची पावती, ई.एस.आय.सी.प्रत्येक महिन्यात नियमितपणे द्यावीच लागेल व भरल्याची चालन नियमित प्रतिमाह सादर करावी लागेल.त्याशिवाय देयक अदा करण्यात येणारा नाही. अशी अट नमूद असतांना लेखा विभागाने अटीचे काटेकोर पालन न करता देयके पारित केलेले आहे.
४ . करारनाम्यातील अट क्रमांक ५१ नुसार कंत्राटदाराला कामगाराचे महावारी वेतन हे राष्ट्रीयकृत बँकेत अदा करावे लागेल.कामगाराच्या बँक खात्यात वेतन अदा झाल्याचा पुरावा जोडल्यानंतरच महानगरपालिका अमरावती तर्फे पुढील देयक अदा करण्यात येईल. अशी अट नमूद असतांना लेखा विभागाने अटीचे काटेकोर पालन न करता देयके पारित केलेले आहे.

PREVIEW

अमरावती शहरातील विविध भागातील दैनिक साफ-सफाई बाबत महानगरपालिकेने कंत्राट विविध कंत्राटदाराला दिलेले आहे. त्यापैकी श्री.जगदंबा स्वंय रोजगार नागरिक सेवा सहकारी संस्था अमरावती यांचे निवडक देयकांच्या तपासणीत खालील अनियमितता आढळून आलेली आहे.

**१** प्रभाग क्रमांक १२ अंबापेठ येथील दैनिक कचरा संकलन करण्याकरिता ठराव क्रमांक ७३ दिनांक ३०/०८/२०१४ आदेश क्रमांक ९९८ दिनांक ३०/०८/२०१४ नुसार श्री. जगदंबा स्वंय रोजगार नागरिक सेवा सहकारी संस्था अमरावती यांना काम देण्यात आले आहे. निवडक देयकांची तपासणी केली असता देयकानिहाय खालील अनियमितता निदर्शनास आलेली आहे.

१. प्र.क्र. ५०७६ दिनांक १२-०८-२०१५ रक्कम ८९३२९/- माहे सप्टे-१४ चे दैनिक कचरा संकलन
२. प्र.क्र. ५०७४ दिनांक १२-०८-२०१५ रक्कम ८९३२९/- ऑक्टो-१४ चे दैनिक कचरा संकलन
३. प्र.क्र. ५०७५ दिनांक १२-०८-२०१५ रक्कम २५४५२७/- नोव्हे-१४ चे दैनिक कचरा संकलन
४. प्र.क्र. ८८३८ दिनांक ०५-११-२०१५ रक्कम २६७०२७/- फेब्रु-१५ चे दैनिक कचरा संकलन
५. प्र.क्र. ८८३७ दिनांक ०५-११-२०१५ रक्कम २६६५२७/- मार्च-१५ चे दैनिक कचरा संकलन

अ.क्र.५ माहे मार्च-१५ च्या देयकातील कामगाराचे हजरीपत्रक तपासले असता, दिनांक ०१/०३/२०१५,०८/०३/२०१५,१५/०३/२०१५,२२/०३/२०१५, २९/०३/२०१४ असे एकूण ५ दिवस कामावर सर्व कामगार गैरहजर असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे करारनाम्यातील अट क्रमांक १० नुसार कामगार कामावर गैरहजर असल्यास प्रतिदिनी प्रती व्यक्ती ५००/- प्रमाणे २९ कामगार*५ दिवस प्रमाणे रक्कम रु ७२५००/- दंडाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे. परंतु देयकातून दंडाची रक्कम रु ७२५००/- वसूल करण्यात आले नसल्यामुळे

करारनाम्यातील अटीप्रमाणे रक्कम रु ७२५००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.
करारनाम्यातील अट क्रमांक ५६ प्रमाणे ज्या दिवशी एकही कामगार उपस्थित राहणार नाही.त्या दिवशी वरील प्रमाणे गैरहजर कामगार कपाती व्यतिरिक्त रु ५०००/- प्रतिदिवस अतिरिक्त दंड आकारण्याची तरतूद आहे. त्यानुसार ५ दिवसाचे रक्कम रु ५०००/- प्रमाणे एकूण २५,०००/- अतिरिक्त दंडाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

**२** प्रभाग क्रमांक ३४ किरण नगर येथील दैनिक कचरा संकलन देयकातील अनियमितता

प्र.क्र. ४७६ दिनांक १०-०४-२०१५ रक्कम २४०३४३/- जुलै-१४
प्रमाणक क्रमांक ७०५० दिनांक ६-१०-२०१५ रक्कम २२१७६५/- माहे डिसेंबर-१४
प्रमाणक क्रमांक ७१६७ दिनांक ८-१०-२०१५ रक्कम २०७९६५/- माहे नोव्हे-१४
माहे जुलै-१४ च्या देयकाबाबत कामगाराचे हजरीपत्रक तपासले असता, दिनांक ६/०७/२०१४, १३/०७/२०१४, २०/०७/२०१४ असे एकूण ३ दिवस कामावर सर्व कामगार गैरहजर असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे करारनाम्यातील अट क्रमांक १० नुसार कामगार कामावर गैरहजर असल्यास प्रतिदिनी प्रती व्यक्ती ५००/- प्रमाणे ३० कामगार*३ दिवस प्रमाणे रक्कम रु ४५०००/- दंडाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे. परंतु देयकातून दंडाची रक्कम रु ४५०००/- वसूल करण्यात आले नसल्यामुळे करारनाम्यातील अटीप्रमाणे रक्कम रु ४५०००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.
करारनाम्यातील अट क्रमांक ५६ प्रमाणे ज्या दिवशी एकही कामगार उपस्थित राहणार नाही.त्या दिवशी वरील प्रमाणे गैरहजर कामगार कपाती व्यतिरिक्त रु ५०००/- प्रतिदिवस अतिरिक्त दंड आकारण्याची तरतूद आहे. त्यानुसार ३ दिवसाचे रक्कम रु ५०००/- प्रमाणे एकूण १५,०००/- अतिरिक्त दंडाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.
माहे डिसेंबर-१४ च्या देयकाबाबत
करारनाम्यातील अट क्रमांक ५१ नुसार कंत्राटदार कामगाराचे वेतन अदा केल्याबाबत २७ अ रजिस्टरची छायांकित प्रत देयकासोबत जोडण्यात आले नाही.
करारनाम्यातील अट क्रमांक १५ नुसार कंत्राटदारांनी कामगाराचे ई.एस.आय.सी.१.७५% व ई.पी.एफ. १२% चे चालान बाबत छायांकित प्रत देयकासोबत जोडणे आवश्यक असतांना जोडण्यात आले नाही.
कामगार कायदा नुसार प्रत्येक कामगाराला साप्ताहिक सुट्टी देणे आवश्यक असतांना,कंत्राटदाराने साप्ताहिक सुट्टी कामगारांना साप्ताहिक सुट्टी दिलेली नाही.
माहे नोव्हेंबर-१४ च्या देयकाबाबत
कामगाराचे हजरीपत्रक तपासले असता, दिनांक २५/११/२०१४ रोजी ४ कामगार कामावर गैरहजर असल्याचे दिसून येत आहे. तरी करारनाम्यातील अट क्रमांक १० नुसार कामगार कामावर गैरहजर असल्यास प्रतिदिनी प्रती व्यक्ती ५००/- प्रमाणे ४ कामगार*१ दिवस प्रमाणे रक्कम रु २०००/- दंडाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे. परंतु देयकातून दंडाची रक्कम रु २०००/- वसूल करण्यात आले नसल्यामुळे करारनाम्यातील अटीप्रमाणे



PREVIEW

रक्कम रु २०००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.
देयकातून गणवेषाबाबत करारनाम्यातील अट क्रमांक ३० नुसार दंड रक्कम रु ४८००/- कपात करण्यात आला आहे. परंतु कोणत्या कामगारांनी गणवेश परिधान केला नाही व कधी केला नाही याबाबतचा अहवाल नस्तीत उपलब्ध नाही. त्यामुळे कपात करण्यात आलेला दंड लेखापरीक्षणास मान्य नाही.
३. करारनाम्यातील अट क्रमांक १५ नुसार कंत्राटदाराने कामगाराचे ई.पी.एफ. भरल्याची पावती, ई.एस.आय.सी.प्रत्येक महिन्यात नियमितपणे द्यावीच लागेल व भरल्याची चालन नियमित प्रतिमाह सादर करावी लागेल.त्याशिवाय देयक अदा करण्यात येणारा नाही. अशी अट नमूद असतांना लेखा विभागाने अटीचे काटेकोर पालन न करता देयके पारित केलेले आहे.

४. करारनाम्यातील अट क्रमांक ५१ नुसार कंत्राटदाराला कामगाराचे महावारी वेतन हे राष्ट्रीयकृत बँकेत अदा करावे लागेल.कामगाराच्या बँक खात्यात वेतन अदा झाल्याचा पुरावा जोडल्यानंतरच महानगरपालिका अमरावती तर्फे पुढील देयक अदा करण्यात येईल. अशी अट नमूद असतांना लेखा विभागाने अटीचे काटेकोर पालन न करता देयके पारित केलेले आहे.

उपरोक्त बाबीची पूर्तता होईपर्यंत श्री.जगदंबा स्वंय रोजगार नागरिक सेवा सहकारी संस्था अमरावती यांना वरील देयकानुसार प्रदान करण्यात आलेली रक्कम रु १३९६४६९/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे. तसेच रक्कम रु १५९५००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.
याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक १४४, दिनांक २५/०९/२०२० निर्गमित करण्यात आले असून प्राप्त खुलासा संयुक्तिक नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 59, Hmm No : 144)

PREVIEW

## *45 श्री. विजय गंगन यांना देण्यात आलेल्या हॉटेल वेस्ट गोळा करण्याच्या कंत्राटबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 2**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 892620.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 45000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 847620.00/-

१ महानगरपालिका क्षेत्रातील लहान-मोठे हॉटेल्स, मंगल कार्यालय, बिअरबार, खानावळी, लॉन व इतर आस्थापनेमधून निघणारा वेस्ट गोळा करुन मनपाच्या सुकळी येथील कंपोस्ट डेपोत किंवा मनपा सांगेल त्या

ठिकाणी नेवुन टाकण्याबाबत श्री. विजय बालकिसन गंगन यांना देण्यात आलेल्या कंत्राटबाबत थकीत रॉयल्टी रक्कम रु ८४७६२०/- कंत्राटदाराकडून वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.
२ करारनाम्यातील अटीनुसार प्रत्येक वर्षीचा माहे मार्च अखेरचा सनदी लेखापालाचा लेखापरिक्षण अहवाल मनपास सादर करणे बंधनकारक होते. परंतु अशा प्रकारचा लेखापरिक्षण अहवाल नस्तीत आढळून आला नाही. त्यामुळे करारनाम्यातील अटी व शर्तीचे उल्लंघन करणे तसेच रॉयल्टी रक्कम विहित मुदतीत भरणा केले नसल्याने कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करणे अपेक्षित होते. परंतु तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

अमरावती महानगरपालिकेने स्थायी समिती ठराव क्र.१०५ दि.२८.१२.२०१२ चे मंजूरीनुसार तसेच मनपा आयुक्ताचे आदेश दि.३०.०४.२०१३ नुसार महानगरपालिका क्षेत्रातील लहान-मोठे हॉटेल्स, मंगल कार्यालय, बिअरबार, खानावळी, लॉन व इतर आस्थापनेमधून निघणारा वेस्ट गोळा करुन मनपाच्या सुकळी येथील कंपोस्ट डेपोत किंवा मनपा सांगेल त्या ठिकाणी नेवुन टाकण्याबाबत श्री. विजय बालकिसन गंगन या कंत्राटदाराची निविदा मंजूर करुन दि.१०.०५.२०१३ ते ०९.०५.२०१६ या कालावधीसाठी कंत्राट देण्यात आला होता. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे

१ व्यवसायिक प्रतिष्ठानातील वेस्ट गोळा करण्यासाठी मनपाने ठरवून दिलेल्या दरानुसार कंत्राटदारास प्राप्त होणारा उत्पन्नाचा तपशिल खालील प्रमाणे

| प्रतिष्ठानांचे नाव | प्रतिष्ठानांचे संख्या | प्रतीमहा वसुलीचा दर | प्रतीमहा प्राप्त होणारे उत्पन्न | वार्षिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| मोठे हॉटेल उपहारगृहे | 28 | 275 | 7700 | 92400 |
| छोटे हॉटेल व उपहारगृहे | 233 | 275 | 64075 | 768900 |
| बिअर बार | 46 | 500 | 23000 | 276000 |
| लॉजिंग बोर्डिंग व हॉस्टेल | 58 | 300 | 17400 | 208800 |
| मंगल कार्यालय व सभागृह | 78 | 250 | 19500 | 234000 |
| मंगल कार्यालय व लॉन | 27 | 150 | 4050 | 48600 |
| ढाबा व खानावळ | 58 | 300 | 17400 | 208800 |
| इतर आस्थापना (हातगाडया/खोमचे) | 200 | 50 | 10000 | 120000 |
| | | | 163125 | 1957500 |

कंत्राटदारास प्रतीवर्षी प्राप्त होणा-या उत्पन्नाच्या आधारावर वाटाघाटीनुसार प्रथम वर्षी उत्पन्नाच्या ८% व पुढील वर्षाकरिता ७.२% दराने वार्षिक वाढ प्रमाणे रॉयल्टी भरणा करण्यास कंत्राटदार मान्य करून महानगरपालिकेशी हॉटेल वेस्ट गोळा करण्याबाबत ३ वर्षाकरिता करारनामा केलेला आहे. तरी



PREVIEW

महानगरपालिकेस सन २०१३-२०१४ ते २०१५-२०१६ या कालावधीत खालील प्रमाणे रॉयल्टीने उत्पन्न कंत्राटदाराकडून प्राप्त होणे आपेक्षित होते.

कंत्राटदारास प्राप्त वार्षिक उत्पन्न रु. १९५७५००/-

सन २०१३-१४ करिता रु.१९५७५००/- च्या ८% = रु.१५६६००/-

सन २०१४-१५ करिता रु १९५७५००/- च्या १५.२% = रु.२९७५४०/-

सन २०१५-२०१६ करिता रु १९५७५००/- च्या २२.४%= ४३८४८०/-

परंतु कंत्राटदाराने सन २०१५-२०१६ अखेर पर्यंत फक्त रक्कम रु ४५०००/- रॉयल्टी रक्कम भरणा केल्याचे दिसून येत आहे. कंत्राटदाराकडून उर्वरित रॉयल्टी रक्कम रु ८४७६२०/- वसूल करणे आवश्यक आहे. तरी रॉयल्टी रक्कम रु ८४७६२०/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

२. करारनाम्यातील अट क्र.८ नुसार कंत्राटदाराने प्रत्येक वर्षीचा माहे मार्च अखेरचा सनदी लेखापालाचा लेखापरिक्षण अहवाल मनपास सादर करणे बंधनकारक होते. परंतु अशा प्रकारचा लेखापरिक्षण अहवाल नस्तीत आढळून आला नाही. त्यामुळे करारनाम्यातील अटी व शर्तीचे उल्लंघन करणे तसेच रॉयल्टी रक्कम विहित मुदतीत भरणा केले नसल्याने कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करणे अपेक्षित होते. परंतु तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

उपरोक्त बाबीची पूर्तता होईपर्यंत प्राप्त रॉयल्टी रक्कम रु ४५०००/- आक्षेपित ठेवण्यात येत असून, व रक्कम रु ८४७६२०/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक १७२, दिनांक १६/१०/२०२० निर्गमित करण्यात आले असून संयुक्तिक खुलासा प्राप्त नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 60, Hmm No : 172)

PREVIEW

## *46 संस्कृती महिला बचत गट यांना देण्यात आलेल्या दैनिक साफसफाई च्या देयकाबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 4**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 430438.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 430438.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 269000.00/-

संस्कृती महिला बचत गट अमरावती यांचे दैनिक साफ-सफाईचे निवडक देयकांच्या तपासणीत खालील अनियमितता आढळून आलेली आहे.

१ कामगार कामावर गैरहजर कालावधीचे करारनामा अट क्रमांक १५ नुसार दंडात्मक रक्कम रु २६४०००/-

देयकातून कपात करण्यात आलेली नाही. त्यामुळे रक्कम रु २६४०००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.
२ करारनाम्यातील अट क्रमांक ५६ प्रमाणे ज्या दिवशी एकही कामगार कामावर उपस्थित राहणार नाही.त्या दिवशी गैरहजर कामगार कपाती व्यतिरिक्त रु ५०००/- प्रतिदिवस अतिरिक्त दंड आकारण्याची तरतूद आहे. असतांना देयकातून १ दिवसाचे अतिरिक्त दंड ५,०००/- वसूल करण्यात आलेला नाही. त्यामुळे रक्कम रु ५,०००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.
३. करारनाम्यातील अट क्रमांक १५ नुसार कंत्राटदाराने कामगाराचे ई.पी.एफ. भरल्याची पावती, ई.एस.आय.सी.प्रत्येक महिन्यात नियमितपणे द्यावीच लागेल व भरल्याची चालन नियमित प्रतिमाह सादर करावी लागेल.त्याशिवाय देयक अदा करण्यात येणारा नाही. अशी अट नमूद असतांना लेखा विभागाने अटीचे काटेकोर पालन न करता देयके पारित केलेले आहे.
४ . करारनाम्यातील अट क्रमांक ५१ नुसार कंत्राटदाराला कामगाराचे महावारी वेतन हे राष्ट्रीयकृत बँकेत अदा करावे लागेल.कामगाराच्या बँक खात्यात वेतन अदा झाल्याचा पुरावा जोडल्यानंतरच महानगरपालिका अमरावती तर्फे पुढील देयक अदा करण्यात येईल. अशी अट नमूद असतांना लेखा विभागाने अटीचे काटेकोर पालन न करता देयके पारित केलेले आहे.

PREVIEW

अमरावती शहरातील विविध भागातील दैनिक साफ-सफाई बाबत महानगरपालिकेने कंत्राट विविध कंत्राटदाराला दिलेले आहे. त्यापैकी संस्कृती महिला बचत गट यांचे निवडक देयकांच्या तपासणीत खालील अनियमितता आढळून आलेली आहे.
प्रभाग क्रमांक ३७ जेवडनगर येथील दैनिक कचरा संकलन करण्याकरिता ठराव क्रमांक ७३ दिनांक ३०/०८/२०१४ आदेश क्रमांक ९९८ दिनांक ३०/०८/२०१४ नुसार संस्कृती महिला बचत गट अमरावती यांना काम देण्यात आले आहे. निवडक देयकांची तपासणी केली असता देयकानिहाय खालील अनियमितता निदर्शनास आलेली आहे.
१. प्र.क्र. ५०६३ दिनांक १२-०८-२०१५ रक्कम २१९२१९/- माहे ऑक्टो-१४ चे दैनिक कचरा संकलन
२. प्र.क्र. ५०६४ दिनांक १२-०८-२०१५ रक्कम २११२१९/- माहे नोव्हे-१४ चे दैनिक कचरा संकलन

१ माहे ऑक्टो-१४ च्या देयकातील कामगाराचे हजरीपत्रक तपासले असता, दिनांक १९/१०/२०१४ ते ३०/१०/२०१४ या कालावधीत कामावर १२ कामगार गैरहजर असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे करारनाम्यातील अट क्रमांक १० नुसार कामगार कामावर गैरहजर असल्यास प्रतिदिनी प्रती व्यक्ती ५००/- प्रमाणे १२ कामगार*१२ दिवस प्रमाणे रक्कम रु ७२०००/- दंडाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे. परंतु देयकातून दंडाची रक्कम रु ७२०००/- वसूल करण्यात आले नसल्यामुळे करारनाम्यातील अटीप्रमाणे रक्कम रु ७२०००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

करारनाम्यातील अट क्रमांक ५६ प्रमाणे ज्या दिवशी एकही कामगार उपस्थित राहणार नाही.त्या दिवशी वरील प्रमाणे गैरहजर कामगार कपाती व्यतिरिक्त रु ५०००/- प्रतिदिवस अतिरिक्त दंड आकारण्याची तरतूद आहे.

त्यानुसार दिनांक ३१/१०/२०१४ रोजी कामावर एकही कामगार हजर नव्हता त्यामुळे २४ कामगार*५००/-*१ दिवस प्रमाणे १२०००/- व अतिरिक्त दंडाची रक्कम रु ५०००/- असे एकूण रक्कम रु १७०००/- वसूल होणे आवश्यक आहे.

२ माहे नोव्हे-१४ च्या देयकातील कामगाराचे हजरीपत्रक तपासले असता, संपूर्ण महिना म्हणजे दिनांक ०१/११/२०१४ ते ३०/११/२०१४ या कालावधीत कामावर १२ कामगार गैरहजर असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे करारनाम्यातील अट क्रमांक १० नुसार कामगार कामावर गैरहजर असल्यास प्रतिदिनी प्रती व्यक्ती ५००/- प्रमाणे १२ कामगार*३० दिवस प्रमाणे रक्कम रु १८००००/- दंडाची रक्कम वसूल होणे आवश्यक आहे. परंतु देयकातून दंडाची रक्कम रु १८००००/- वसूल करण्यात आले नसल्यामुळे करारनाम्यातील अटीप्रमाणे रक्कम रु १८००००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

३. करारनाम्यातील अट क्रमांक १५ नुसार कंत्राटदाराने कामगाराचे ई.पी.एफ. भरल्याची पावती, ई.एस.आय.सी.प्रत्येक महिन्यात नियमितपणे द्यावीच लागेल व भरल्याची चालन नियमित प्रतिमाह सादर करावी लागेल.त्याशिवाय देयक अदा करण्यात येणारा नाही. अशी अट नमूद असतांना लेखा विभागाने अटीचे काटेकोर पालन न करता देयके पारित केलेले आहे.

४. करारनाम्यातील अट क्रमांक ५१ नुसार कंत्राटदाराला कामगाराचे महावारी वेतन हे राष्ट्रीयकृत बँकेत अदा करावे लागेल.कामगाराच्या बँक खात्यात वेतन अदा झाल्याचा पुरावा जोडल्यानंतरच महानगरपालिका अमरावती तर्फे पुढील देयक अदा करण्यात येईल. अशी अट नमूद असतांना लेखा विभागाने अटीचे काटेकोर पालन न करता देयके पारित केलेले आहे

उपरोक्त बाबीची पूर्तता होईपर्यंत संस्कृती महिला बचत गट अमरावती यांना वरील देयकानुसार प्रदान करण्यात आलेली रक्कम रु ४३०४३८/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे. तसेच रक्कम रु २६९०००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक १४६, दिनांक २५/०९/२०२० निर्गमित करण्यात आले असून प्राप्त खुलासा संयुक्तिक नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 61, Hmm No : 146)

## *47 कमी परवाना शुल्क वसूल केल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 1**

PREVIEW

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 30200.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 30200.00/-

१ सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक १७ दिनांक २०.०२.२०१३ अन्वये मंगल कार्यालयाचे नवीन/नूतनीकरण परवाना शुल्क रक्कम रु १५,०००/- निश्चित केलेली असतांना, बाजार व परवाना विभागाने सन २०१५-२०१६ मध्ये मंगल कार्यालयाकडून रक्कम रु १३,०००/- परवाना शुल्क वसूल केलेला आहे. तरी निवडक महिन्याच्या तपासणीत कमी वसूल करण्यात आलेला परवाना शुल्क रक्कम रु २६०००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.
२ काही प्रकरणात नवीन परवाना देतांना कमी परवाना शुल्क वसूल करण्यात आला आहे. तरी कमी वसूल करण्यात आलेला परवाना शुल्क रक्कम रु ४२००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

बाजार परवाना विभागाकाकडून सन २०१५-२०१६ मध्ये रक्कम रु ३२८७३४०/- परवाना शुल्क वसूल करण्यात आला आहे. परवाना शुल्क वसुलीबाबत निवडक महिन्याचे पावती पुस्तके तपासले असता, खालील बाब निदर्शनास आलेली आहे.

१ सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक १७ दिनांक २०.०२.२०१३ अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रकारच्या व्यवसायाकरिता परवाना शुल्क दर निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार नमूद ठरावात मंगल कार्यालयाचे नवीन/नूतनीकरण परवाना शुल्क रक्कम रु १५,०००/- निश्चित केलेली असतांना बाजार व परवाना विभागाने सन २०१५-२०१६ मध्ये मंगल कार्यालयाकडून रक्कम रु १३,०००/- परवाना शुल्क वसूल केलेला आहे. तरी खालील यादीप्रमाणे कमी वसूल करण्यात आलेला परवाना शुल्क रक्कम रु २६०००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

| पावती बुक/पा.क्र. | दिनांक | रक्कम | तपशील | कमी जमा |
|---|---|---|---|---|
| ११०९/२२ | ३०-१२-२०१५ | १३०००/- | श्री.साईप्रस्त मंगल कार्यालय | २०००/- |
| ११०९/६८ | १५-०१-२०१६ | १३०००/- | बापुरावजी कोल्हटकर मंगल कार्यालय | २०००/- |
| ११००/४१ | २०/१०/२०१५ | १३०००/- | रुदेश मंगल कार्यालय | २०००/- |
| ११००/७६ | ५/११/२०१५ | १३०००/- | बालाजी मंगल कार्यालय सुरेश चंदेल | २०००/- |
| ११००/७९ | ६/११/२०१५ | १३०००/- | विनय विला मॅरेज हॉल | २०००/- |
| ११०२/८३ | १८-११-२०१५ | १३०००/- | शहनाई मंगलम | २०००/- |

PREVIEW

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११०४/२२ | २/१२/२०१५ | १३०००/- | स्वयंवर मंगल कार्यालय | २०००/- |
| ११०४/३० | ०४/१२/२०१५ | १३०००/- | दिपार्चन मंगल कार्यालय | २०००/- |
| ११०९/९१ | २१/०१/२०१६ | १३०००/- | जाधव पॅलेस मंगल कार्यालय | २०००/- |
| ११११/५६ | ११/०२/२०१६ | १३०००/- | कमल प्लाझा मंगल कार्यालय | २०००/- |
| १११६/३६ | ०३/०३/२०१६ | १३०००/- | अनिल श्रीधरराव जवादे जवादे मंगल कार्यालय | २०००/- |
| १११६/५५ | ०९/०३/२०१६ | १३०००/- | मनोर मांगल्य मंगल कार्यालय | २०००/- |
| १११९/६ | १९/०३/२०१६ | १३०००/- | गणेश वसंतराव बहाडे यांचे मंगल कार्यालय | २०००/- |
| | | | | **२६०००/-** |

२ तसेच खालील प्रकरणात नवीन परवाना देतांना कमी परवाना शुल्क वसूल करण्यात आला आहे. तरी कमी वसूल करण्यात आलेला परवाना शुल्क रक्कम रु ४२००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

अ.  पावती क्रमांक ११११/५० दिनांक ८/२/२०१६ रक्कम २८७००/- गिरीजा शंकर जयस्वाल वाईन शॉप सन १९८२-२०१६ चे नवीन नोंदणी परवाना शुल्क

१९८२ ते २०१३ ३१ वर्ष ५००/- प्रमाणे १५५००/-

२०१३ ते २०१६ ३ वर्ष ५०००/- प्रमाणे १५०००/-

रक्कम रु ३०५००/- भरणा करणे आवश्यक आहे. कमी भरणा केलेली रक्कम रु १८००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

ब. तसेच पावती क्रमांक ११११/८२ दिनांक २३/२/२०१६ रक्कम २७६००/- कृष्ण मनोहर बाबूलाल जयस्वाल वाईन शॉप सन १९८३-२०१६ चे नवीन नोंदणी परवाना शुल्क

१९८३ ते २०१३ ३० वर्ष ५००/- प्रमाणे १५०००/-

२०१३ ते २०१६ ३ वर्ष ५०००/- प्रमाणे १५०००/-

रक्कम रु ३००००/- भरणा करणे आवश्यक आहे. कमी भरणा केलेली रक्कम रु २४००/- वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक १५४ दिनांक ०१/१०/२०२०  देण्यात आले आहे. खुलासा अप्राप्त झाल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 64, Hmm No : 154)

PREVIEW

## *48 करवसुली पावतीपुस्तकाद्‌वारे केलेल्या करवसुलीतील अनियमितता बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 8**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 5.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 5.00/-

| |
|---|
| सादर केलेल्या पावतीपुस्तकांचे संदर्भात चालान रजीष्टर दर्शवले नाही, बेरजेत चुक करुन कमी रक्कम जमा केली आहे, पावती पुस्तकांतील रकमा व खाडाखोड/उपरीलेखन केल्यामुळे कमी रक्कम जमा व विलंबाने रक्कम जमा केल्याची शक्यता आहे, करवसुलीबाबत यापुर्वी करण्यात आलेल्या तपासण्यांचे अहवाल सादर केले नाही, भरणा रजीष्टर, करवसुलीच्या रकमा ज्या बँक खात्यात भरणा केल्या त्या बँक खात्यांचा तपशील / स्टेटमेंट, कर निर्धारण तसेच सन 2015-2016 मधील मागणी वसुली व थकबाकीची माहिती सादर केली नाही. |

महानगरपालीका अमरावतीचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात बाजार व परवाना विभागाकडुन सादर करण्यात आलेल्या पावतीपुस्तकांची तपासणी केली असता त्यात खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या आहेत.

1. लेखापरीक्षणात सादर पावतीपुस्तकांची तपासणी केली असता पावतीपुस्तक क्रमांक 11070 (पावती क्रमांक 98 ते 100) व 11771 (पावती क्रमांक 01 ते 21) द्‌वारे वसुल करण्यात आलेली रकमेचे चालान रजीष्टर दर्शवले नाही त्यामुळे सदरील रकमा महानगरपालीका निधीत भरणा झाल्याची पडताळणी करता आली नाही.

2. पावती क्रमांक 1106987 दि.19.03.2016 ची तपासणी केली असता सदरील पावतीवरील रकमांची बेरीज रु.2629/- येत असताना प्रत्यक्षात भरणा रजीष्टरला रु.2624/- भरणा केले आहेत त्यामुळे रु.5/- कमी जमा झाले आहेत सदरील कमी जमा रक्कम संबंधीताकडुन वसुल करुन महानगरपालीका खात्यात भरणा करणे आवश्यक आहे.

3. लेखापरीक्षणात सादर पावतीपुस्तकांची तपासणी केली असता पावतीपुस्तक क्रमांक 11066 मधील पावती क्रमांक 1106509 दि.18.01.2016 नंतर पावती क्रमांक 1106510 द्‌वारे दि.30.03.16 पासुन तारखा दिसत आहेत परंतू पावती क्रमांक 1106510 ते 1106530 च्या तारखांमध्ये उपरीलेखन/ खाडाखोड केलेले आहे त्यामुळे सदरील पावत्यांद्‌वारे वसुल करण्यात आलेली रक्कम दि.30.03.2016 पुर्वी वसुल केली आहे परंतु विलंबाने भरणा केल्यामुळे तारखांमध्ये खाडाखोड केल्याचे दिसते याबाबत खुलासा करुन संबंधीतावर योग्य ती कार्यवाही करुन दर्शवणे आवश्यक आहे.

4. पावती क्रमांक 1106524 दि.30.03.2016 च्या रकमेतही उपरीलेखन/खाडाखोड केल्यामुळे प्रत्यक्ष वसुल रकमेपेक्षा कमी भरणा केल्याची शक्यता नाकारता येत नाही याबाबत खात्री पटवणे आवश्यक आहे.

PREVIEW

5. लेखापरीक्षणात सादर केलेल्या पावती पुस्तक क्रमांक 10595 ची तपासणी केली असता सदरील पावती पुस्तक तपासणी केल्याबाबत स्वाक्षरी आढळून आली आहे तथापी सदरील पावतीपुस्तकातील पावत्यांची ज्या भरणा रजीष्टर व चालान बुकवर नोंद करण्यात आली आहे ते तपासल्याबाबत शेरे अथवा स्वाक्ष-या आढळून आल्या नाहीत याबाबत खुलासा करावा व तसेच यापुर्वी करवसुलीबाबत झालेल्या तपासण्यांचे अहवाल सादर करावे.

6. पावतीपुस्तक साठा नोंदवहीप्रमाणे श्री.ठाकरे व रामटेके यांना अनुक्रमे पावतीपुस्तक क्रमांक 11068 व 10594 वितरीत केल्याचे दिसुन आले तथापी पावतीपुस्तक क्रमांक 11068 चे बाबतीत भरणा रजीष्टर व चालान बुक दर्शवले नाही तसेच पावतीपुस्तक क्रमांक 10594 दर्शवले नाही.

7. लेखापरीक्षणात पावतीपुस्तके, भरणा रजीष्टर, चालान रजीष्टर, रोखपाल रोखवही, पावतीपुस्तकांद्वारे वसुल करण्यात आलेल्या रकमा ज्या बँक खात्यात भरणा करण्यात आल्या आहेत त्या बँक खात्यांचा तपशील व बँक स्टेटमेंट, सदरील पावतीपुस्तकांद्वारे ज्या मालमत्ता, गाळे, जागांची करवसुली करण्यात आली त्या जागांचे ठरविण्यात आलेल्या कर निर्धारणाची संचीका, ठराव, करआकारणी व मागणी नोंदवही ई. अभिलेख्यांची मागणी करुनही तसेच करआकारणी वर्ष व सन 2015-2016 अखेर संबंधीत थकीत, चालू व एकुण मागणी व वसुलीची माहिती दोन दिवसात सादर करण्याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 163 दि.12.10.2020 द्वारे कळवूनही अभिलेखे व माहिती सादर केली नाही.

8. सदर अनियमिततांबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 186 दि.29.10.2020 अन्वये कळवूनही कोणताही खुलासा तसेच अभिलेखे सादर न केल्यास महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 (सुधारीत 2011) चे कलम 8 नुसार रु.25000/- पर्यंत दंडाची तरतुद असल्याबाबत कळवूनही काहीही कार्यवाही न झाल्यामुळे संबंधीतांवर दंडात्मक कार्यवाही होणे आवश्यक आहे.

DATVPWM6902 (Ref No : 72, Hmm No : 186)

PREVIEW

## *49 सर्वसाधारण पावतीपुस्तकांद्वारे करण्यात आलेल्या वसुलीतील अनियमितताबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 07**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 3248.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3048.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 200.00/-

करवसुलीबाबत यापुर्वी करण्यात आलेल्या तपासण्यांचे अहवाल सादर केले नाही, विलंबाने रकमा जमा केली

आहे, कमी रक्कम जमा केली आहे, भरणा रजीष्टर व चालान बुक दर्शवले नाही, पावती पुस्तके व त्यासंबंधीत अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केली नाहीत, सर्वसाधारण पावतीपुस्तादवारे केलेल्या करवसुलीच्या रकमा ज्या बँक खात्यात भरणा केल्या त्या बँक खात्यांचा तपशील / स्टेटमेंट, तसेच गाळे, शॉपींग कॉम्पलेक्स, जागा ई. गाळा/जागा धारकांच्या नाव, गाळे क्रमांक, वाटप करण्यात आलेला दिनांक, करआकारणी वर्ष व सन 2015-2016 अखेर संबंधीत थकीत, चालू व एकुण मागणी व वसुलीची माहिती सादर केली नाही.

महानगरपालीका अमरावतीचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात बाजार व परवाना विभागाकडुन सादर करण्यात आलेल्या सर्वसाधारण पावतीपुस्तकाद्वारे करण्यात आलेल्या वसुलीची तपासणी केली असता त्यात खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या आहेत.

1. लेखापरीक्षणात सादर केलेल्या पावती पुस्तक क्रमांक 985 व 1117 ची तपासणी केली असता सदरील पावती पुस्तक तपासणी केल्याबाबत स्वाक्षरी आढळून आली नाही तथापी सदरील पावतीपुस्तकातील पावत्यांची ज्या भरणा रजीष्टर व चालान बुकवर नोंद करण्यात आली आहे ते तपासल्याबाबत शेरे व स्वाक्ष-या आढळून आल्या आहेत तसेच पावतीपुस्तक क्रमांक 1113 चे भरणा रजीष्टरवर तपासणीच्या खुणा आहेत परंतु स्वाक्षरी आढळून आली नाही याबाबत खुलासा करावा व तसेच यापुर्वी करवसुलीबाबत झालेल्या तपासण्यांचे अहवाल सादर करावे.

2. लेखापरीक्षणात सादर केलेल्या पावतीपुस्तक क्रमांक 1113 ची तपासणी केली असता पावती क्र.01 दि.14.01.2016 द्वारे वसुल करण्यात आलेली रक्कम रु.3048/- हि रोखपालाकडे दि.15.02.2016 रोजी विलंबाने भरणा केल्याचे दिसुन आले आहे याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3. लेखापरीक्षण पावतीपुस्तक क्रमांक 1113 ची तपासणी केली असता पावती क्रमांक 90 दि.31.03.2016 अन्वये रक्कम रु.2868/- वसुल केल्याचे दिसते परंतु प्रत्यक्षात भरणा रजीष्टरवर रु.2668/- जमा केले आहेत त्यामुळे रु.200/- कमी जमा केल्याचे दिसुन येते याबाबत खुलासा करुन सदरील रक्कम महानगरपालीका निधीत भरणा करुन दर्शवावे. तसेच सदरील पावतीपुस्तकातील पावत्यांच्या दिनांकामध्ये उपरीलेखन/खाडाखोड केल्याचे दिसुन येते याबाबत खुलासा करुन यात कोणतीही अनियमितता झाली नसल्याबाबत खात्री पटवणे आवश्यक आहे.

4. लेखापरीक्षणात पावतीपुस्तक क्रमांक 1103,1110,1115,1108,1114,1107,1113,1105 सादर केली तथापी सदरील पावतीपुस्तकांतील पावत्यांद्वारे वसुल करण्यात आलेली रक्कम ज्या भरणा रजीष्टर व चालान बुक मध्ये नोंदवली आहे ती भरणा रजीष्टर व चालान बुक लेखापरीक्षणास सादर केले नाही.

5. लेखापरीक्षणात अर्धसमासपत्र क्रमांक 163 दि.12.10.2020 अन्वये मागणी करुनही पावतीपुस्तक क्रमांक 1293, 1294 व त्यासंबंधीचे अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केले नाही.

6. लेखापरीक्षणात सादर केलेल्या पावतीपुस्तकांची तपासणी केली असता सदरील पावतीपुस्तकांद्वारे विविध बाजार ओटे, संकुल, मार्केटमधील गाळे, माहिती अधिकार, जमीन भाडे ची वसुली केल्याची दिसुन येते तथापी त्याबाबत रोखपाल रोखवही, सदरील पावतीपुस्तकांद्वारे वसुल करण्यात आलेल्या रकमा ज्या बँक खात्यात

PREVIEW

भरणा करण्यात आल्या आहेत त्या बँक खात्यांचा तपशील व बँक स्टेटमेंट, सदरील पावतीपुस्तकांद्वारे ज्या मालमत्ता, गाळे, जागांची करवसुली करण्यात आली त्या जागांचे ठरविण्यात आलेल्या कर निर्धारणाची संचीका, ठराव, करआकारणी व मागणी नोंदवही, अभिकर्ता द्वारा करवसुली असेल तर त्यासंबंधीची संचीका ई. अभिलेखे तसेच महानगरपालीका अमरावतीचे मालकीचे असलेल्या गाळे, शॉपींग कॉम्पलेक्स, जागा ई. गाळा/जागा धारकांच्या नाव, गाळे क्रमांक, वाटप करण्यात आलेला दिनांक, करआकारणी वर्ष व सन 2015-2016 अखेर संबंधीत थकीत, चालू व एकुण मागणी व वसुलीची माहिती दोन दिवसात सादर करण्याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 163 दि.12.10.2020 द्वारे कळवूनही अद्याप संबंधीत अभिलेखे व माहिती सादर केलेली नाही.

7. सदर अनियमिततांबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 187 दि.29.10.2020 अन्वये कळवूनही कोणताही खुलासा तसेच अभिलेखे सादर न केल्यास महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 (सुधारीत 2011) चे कलम 8 नुसार रु.25000/- पर्यंत दंडाची तरतुद असल्याबाबत कळवूनही काहीही कार्यवाही न झाल्यामुळे संबंधीतांवर दंडात्मक कार्यवाही होणे आवश्यक आहे.

DATVPWM6902 (Ref No : 73, Hmm No : 187)

PREVIEW

## *50 चिल्लर वसुली कंत्राटबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 1**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 179222.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 179222.00/-

सन २०१५-२०१६ मध्ये चिल्लर वसुली कंत्राटदार कृष्णा विश्रामजी गावंडे यांच्याकडून जानेवारी २०१६ अखेर पर्यंत रक्कम रु १२,२२,२२२/- प्राप्त होणे आपेक्षित असतांना मार्च-२०१६ पर्यंत श्री कृष्णा गावंडे यांनी रक्कम रु १०,४३,०००/- भरणा केलेला आहे. तरी करारनाम्यातील अटीनुसार जानेवारी २०१६ अखेर पर्यंतची थकीत रक्कम रु १७९२२२/- कंत्राटदार श्री. कृष्णा गावंडे यांच्याकडून वसूल करण्यात यावे.

अमरावती महानगरपालिका बाजार व परवाना विभागाचे सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाचे जमा बाजूचे लेखापरीक्षणात महानगरपालिकेने स्थायी समिती ठराव क्रमांक १९२ दिनांक १९.१२.२०१३ अन्वये

महानगरपालिका क्षेत्रातील चिल्लर वसुली कंत्राट कृष्णा विश्रामजी गावंडे यांना दिनांक ०७/०१/२०१४ ते ०६/०१/२०१७ या कालावधीसाठी देण्यात आला आहे. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे कंत्राटदाराची ऑफर मुल्य रक्कम रु ११,११,१११/- असून करारनाम्यातील अट क्रमांक २ नुसार ऑफर मुल्यात दर वर्षी १०% नैसर्गिक वाढ अनुज्ञेय राहील, त्यानुसार सन २०१५-२०१६ मध्ये जानेवारी २०१६ अखेर पर्यंत कृष्णा विश्रामजी गावंडे यांच्याकडून रक्कम रु १२,२२,२२२/- प्राप्त होणे आपेक्षित असतांना मार्च-२०१६ पर्यंत श्री कृष्णा गावंडे यांनी रक्कम रु १०,४३,०००/- भरणा केलेला आहे. तरी करारनाम्यातील अटीनुसार जानेवारी-२०१६ अखेर पर्यंतची थकीत रक्कम रु १७९२२२/- कंत्राटदार श्री. कृष्णा गावंडे यांच्याकडून वसूल करण्यात यावे. भरणा केलेल्या रक्कमेचा तपशील खालील प्रमाणे

| पावती बुक/पावती क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| ८७८०६/ | ०८२०१५-०१- | २५०००० |
| ९५१२७/ | १६२०१५-०३- | ८०००० |
| ९६७२५/ | ०८२०१५-०५- | ६५००० |
| ९६७४८/ | ०२२०१५-०६- | १,००,००० |
| ९६७९१/ | ३०२०१५-०७- | ५०,००० |
| ९८५०६/ | २४२०१५-०९- | ७०,००० |
| ९८५१२/ | २८२०१५-१०- | ७०,००० |
| ९८५१८/ | २६२०१५-११- | ७०,००० |
| ९८५२५/ | ०३२०१५-१२- | १,९०,००० |
| ९८५६३/ | १३२०१६-०१- | ५०,००० |
| १११७३६/ | २३२०१६-०३- | ४८००० |
| | प्राप्त रक्कम रु | **१०,४३,०००/-** |

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक १५१ दिनांक ०१/१०/२०२० देण्यात आले आहे. खुलासा अप्राप्त झाल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSGCF7501 (Ref No : 106, Hmm No : 151)

## *51 मनपा अमरावती विद्युत विभागाने सन 2015-2016 या आर्थिक वर्षामध्ये वीज वितरण कंपनीची देयके अदा करताना वीज शुल्कासह अदा केल्यामुळे झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत.*

**विद्युत विभाग**



PREVIEW

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 99008.11 /-

वसूलपात्र रक्कम रु. 99008.11/-

| |
|---|
| मुंबई इलेक्ट्रीसिटी ड्युटी ॲक्ट 1958 मधील कलम 3(2) ja नुसार शासकीय निमशासकीय कार्यालयांना विद्युत शुल्कातून सुट देण्यात आलेली आहे. अमरावती मनपाने सन 2015-2016 या वित्तीय वर्षात वीज देयके वीज शुल्कासह अदा केल्याने महानगरपालिकेचे रू. 99008.11 नुकसान झाले आहे |

PREVIEW

मनपा अमरावती सन 2015-2016 या आर्थिक वर्षात विद्युत विभागाकडील काही निवडक वीज देयके पडताळणी केली असता, वीज देयके वीज शुल्कासह अदा केली आहेत. त्यामुळे अनियमितता झालेली आहे.

| प्रमाणक क्रमांक 15211 दिनांक 18/3/16 रू 38990 , पाणी पुरवठा विभाग | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | वीज मीटर क्रमाक | कालावधी | वीज बिल देयकाची रक्कम | भरणा केलेले वीज शुल्क |
| 1 | 36647195377 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 24370 | 292.46 |
| 2 | 366557135957 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 2940 | 133.47 |
| प्रमाणक क्रमांक 15212 दिनांक 18/3/16 रू 168350 ,पा पाणी पुरवठा विभाग | | | | |
| अ.क्र | वीज मीटर क्रमाक | कालावधी | वीज बिल देयकाची रक्कम | भरणा केलेले वीज शुल्क |
| 1 | 366474022395 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 2090 | 91.50 |
| 2 | 366472091616 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 21220 | 943.02 |
| 3 | 366471097637 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 11920 | 433.31 |
| 4 | 366470728421 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 30690 | 1695.67 |
| 5 | 366471617606 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 6080 | 287.22 |
| 6 | 366470982416 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 3555 | 153.52 |
| 7 | 36641617550 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 17360 | 764.89 |
| 8 | 366471099681 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 2840 | 48.23 |
| 9 | 366471617568 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 6790 | 326.17 |
| 10 | 366470019012 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 11870 | 195.63 |
| 11 | 366473721079 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 15790 | 701.75 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 12 | 366470442748 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 17300 | 1139.69 |
| प्रमाणक क्रमांक 15213 दिनांक 18/3/16 रू 153८५ पा पाणी पुरवठा विभाग | | | | |
| अ.क्र | वीज मीटर क्रमाक | कालावधी | वीज बिल देयकाची रक्कम | भरणा केलेले वीज शुल्क |
| 1 | 366477122218 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 14900 | 244.81 |
| 2 | 366478408832 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 4550 | 232.95 |
| प्रमाणक क्रमांक 15214 दिनांक 18/3/16 रू 44350 पाणी पुरवठा विभाग | | | | |
| अ.क्र | वीज मीटर क्रमाक | कालावधी | वीज बिल देयकाची रक्कम | भरणा केलेले वीज शुल्क |
| 1 | 366470925480 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 10510 | 330.43 |
| 2 | 366471617576 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 8650 | 323.57 |
| 3 | 366471030401 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 3940 | 89.83 |
| **प्रमाणक क्रमांक 15393 दिनांक 23/3/16 रू 182740 पाणी पुरवठा विभाग** | | | | |
| अ.क्र | वीज मीटर क्रमाक | कालावधी | वीज बिल देयकाची रक्कम | भरणा केलेले वीज शुल्क |
| 1 | 366474022395 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 2010 | 98.39 |
| 2 | 366471097637 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 12280 | 717.67 |
| 3 | 366470728421 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 30070 | 1642.23 |
| 4 | 366471617606 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 5570 | 255.97 |
| 5 | 366470982416 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 3450 | 18.8.53 |
| 6 | 366471617550 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 17160 | 767.42 |
| 7 | 366471617568 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 5900 | 181.04 |
| 8 | 366463721079 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 15590 | 686.04 |
| 9 | 366471617576 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 10970 | 329.39 |
| 10 | 366470442728 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 24530 | 1115.81 |
| **प्रमाणक क्रमांक 15390 दिनांक 23/3/16 रू 144790 पाणी पुरवठा विभाग** | | | | |
| अ.क्र | वीज मीटर क्रमाक | कालावधी | वीज बिल देयकाची रक्कम | भरणा केलेले वीज शुल्क |
| 1 | 366470299937 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 1090 | 34.60 |
| 2 | 366470382885 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 5350 | 317.03 |
| 3 | 366473014836 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 4080 | 152.32 |

PREVIEW

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | 366471098846 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 2660 | 137.34 |
| 5 | 366473710034 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 20770 | 916.85 |
| 6 | 366473710026 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 9580 | 403.99 |
| 7 | 366471099095 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 17290 | 767.42 |
| 8 | 366473710018 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 880 | 42.51 |
| 9 | 366470982424 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 17160 | 767.42 |
| 10 | 366473221823 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 8620 | 441.83 |
| 11 | 366473221831 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 2160 | 109.87 |
| 12 | 366471090748 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 27360 | 1494.59 |
| 13 | 366471617819 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 3770 | 757.67 |
| **प्रमाणक क्रमांक 15209 दिनांक 18/3/16 रू 75400 पाणी पुरवठा विभाग** | | | | |
| अ.क्र | वीज मीटर क्रमाक | कालावधी | वीज बिल देयकाची रक्कम | भरणा केलेले वीज शुल्क |
| 1 | 366472099129 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 8550 | 349.33 |
| 2 | 366471618874 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 11690 | 774.74 |
| 3 | 366473717659 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 21920 | 979.52 |
| 4 | 366471991826 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 13560 | 1116.70 |
| 5 | 366471992318 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 17360 | 774.74 |
| **प्रमाणक क्रमांक 15210 दिनांक 18/3/16 रू 152490 पाणी पुरवठा विभाग** | | | | |
| अ.क्र | वीज मीटर क्रमाक | कालावधी | वीज बिल देयकाची रक्कम | भरणा केलेले वीज शुल्क |
| 1 | 366470299937 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 1030 | 109.38 |
| 2 | 366470382885 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 5050 | 262.49 |
| 3 | 366473014836 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 4560 | 160.01 |
| 4 | 366471098846 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 3320 | 132.75 |
| 5 | 366473710034 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 20950 | 936.94 |
| 6 | 366473710026 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 9640 | 404.68 |
| 7 | 366471099095 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 17430 | 774..74 |
| 8 | 366470982424 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 17250 | 764.80 |
| 9 | 366473221823 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 7210 | 272.94 |
| 10 | 366473221831 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 2340 | 93.80 |

PREVIEW

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 11 | 366473221815 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 1620 | 128.00 |
| 12 | 366473221815 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 19180 | 1551.25 |
| 13 | 366471617819 | डिसेंबर 15 जानेवारी 16 | 10670 | 774.74 |
| 14 | 366470292223 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 33860 | 3051.60 |
| **प्रमाणक क्रमांक 12530 दिनांक 20/1 /16 रू 75900 /- प्रकाश विभाग** | | | | |
| अ.क्र | वीज मीटर क्रमाक | कालावधी | वीज बिल देयकाची रक्कम | भरणा केलेले वीज शुल्क |
| 1 | 366470970493 | नोव्हेंबर 15डिसेंबर 15 | 7980 | 583.81 |
| 2 | 366478311685 | नोव्हेंबर 15डिसेंबर 15 | 5490 | 719.78 |
| 3 | 366470032370 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 5040 | 693.64 |
| 4 | 366474008121 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 2200 | 62.55 |
| 5 | 366471500725 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 34590 | 4751.54 |
| **प्रमाणक क्रमांक 12531दिनांक 20/1/16 रू 331370 /- प्रकाश विभाग** | | | | |
| अ.क्र | वीज मीटर क्रमाक | कालावधी | वीज बिल देयकाची रक्कम | भरणा केलेले वीज शुल्क |
| 1 | 366471707125 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 13350 | 2203.08 |
| 2 | 366470034917 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 20990 | 3483.86 |
| 3 | 366470461904 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 4780 | 629.23 |
| 4 | 366470920925 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 30870 | 5130.58 |
| 5 | 366470363155 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 46120 | 2220.33 |
| 6 | 366470926940 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 140440 | 23784.81 |
| 7 | 366472024846 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 11760 | 4447.00 |
| 8 | 366471285786 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 1060 | 142. 39 |
| 9 | 366471990471 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 970 | 163.03 |
| 10 | 366470236811 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 11580 | 1956.07 |
| 11 | 366470299562 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 2180 | 442.01 |
| **प्रमाणक क्रमांक 12533दिनांक 20/1/16 रू 44730/- प्रकाश विभाग** | | | | |
| अ.क्र | वीज मीटर क्रमाक | कालावधी | वीज बिल देयकाची रक्कम | भरणा केलेले वीज शुल्क |
| 1 | 366471234049 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 4430 | 382.54 |
| 2 | 366471952251 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 1800 | 298.80 |

PREVIEW

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | 366471941250 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 9560 | 810.23 |
| 4 | 366471247892 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 1890 | 134.60 |
| **प्रमाणक क्रमांक 12534 दिनांक 20/1/16 रू 54920 - प्रकाश विभाग** | | | | |
| अ.क्र | वीज मीटर क्रमाक | कालावधी | वीज बिल देयकाची रक्कम | भरणा केलेले वीज शुल्क |
| 1 | 366551312300 | नोव्हेंबर डिसेंबर 1515 | 7070 | 1187.28 |
| 2 | 366550055044 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 5650 | 503.43 |
| 3 | 366551310510 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 3750 | 267.23 |
| 4 | 366550018777 | नोव्हेंबर 15 डिसेंबर 15 | 3060 | 260.91 |
| **प्रमाणक क्रमांक 15064 दिनांक 14/3/16 रू 23500 – उद्यान विभाग** | | | | |
| अ.क्र | वीज मीटर क्रमाक | कालावधी | वीज बिल देयकाची रक्कम | भरणा केलेले वीज शुल्क |
| 1 | 366470100995 | डिसेंबर 15 जाने.16 | 3740 | 640.98 |
| **प्रमाणक क्रमांक 15066 दिनांक 14/3/16 रू 15260 – उद्यान विभाग** | | | | |
| अ.क्र | वीज मीटर क्रमाक | कालावधी | वीज बिल देयकाची रक्कम | भरणा केलेले वीज शुल्क |
| 1 | 366471946898 | डिसेंबर 15 जाने.16 | 3140 | 1092.41 |
| 2 | 366478395242 | डिसेंबर 15 जाने.16 | 570 | 94.24 |
| **प्रमाणक क्रमांक 15065 दिनांक 14/3/16 रू 122500 – उद्यान विभाग** | | | | |
| अ.क्र | वीज मीटर क्रमाक | कालावधी | वीज बिल देयकाची रक्कम | भरणा केलेले वीज शुल्क |
| 1 | 366470464342 | डिसेंबर 15 जाने.16 | 4520 | 610.61 |
| 2 | 366470464792 | डिसेंबर 15 जाने.16 | 1180 | 196.66 |
| 3 | 366470264190 | डिसेंबर 15 जाने.16 | 770 | 213.74 |
| 4 | 366470104257 | डिसेंबर 15 जाने.16 | 2190 | 182.08 |
| 5 | 366473004474 | डिसेंबर 15 जाने.16 | 650 | 91.34 |
| **प्रमाणक क्रमांक 15770 दिनांक 30/3/16 रू 19130 – उद्यान विभाग** | | | | |
| अ.क्र | वीज मीटर क्रमाक | कालावधी | वीज बिल देयकाची रक्कम | भरणा केलेले वीज शुल्क |
| 1 | 366478338494 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 19130 | 567.79 |
| **प्रमाणक क्रमांक 15771 दिनांक 303/16 रू 18230– उद्यान विभाग** | | | | |

PREVIEW

| अ.क्र | वीज मीटर क्रमाक | कालावधी | वीज बिल देयकाची रक्कम | भरणा केलेले वीज शुल्क |
|---|---|---|---|---|
| 1 | 366470649253 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 18230 | 103.95 |
| **प्रमाणक क्रमांक 15422 दिनांक 28/3/16 रू.26920 उद्यान विभाग** | | | | |
| अ.क्र | वीज मीटर क्रमाक | कालावधी | वीज बिल देयकाची रक्कम | भरणा केलेले वीज शुल्क |
| 1 | 366470100995 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 3150 | 616.34 |
| 2 | 366470005933 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 8770 | 1170.29 |
| **प्रमाणक क्रमांक 15423 दिनांक 28/3/16 रू.8500 उद्यान विभाग** | | | | |
| अ.क्र | वीज मीटर क्रमाक | कालावधी | वीज बिल देयकाची रक्कम | भरणा केलेले वीज शुल्क |
| 1 | 366470464342 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 2560 | 332.07 |
| 2 | 366470464792 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 1300 | 214.72 |
| 3 | 36647'3165371 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 1630 | 273.40 |
| **प्रमाणक क्रमांक 15424 दिनांक 28/3/16 रू.12 290 उद्यान विभाग** | | | | |
| अ.क्र | वीज मीटर क्रमाक | कालावधी | वीज बिल देयकाची रक्कम | भरणा केलेले वीज शुल्क |
| 1 | 366473165362 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 3280 | 549.63 |
| 2 | 366473165346 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 2480 | 406.70 |
| 3 | 366471916719 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 5810 | 480.21 |
| 4 | 366473165354 | जानेवारी 16 फेब्रुवारी 16 | 5450 | 917.21 |

उपरोक्त दर्शवल्या प्रमाणे विभागाकडून वीज देयके वीज शुल्कासह अदा करण्यात आली आहेत. मुंबई इले. ड्युटी ॲक्ट 1958 मधील कलम 3 (2) ia नुसार शासकीय निमशासकीय कार्यालयांना विद्युत शुल्कातून सूट देण्यात आलेली असतानाही वीज देयके शुल्कासह अदा केल्याने महानगरपालिकेचे रुपये 99008.11 चे नुकसान झाले आहे.

उपरोक्त अनियमितते बाबत विधी विभागास अर्धासामास पत्र क्रमांक 56 दिनांक 11/02/2020 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन सादर केले नाही. त्यामुळे सदरचा परिच्छेद कायम करणेत येत आहे

DATVDKM6401 (Ref No : 86, Hmm No : 56)

PREVIEW

## *52 प्रभाग क्रमांक १६ मध्ये उर्जा बचतीचे दिवे (Energy Efficient fitting) लावून प्रकाश व्यवस्था करणे*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 329649.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 25065.00/-

| |
|---|
| प्रभाग क्रमांक १६ मध्ये उर्जा बचतीचे दिवे (Energy Efficient fitting) लावून प्रकाश व्यवस्था करण्याच्या कामात दर करारात नमूद नसलेल्या बाबीवर रक्कम रु २५०६५/- खर्च करण्यात आला आहे. तरी दर करारात नमूद नसलेल्या बाबीवर करण्यात आलेला खर्च लेखापरीक्षणास मान्य नसून वसूलपात्र ठरविण्यात येत आहे. |

PREVIEW

अमरावती महानगरपालिका विद्युत विभागाने सन २०१५-२०१६ मध्ये शहरातील विद्युत देखभाल दुरुस्तीचे काम दरकरार क्रमांक ३ नुसार मे.ब्राईट इलेक्टीकल वर्क यांना देण्यात आला आहे. तरी मे.ब्राईट इलेक्टीकल वर्क यांनी केलेल्या प्रभाग क्रमांक १६ मधील कामात खालील अनियमितता झालेली आहे.

प्रमाणक क्रमांक ५७४१ दिनांक ०३-०९-२०१५ रक्कम ३२९६४९/-

निधी - वार्ड विकास निधी

प्रशासकीय मंजुरी :- मा.आयुक्त यांचे मंजुरी दिनांक ०३/०१/२०१४

तांत्रिक मंजुरी मुल्य :- ३५०५३०/-

निविदा मंजुरी :- स्थायी समिती ठराव क्रमांक १९० दिनांक ०१/०३/२०१३ दरकरार क्रमांक ३

कंत्राटदाराचे नाव :- मे.ब्राईट इलेक्टीकल वर्क (०.४% कमी अंदाजपत्रकिय दराने)

करारनामा :- ०२/०४/२०१३

कामाचा आदेश :- अ.क्र.३८ ,आदेश क्रमांक ६५/१४ दिनांक २७/०१/२०१४

कामाची मुदत :- २ महिने

काम पूर्ण दिनांक :- २९/०३/२०१४

मोजमाप पुस्तक :- १२८ पान क्रमांक १२७४५ ते १२७४६

मे.ब्राईट इलेक्टीकल वर्क यांच्या सोबत करण्यात आलेला दर करार क्रमांक ३ रक्कम २१७६९५४/- नुसार मा.शहर अभियंता यांनी मे.ब्राईट इलेक्टीकल वर्क यांना कामाचा आदेश क्रमांक १३५/२०१३ दिनांक ०८/०४/२०१३ देण्यात आला आहे. दरकरारात ७२ विविध बाबीचा समावेश आहे.

उपरोक्त नमूद कामाचे मोजमाप पुस्तक तपासले असता, दर करारात नमूद नसलेल्या खालील बाबीवर खर्च करण्यात आला आहे.

बाब क्रमांक १५ -दर करार क्र. २६ S&E G.I. pipe Pole 75/80 mm dia 6 mtr long ----05 each दर ३९९२/- खर्च १९९६०/-

बाब क्रमांक १६ -दर करार क्र. २७ Providing CC foundation for 6 mtr poles ----05 each दर १०२१/- खर्च ५१०५/-

असे एकूण रक्कम रु २५०६५/- दर करारा व्यतिरिक्त बाबीवर खर्च करण्यात आला आहे. तरी दर करारात नमूद नसलेल्या बाबीवर करण्यात आलेला खर्च लेखापरीक्षणास मान्य नसून वसूलपात्र ठरविण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक १७६, दिनांक २०/१०/२०२० निर्गमित करण्यात आले असून, संयुक्तिक अनुपालन प्राप्त नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATSGCF7501 (Ref No : 111, Hmm No : 176)

PREVIEW

## *53 आरोग्य विभागाकडील टँकर क्र.एम.एच. 27 - 5120 साठी होसपाईप खरेदी बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 2**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 132000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 88200.00/-

अमरावती भांडार विभागाने आरोग्य विभागाकडील टँकर क्रमांक एम.एच. 27- 5120 साठी एकाच आर्थिक वर्षात तीन वेळा पाईप खरेदी केला आहे. खरेदी केलेले होसपाईप योग्य त्या दर्जाचे खरेदी केले नसल्याचे दिसून येते. त्यामुळे दुबार खरेदी केलेली पाईपची रक्कम रू 88200/- वसूलपात्र ठरते

अमरावती महानगरपालिका सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात भांडार विभागाने आरोग्य विभागाकडील टँकर क्रमांक एम.एच. 27- 5120 साठी खरेदी केलेल्या होसपाईपच्या देयकाची तपासणी केली असता पुढील प्रमाणे अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास आले.

| अ क्र. | प्रमाणक | दिनांक | पुरवठा दाराचे नाव | तपाशील | रक्कम |
|---|---|---|---|---|---|

| | क्रमांक | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1532 | 18/5/15 | श्रीराम एन्टरप्रायझेस अमरावती | होसपाईप 3 इंच 180 फुट | 44100 |
| 1 | 1440 | 25/2/16 | श्रीराम एन्टरप्रायझेस अमरावती | होसपाईप 3 इंच 180 फुट | 44100 |
| 2 | 6934 | 29/9/15 | श्रीराम एन्टरप्रायझेस अमरावती | होसपाईप 3 इंच 180 फुट | 44100 |
| | | | | एकूण | 132000 |

यावर लेखापरीक्षणाचे पुढील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एकच पाईप, एका आर्थिक वर्षात तीन वेळा खरेदी केला आहे. त्यामुळे खरेदी केलेले होसपाईप योग्य त्या दर्जाचे खरेदी केले नसल्याचे दिसून येते. महापालिकेने तीनदा पाईप खरेदी केले असल्याने दुबार केलेली खरेदीची रक्कम रुपये 88200/- लेखापरीक्षणास मान्य नसून वसूलपात्र ठरत आहे.

2) प्रमाणक क्रमांक 6934 दिनांक 29/52015 नुसार खरेदी केलेल्या पाईपची नोंद साठा नोंदवही वर घेण्यात आली आहे. तथापि सदरचा होसपाईप आरोग्य विभागास दिल्याबाबत संबंधीताची स्वाक्षरी नाही. त्यामुळे पाईप खरेदी केला असल्याबाबत खात्री करता आली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 123 दिनांक 18/09/2020 अन्वये खुलासा /अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन सादर न केल्याने परीच्छेद कायम करण्यात येत आहे..

DATVDKM6401 (Ref No : 89, Hmm No : 123)

PREVIEW

## *54 भांडार विभागाने खरेदी केलेल्या साहित्याच्या देयकातून आयकर कपात न केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 1**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 52010.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 52010.00/-

अमरावती मनपाच्या भांडार विभागाने सन 2015-2016 मध्ये खरेदी केलेल्या साहित्याच्या देयकातून आयकर कपात केला नाही

अमरावती मनपाने सन 2015-2016 या वित्तीय वर्षामध्ये, भांडार विभागाने खरेदी केलेल्या काही निवडक देयकाची पडताळणी केली असता खालील देयकातून आयकर वजा केला नसल्याचे निदर्शास आले आहे.

| अ.क्र. | प्रमाण क्रमांक | दिनांक | खरेदीचा तपशील | रक्कम | आयकर रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| हरिहर प्रिंटर्स अमरावती , धनादेश क्रमांक 529822 29/5/2015 रू.144375 /- | | | | | |
| 1 | 1862 | 29/05/2015 | निविदा पुस्तक B1,B2 | 47500/- | 950 /- |
| 2 | 1863 | 29/05/2015 | आरोग्य विभागाकरिता साहित्य | 48875/- | 978/- |
| 3 | 1664 | 29/05/2015 | आरोग्य विभागाकरिता साहित्य | 48000 | 960/- |
| | | | एकूण | 144375/- | 2888/- |
| हरिहर प्रिंटर्स अमरावती , धनादेश क्रमांक 53391 रू 195375 /- एकूण 4 बिले | | | | | |
| 1 | 2959 | 25/06/2015 | आरोग्य विभागासाठी जन्म/मृत्यू रजिस्टर | 49000/- | 980/- |
| 2 | 2960 | 25/06/2015 | केस पेपर | 49000/- | 980/- |
| 3 | 2961 | 25/06/2015 | नोंदवह्या व फॉर्म छपाई | 49375/- | 988/- |
| 4 | 2962 | 25/06/2015 | नियम संच | 48000/- | 960/- |
| | | | एकूण | 195375 /- | 3908 |
| हरिहर प्रिंटर्स अमरावती , धनादेश क्रमांक 530647 रू 280250 /- एकूण 6 बिले | | | | | |
| 1 | 3973 | 16/07/2015 | स्थानिक संस्था कर | 49500/- | 990/- |
| 2 | 3974 | 16/07/2015 | बांधकाम विभागाकरिता निविदा पुस्तक | 47000/- | 940/- |
| 3 | 3975 | 16/07/2015 | प्रभाग क्रमांक 1ते 5 असेसमेंट फॉर्म | 49500/- | 990/- |
| 4 | 3976 | 16/07/2015 | प्रभाग क्रमांक 1ते 5 दैनदिनी व पगार पत्रक | 48000/- | 960/- |
| 5 | 3977 | 16/07/2015 | बांधकाम विभागाकरिता एम. बी छपाई | 48750/- | 975/- |

PREVIEW

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 6 | 3978 | 16/07/2015 | स.स.न.र कार्यालयासाठी गुंठेवारी पुस्तिका | 37500/- | 750/- |
| | | | एकूण | 280250 | 5605/- |
| अ.क्र. | प्रमाण क्रमांक | दिनांक | खरेदीचा तपशील | रक्कम | आयकर रक्कम |
| 1 | 43742 | 27/07/2015 | बांधकाम विभागाकरिता निविदा पुस्तक B1,B2 | 47000/- | 940/- |
| 2 | 4343 | 27/07/2015 | अग्निशमन विभागाकरिता कॉल रजिस्टर | 12000/- | 240/- |
| 3 | 4344 | 27/07/2015 | कर विभाग, मालमत्ता कराची दैनिक नोंदवही | 49500/- | 990/- |
| 4 | 4345 | 27/07/2015 | बांधकाम विभागाकरिता फॉर्म | 48000/- | 960/- |
| 5 | 4346 | 27/07/2015 | आरोग्य विभाग रक्त नमुने | 49000/- | 980/- |
| 6 | 4347 | 27/07/2015 | कर विभाग, लेजर पेपर नोंदवही | 49500 | 990/- |
| 7 | 4348 | 27/07/2015 | आरोग्य विभाग फॉर्म छपाई | 6000/- | 120/- |
| हरिहर प्रिंटर्स अमरावती , धनादेश क्रमांक 531372 रू 261000 /- एकूण 7 बिले | | | | | |
| अ.क्र. | प्रमाण क्रमांक | दिनांक | खरेदीचा तपशील | रक्कम | आयकर रक्कम |
| 1 | 6931 | 29/9/2015 | स.स.न.र. विभाग विकास नियंत्रण पुस्तिका | 48750/- | 975/- |
| सुवर्ण मुद्रणालय धनादेश क्रमांक 1641 29/9/15 रू/48750 | | | | | |
| 1 | 9496 | 27/11/2015 | कर विभाग असेसमेंट फॉर्म | 47500/- | 950/- |
| 2 | 9497 | 27/11/2015 | कर विभाग विशेस कर आकारणी पुस्तके | 48750/- | 975/- |
| 3 | 9498 | 27/11/2015 | कर विभागाकरिता फॉर्म नं. 20 | 47500/- | 950/- |
| 4 | 9499 | 27/11/2015 | कर विभागाकरिता लागणारे कर आकारणी पुस्तक | 48750/- | 975/- |
| 5 | 9500 | 27/11/2015 | शौचालय नळ कनेक्शन | 36000/- | 720/- |

PREVIEW

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पुस्तिका 1 ते 100 | | |
| 6 | 9501 | 27/11/2015 | शौचालय नळ कनेक्शन पुस्तिका 1 ते 200 | 48000/- | 960/- |
| 7 | 9502 | 27/11/2015 | बांधकाम विभागाकरिता निविदा पुस्तक B1,B2 | 47000/- | 940/- |
| | | | एकूण | 323500/- | 6740/- |
| सुवर्ण मुद्रणालय ,धनादेश क्रमांक 533852 दिनांक 27/11/2015 रू 323500 | | | | | |
| अ.क्र. | प्रमाण क्रमांक | दिनांक | खरेदीचा तपशील | रक्कम | आयकर रक्कम |
| 1 | 1533 | 18/5/2015 | LBT विभागाकरिता स्टेशनरी खरेदी | 49000/- | 980/- |
| 2 | 1534 | 18/5/2015 | LBT विभागाकरिता स्टेशनरी खरेदी | 49000/- | 980/- |
| 3 | 1535 | 18/5/2015 | LBT विभागाकरिता स्टेशनरी खरेदी | 46250/- | 925/- |
| 4 | 1536 | 18/5/2015 | महापौर यांचे कार्यालायाकरिता साहित्य | 44100/- | 882/- |
| | | | एकूण | 188350/- | 3767/- |
| बजरंग ट्रेडर्स धनादेश क्रमांक 573512 दिनांक 18/05/2015 रू 188350 /- | | | | | |
| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | खरेदीचा तपशील | रक्कम | आयकर रक्कम |
| 1 | 2963 | 25/06/2015 | साप्रवी करिता लागणारे झेरोक्स पेपर | 48750/- | 975/- |
| 2 | 2964 | 25/06/2015 | LBT विभागाकरिता स्टेशनरी खरेदी | 49000/- | 980/- |
| 3 | 2965 | 25/06/2015 | स.स.न.र विभागाकरिता फॉर्म छपाई | 49500/- | 990/- |
| 4 | 2966 | 25/06/2015 | नगर सचिवविभागाकरिता लागणारे पेपर | 48750/- | 975/- |
| | | | एकूण | | 3920/- |
| बजरंग ट्रेडर्स धनादेश क्रमांक 530392 दिनांक 25/6/2015 रू 196000/- | | | | | |
| अ.क्र. | प्रमाणक | दिनांक | खरेदीचा तपशील | रक्कम | आयकर |

PREVIEW

| | क्रमांक | | | | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 6931 | 29/09/2015 | LBT विभागाकरिता कर निर्धारण फाईल | 48000/- | 960/- |
| 2 | 6936 | 29/09/2015 | LBT विभागाकरिता कर निर्धारण फाईल | 49000/- | 980/- |
| 3 | 6937 | 29/09/2015 | लेखापाल विभागाकरिता स्टेशनरी | 49750/- | 995/- |
| 4 | 6938 | 29/09/2015 | लेखापाल विभागाकरिता स्टेशनरी | 47100/- | 942/- |
| 5 | 6939 | 29/09/2015 | LBT कार्यालायाकरिता | 48800/- | 976/- |
| 6 | 6940 | 29/09/2015 | नगर सचिव विभागा करिता झेराक्स पेपर | 44250/- | 885/- |
| 7 | 6941 | 29/09/2015 | आयुक्त कार्यालायाकरिता साहित्य खरेदी | 2980/- | 60/- |
| | | | एकूण | | 5798/- |
| बजरंग ट्रेडर्स धनादेश क्रमांक 1643 दिनांक 29/9/2015रू 310005 | | | | | |
| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | खरेदीचा तपशील | रक्कम | आयकर रक्कम |
| 1 | 1867 | 29/05/15 | उपमहापौर यांचे कार्यालायाकारिता फर्निचर | 49400/- | 988/- |
| 2 | 1868 | 29/05/15 | बसपा गट नेता यांचे कार्यालायाकारिता फर्निचर | 49300/- | 986/- |
| 3 | 1869 | 29/05/15 | जनसंपर्क कार्या.करिता लोखंडी आलमारी | 49200/- | 984/- |
| 4 | 1870 | 29/05/15 | लेखापाल विभागाकरिता लोखंडी आलमारी | 49200/- | 984/- |
| | | | एकूण | 197100/- | 3942/- |
| श्रीराम इंटरप्रायझेस अमरावती धनादेश क्र. 529854 दिनांक 29/5/15 रू 197100 | | | | | |
| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | खरेदीचा तपशील | रक्कम | आयकर रक्कम |
| 1 | 1529 | 18/05/15 | का.अभियंता कार्यालाया करीता आलमारी | 49200 | 984/- |

PREVIEW

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 1530 | 18/05/15 | कर संकलन अधि. फर्निचर | 49450 | 989/- |
| 3 | 1531 | 18/05/15 | शहर सुधार समिती फर्निचर | 47650 | 953/- |
| 4 | 1532 | 18/05/15 | आरोग्य पाणी पुरवठा होस पाईप | 44100 | 882/- |
| | | | एकूण | 190400/- | 3808/- |
| श्रीराम इंटरप्रायझेस अमरावती धनादेश क्र. 573511 दिनांक 18/5/15 रू 190400 | | | | | |
| 1 | 2958 | 25/06/15 | पाणी पुरवठा विभागाकरिता होस पाईप | 44100/- | 882/- |
| 2 | 6932 | 29/9/15 | महापौर यांचे कार्यालाया करिता स्टेशनरी | 48000/- | 960/- |
| 3 | 6933 | 29/9/15 | नगर सचिव कार्यालायाकरिता फर्निचर | 44100/- | 882/- |
| | | | एकूण | | 2724/- |
| श्रीराम इंटरप्रायझेस अमरावती धनादेश क्र. 1642दिनांक 29/5/15 रू 133100 | | | | | |
| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | खरेदीचा तपशील | रक्कम | आयकर रक्कम |
| 1 | 1865 | 29/5/15 | शिक्षण विभागाकरिता लागणारे मूल्यमापन पंजी वर्ग 1 ते 7 | 49000/- | 980/- |
| 2 | 1866 | 29/5/15 | शिक्षण विभागाकरिता लागणारे टी सी' पुस्तिका रजिस्टर | 48500/- | 970/- |
| | | | एकूण | 97500/- | 1950/- |
| मे.प्रिंट सर्व्हिस | | | | 97500/- | 0 |
| 1 | 9504 | 27/11/15 | कर विभागाकरिता लागणारे साहित्य | 38000/- | 760/- |
| 2 | 9505 | 27/11/15 | आरोग्य विभागाकरिता लागणारी चुना पावडर | 49000/- | 980/- |
| ओम इलेक्ट्रीकल अंड जनरल store | | | | 87000 | 1740/- |
| एकूण एकंदर | | | | | 52010/- |

आयकर अधिनियम 1961 कलम 194 C नुसार पुरवठादाराचे देयकातून 2 टक्के आयकर कपात करणे

PREVIEW

आवश्यक आहे. तरी आयकर रक्कम रुपये 52010/- संबंधिताकडून वसूल करून शासन सदरी भरणा करण्यात यावी.

उपरोक्त अनियमितते बाबत विभागास अर्धासमास पत्र क्रमांक 126 दिनांक 18/09/2020 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन सादर न केल्याने सदरचा परिच्छेद कायम करणेत येत आहे.

DATVDKM6401 (Ref No : 91, Hmm No : 126)

## *55 अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील हातपंप दुरुस्तीचे कामातील अनियमितता बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 9**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 400.00/-

मनपा अमरावती महानगरपालिकेचे सन 2015-2016 चे लेखा परीक्षणामध्ये, महानगरपालिकेने हातपंप दुरुस्ती साठी केलेल्या कामाचे अंदाजपत्रक लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाही. तसेच maharashtra stamp act (Amendment )act 2015 मधील परिच्छेद 34 मध्ये केलेल्या सुधारणे नुसार 10 लाख पर्यंत रू 500/- व त्यापुढील प्रत्येक लाखास रुपये 100 व अधिकत्तम रुपये 5 लक्ष या प्रमाणे मुद्रांक घेणे आवश्यक आहे. कमी घेतलेल्या रकमेचे मुद्रांक रुपये 400 वसूल करणे आवश्यक आहे.

PREVIEW

अमरावती महानगरपालिकेचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणामध्ये, महानगरपालिकेने हातपंप दुरुस्ती साठी केलेल्या कामाचे निवडक प्रमाणके तपासली असता खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आली आहे.

1) महानगरपालिकेने मनपा क्षेत्रातील इंडिया मार्क 11 व 111 हातपंप (सर्व सामानासह) दुरुस्ती साठी दिनांक 1/4/2015 ते 31/10/2015 पर्यंत टर्मली बेसिसवर वेळोवेळी दुरस्ती करून पाणी व्यवस्तीत चालू ठेवणे साठी, दिनांक 16/05/2015 रोजी रुपये 25,00,000/- चा दरमहा रुपये 317896/ प्रमाणे करारनामा केला असून ठेकेदार मे.एच. हिरालाल यांना जा.क्र. पाणी पुरवठा अमनपा/कार्या/अभि-2/40/2015 दिनांक 28/05/2015 अन्वये कार्यारंभ आदेश दिला आहे. त्यानुसार ठेकेदारास माहे एप्रिल 2015 व मे 2015 चे देयक, प्रमाणक क्र.13390 रक्कम रुपये 5,81,813/- अदा केले आहे यावर खालील अभिप्राय आहेत.

1) दैनंदिन दुरुस्ती करतना काढण्यात आलेले साहित्याची नोंद, साठानोंद पुस्तकात घेण्यात आल्या बाबत साठानोंदवही लेखापरीक्षणास सादर केले नाही.

2) दिनांक 1/4/2015 ते 31/10/2015 पर्यंत आठ महिन्याच्या कामाकरिता करिता तयार करण्यात आलेले रक्कम रुपये 25, 00,000 /-चे अंदाजपत्रक लेखापरीक्षणास उपलब्द करून देण्यात आले नाही.

3) हातपंप नोंदवही लेखापरीक्षणास सादर केली नाही.

4) तक्रार नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

5) देयकासोबत दोन महिन्यात केलेल्या कामाचा तपशीलवार अहवाल नस्तीस जोडला नाही.

6) हातपंपावर केलेल्या कामाचे विवरणपत्र (दैनंदिन अहवाल) नस्तीस आढळून आला नाही.

7) कामाच्या आदेशानुसार कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याच्या अहवाल स्टॉकबुकाच्या नोंदीसह सादर केला नाही.

8) हातपंप दुरुस्ती करतना निघालेले साहित्य साठानोंदवहीत नोंद घेवून, भांडार विभागास परत केल्याच्या, भांडार विभागाकडून प्राप्तीचा अहवाल सादर करावा.

9) maharashtra stamp act (Amendment) act 2015 मधील परिच्छेद 34 मध्ये केलेल्या सुधारणे नुसार 10 लाख पर्यंत रुपये 500/- व त्यापुढील प्रत्येक लाखास रुपये 100 व अधिकत्तम रुपये 5 लक्ष या प्रमाणे मुद्रांक घेणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने रुपये 25,00,000/- लाखाच्या कामासाठी 2000/- रुपयाचा करानामा करणे आवश्यक असताना रुपये 1600/- चा करारनामा केला आहे. तरी उर्वरित फरकाचे रक्कम रुपये 400/-चे मुद्रांक प्राप्त करून घेवून/रक्कम शासन सदरी भरणा करावी.

उपरोक्त अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.179 दिनांक- 28/10/2020 अन्वये खुलासा/अनुपालन दर्शवण्यात कळविण्यात आले असता विभागाने अनुपालन सादर न केल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVDKM6401 (Ref No : 93, Hmm No : 179)

PREVIEW

## *56 जाहिरातीवरील करवसुलीचे काम कंत्राट त्वावर दिल्याने.विहित मुदतीत कराची रक्कम मनापासप्राप्त होत नसल्याने त्यावर आकारण्यात येणाऱ्या नुकसानी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 2**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 6250000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 4898100.00/-

अमरावती मनपाने महानगरपालिका क्षेत्रातील जाहिरात कर वसूलीचे काम करण्यासाठी मे.सेल ॲड सर्विसेस ,

| |
|---|
उपरोक्त अनियामिते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 102 दिनांक 20/03/2020 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविण्यात आले असता विभागाने अनुपालन सादर केले नसल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.



PREVIEW

## *100 शिक्षण कर, रोजगार हमी कर, उपकर, मोठ्या इमारतीवरील उपकर विलंबाने शासन सदरी भरणा केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| महाराष्ट्र शिक्षण कर, रोजगार हमी कर, (उपकर) अधिनियम १९६२ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शिक्षण कर, रोजगार हमी कर, उपकर, मोठ्या इमारतीवरील कर, मालमत्ता धारकाकडून आकारणी होऊन महानगरपालिकेने सदरचे रकमा वेळोवेळी वसूल करून सत्वर शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे. तथापि अमरावती महानगरपालिकेने विलंबाने भरणा केला आहे. |

PREVIEW

अमरावती महानगरपालिकेने महाराष्ट्र शिक्षण कर, रोजगार हमी कर,(उपकर) अधिनियम १९६२ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शिक्षण कर, रोजगार हमी कर,उपकर मोठ्या इमारतीवरील कर, मालमत्ता धारकाकडून आकारणी होवून महानगरपालिकेने, सदरचे रकमा वेळोवेळी वसूल करून सत्वर शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे. तथापी महानगरपालिकेने वसूल केलेल्या महाराष्ट्र शिक्षण कर, रोजगार हमी कर, उपकर, मोठ्या इमारतीवरील कराच्या भरणा केलेल्या चलनाची पडताळणी केली असता खालील प्रमाणे विलंबाने भरणा केला आहे.

| अ.क्र | महिना | महाराष्ट्र शिक्षण कर | रोजगार हमी कर,उपकर | मोठ्या इमारतीवरील कर | भरणा केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | एप्रिल २०१५ | १२०२१९७ | ९००५८ | १७२१७ | २०/०६/२०१५ |
| २ | मे-२०१५ | १४६७४९९ | ९५३१२ | ६९३३४ | ०४/०७/२०१५ |
| 3 | जून २०१५ | ११३४५५२ | ७१३९७ | ३०८५१ | १९/०८/२०१५ |
| ४ | जुलै२०१५ | १४६६०३७ | १०३१०० | २५२०५ | १९/०९/२०१५ |
| ०५ | ऑगस्ट २०१५ | २०९२२४९ | १४०४९१ | ४३२०५ | २८/१०/२०१५ |
| ०६ | सप्टेंबर२०१५ | ३०६७१११ | ४२५१८४ | ९४५४० | ०७/१२/२०१५ |
| ०७ | ऑक्टोबर ०१५ | ४७३२५७० | ६१०८८६ | १८४५९७ | ३०/१२/२०१५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०८ | नोव्हेंबर २०१५ | ३९१०७१६ | ६१२४५५ | १६७३८९ | २५/०२/२०१६ |
| ०९ | डिसेंबर २०१५ | १०४९१७१० | १५५०६०४ | ४२४२१३२४ | ०५/०२/२०१६ |
| १० | जानेवारी २०१६ | ६२२८४६३ | १०४३५११ | ३१९६७८ | ०५/०४/२०१६ |
| ११ | फेब्रुवारी २०१६ | ५१७४७५७ | ८०७७०९ | १८४८२७ | ०५/०४/२०१६ |
| १२ | मार्च २०१६ | १२२६९९२५ | २०२१२५७ | ३२४९४ | २५/०४/२०१६ |

उपरोक्त अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक ८५ दिनांक ०४/०३/२०२० अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता, विभागाने अनुपालन सादर न केल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATSGCF7501 (Ref No : 13, Hmm No : 85)

PREVIEW

## *101 वेतन अदा करताना घेण्यात येणाऱ्या रू.1. किमतीच्या मुद्रांकाची रक्कम शासन खाती न भरले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनि यमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण 1013 /प्र.क्र.64 कोषा प्रशा -5 दिनांक 26/10/2015 अन्वये रू.मूल्यांच्या मुद्रांका एवजी कर्मचाऱ्याचे वेतनातून रू.1 वजा करण्यात येवून ते शासन खाती जमा करण्यात यावे असे निर्देश असतना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

अमरावती महानगरपालिकेच्या सन 2015-2016 चे च्या वित्तीय वर्षापैकी निवड महिना माहे जानेवारी 2016 व मार्च 2016 वित्तीय वर्षाच्या वेतन देयाकाचे लेखा परीक्षण करण्यात आले असून आढळून आलेल्या अनियमितते बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) शासनाचे सर्व विभाग महानगरपालिका महायांचे अधिनस्त कर्मचाऱ्यांचे वेतन बँक खात्यामध्ये जमा होते त्यामुळे वेतन पटाची आवश्यकता उरलेली नाही. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 1013 प्र.क्र.64 कोषा प्रशा-5 दिनांक 26/10/2015 अन्वये रुपये 1 मूल्यांच्या मुद्रांका ऐवजी कर्मचा-याच्या वेतनातून रू 1 वजा करण्यात येवून खालील प्रमाणे शासन खाती जमा करणे आवश्यक आहे,

0030 मुद्रांक व नोंदणी फी 102 मुद्रांकाची विक्री

02 मुद्रांकेत्तर इतर मुद्रांकाची विक्री

01.02 नोंदणी महानिरीक्षक 003000464 उर्वरित महाराष्ट्रा करिता

तरी सदर शासन निर्णयानुसार माहे आक्टोबर 2015 पासून सन 2015 -2016 मध्ये रू 1 प्रमाणे मुद्रांकाची रक्कम वजा करून शासन खाती जमा करण्यात आले नसल्याचे दिसून येते.

उपरोक्त अनियमितते बाबत लेखा विभागास अर्धासामास पत्र क्रमांक 76 दिनांक 26/02/2020 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन सादर केले नाही. त्यामुळे सदरचा परिच्छेद कायम करणेत येत आहे

DATVDKM6401 (Ref No : 14, Hmm No : 76)

## *102 निवृत्ती वेतनधारकांच्या निवृत्ती वेतनातून आयकर कपात न करणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा प्र.5 दिनांक 22 फेब्रुवारी 2008 तसेच आयकर अधिनियम 1961 चे कलम 192 च्या तरतुदीनुसार केंद्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्रमांक 20/2015 दिनांक 02/12/2015 नुसार विहित दराने आहरण व संवितरण अधिकारी यांनी आयकर कपात करणे बंधनकारक असतना सुद्धा निवृत्ती वेतन धारकांच्या निवृत्ती वेतनातून आयकर कपात करण्यात आली नाही. |

अमरावती महानगरपालीकेच्या सन 2015-2016 या वित्तीय वर्षाच्या आर्थिक वर्षात प्रदान करण्यात आलेल्या निवृत्तीवेतनधारकांच्या फेब्रुवारी-2016 चे मासिक निवृत्ती वेतन देयकाची पडताळणी केली असता निवृत्ती वेतनधारकाच्या निवृत्ती वेतनातून नियमानुसार आयकराची रक्कम कपात करुन शासनाकडे भरणा केली नसल्याचे दिसून आले आहे.

१ महानगरपालिका, नांदेड-वाघाळा कार्यालयाने महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा-प्र 5 दिनांक 22 फब्रूवारी 2008 तसेच आयकर अधिनियम 1961 कलम 192 च्या तरतूदीनुसार केन्द्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्रमांक 20/2015 दिनांक 02/12/2015 नुसार विहीत दराने आहरण व संवितरण अधिकारी यांनी आयकर कपात करणे बंधनकारक आहे. तरी खालील सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचे आयकर रकमांची कपात केल्याचे दिसून येत नाही तसेच.फॉर्म न 16 देयकासोबत जोडलेला दिसत नाही. तरी पात्र निवृत्तीवेतन धारकाचे व नमूद निवृत्तीवेतन धारकांचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे

PREVIEW

आयकर निर्धारण करून आयकराची रक्कम शासन खाती जमा केल्याचे चालन लेखापरीक्षणास सादर करून अनुपालन दर्शवावे.

| अक्र. | निवृत्ती वेतन धारकाचे नाव | वार्षिक वित्तलब्धी सन 2015-2016 |
|---|---|---|
| 1 | विरेंद्र तेजकरण जैन. | ४०२६१२-/ |
| 2 | अनुपमा प्रविण देशमुख. | ३५६११२-/ |
| 3 | विलास देविदासराव जामठीकर | ४००८९६-/ |
| 4 | विजय रुपराव साखरे. | ४१८५१२-/ |
| 5 | प्रमोद मनोहर देशमुख. | ४४४६६०-/-/ |
| 6 | दिलीप भाऊरावजी पडघन. | ३७१७००-/ |
| 7 | निलिमा नारायणराव विध्वंस. | ४४४५२८-/ |
| 8 | निलेश बाबाराव ढोरे. | ४१९०४०-/ |
| 9 | सविता हिम्मतराव चक्रपाणी. | ४४२९३२-/ |
| 10 | ओमप्रकाश विठ्युजी चर्जन. | ३१२५२८-/ |
| 11 | प्रभाकर गोपाळराव खेरेडे. | ३६४१२८-/ |
| 12 | अशोक हरीरामजी राठी. | ६४४५२०-/ |
| 13 | शिवदास हिरालाल नाचणकर. | ३८६८५६-/ |
| 14 | एम.रहमान.ए. | ४६७१२४-/ |
| 15 | प्रमिला शामराव कपाळे— | ३४१५२०-/ |

उपरोक्त अनियमितते बाबत लेखा विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 65 दिनांक 15/02/2016 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन खुलासा सादर न केल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATVDKM6401 (Ref No : 15, Hmm No : 65)

PREVIEW

### *103 मुद्रांक शुल्क सहाय्यक अनुदानाबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| शासनाकडून प्राप्त होणा-या मुद्रांक शुल्क सहाय्यक अनुदान रकमांचा वर्षनिहाय तपशील लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. यामुळे मागणी असणारे अनुदान व प्रत्यक्ष प्राप्त अनुदान रकमांचा ताळमेळ घेता येत नाही. तसेच मागणी करावयाची रक्कम बाबत विहीत नमुन्यात नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. |

अमरावती शहर महानगरपालिकेचे सन 2015-2016 या आर्थिक वर्षात मुद्रांक शुल्क सहायक अनुदानापोटी एकूण रक्कम किती प्राप्त झाली याबाबत विभागाने माहीती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 122 नुसार विहीत नमुन्यातील मागणी पुस्तक परिरक्षित करणे आवश्यक आहे. विभागाने नियमित अनुदानाचा तपशिल उपलब्ध करुन दिला नसल्याने प्रलंबित मुद्रांक शुल्क अनुदानाच्या रकमांची सत्यता पडताळता आलेली नाही.

याबाबत लेखा विभागास अर्धसमास पत्र क्रमांक १३८ , दिनांक २४/०९/२०२० अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता लेखा विभागाने अनुपालन सादर न केल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 48, Hmm No : 138)

### *104 सन २०१५-२०१६ पासून ऑनलाईन पद्धतीने प्राप्त झालेला मालमत्ता कर लेख्याबाहेर ठेवल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*शासन निधी*
*अनियमितता कलम : 9ड*



PREVIEW

गुंतलेली रक्कम रु. 1113518.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1113518.00/-

| |
|---|
| सन २०१५-२०१६ मध्ये शहरातील ५२२ मालमत्ताधारकांनी रक्कम रु १११३५१८/- मालमत्ता कर ऑनलाईन पद्धतीने भरणा केलेला आहे. परंतु याची नोंद लेखा विभागाने सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाच्या रोखपालाचे रोखपुस्तक व सर्वसाधारण रोखपुस्तकात घेतलेली नाही. लेखा विभागाने रक्कम रु १११३५१८/- लेख्याबाहेर ठेवले आहे. अद्याप सन २०१५-२०१६ पासून सन २०१९-२०२० पर्यंतचा ऑनलाईन मालमत्ता कर लेखा बाहेर ठेवले असल्याचे निदर्शनास आले आहे. |

अमरावती महानगरपालिका सन २०१५-२०१६ मध्ये शहरातील मालमत्ताधारकांना मालमत्ता कर ऑनलाईन पद्धतीने भरणा करण्याची सेवा उपलब्ध करून दिली होती. त्याचा लाभ घेत शहरातील काही मालमत्ताधारकांनी ऑनलाईन पद्धतीने मालमत्ता कर भरणा केलेला आहे. याबाबत संगणक विभागाकडून प्राप्त अहवालानुसार सन २०१५-२०१६ मध्ये शहरातील ५२२ मालमत्ताधारकांनी रक्कम रु १११३५१८/- मालमत्ता कर ऑनलाईन पद्धतीने भरणा केलेला आहे. परंतु याची नोंद लेखा विभागाने सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाच्या रोखपालाचे रोखपुस्तक व सर्वसाधारण रोखपुस्तकात घेतलेली नाही. लेखा विभागाने रक्कम रु १११३५१८/- लेख्याबाहेर ठेवले आहे. अद्याप सन २०१५-२०१६ पासून सन २०१९-२०२० पर्यंतचा ऑनलाईन मालमत्ता कर लेखा बाहेर ठेवले असल्याचे निदर्शनास आले आहे. तरी बँक खातेसोबत रोखपुस्तकाचे ताळमेळ घेण्यात येऊन सदर रक्कम लेख्यात घेण्यात यावे. तसेच महानगरपालिकेच्या वित्तीय वर्षाच्या अंदाजपत्रकात देखील महसुली जमा बाजूस ऑनलाईन मालमत्ता कर असे स्वतंत्र लेखाशीर्ष निर्माण करण्यात यावे.

उपरोक्त बाबीची पूर्तता होईपर्यंत ऑनलाईन मालमत्ता कर रक्कम रु १११३५१८/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

उपरोक्त सर्व बाबीकरिता अर्धसमासपत्र क्रमांक १३० दिनांक २१/०९/२०२० निर्गमित करण्यात आले असून, संयुक्तिक खुलासा प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 49, Hmm No : 130)

PREVIEW

### *105 महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता' 2011 महापालिकेस लागू करणे बाबत.*

**लेखा विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| अमरावती महानगरपालिकेने महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 महापालिकेस लागू केली नाही. तरी स्थायी समितीची मान्यता घेवून महापालिकेस महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 लागू करावी |

अमरावती मनपाच्या सन 2015-2016 च्या लेखा परीक्षणात सर्व विभागाने महाराष्ट्र लेखासंहिता 1971 प्रमाणे लेखे ठेवलेले आहेत. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग,राजपत्र भाग अ मध्ये उपविभाग जानेवारी 2013 अन्वये प्रसिद्ध अधिसूचनेत राज्यातील नगरपरिषदेकरिता नवीन सुधारित लेखासंहिता 2011 लागू केली आहे. तरी अमरावती मनपाने, लेखासंहिता 1971 ही कालबाह्य झाली असल्यामुळे, अधिसूचनेनुसार सुधारित लेखा संहिता 2011 मनपा करीता, स्थायी समितीची मंजुरी घेवून लागू करावी. अथवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 93 नुसार आपली स्वतंत्र लेखासंहिता तयार करून त्यास स्थायी समितीच्या शिफारशीसह शासनाची मंजुरी घेवून लागू करावी.
उपरोक्त अनियमितते बाबत लेखा विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 75 दिनांक 26/02/2020 अन्वये खुलासा /अनुपालन दर्शविण्यास कळविले असता अनुपालन / खुलासा प्राप्त न झालेने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVDKM6401 (Ref No : 74, Hmm No : 75)

PREVIEW

## ***106 अंशदायी निवृत्ती वेतन योजना (DCPS) चे ledjer व ब्राहत पत्रक न ठेवलेबाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 8**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| अमरावती मनपाने, नगरपालिका लेखासंहिता 2011 परिशिष्ठ 5 चे नियम 466 (5) ग नुसार नमुना नंबर 99,100 नुसार DCPS मधील कर्मचा-यांचे ब्राहत पत्रक ठेवले नाही.त्यामुळे सन 2015-2016 मधील वेतन देयकातून जमा करावयाची अंशदान, नियुक्त्यांचे अंशदान, जमा रकमांचा तपशील परत केलेल्या रक्कामा इत्यादीचा व बँक खात्यातील शिल्लक रक्कम इत्यादीचा ताळमेळ घेता आला नाही. |

मनपा अमरावती महानगरपालिका सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात, लेखा विभागाकडील अंशदायी

निवृत्तीवेतन योजनेच्या लेख्यांची पडताळणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

1) शासन निर्णय,वित्त विभाग क्रमांक अंनियो/1005/126/ सेवा 4 दिनांक 31/10/2005 अन्वये परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आली आहे. ही योजना लागू असलेले कर्मचारी/अधिकारी यांचे माहे फेब्रुवारी 2016 देय मार्च 2016 चे वेतन देयक तपासले असता, कपातीचे तपशिलामध्ये अंशदायी वर्गणीची रक्कम कपात केलेली दिसून येत नसून इतर कपाती मध्ये सदरची रक्कम समाविष्ठ आहे. अंशदायी निवृत्ती वेतन स्वतंत्र कपात दाखविली नाही.कर्मचा-याचे मासिक वेतन अदा करतना, वेतन देयकातून कपातीच्या रक्कमा वगळून फक्त निव्वळ वेतन कर्माचा-यांना अदा केले जाते. कपातीच्या रक्कमा स्वतंत्र देयक तयार करून भरणा केले जाते. याप्रमाणे कर्मचा-याचे 10 टक्के अंशदान कपात केली आहे. सदर कपातीची रक्कम व महानगरपालिका स्व:हिस्साची रक्कम एकत्रित करून विलंबाने देयक तयार करून प्रमाणक क्रमांक 1784 दिनांक 17/05/2016 नुसार योजनेच्या खाती जमा करण्यात आली आहे. यावर खापरीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1)योजनेचा निधी खाते क्रमांक 0507104000089122 मध्ये दिनांक 31/03/2016 रोजी रक्कम रुपये 1,13,07,759/- इतकी शिल्लक असल्याचे बँक पासाबुकावरून दिसून येते. यासाठी स्वतंत्र रोख पुस्तक ठेवण्यात आले नाही.

2)सन 2015-2016 मध्ये माहे एप्रिल 2015 ते ऑगस्ट 2015 अखेर कर्मचा-याचे वेतनातून निवृत्ती वेतन अंशदान रकमा कपात करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे शासन निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही.या बाबत समर्पक खुलासा होणे आवश्यक आहे.

3) विभागाने सादर केलेल्या तपशिलानुसार सन 2007-2008 ते 2015-2016 अखेर एकूण रक्कम रुपये 7,71,12,886 /- कपात केली असून त्यापैकी फक्त रुपये 2,43,19,476/- इतकी बँक खाती जमा करण्यात आली आहे. व रककम रुपये 5,27,94,310/- कपात करून देखील भरणा केला नाही.

4) नगरपालिका लेखासंहिता 2011 चे परिशिष्ठ 5 चे नियम 466 (5) ग नुसार नमुना नंबर 98 मध्ये LEDJER ठेवण्यात आले नाही

5) नगरपालिका लेखासंहिता 2011 परिशिष्ठ 5 चे नियम 466 (5) ग नुसार नमुना नंबर 99,100 नुसार DCPS मधील कर्मचा-यांचे ब्राहत पत्रक ठेवले नाही.त्यामुळे सन 2015-2016 मधील वेतन देयकातून जमा करावयाची अंशदान, नियुक्त्यांचे अंशदान, जमा रकमांचा तपशील परत केलेल्या रक्कामा इत्यादीचा व बँक खात्यातील शिल्लक रक्कम इत्यादीचा ताळमेळ घेता आला नाही.

6) ही योजना चालू झाल्यावर त्याची गुंतवणूक कशी करावी, तसेच एखाद्या अधिकारी/कर्मचारी यांचा मृत्यू झाल्यास, सेवा सोडून गेल्यास, निवृत्त झाल्यास त्यांना काय रक्कम देय आहेत.या बाबत वरिष्ठ पातळीवरून मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे.

7)प्राप्त माहितीनुसार महानगरपालिकेकडे अंशदायी निवृत्ती वेतनाचे एकूण 639 कर्मचारी असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 चे नियम 466 (5) प्रमाणे आर्थिक वर्ष संपल्यावर शक्य तितक्या

PREVIEW

लवकर वर्गणीदारास, त्याच्या खाती किती रक्कम जमा झाली व या बाबतचे विवरण पत्र, ते अचूक असल्याबाबत कर्मचा-याची पोहोच घेणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही केली जात नाही.

8) निवृत्ती वेतन अंशदान देयकासोबत जोडलेले विवरण पत्राची पडताळणी केली असता, विवरण पत्रामध्ये बऱ्याच कर्मचा-याची नावे समाविष्ठ आहेत. परंतु त्यांचे रकमा कपात केलेल्या दिसत नाहीत(कर विभाग,शिक्षण विभाग,अग्निशमन विभाग) निवृत्ती वेतन अंशदान मासिक कपात अहवालामध्ये त्यांची नावे असल्याने, किती कर्मचा-याचे अंशदान कपात करणे आवश्यक आहे. व किती कर्मचारी पात्र आहेत. याची पडताळणी करता आली नाही. तसेच विवरण पत्रामध्ये कर्मचारी वेतनाचा तपशील नसल्याने योग्य ती कपात केल्या बाबतची खात्री करता आली नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 83 दिनांक 04/03/2020 अन्वये अनुपालन दर्शवण्यास कळवले असता, विभागाने अनुपालन सादर केले नाही.त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत.आहे

DATVDKM6401 (Ref No : 75, Hmm No : 83)

PREVIEW

### *107 धनादेश साठा नोंदवही न ठेवलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

मनपा अमरावती महानगरपालिका सन 2015-2016 या वित्तीय वर्षासाठी महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 चे नियम 62 मध्ये निर्देश केले प्रमाणे धनादेश साठा नोंदवही नमुना 8 मध्ये ठेवणे आवशक आहे. तथापि लेखा विभागाने धनादेश साठा नोंदवही ठेवली नाही त्यामुळे कोणत्या बँकेकडून किती धनादेश पुस्तके प्राप्त झाली ,व त्यातील किती धनादेश पुस्तके वापरली याची खात्री करता आली नाही. .

मनपा अमरावती महानगरपालिका सन 2015-2016 चे लेखा परीक्षणात, लेखा विभागाने धनादेश साठा नोंदवही ठेवेली नसल्याचे निदर्शनास आले असून खालील प्रमाणे अनियमितता झालेली आहे

1) अमरावती महानगरपालिकेने सर्व योजनांसाठी स्वतंत्र खाती बँक खाती ठेवली असून, सर्व योजनासाठी एकच रोखवही ठेवली आहे. सर्व योजनांचे व्यवहार एकाच रोख पुस्तकातून केले जातात. याबाबत लेखा विभागास धनादेश साठा नोंदवही ची मागणी केली असता, धनादेश साठा नोंदवही ठेवली नसल्याचे निदर्शनास आले.

धनादेश साठा नोंदवही लेखा परीक्षणास सादर केली नसल्यामुळे कोणत्या बँकेकडून, कोणत्या खात्याचे किती धनादेश पुस्तक प्राप्त झाली व त्यातील किती धनादेश वापरले याची खात्री करता आली नाही. बँकेकडून प्राप्त झालेली धनादेश पुस्तके तपासून सर्व धनादेश व्यवस्थित क्रमवार असून धनादेश पुस्तकातील संख्या योग्य असल्याचे प्रमाणपत्र देवून विहित नमुन्यातील धनादेश साठा नोंदवही मध्ये नोंदविणे आवश्यक आहे. महाराष्ट्र नगरपालिका लेखा सहिता 2011 चे नियम 62 अन्वये नमुना क्रमांक 8 मध्ये धनादेश साठा नोंदवही ठेवणे आवश्यक आहे.परंतु अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

2) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम 170 नुसार कोणताही धनादेश आहरण केल्याचे दिनांका पासून तीन महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी वितरीत करणेचे राहून गेलेल्या आणि हा कालावधी संपल्यानंतर, अदात्याने असा धनादेश आहार्त्याच्या स्वाक्षरीनिशी पुन्हा विधी ग्राहृय करून घेण्यासाठी पाठविणे जरुरीचे आहे. व असा मुदतबाहृय धनादेश पुन्हा विधीग्राहृय केल्याची तळटीप सामान्य रोखवाहीतील मूळ नोंदिसमोर लिहिणे आवश्यक आहे. परंतु अमरावती महानगरपालिकेने सदर धनादेश साठानोंदवही ठेवली नसल्याने मुदतबाहृय धनादेशापोटी महानगरपालिकेवर किती रकमेचे दायित्व आहे हे समजू शकले नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 84 दिनांक 04/03/2020 अन्वये अनुपालन सादर करण्यास कळविले असता, विभागाने खुलासा, अनुपालन सादर न केल्याने आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATVDKM6401 (Ref No : 76, Hmm No : 84)

PREVIEW

### *108 लेखा विषयक नोंदवहृया न ठेवल्या बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

अमरावती महापालिकेने महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील तरतुदी नुसार आवश्यक त्या नोंदवहृया विहित नमुन्यात ठेवल्या नाहीत.

अमरावती महानगरपालिकेच्या सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात मनपाच्या विविध विभागा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या नोंदवहृयाची तपासणी करण्यात आली असता मनपाने खालील प्रमाणे महाराष्ट्र

नगरपरिषद लेखा संहिता नियम 62 व 63 नुसार विहित नमुन्यात नोंदवह्या ठेवल्या नाहीत.

| अ क्र | तपशील | नमुना क्रमांक | लेखा प्रमुखाने अद्यावत करावयाचे व मुद्रित करावयाचे |
|---|---|---|---|
| 1 | धनादेश साठा नोंदवही | 8 | मासिक |
| 2 | अनुज्ञाप्तीनोंदवही | 9 | मासिक |
| 3 | भाड्याने देण्यात आलेल्या मालमत्तेची नोंदवही | 10 | मासिक |
| 4 | संकीर्ण विक्री नोंदवही | 11 | मासिक |
| 5 | कार्यादेश नोंदवही | 12 | मासिक |
| 6 | प्राप्त झालेल्या देयकाची नोंदवही | 13 | साप्ताहिक |
| 7 | देय असलेल्या परंतु अदागयी न झालेल्या देयकाची नोंदवही | 14 | मासिक |
| 8 | जमिनीची नोंदवही | 15 | मासिक |
| 9 | स्थावर मालमत्ता नोंदवही | 16 | मासिक |
| 10 | जंगम मालमत्ता नोंदवही | 17 | मासिक |
| 11 | चालू असलेल्या कामाची नोंदवही | 18 | मासिक |
| 12 | गुंतवणूक नोंदवही | 19 | मासिक |
| 13 | अग्रिमधन नोंदवही | 20 | मासिक |
| 14 | वस्तुसुची नोंदवही | 21 | मासिक |
| 15 | कर्मचा-याने दिलेले अग्रीमे व कर्ज यांची नोंदवही | 22 | मासिक |
| 16 | कर्ज नोंदवही | 23 | मासिक |
| 17 | स्वीकृत ठेवींची नोंदवही | 24 | मासिक |
| 18 | सुरक्षा अनामत नोंदवही | 25 | मासिक |
| 19 | अनुदान नोंदवही | 26 | मासिक |
| 20 | मागणी नोंदवही | 27 | मासिक |
| 21 | देय वेतन नोंदवही | 28 | मासिक |
| 22 | दाव्यांची नोंदवही | 29 | मासिक |
| 23 | मोजमाप पुस्तकांची नोंदवही | 33 | मासिक |
| 24 | पशुधनाची नोंदवही | 35 | मासिक |
| 25 | इमारत बांधकाम परवानगी | 38 | मासिक |

PREVIEW

| | | | |
|---|---|---|---|
| 26 | खाजगी पाईप जोडणीची नोंदवही | 40 | मासिक |
| 27 | गृह जोडणीची नोंदवही | 41 | मासिक |
| 28 | स्वच्छता निरीक्षकाचा अहवाल | 46 | साप्ताहिक |
| 29 | मीटर रिडींग पुस्तक | 47 | मासिक |
| 30 | कर्मचा-यांचा उपस्थिती/अनुपस्थितीचा सारांश पट | 48 | मासिक |
| 31 | मोटार वाहन लेखा | 49 | मासिक |

तरी वरील प्रमाणे नोंदवहया ठेवून त्या अद्यावत करून लेखा लेखा परीषणात दाखवण्यात या बाबत अर्धसमास पत्र क्रमांक 87 दिनांक 04/03/2020 निर्गमित करण्यात आले असून विभागाकडून खुलासा प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATSGCF7501 (Ref No : 77, Hmm No : 87)

PREVIEW

## ***109 सन 2015-2016 मध्ये लेखा विभागामार्फत होणारे सर्व प्रदाने ईसीएस/एनईएफटी व्दारे न केले बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनि यमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमाक संकीर्ण 1010/प्र.क्र.68/प्र.-5 दिनांक 28/04/2011 नुसार दिनांक 01/05/2011 पासून रक्कम रुपये 25000/- चे वरील सर्व प्रदाने ईसीएस/एनईएफटी व्दारे करण्याबाबत आदेशित केले असतना अमरावती मनपाने . सन 2015-2016 मध्ये ईसीएस/एनईएफटी व्दारे रकमा प्रदान करणे पध्दतीचा अवलंब केलेला नाही. |

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमाक संकीर्ण 1010\/प्र.क्र..68/प्र.-5 दिनांक 28/04/2011 नुसार दिनांक 01/05/2011 पासून रक्कम रुपये 25000/- चे वरील सर्व प्रदाने ईसीएस/ एनईएफटी व्दारे करण्याबाबत आदेशित केले असतना अमरावती मनपाने सन 2015-2016 मध्ये ईसीएस/एनईएफटी व्दारे रकमा प्रदान करणे पध्दतीचा अवलंब केलेला नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत लेखा विभागास अर्धसमास पत्र क्रमाक 4 दिनांक 14/02/2019 अन्वये

अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन सादर केले नाही. त्यामुळे परिच्छेद कायम करणेत येत आहे.

DATSGCF7501 (Ref No : 80, Hmm No : 04)

## *110 निवृत्तीवेतन धारक तसेच कुटुंब निवृत्तीवेतन धारक यांच्या हयातीच्या दाखल्याची पडताळणी न करता निवृत्त्तीवेतन सुरु ठेवणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

महाराष्ट्र कोषागार नियम 1968 चे नियम 335 ते 342 नुसार तसेच महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्र.निवेयो 0117/ प्र.क्र.120/ कोषा.प्र.5 दिनांक 18/8/2008 चे तरतुदीनुसार निवृत्ती वेतन धारकांना दरवर्षी 1नोव्हेबर रोजीचा ह्यातीच्या दाखला नोव्हेंबर अखेर निवृत्ती वेतन संवितरण अधिका-यास सादर करणे आवश्यक आहे.निवृत्त्ती वेतन/कुटुंब निवृत्तवेतन धारकाकडून हयातीचा दाखला प्राप्त झाल्याशिवाय, निवृत्ती /कुटुंब निवृत्तीवेतनाचे प्रदान करण्यात येवू नये असे स्पष्ट निर्देश आहेत. असे असताना सुद्धा अमरावती महानगर पालिका कार्यालयातील निवृत्ती वेतन कार्यासनाकडून निवृत्तीवेतन धारक / कुटुंब निवृत्तीवेतन धारक यांच्या हयातीच्या दाखल्याची पडताळणी न करता निवृत्ती वेतन सुरु ठेवण्यात आले आहे.

अमरावती महानगरपालिकेचे सन 2015.2016 चे लेखापरीक्षणा दरम्यान लेखा विभागाकडील निवृत्ती वेतन कार्यासानाकडील माहे फेब्रुवारी 2016 पेड मार्च 2016 चे निवृत्तीवेतन देयकाची पडताळणी केली असता, हयातीचे दाखले प्राप्त नसताना देखील निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन प्रदान केले जाते
महाराष्ट्र कोषागार नियम 1968 चे नियम 335 ते 342 नुसार तसेच महाराष्ट्र शासन, वित्त विभाग निर्णय क्र.निवेयो 0117/ प्र.क्र.120/कोषा.प्र.5 दिनांक-18/8/2008 चे तरतुदीनुसार निवृत्तीवेतन धारकांना दरवर्षी 1 नोव्हेबर रोजीचा ह्यातीच्या दाखला, नोव्हेंबर अखेर निवृत्तीवेतन संवितरण अधिका-यास सादर करणे आवश्यक आहे. निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन धारकाकडून हयातीचा दाखला प्राप्त झाल्याशिवाय निवृत्ती/कुटुंब निवृत्तीवेतनाचे प्रदान करण्यात येवू नये असे स्पष्ट निर्देश आहेत. असे असताना सुद्धा अमरावती महानगरपालिका कार्यालयातील निवृत्तीवेतन कार्यासनाकडून निवृत्तीवेतन धारक / कुटुंब निवृत्तवेतन धारक यांच्या हयातीच्या दाखल्याची पडताळणी न करता निवृत्तीवेतन सुरु ठेवण्यात आले आहे.



PREVIEW

उपरोक्त अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 66 दिनांक 15./02/2020 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATVDKM6401 (Ref No : 81, Hmm No : 66)

### *111 निवृत्तीवेतन निधी स्थापन न करणे बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नियम 466 (5)ख,छ नुसार कर्मचाऱ्यांना देय असलेले निवृत्ती वेतन सर्वसाधारण निधी मध्ये जमा न करता निवृत्तीवेतन राखीव निधी मध्ये जमा करावे. निवृत्ती वेतन निधीमधून शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय अन्य कोणत्याही प्रयोजनाकरिता कोणतीही रक्कम खर्च करणेत येणार नाही असे स्पष्ट पणे नमूद असताना निवृत्तीवेतन राखीव निधी स्थापन करून प्रत्येक महिन्याच्या वेतन देयकाच्या एक नवमांश इतकी रक्कम निधी मध्ये जमा केलेली नाही.

PREVIEW

मनपा अमरावतीचे सन 2015 -2016 चे लेखापरीक्षणा दरम्यान लेखा विभागाकडील अभिलेख्यांची पडताळणी केली असता, मनपाने निवृत्तीवेतन अंशदान निधीची स्थापना केली नसल्याचे निदर्शनास आले सेवानिवृत्ती नंतरचे लाभ व मासिक सेवा निवृत्तीवेतनाचे दायीत्वासाठी निवृत्तीवेतन अंशदान निधीची स्थापना करणे आवश्यक आहे.

अमरावती महानगरपालिके मध्ये सध्या अंदाजे 2250 निवृत्तीवेतन धारक निवृत्तीवेतन घेत असून सन 2015-2016 मध्ये निवृत्ती वेतनावर रक्कम रू.24.25,10,.235/- एवढा खर्च झालेला आहे. तसेच सन 2015-2016 अर्धसंकल्प पुस्तकामध्ये माहे फेब्रुवारी 2016 अखेर थकबाकी रू.53.50 कोटी एवढी असल्याचे दिसून येते.
माहे फेब्रुवारी 2016 दायित्व दर्शविणारे विवरणपत्र खालील प्रमाणे आहे.

1) सेवा निवृत्तीवेतन थकबाकी .2.50.कोटी

2) सेवा निवृत्तीवेतन उपदान 8.0 कोटी

3) सेवा निवृत्ती अंशराशिकरण 4.कोटी

4) सेवा निवृत्ती अर्जित रजा 1.50 कोटी

5) सेनिवे/.कुनिवे थकबाकी 9.50 कोटी

6) 6 वा वेतन आयोग सेवा उपदान थकबाकी -15.कोटी

7) 6 वा वेतन आयोग सेवानिवृत्त शिक्षकांचे सेनिवे/कुनिवे थकबाकी 5.50 कोटी

8) सेवानिवृत्त शिक्षकांचे उपदान 3.50 कोटी

9) कार्यालयीन कर्माचा-याचे रजा रोखीकरण -4.कोटी

एकूण 53.50 कोटी

यावर खाली खालील प्रमाणे अभिप्राय आहे.

1) महाताष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 2011 चे नियम 466 (5 )ख छ प्रमाणे स्वतंत्र निवृत्ती वेतन निधी स्थापन करून,महापालिकेतील कर्मचाऱ्यांना देय असणाऱ्या निवृत्ती वेतनासाठी पदाच्या सरासरी खर्चाच्या 1/9 ऐवढे अंशदान निधीत जमा करून नियम 6 ड नुसार नमूद केलेल्या कार्यावाहीनुसार सदर रकमा राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

2) महानपालिका कर्मचाऱ्यांना देय असणा-या निवृत्तीवेतनासाठी , निवृत्तीवेतन राखीव निधीची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली नसल्याचे सन 2015- 2016 चे अर्थसंकल्प पुस्तकावरून दिसून येते

3) अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या निवृत्तीवेतन अंशदान निधीसाठी स्वतंत्र खाते ठेवणे आवश्यक आहे.परंतु अशा प्रकारचे बँकेत खाते उघडण्यात आले नाही. अर्थसंकल्पात निवृत्तीवेतन राखीव निधीची तरतूद करून असा निधी मनपाचे नावे बँक खाते उघडून निधी खात्यात जमा करणे बाबतची कार्यवाही करावी

उपरोक्त अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 73 दिनांक 26/2/2020 अन्वये खुलासा / अनुपालन दर्शविण्यास कळविण्यात आले असता, विभागाने अनुपालन खुलासा सादर न केल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATVDKM6401 (Ref No : 82, Hmm No : 73)

PREVIEW

## *112 निवृत्तीवेतन धारकांच्या निवृत्ती वेतनातून आयकर कपात न करणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा प्र.5 दिनांक 22 फेब्रुवारी 2008 तसेच आयकर अधिनियम 1961 चे कलम 192 च्या तरतुदीनुसार केंद्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्रमांक 20/2015 दिनांक 02/12/2015 नुसार विहित दराने आहरण व संवितरण अधिकारी यांनी आयकर कपात करणे

बंधनकारक असतना सुद्धा अमरावती मनपाने निवृत्तीवेतन धारकांच्या निवृत्ती वेतनातून आयकर कपात केली नाही.

अमरावती महानगरपालिकेच्या सन 2015-2016 या वित्तीय वर्षात प्रदान करण्यात आलेल्या निवृत्तीवेतनधारकांच्या माहे फेब्रुवारी-2016 चे मासिक निवृत्ती वेतन देयकाची पडताळणी केली असता, निवृत्ती वेतनधारकाच्या निवृत्ती वेतनातून नियमानुसार आयकराची रक्कम कपात करुन शासनाकडे भरणा केली नसल्याचे दिसून आले आहे.

1) महानगरपालिका अमरावती कार्यालयाने महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा-प्र 5 दिनांक 22 फब्रूवारी 2008 तसेच आयकर अधिनियम 1961 कलम 192 च्या तरतूदीनुसार, तसेच केंद्र शासन, वित्त विभाग परिपत्रक क्रमांक 20/2015 दिनांक 02/12/2015 नुसार विहीत दराने आहरण व संवितरण अधिकारी यांनी आयकर कपात करणे बंधनकारक आहे. तरी खालील सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचे आयकर रकमांची कपात केल्याचे दिसून येत नाही तसेच.फॉर्म नं 16 देयकासोबत जोडलेला दिसत नाही. तरी पात्र निवृत्तीवेतन धारकांचे व खालील नमूद निवृत्तीवेतन धारकांचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे आयकर निर्धारण करून आयकराची रक्कम शासन खाती जमा केल्याचे चालन लेखापरीक्षणास सादर करून अनुपालन दर्शवावे.

| अ.क्र | निवृत्ती वेतन धारकाचे नाव | वार्षिक वित्तलब्धी सन 2015-2016 |
|---|---|---|
| 1 | विरेंद्र तेजकरण जैन. | ४०२६१२/- |
| 2 | अनुपमा प्रविण देशमुख. | ३५६११२/- |
| 3 | विलास देविदासराव जामठीकर | ४००८९६/- |
| 4 | विजय रुपराव साखरे. | ४१८५१२/- |
| 5 | प्रमोद मनोहर देशमुख. | ४४४६६०/- |
| 6 | दिलीप भाऊरावजी पडघन. | ३७१७००/- |
| 7 | निलिमा नारायणराव विध्वंस. | ४४५५२८/- |
| 8 | निलेश बाबाराव ढोरे. | ४१९०४०/- |
| 9 | सविता हिम्मतराव चक्रपाणी. | ४४२९३२/- |

PREVIEW

| | | |
|---|---|---|
| 10 | ओमप्रकाश विठ्युजी चर्जन. | ३१२५२८/- |
| 11 | प्रभाकर गोपाळराव खेरेडे. | ३६४१२८/- |
| 12 | अशोक हरीरामजी राठी. | ६४४५२०/- |
| 13 | शिवदास हिरालाल नाचणकर. | ३८६८५६/- |
| 14 | ए.एम. रहमान | ४६७१२४/- |
| 15 | प्रमिला शामराव कपाळे | ३४१५२०/- |

उपरोक्त अनियमितते बाबत लेखा विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 65 दिनांक 15/02/2020 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन/ खुलासा सादर न केल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATVDKM6401 (Ref No : 83, Hmm No : 65)

PREVIEW

### *113 लेखा विभागाने वेतन राखीव निधी ठेवला नसल्या बाबत*

**लेखा विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 02**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नियम नियम 366 व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे चे कलम 91 प्रमाणे वेतन राखीव निधी या नावाने स्वतंत्र निधी उभारणे आवश्यक आहे. अमरावती महानगरपालिकेने नियमाप्रमाणे कार्यवाही केली नाही. |

1) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 नियम 366 व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 91 प्रमाणे वेतन राखीव निधीचे स्वतंत्र खाते ठेवून सर्व अधिकारी / कर्माचा-यांचे वेतन व भत्याच्या एकूण रकमेइतकी रक्कम दरवर्षी दिनांक 31 डिसेंबर रोजी किंवा तत्पूर्वी हस्तांतरीत करून निर्धारित केलेल्या कार्यपद्धती नुसार ठेवण्यात येईल. तसेच मनपा निधीपासून वेगळा स्वतंत्र ठेवण्यात येईल

2) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 मधील नियम 366 नुसार नमुना नंबर 78 व 79 प्रमाणे विहित

नमुन्यात परिरक्षित करणे आवश्यक असताना नियमोचीत कार्यवाही करण्यात आली नाही. या बाबत लेखा विभागास अर्ध समास पत्र क्रमाक 157 दिनांक 5/10 2020 नुसार वेतन राखीव निधीचे अभिलेखे मागणी केले असता, विभागाने लेखे उपलब्ध केले नाहीत. त्यामुळे लेखा परीक्षणास राखीव निधी बाबतची खात्री करता आली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत लेखा विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 157, दिनांक 5/10/2020 अन्वये अनुपालन सादर करणे बाबत कळविले असता अनुपालन सादर केले नसल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATVDKM6401 (Ref No : 85, Hmm No : 157)

### *114 अभियंता,भांडारपाल,रोखापाल, वाहन चालक यांचे कडून प्रतीभूती बंधपत्र न घेतले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :01 महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

मुंबई वित्तीय नियम 1959 चे नियम क्रमांक 51 साहित्य हाताळणे , रोख रकमेचा व्यवहार करणे , वाहन चालवने या कर्माचा-यांच्या कडून तसेच अभियंत्याकडून प्रतिभूती बंधपत्र घेणे आवश्यक आहे.परंतु अमरावती महानगरपालिकेने अशी कार्यवाही केली नाही.

PREVIEW

मुंबई वित्तीय नियम 1959 चे नियम क्रमांक 51 तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1965 चे नियम 80 ( अ) अन्वये किमती साहित्य हाताळणे,रोख रकमेचा व्यवहार करणे,वाहन चालवणे तसेच अभियंता यांचेकडूनतसेच स्वायत्त संस्थेच्यावतीने रक्कमा जमा करणे त्याब्यात ठेवणे हे कामा सोपविण्यात आले आहे.अशा कर्मचा-याकडून सक्षम प्राधिका-याने मंजूर केलेल्या नमुन्यात जमानत किंवा प्रतिभूती बंधपत्र घेणे आवश्यक आहे.

अमरावती महानगरपालिकेने सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात अभियंता, भांडारपाल, रोखापाल वाहनचालक यांचे प्रतिभूती बंधापात्राची मागणी केली असता कोणताही अभिलेख उपलब्ध करून दिला नाही.या बाबत अर्धसमास पत्र क्रमांक 138 दिनांक 24/09/2020 अन्वये खुलासा अनुपालन सादर करणे बाबत कळविले असता विभागाने खुलासा /अनुपालन सादर न केलेने आक्षेप कायम करणेत येत आहे.

## *115 जल व मल प्रवाह निधीची स्थापना न करणे व कलमात नमूद बाबीवर खर्च न होणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

| |
|---|
| महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 91 (ब) नुसार महानगरपालिकेने जल व मल प्रवाह निधी नावाचा एक स्वंतंत्र निधी स्थापन करून, अधिनियमातील कलम 134 ते 138 व प्रकरण 12 व 13 यात नमूद केल्याप्रमाणे सदरच्या प्रयोजनासाठी स्वतंत्र जल व मल प्रवाह निधी या नावाने प्राप्त होणारा निधी खात्यात जमा करणे आवश्यक आहे. सदर निधीचा वापर प्रकरण 12 व 13 मधील तरतुदी आमलात आणणेकामी त्याच प्रयोजनासाठी खर्च करतील व वर्षाअखेरीस शिल्लक राहणारा निधी महानगरपालिकेने गुंतवणूक ठेव कामी वापरायचा आहे. उपरोक्त नमूद कार्यपद्धती प्रमाणे सदरचा स्वतंत्र निधी अस्तित्वात आणण्याचे निर्देश असतना महानगरपालिकेने स्वतंत्र निधी स्थापन केला नाही. |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 91( ब) नुसार महानगरपालिकेने जल व मल प्रवाह निधी नावाचा एक स्वंतंत्र निधी स्थापन करून, अधिनियमातील कलम 134 ते 138 व प्रकरण 12 व 13 यात नमूद केल्याप्रमाणे सदरच्या प्रयोजनासाठी स्वतंत्र जल व मल प्रवाह निधी या नावाने प्राप्त होणारा निधी खात्यात जमा करेल व सदर निधीचा वापर प्रकरण 12 व 13 मधील तरतुदी आमलात आणणेकामी त्याच प्रयोजनासाठी खर्च करतील व वर्षाअखेरीस शिल्लक राहणारा निधी महानगरपालिकेने गुंतवणूक ठेवकामी वापरायचा आहे.
उपरोक्त नमूद कार्यपद्धती प्रमाणे सदरचा स्वतंत्र निधी अस्तित्वात आणण्याचे निर्देश असतना महानगरपालिकेने स्वतंत्र निधी स्थापन केला नाही. सदर बाब नियमबाह्य असून वैधानिक तरतुदीचे उल्लंघन करणारी आहे.
महानगरपालिकेने अधिनियमातील तरतुदीनुसार जल व मलप्रवाह स्वतंत्र निधीची स्थापना करणे आवश्यक असून जल व मल प्रवाह निधीची स्थापना करून अनुपालन दर्शवण्यात यावे.
उपरोक्त अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 182 दिनांक 28/10/2020 नुसार विभागास अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन सादर न केल्याने परिच्छेद कायम करण्यात येत



PREVIEW

आहे.

DATVDKM6401 (Ref No : 96, Hmm No : 182)

## *116 ठेव नोंदवही बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नियम 295 नुसार अमरावती शहर महानगरपालिका, अमरावती यांस ठेकेदारकडून, पुरवठादाराकडून सन 20 15-2016 या आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या अनामत रकमेच्या नोंदी ठेवीच्या स्वरुपात ठेव म्हणून नोंदवही नमुना नंबर 24 मध्ये घेवून नोंदवही अद्यावत ठेवणे आवश्यक आहे. मागणी करूनही नोंदवही लेखा परीक्षणास सादर करण्यात आली नाही. त्यामुळे आर्थिक वर्ष सन 2015-2016 मध्ये ठेवी या सदराखाली किती रक्कम जमा झाली, पैकी किती रक्कम मागणीदारास प्रदान केली व वर्षा अखेरीस किती रक्कम शिल्लक राहिली, याची पडताळणी नोंदवही अभावी पडताळता आला नाही. |

अमरावती महानगरपालिका, अमरावती यांस ठेकेदारकडून, पुरवठादाराकडून व इतर संकीर्ण रक्कमा, सन 2015-2016 या आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या अनामत रकमेच्या नोंदी ठेवीच्या स्वरुपात ठेवनोंदवही म्हणून, महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम 295 नुसार नमुना नंबर 24 मध्ये घेवून नोंदवही अद्यावत ठेवणे आवश्यक आहे. अर्धसमास पत्र क्रमांक 1 दिनांक 16/12/2019 तसेच वारंवार तोंडी मागणी करून व पुनश्च अर्धसमास क्र.138 दिनांक 21/09/2020 नुसार ठेव नोंदवहीची मागणी केली असता, लेखापरीक्षणास नोंदवही सादर करणेत आली नाही.

आर्थिक वर्ष सन 2015-2016 मध्ये ठेवी या सदराखाली किती रक्कम जमा झाली, पैकी किती रक्कम मागणीदारास प्रदान केली व वर्षा अखेरीस किती रक्कम शिल्लक राहिली, शिल्लक रकमेचा पडताळणी नोंदवही अभावी पडताळता आला नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 चे नियम 299 नुसार महसुली जमा शीर्षकाखाली तीन वर्षापेक्षा अधिक कालावधीच्या ठेवी व्यपगत करून महसुली जमा शीर्षकाखाली जमा झालेली रक्कम मनपा सर्वसाधरण सभेची मान्यता घेवून मागणीदारास प्रदान केलेल्या रकमांची खात्री करता आली नाही. तरी ठेव नोंदवही अद्यावत करून लेखा परीक्षणास सादर करावी.



PREVIEW

उपरोक्त अनियमितते बाबत अर्धसमास पत्र क्रमांक 138 दिनांक 21/09/2020 नुसार संबंधित विभागास अनुपालन सादर करण्यास कळविणेत आले होते परंतु अनुपालन प्राप्त न झाल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATVDKM6401 (Ref No : 97, Hmm No : 138)

## *117 कंत्राटदार /पुरवठादर यांचे देयकातून कपात केलेल्या शासकीय विम्याच्या रकमा विलंबाने भरणा केलेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 2**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

अमरावती महानगरपालिकेने सन 2015-2016 या वित्तीय वर्षात, कंत्राटदार आणि पुरवठादार याचे देयकातून शासकीय विमाच्या रकमा वसूल करून भरणा करण्यात आल्या आहेत. सदरच्या रकमा विलंबाने भरणा केल्याचे निदर्शनास आले आहे.

PREVIEW

अमरावती महानगरपालिकेने सन 2015-2016 या वित्तीय वर्षात, कंत्राटदार आणि पुरवठादार याचे देयकातून शासकीय विमाच्या रकमा पुढील प्रमाणे वसूल करून भरणा करण्यात आल्या आहेत. सदरच्या रकमा विलंबाने भरणा केल्याचे निदर्शनास आले आहे.

| योजनेचे नाव | कालावधी | रक्कम | भरणा चालन दिनांक |
|---|---|---|---|
| मनपा निधी | एप्रिल 2015 ते मार्च 2016 | 4077480 | ---- |
| अंबादेवी | एप्रिल 2015 ते मार्च 2016 | 32067 | 10/02/2017 |
| विकास शुल्क (बा.व प) | एप्रिल 2015 ते मार्च 2016 | 1,84,188/- | 10/02/2017 |
| विकास शुल्क (भू.वि) | एप्रिल 2015 ते मार्च 2016 | 71,574/- | 10/02/2017 |
| दलीत वस्ती | एप्रिल 2015 ते मार्च 2016 | 3,38,922/- | 10/02/2017 |
| वृक्ष प्राधिकरण | एप्रिल 2015 ते मार्च 2016 | 5455/- | 10/02/2017 |
| आमदार | एप्रिल 2015 ते मार्च 2016 | 6856/- | 10/02/2017 |
| खासदार | एप्रिल 2015 ते मार्च 2016 | 402 | 10/02/2017 |

| | | | |
|---|---|---|---|
| अतिवृष्टी | एप्रिल 2015 ते मार्च 2016 | 51.209 | 10/02/2017 |
| रस्ते अनुदान | एप्रिल 2015 ते मार्च 2016 | 3.06,669 | 10/02/2017 |
| घरकुल | एप्रिल 2015 ते मार्च 2016 | 24004 | 10/02/2017 |
| 14 वित्त आयोग | एप्रिल 2015 ते मार्च 2016 | 153381 | 10/02/2017 |
| भुयारी गटार | एप्रिल 2015 ते मार्च 2016 | 6044 | 10/02/2017 |
| नागरोत्थान | एप्रिल 2015 ते मार्च 2016 | 335107 | 10/02/2017 |
| आय.एस.डी.एम.टी | एप्रिल 2015 ते मार्च 2016 | 72086 | 10/02/2017 |
| 13 वा वित्त आयोग | एप्रिल 2015 ते मार्च 2016 | 295490 | 10/02/2017 |
| त्रिवेणी | एप्रिल 2015 ते मार्च 2016 | 3944 | 10/02/2017 |
| नाझुल | एप्रिल 2015 ते मार्च 2016 | 304841 | ---- |
| प्राथ.सोयी सुविधा | एप्रिल 2015 ते मार्च 2016 | 942591 | --- |

यावर लेखापरीक्षणाचे खालील अभिप्राय आहेत.

1) शासकीय विमा भरणा करण्यात आलेली रक्कम कोणत्या देयकातून, कोणत्या कामाची कपात केली आहे याचा तपशील देयकावर नाही त्यामुळे कोणत्या देयकातील रक्कम आहे याची लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

2) भरणा करण्यात आलेली रक्कम कोणत्या प्रमाणक क्र. व दिनांकानुसार रोखवहीत खर्च टाकली तो प्रमाणक क्रमांक व दिनांक देयकावर नसल्याने रोखवहीत सदरची रक्कम कोणत्या तारखेस खर्च टाकली याची लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

3) सन 2015-2016 च्या रक्कमा दिनांक- 10/02/2017 रोजी विलंबाने भरणा केल्या आहे आहेत. विलंबा बाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

4) नझुल व प्रथा.सोयी सुविधा या योजनेच्या कामातील कपात केलेल्या रक्कमा, अनुक्रमे 304841 व 942591 शासन सदरी भरणा केल्याचे चालन नस्ती सोबत जोडले नाही. त्यामुळे सदरच्या रक्कमा केव्हा शासन सदरी भरणा केल्या याची खात्री लेखापरीक्षणास करता आली नाही.

5) देयकातील चालन पाहता खालील चलनांच्या रकमा मुदती नंतर भरणा केल्याचे (payment period expired ) चलनावरकेले नमूद आहे.

| योजना | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| अंबादेवी | 32067 /- | payment period expired |
| 14 वित्त आयोग | 153381/- | payment period expired |
| नगरोथान | 335107/- | payment period expired |
| आय.एस.डी.एम.टी | 72086/- | payment period expired |
| 13वित्त आयोग | 295490/- | payment period expired |

सदर मुदतबाहय चालन भरण्यामुळे शासनाचा हेतू साध्य झाला नाही तरी या बाबत समर्थनीय खुलासा



PREVIEW

करण्यात यावा.

उपरोक्त अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 167 दिनांक 13/10/2020 नुसार अनुपालन / खुलासा दर्शविण्यास कळविले असता विभागानेअनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATVDKM6401 (Ref No : 98, Hmm No : 167)

## *118 वेतनातून /अथवा देयकातून वजाती करण्यात आलेल्या विविध रक्कमा विहित खाती उशिरा भरणा केले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| अमरावती महानगरपालिकेने सन 2015-2016 मध्ये वेतनातून / अथवा पुरवठादाराच्या देयकातून वजाती केलेल्या रक्कमा त्या त्या खाती उशिराने भरणा केल्या आहेत. संबधीत देयके तपासली असता देयकामध्ये कोणत्या कामाच्या देयकातील रक्कम कपात केली आहे याचा तपशील देयकावर नमूद केला नसल्याने सर्व कपात करण्यात आलेल्या रकमा भरणा केल्या असल्याची खात्री करता आली नाही. |

PREVIEW

अमरावती महानगरपालिकेने सन 2015-2016 या आर्थिक वर्षात वेतनातून अथवा पुरवठादाराच्या देयकातून वजाती करण्यात आलेल्या विविध रकमा वेगवेगळ्या लेखाशिर्षाच्या, त्या त्या खाती जमा केल्या आहेत. सदरच्या रक्कमा नियमितपणे सत्वर भरणा करणे आवश्यक आहे. सदर रक्कमा लेखाशीर्ष खालील प्रमाणे आहे.

1)आयकर,(income tax)

2) गौण खनिज (Royalty)

3) व्यवसाय कर' (profession tax.)

4)भविष्य निर्वाह निधी (G.P.F.)

5) कामगार विमा lebour insurance)

6) व्हट (Vat )

7)आयुर्विमा (L.I.C)

1) वरील पैकी निवड महिन्यातील आयकराची कपात करण्यात आलेल्या रकमांची चलने, लेखे व पोहोच पावती तपासली असता सरासरी एक महिन्याच्या विलंबाने आयकर कपातीच्या रक्कमा विहित खाती जमा केल्याचे दिसून येते. संबधीत देयके तपासली असता देयकामध्ये कोणत्या कामाच्या देयकातील रक्कम कपात केली आहे याचा तपशील देयकावर नमूद केला नसल्याने सर्व कपात करण्यात आलेल्या रकमा भरणा केल्या असल्याची खात्री करता आली नाही.

तसेच गौण खनिज, व्यवसायकर, भ.नि.नि. कामगार विमा, मुल्यावार्धीतकर, आयुर्विमा निधी रक्कमा, नविन अंशदायी निवृत्ती वेतन योजना अंतर्गत कपाती योग्य त्या शासकीय लेख्यात सत्वर भरणा केले बाबतचे चलने, पोहोच इत्यादी अभिलेख लेखापरीक्षणास पुरवण्यात आले नाहीत. त्यामुळे कपातीच्या रक्कमा योग्य सदरी विहित कालावधीत भरणा झाल्याची खात्री होवू शकली नाही .

उपरोक्त अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 168 दिनांक 13/10/2020 अन्वये खुलासा अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन सादर केले नसल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे

DATVDKM6401 (Ref No : 99, Hmm No : 168)

## *119 सर्वसाधारण रोखवहीतील अनियामिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 08**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

अमरावती महानगरपालिकेने योजनानिहाय स्वतंत्र खाती उघडली असनू सर्व योजनाचे एकच संयुक्त रोखपुस्तक ठेवले आहे. योजनानिहाय स्वतंत्र रोखपुस्तके ठेवण्यात आली नाहीत. महिना अखेरीस नमुना नंबर 5 ताळमेळ घेतला नाही. वेळोवेळी नियमबाह्यपणे 13 व्या वित्त आयोगातून 14 व्या वित्त आयोगातून मनपा



PREVIEW

फंडात रकमा वर्ग करण्यात आल्या आहेत. तसेच रस्ते दुरुस्ती मधून अतिवृष्टी मध्येही वर्ग करण्यात आहेत. त्यामुळे एकाच रोखपुस्तकात सर्व योजनांचा जमा व खर्चाचा हिशोब ठेवण्यात येत असल्यामुळे शासकीय अनुदानातून होत असलेला खर्च त्या त्या मंजूर योजना शिवाय अन्य बाबीवर करण्यात येत नाही याची खात्री होत नाही.

अमरावती महानगरपालिकेकडील सन 2015-2016 या आर्थिक वर्षातील सर्वसाधारण रोखवहीची तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता आढळून आल्या आहेत.

1) अमरावती महानगरपालिकेत विविध योजनांसाठी स्वतंत्र बँक खाती उघडण्यात आली असून, शासकीय अनुदानाची योजनानिहाय स्वतंत्र रोखपुस्तके ठेवण्यात आली नाहीत.एकाच रोखपुस्तकात सर्व योजनांचा जमा व खर्चाचा हिशोब ठेवण्यात आलेला आहे. महानगरपालिकेने वर्गीकरण नोंदवही ठेवली नाही. त्यामुळे शासकीय अनुदानातून होत असलेला खर्च त्या त्या मंजूर योजना शिवाय अन्य बाबीवर करण्यात येत नाही याची खात्री होत नाही.

2) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 मधील नियम क्रमांक 398 नुसार प्रत्येक महिना अखेर रोखवहीत नोंदविलेल्या जमा व खर्च रक्कमांच्या नोंदी पासबुकातील नोंदीशी तुलना करून शिल्लक रकमेची तपासणी करणे आवश्यक आहे. रोखापाल रकमेच्या नोंदी तपासणार नाही तर धनादेश क्रमांक, नोंद क्रमांक किंवा अदात्याचे तसेच प्रदात्याचे नाव इत्यादीच्या नोंदी देखील तपासणी करेल. मात्र लेखापरीक्षण कालावधीत रोखवहीतल जमा व खर्च रकमांची पडताळणी महिना अखेरीस बँक पासबुकाच्या रकमची जुळवणी केली नाही. तरी तफावत रकमांचा ताळमेळ घेवून प्रमाणित करणे आवश्यक आहे.

3) देयकातील प्रदानाच्या नोंदी पाहता रक्कम अदा करताना देयकातील वजावटीसह रकमा अदा करणे आवश्यक आहे. तथापी प्रदानाच्या वेळी फक्त निव्वळ रक्कम संबंधितास अदा केली जाते.

वजावटीच्या रकमा विलंबाने अदा केल्या आहेत. संबंधीत देयकातील सर्व वजावटीच्या शासकीय रकमाचा भरणा विलंबाने केला जातो. याबाबत विलंबाने भरणा केल्यामुळे देयकातील सर्व कपात केलेल्या रकमा शासन सदरी भरणा केल्याची खात्री करता आली नाही. तरी कपातीच्या रकमा विलंबाने भरणा केल्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

४) लेखासंहिता 2011 मधील नियम क्रमांक 53 मधील तरतुदीनुसार सक्षम अधिकारी यांनी स्वाक्षरीनिशी रोखवहीत प्रतिदिन व्यवहार समाप्ती करणे बंधनकारक असतना अशी कार्यवाही केलेली नाही.

५) लेखासंहिता नियम 2011 मधील नियम 54 नुसार प्रत्येक महिना अखेरीस, बँक नोंदवही मधील नोंदीची, बँक नमुना नंबर 5 मध्ये ताळमेळ विवरणपत्र तयार करणे बंधनकारक असतना ताळमेळ घेतला जात नाही.

६) रोखनोंदवही तपासणी केली असता सर्व योजनांठी एकच नोंदवही ठेवली असल्याने लेखा विभागाने वेळोवेळी खालील प्रमाणे रकमा 13 वित्त आयोगातून 14 व्या वित्त आयोगातून मनपा फंडात ,रक्कमा जमा केल्या आहेत.रस्ते दुरुस्ती मधून अतिवृष्टी मध्ये,आर.ओ.बी. मधून नगरोथ्यान मध्ये नियम बाहय रकमा वर्ग केलेल्या आहेत.



PREVIEW

13 व्या वित्त व 14 व्या वित्त आयोगासाठी स्वतंत्र खाते असतना रकमा मनपा फंडात जमा कोणत्या प्रधीकारा अन्वये एका खात्यातून काढून दुस-या खात्यात जमा केल्या जातात,याचा खुलासा होणे आवश्यक आहे. रोखवहीमध्ये कोणत्या प्रमाणकान्वये रक्कम खर्च टाकली तो प्रमाणक नंबर रोखवही मध्ये नमूद करणे आवश्यक असतना प्रमाणक क्रमांक नमूद केला नाही.

7) रोखपुस्तका मध्ये yourself म्हणून रकमा खर्च टाकल्या आहेत. स्व:ताच्या नावे रक्कम काढून वर्ग करण्याचे प्रयोजना बाबत खुलासा होणे अत्यंत आवश्यक आहे.

8) रोखपुस्तके महानगरपालिकेच्या शिक्क्यांनीमुद्रित केलेली नाहीत तसेच प्रमाणित ही केलेली नाहीत.

DATVDKM6401 (Ref No : 136, Hmm No : 01)

PREVIEW

## *120 भविष्य निर्वाह निधी बृहतपत्रक लेखापरीक्षणास उपलब्ध करून न देणेबाबत*

**लेखा विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 3**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील नियम 36 अन्वये तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 466 (5) ग नुसार नमुना नंबर 116 मधील भविष्य निर्वाह निधीचे बृहत पत्रक नोंदवही ठेवणे आवश्यक असतना महानगरपालिका लेखा विभागाने बृहत पत्रक ठेवलेले नाही. त्यामुळे खात्यांची स्थिती कळू शकली नाही. तरी सबंधित विभागावर स्थानिक निधी लेखा अधिनियम 1930 सुधारणा 2011 चे कलम 8 अन्वये लेखा परीक्षणास अभिलेख सादर न केल्यामुळे रक्कम रुपये 25000/- दंडाची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

अमरावती महानगरपालिकेचे सन 2015-2016 चे लेखा परीक्षणामध्ये भविष्य निर्वाह निधीचे लेख्या बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 2011 नियम 466 (5) ग नुसार नमुना नंबर 116 मध्ये बृहत पत्रक नोंदवही ठेवणे आवश्यक असताना लेखा विभागाने नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे लेख्यांची स्थिती कळू शकली नाही

2) कर्मचाऱ्यांचे वेतनातून कपात करणेत आलेल्या भविष्य निर्वाह निधीचे रकमा गुतंवणूक केले बाबत गुंतवणूक नोंदवही लेखा विभागास मागणी करूनही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

त्यामुळे गुंतवणूक केल्या बाबतची खात्री करता आली नाही.

3) सर्वसाधारण भविष्य निधी नियम 1998 मधील नियम 36 अन्वये तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 2011 चे नियम 466 (5) प्रमाणे प्रत्येक आर्थिक वर्ष संपल्यावर शक्य तितक्या लवकर वर्गणीदारास त्याचे खाते किती रक्कम जमा झाली याबाबत विवरणपत्र, ते अचूक असल्याबाबत कर्माचा-याची पोहोच घेणे आवश्यक आहे.तथापी अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत अर्धसमास पत्र क्रमाक 1 दिनांक 16/12//2019 अन्वये खुलासा दर्शविण्यास कळविले असता खुलासा / अनुपालन प्राप्त न झाले मुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.तरी सबंधित विभागावर स्थानिक निधी लेखा अधिनियम 1930 (सुधारणा 2011 ) चे कलम 8 अन्वये लेखा परीक्षणास अभिलेख सादर न केल्यामुळे रक्कम रुपये 25000/- दंडाची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

DATVDKM6401 (Ref No : 137, Hmm No : 01)

PREVIEW

### *121 अस्थापना खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

शासन नगरविकास विभाग निर्णय क्र. 1005/ वर्गीकरण / प्र/क्र/3790/05/नवि/24/दिनांक 04/05/2008 नुसार महानगरपालिकांना विकास कामासाठी पुरेसा निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यासाठी अस्थापना खर्चावर देखील नियंत्रण राहणे गरजेचे आहे.अस्थापना खर्चावर नियंत्रण राहणेसाठी जास्तीत जास्त 35% एवढी मर्यादा ठेवण्यात आली आहे. तथापी महानगरपालिकेचा अस्थापानावरील खर्च 77.73 इतका झाला असून मर्यादेपेक्षा 42.73 % जास्त आहे.

मनपा अमरावती सन 2015-2016 चे लेखापरीक्षणा दरम्यान महानगरपालिकेने सन 2015-2016 मध्ये अंदाज पत्रकातील माहिती नुसार व प्राप्त विवरण पत्रानुसार अस्थापानावरील खर्च 35% पेक्षा जास्त झाला असल्याचे दिसून येते.

1) एकूण महसुली उत्पन्न -----2089113109/-

2)अस्थापना विषयक खर्च ----1623915698/-

3) अस्थापना खर्चाची उत्पन्नाशी टक्केवारी- 77.73 %

शासन नगरविकास विभाग निर्णय क्र. 1005/ वर्गीकरण / प्र/क्र/3790/05/नवि/24/दिनांक 04/05/2008 नुसार महानगरपालिकांना विकास कामासाठी पुरेसा निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यासाठी अस्थापना खर्चावर देखील नियंत्रण राहणे गरजेचे आहे.अस्थापना खर्चावर नियंत्रण राहणेसाठी जास्तीत जास्त 35% एवढी मर्यादा ठेवण्यात आली आहे.तथापी महानगरपालिकेचा अस्थापानावरील खर्च 77.73 इतका झाला झाला असून मर्यादेपेक्षा 42.73 % जास्त आहे.

उपरोक्त अनियामितेबाबत विभागास अर्धसमासपत्र क्रमांक 200 दिनांक 11/12/2020 अन्वये खुलासा अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन सादर न केल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे

DATVDKM6401 (Ref No : 139, Hmm No : 200)

PREVIEW

## *122 अमरावती महानगरपालिका, सन 2015-2016 चा वार्षिक लेखा उपलब्ध न केलेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक लोलेस/2016/प्र.क्र.3/नावि/31 दिनांक 22 जानेवारी 2016 अन्वये महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाकडून,महानगरपालिकेच्या लेख्यांचे लेखापरीक्षण दरवर्षी पूर्ण केले पाहिजे.व पूर्ण झालेले लेखे प्रत्येक वर्षी 30 जून पूर्वी स्थायी समिती समोर सादर केले पाहिजेत. परंतु अशी कार्यवाही करण्यात आली नाही. |

अमरावती महानगरपालिका सन 2015-2016 मधील लेखापरीक्षणादरम्यान लेखा विभागास सन 2015-2016 चा वार्षिक लेखा उपलब्ध करून देणेबाबत अर्धसमास पत्र क्रमाक1दिनांक 16/12/2019, व अर्धसमास पत्र क्रमांक 72 दिनांक 17/02/2020 व दिनांक 80 दिनांक 27/02/2020 अन्वये वार्षिक लेखा सादर करणे बाबत कळविले असता विभागाने वार्षिक लेखा सादर केला नाही. त्यामुळे लेख्याची स्थिती कळू शकली नाही.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन परिपत्रक:-लोलेस-2016/प्र.क्र-3. नावि/31 दिनांक 22 जानेवारी 2016 अन्वये, महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाकडून महानगरपालिकेच्या लेख्यांचे लेखापरीक्षण दर वर्षी पूर्ण केले पाहिजे व पूर्ण झालेले लेखे प्रत्येक वर्षी 30 जून पूर्वी स्थायी समिती समोर सादर केले पाहिजेत परंतु अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 165 दिनांक 13/10/2020 अन्वये खुलासा/अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन सादर न केल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATSGCF7501 (Ref No : 140, Hmm No : 165)

PREVIEW

### *123 विविध योजनांचा निधी वळती करून मनपा फंडात वर्ग केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 2**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

अमरावती मनपाने सर्व योजनांसाठी एकच नोंदवही ठेवली असून बँक खाती स्वतंत्र ठेवली आहेत. विभागाने वेळोवेळी 13 व्या वित्त आयोगातून ,14 व्या वित्त आयोगातून,मनपा फंडात,रस्ते दुरुस्ती मधून अतिवृष्टी मध्ये आर.ओबी. मधून नगररोथ्यान मध्ये रक्कमा नियम बाह्य पणे वर्ग केल्या आहेत. मनपाने वर्गीकरण नोंदवही ठेवली नाही त्यामुळे योजनेसाठी प्राप्त झालेला निधी त्याच योजनेसाठी खर्च केल्या असल्याची खात्री करता आली नाही.

मनपा अमरावती सन 2015-2016 चे लेखापरीक्षण कालावधीतील रोखनोंदवहीची तपासणी केली असता, खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आली आहे.

1) रोखनोंदवही तपासणी केली असता, मनपाने सर्व योजनांसाठी एकच नोंदवही ठेवली असून बँक खाती स्वतंत्र ठेवली आहेत. विभागाने वेळोवेळी 13 व्या वित्तआयोगातून,14 व्या वित्त आयोगातून मनपा फंडात रकमा वर्ग केल्या आहेत, तसेच रस्ते दुरुस्ती मधून अतिवृष्टी मध्ये ,आर.ओ.बी.मधून नगरोथ्यान मध्ये रकमा वर्ग केल्या आहेत.

| क्र. | दिनांक | योजनेचे नाव | जमा खात्याचे नाव | रक्कम | धनादेश क्रमांक | बँकेचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 30/04/2015 | रस्ते दुरुस्ती नझुलमधून | अतिवृष्टी मध्ये | 15,00,000/- | 216000 | एच.डी.एफ. सी बँक |
| 2 | 08/05/2015 | आयडीबीय मनपा फंडातून | एच.डी.एफ.सी नगरोथ्यान मध्ये | 10,00,00,000/- | 540484 | एच.डी.एफ. सी बँक |
| 3 | 08/07/2015 | 13 व्या वित्त आयोगातून | मनपा फंडात | 2,00,00,000/- | 33173 | अक्शिस बँक |
| 4 | 15/07/2015 | 13 व्या वित्त आयोगातून | मनपा फंडात | 5,10,00,000/- | 033177 | flesruoy sgtr rof |
| 5 | 22/07/2015 | 13 व्या वित्त आयोगातून | मनपा फंडात | 70,00,000/- | 33179 | flesruoy sgtr rof |
| 6 | 23/07/2015 | 13व्या वित्त आयोगातून | प्रायमरी स्कूलमध्ये वर्ग | 1,56,18,378/- | 33180 | एच.डी.एफ. सी बँक |
| 7 | 05/08/2015 | 13 व्या वित्त आयोगातून | प्राथमिक सोयीसुविधा मध्ये वर्ग | 5,00,00,000/- | 033051 | एच.डी.एफ. सी बँक |
| 8 | 07/08/2015 | आर.ओ.बी.मधून | नागरोत्थान मध्ये जमा | 10,00,00,000/- | 009881 | एच.डी.एफ. सी बँक |
| 9 | 27/08/2015 | 13 व्या वित्त आयोगातून | मनपा फंडात वर्ग | 17,40,000/- | 033054 | ॲक्सिस बँक |
| 10 | 27/08/2015 | 13 व्या वित्त आयोगातून | मनपा फंडात वर्ग | 2,20,00,000/- | 033054 | ॲक्सिस बँक |
| 11 | 30/10/2015 | मनपा फंडातून | 13 व्या वित्त आयोगामध्ये | 2,00,00,000/- | 532813 | बँक ऑफ महाराष्ट्र |
| 12 | 04/11/2015 | 14 व्या वित्त आयोगातून | मनपा फंडात वर्ग | 2,00,00,000/- | 000573 | ॲक्सिस |

PREVIEW

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | बँक |
| 13 | 09/11/2015 | 14 व्या वित्त अयायोगातून | स्वच्छ भारत अभियान | 87,50,000/- | नंबर नाही | एच.डी.एफ. सी बँक |
| 14 | 21/11/2015 | 13 व्या वित्त आयोगातून | मनपा फंडात | 2,00,00,000/- | 033131 | ॲक्सिस बँक |
| 15 | 21/11/2015 | मनपाफंडातून | 13 व्या वित्त आयोगामध्ये | 11,70,000/- | 533724 | बँक ऑफ महाराष्ट्र |
| 16 | 27/11/2015 | 13 व्या वित्त आयोगातून | मनपा फंडात वर्ग | 11,70,000/- | 033132 | ॲक्सिस बँक |
| 17 | 19/12/2015 | 13 व्या वित्त आयोगातून | मनपा फंडात वर्ग | 1,50,00,000/- | 534197 | बँक ऑफ महाराष्ट्र |
| 18 | 19/01/2016 | 14 व्या वित्त आयोगातून | स्वच्छ भारत अभियान | 3,25,00,000/- | 252613 | एच.डी.एफ. सी बँक |
| 19 | 22/01/2016 | 14 व्या वित्त आयोगातून | मनपा फंडात | 6,79,77,880/- | 252614 | ॲक्सिस बँक |
| 20 | 25/02/2016 | 14 व्या वित्त आयोगातून | मनपा फंडात | 69,96,996/- | 252619 | ॲक्सिस बँक |
| 21 | 11/02/2016 | 14 व्या वित्त आयोगातून | मनपा फंडात | 63,18,760/- | 252620 | ॲक्सिस बँक |
| 22 | 18/02/2016 | रस्ते दुरुस्ती मधून | अतिवृष्टी मध्ये | 25,00,000/- | 253136 | एच.डी.एफ. सी बँक |
| 23 | 18/02/2016 | 14 व्या वित्त आयोगातून | स्वच्छ भारत मिशन | 1,00,00,000/- | 252625 | एच.डी.एफ. सी बँक |
| 24 | 15/03/2016 | एच.डी.एफ.सी प्रायमरी.मधून | मनपा फंडात | 1,05,02,844/- | 000092 | fles ruoy |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 25 | 22/03/2016 | 14 व्या वित्त आयोगातून | मनपाफंडात | 8,18,00,000/- | 252637 | ॲक्सिस बँक |
| 26 | 28/03/2016 | ॲक्सिस बँक | एच.डी.एफ.सीमध्ये वर्ग | 2,09,41,190 /- | 231418 | स्व:ताचे नावे |

13 वित्त आयोग,14 वा वित्त आयोगासाठी स्वतंत्र बँक खाती असतना, योजनेच्या रक्कमा कोणत्या प्रधीकारान्वये मनपा  फंडात जमा करण्यात आल्या आहेत. याचा खुलासा होणे आवश्यक आहे. रक्कमा  वर्ग करतना कोणत्या प्रमाणकान्वये रक्कम वर्ग केली तो प्रमाणक नंबर रोख पुस्तकात नोंदविला नाही  अथवा त्याचे प्रमाणक लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाही, मनपाने, मनपाफंड व शासकीय निधीसाठी एकच सयुक्तिक नोंदवही ठेवली आहे. तसेच वर्गीकरण नोंदवही ठेवली नसल्याने  योजना निहाय प्राप्त झालेला निधी त्याच योजनेवर खर्च  झाला असल्याबाबत खात्री करता आली नाही. तरी विविध योजनेच्या रकमा मनपा फंडात वर्ग केल्यामुळे योजना निहाय प्राप्त झालेला निधी  त्याच बाबीवर खर्च केला असल्या बाबत लेखापरीक्षणाची खात्री पटवावी.

2) रोख पुस्तकामध्ये "your self " म्हणून रक्कमा खर्च टाकल्या आहेत. स्व:ताचे नावे रक्कमा काढून खर्च टाकल्या आहेत.याबाबत लेखा परीक्षणास खुलासा होणे आवश्यक आहे. सदर बाबनियम बाह्य आहे.

उपरोक्त अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 211 दिनांक18/12/2020 अन्वये  अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन सादर न केल्याने परिच्छेद कायम कराण्यात येत आहे.

DATVDKM6401 (Ref No : 141, Hmm No : 211)

## *124    रोखपुस्तक व बँक खात्यातील शिल्लक रकमेचा ताळमेळ न घातल्याने   दिनांक 31/03/2016 रोजीच्या अखेरच्या शिल्लकेमधील तफावतीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष  : 2015-2016**
**अनियमितता    संख्या    : 00**

*लेखा शीर्ष :00    महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम  : 9ड*

मनपा अमरावतीच्या लेखापरीक्षण कालावधीत मनपाच्या मनपा व शासन निधीच्या संयुक्त रोखवही जमा व खर्च  रकमांची पडताळणी केली असता 2015-2016  मध्ये वर्षा अखेरीस नोंदवहीची,बँक खाते पुस्तकातील

| |
|---|
| दिनांक 31/03/2016 अखेरच्या रकमांशी ताळमेळ घेतला असल्याचे दिसून आले नाही. वर्षाअखेर रोखवहीतील शिल्लक व बँक खात्यातील शिल्लक यामध्ये रुपये 131.98 कोटीची तफावत आहे. मनपातील लेखा विभागाने सदर तफावतीचे व ताळमेळ न घेण्याचे कारण दिलेले नाही. त्यामुळे सदर रकमेच्या खर्चाची नोंद रोख नोंदवही मध्ये न नोंदविता थेट बँकेतून झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. |

अमरावती मनपा सन 2015-2016 या आर्थिक वर्षाची रोखनोंदवही व संबंधित बँकेचे शिल्लक रकमांची दिनांक 31/03/2016 अखेरची पडताळणी केली असता, रोखवहीतील शिल्लक व बँक खात्यानिहाय शिल्लक रकमांची पडताळणी केली असता, महानगरपालिकेच्या संयुक्त रोखवहीतील शिल्लक व बँक खात्यात शिल्लक असलेली शिल्लक यात पुढील तपशीलात दर्शविल्याप्रमाणे तफावत आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 395 ते 398 अन्वये प्रत्येक महिन्याचे शेवटी सर्वसाधारण रोखवहीतील जमा व खर्च रकमांची जुळवणी करून तशा नोंदी रोखवहीत नोंदवून सदर रकमांची बँक पासबुक, स्क्रोल नुसार शिल्लक रकमेची पडताळणी करून तफावत रकमांचा सविस्तर तपशील नोंदवून ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

| अ.क्र | वर्ष | रोखवही प्रमाणे दिनांक 31/03/2016 अखेरची शिल्लक | योजनानिहाय बँक पासबुकाप्रमाणे दिनांक 31/03/2016 अखेरची शिल्लक | तफावत |
|---|---|---|---|---|
| 1 | 2015-2016 | 266,36,10,845.00 | 13437,15,581.88 | 13198,95,263.12 |

उपरोक्त रकमा क्रमाक 4 मध्ये दर्शवाल्या प्रमाणे शिल्लक रकमेशी योजना निहाय उघडण्यात आलेली व लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेली एकूण बँक खाती व त्यात असलेली दिनांक 31/03/2016 अखेरची शिल्लक या बाबतचा तपशील पुढील प्रमाणे

| अ क्र | योजनेचे नाव | बँकेचे नाव | खातेक्रमांक | दिनांक 31/03/2016अखेर खात्यात शिल्लक असलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | मनपा फंड | ॲक्शीस बँक ,अमरावती | 1540 | 4,36, 58,543.43 |
| 2 | स्थानिक संस्था कर | ॲक्शीस बँक, अमरावती | 3973 | 37,67,306.00 |
| 3 | सिंकींग फंड | ॲक्शीस बँक, अमरावती | 8187 | 11,27,927.00 |
| 4 | स्थानिक संस्था कर | बँक ऑफ इंडिया, अमरावती | 4735 | 34,46,583.85 |
| 5 | स्थानिक संस्था कर | बँकऑफ महाराष्ट्र,अमरावती | 4679 | 8,85,978.00 |
| 6 | स्थानिक संस्था कर | कॉसमॉस बँक अमरावती | 1038 | 17,97,504.00 |

PREVIEW

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | | एचडीएफसी बँक,अमरावती | 001152 | 15,83,415.00 |
| 8 | मनपा फंड | एचडीएफसी बँक,अमरावती | 1136 | 55,35,039.00 |
| 9 | Repayment | एचडीएफसी बँक,अमरावती | 8042 | 5,16,87,946.00 |
| 10 | | एचडीएफसी बँक,अमरावती | 899 | 4,56,409.00 |
| 11 | | एचडीएफसी बँक,अमरावती | 9590 | 9,26,500.00 |
| 12 | भुयारी गटार योजना | एचडीएफसी बँक,अमरावती | 8233 | 1,34,72,366.00 |
| 13 | रस्ते दुरुस्ती | एचडीएफसी बँक,अमरावती | 1162 | 5,13,945.00 |
| 14 | त्रिवेणी योजना | एचडीएफसी बँक,अमरावती | 729679 | 8,97,335.00 |
| 15 | मालमत्ता कर | एचडीएफसी बँक,अमरावती | 0020 | 6,09,50,200.45 |
| 16 | स्थानिक संस्था कर | आयसीआयबँक अमरावती | 1488 | 2,47,939.94 |
| 17 | अमरावती कल्याण निधी | आय.डी.बी,आय.बँक अमरावती | 1924 | 11,00,549.00 |
| 18 | मनपा फंड | आय.डी.बी,आय.बँक अमरावती | 374 | 1,18,50,264.97 |
| 19 | वृक्ष प्राधिकरण निधी | आय.डी.बी,आय.बँक अमरावती | 548 | 1,19,76,201.00 |
| 20 | रहदारी पास | आय.डी.बी,आय.बँक अमरावती | 568 | 82,878.22 |
| 21 | अंदादन निवृत्ती योजना | आय.डी.बी,आय.बँक अमरावती | 9122 | 1,13,07,759.00 |
| 22 | अग्नी सुरक्षा निधी | इंडियन बँक अमरावती | 2850 | 25,09,241.00 |
| 23 | स्थानिक संस्था कर | पंजाब नॅशनल बँक, अमरावती | 4760 | 53,14,891.57 |
| | एकूण | | | 23,50,96,723.45 |
| | मनपा विशेष निधी | | | |
| 24 | UTF | ॲक्शीस बँक, अमरावती | 97471 | 21,12,150.00 |
| 25 | भीमटेकडी सौदार्यीकरण | ॲक्शीस बँक, अमरावती | 9758 | 8,77,243.00 |
| 26 | शहर बस वाहतूक | ॲक्शीस बँक, अमरावती | 2904 | 6,30,108.00 |
| 27 | विकास शुल्क | ॲक्शीस बँक, अमरावती | 6314 | 48,95,654.64 |
| 28 | त्रिवेणी योजना | आय.डी.बी,आय.बँक | 0072 | 1,18,37,723.00 |

PREVIEW

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अमरावती | | |
| 29 | I.S.D.M.T | आय.डी.बी,आय.बँक अमरावती | 2295 | 84,22,322.00 |
| 30 | भुयारी गटार योजना | आय.डी.बी,आय.बँक अमरावती | 465 | 1,03,94,936.64 |
| 31 | ई टेंडर EMD | एस.बी.आय.अमरावती | 1815 | 39,73,862.00 |
| | | एकूण | | 4,31,43,999.28 |
| 33 | रोड व पूल | ॲक्शीस बँक, अमरावती | 24326 | 24,82,116.00 |
| 34 | अतिवृष्टी ( नैसाग्रिक आपत्ती | ॲक्शीस बँक, अमरावती | 24967 | 1,11,80,549.00 |
| 35 | रस्ते दुरुस्ती नझुल | ॲक्शीस बँक, अमरावती | 1445 | 98,34,083.00 |
| 36 | 14 वित्त आयोग | ॲक्शीस बँक, अमरावती | 2834 | 14,65,06,348.00 |
| 37 | अंगणवाडी | ॲक्शीस बँक, अमरावती | 1831 | 5,47,377.00 |
| 38 | अल्पसंख्याक अनुदान | ॲक्शीस बँक, अमरावती | 3188 | 45,53,388.00 |
| 39 | रस्तेदुरुस्ती Reliance/mseb | ॲक्शीस बँक, अमरावती | 4761 | 13,17,70,320.20 |
| 40 | स्पर्धा प्रशिक्षण | ॲक्शीस बँक, अमरावती | 6020 | 5,33,189.00 |
| 41 | गटार अनुदान (UIDSMT) | ॲक्शीस बँक, अमरावती | 7006 | 2,06,000.56 |
| 42 | विकास शुल्क 39 | ॲक्शीस बँक, अमरावती | 9033 | 1,30,74,920.64 |
| 43 | १३वा वित्त आयोग | ॲक्शीस बँक, अमरावती | 9638 | 14,66,012.00 |
| 44 | GIS अनुदान | ॲक्शीस बँक, अमरावती | 9860 | 19,36,310.00 |
| 45 | १३ वित्त आयोग | बँकऑफ महाराष्ट्र, अमरावती | 3274 | 1,56,264.00 |
| 46 | सुवर्ण जयंती योजना | सेन्ट्रल बँक इंडिया,अमरावती | 1571 | 14,97,47,011.00 |
| 47 | मुलभूत सोयी सुविधा | सेन्ट्रल बँक इंडिया,अमरावती | 7913 | 3,00,72,477.00 |
| 48 | रस्ते दुरुस्ती नझुल | देना बँक, अमरावती | 3840 | 1,54,51,959.00 |
| 49 | SJSRY | देना बँक, अमरावती | 24821 | 13,04,194.50 |
| 50 | नवबौद्ध घरकुल,अनु जाती | देना बँक, अमरावती | 32025 | 15,48,74,644.00 |
| 51 | दलीत वस्ती सुधारणा | देना बँक, अमरावती | 3841 | 1,565.00 |
| 52 | स्मार्ट सिटी | एचडीएफसी बँक, अमरावती | 0062 | 1,678.00 |

PREVIEW

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 53 | विकास शुल्क | एचडीएफसी बँक, अमरावती | 00910 | 8,35,22,327.00 |
| 54 | दुर्बल घटक | एचडीएफसी बँक, अमरावती | 0024 | 4,45,71,155.00 |
| 55 | प्राथमिकसोयी सुविधा | एचडीएफसी बँक, अमरावती | 3964 | 96,19,805.00 |
| 56 | अतिवृष्टी | एचडीएफसी बँक,अमरावती | 4673 | 1,54,918.00 |
| 57 | प्राथमिकशाळा अनुदान | एचडीएफसी बँक,अमरावती | 859 | 91,77,447.82 |
| 58 | जिल्हा नियोजन विकास समिती | आयडीबीआय बँक अमरावती | 0228 | 1,64,04,894.00 |
| 59 | नगरोथ्यान प्रकल्प | आयडीबीआय बँक अमरावती | 0063 | 53,34,449.00 |
| 60 | अग्निशमन बळकटीकरण | आयडीबीआय बँक अमरावती | 196 | 5,74,41,952.00 |
| 61 | विदर्भ वैधानिक मंडळ | आयडीबीआयबँक, अमरावती | 0115 | 24,06,391.00 |
| 62 | अंबानाला | आयडीबीआय बँक, अमरावती | 1970 | 48,036.56 |
| 63 | काटकसर निधी | आयडीबीआयबँक, अमरावती | 1991 | 3,85,296.00 |
| 64 | रोड ग्रांट | आयडीबीआय बँक, अमरावती | 1993 | 3,14,77,918.51 |
| 65 | B.R.GF | आयडीबीआय बँक, अमरावती | 2257 | 38,32,701.00 |
| 66 | दलीत वस्ती | आयडीबीआय बँक, अमरावती | 2269 | 4,40,56,452.44 |
| 67 | खासदार निधी आनंदराव अडसूळ | आयडीबीआय बँक, अमरावती | 2695 | 3,03,733.00 |
| 68 | अंबादेवी /एकविरा देवी | इंडियन बँक, अमरावती | 2003 | 86,00,517.00 |
| 69 | आधार योजना | इंडियन बँक, अमरावती | 3452 | 41,77,156.00 |
| 70 | जनगणना | इंडियन बँक, अमरावती | 7652 | 3,97,734.00 |
| 71 | विकास शुल्क | एसबीआय, अमरावती | 045 | 17,009.00 |
| 72 | विकास शुल्क,म्हाडा | एसबीआय, अमरावती | 381 | 18,73,366.00 |
| 73 | आमदार निधी | युनियन बँक, अमरावती | 1369 | 84,06,291.98 |
| 74 | उर्जा संवर्धन प्रकल्प | युनियन बँक, अमरावती | 2253 | 1,81,225.00 |
| 75 | शासकीय निधी | युनियन बँक, अमरावती | 63860 | 8,12,225.00 |
| 76 | I.H.S.D.P | युनियन बँक, अमरावती | 66976 | 1,81,93,655.34 |
| | एकूण | | | 102,70,97,032.15 |
| 77 | स्वच्छ भारत | एचडीएफसी बँक, अमरावती | 8723 | 3,80,38,936.00 |
| 78 | स्वीपर कल्याण | आयडीबीआय बँक, अमरावती | 630 | 3,38,891.00 |
| | एकंदर | | | 134,37,15,581.88 |

PREVIEW

1)वरील प्रमाणे विवरण पत्रातील आकडेवारीवरून रोखवाहिपेक्षा बँक खात्यातील शिल्लक 266,36,10,845.00-1343715581.88=131,98,95,263.12 ने कमी असल्याचे दिसून येते. उपरोक्त आढळून आलेल्या विसंगती मुळे रोखपुस्तकेतील शिल्लकेपेक्षा बँक खात्यातील शिल्लक कमी आहे यावरून 131.98 कोटीचा खर्च वहीत न नोंदविता नियमबाह्य पणे थेट बँकेतून झाला असल्याची शक्यता नाकारता येत नाही
2) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 चे नियम 395 ते 398 नुसार महिन्याच्या शेवटी रोख नोंदवहीत नोंदवलेल्या जमा व खर्चाची रक्कम पासबुकातील प्रत्यक्ष जमा व खर्च बाबीची तुलना करून बँक ताळमेळ घालण्यात आलेला नाही. सदरील बाब गंभीर स्वरुपाची असून वेळीच ताळमेळ घालणे आवश्यक व बंधनकारक आहे.
3)बँक ताळमेळा अभावी संयुक्त रोखवहीतील शिल्लक व योजना निहाय बँकेतील शिल्लक यामधील तफावत कोणत्या कारणामुळे आहे, व त्याची कारणे कोणती आहेत याचा उलघडा होवू शकला नाही.
4) ताळमेळा अभावी रोखवही व बँक स्क्रोल यामधील शिल्लक रकमा बरोबर असल्याची खात्री पटत नाही ताळमेळ नसल्याने काही गंभीर अनियमितता घडली असल्यास त्यावर भाष्य करता येत नाही.
5) मनपा निधीचे संयुक्त खाते व योजना निहाय बँक खात्यातील शिल्लक यांचा ताळमेळ घेतला नसल्याने एखादी गंभीर अनियमितता घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.
उपरोक्त अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 94 दिनांक 17/03/2020 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता लेखा विभागाने अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATVDKM6401 (Ref No : 142, Hmm No : 94)

PREVIEW

### *125 अमरावती मनपा सन 2015-2016 गुंतवणूक नोंदवहीबाबत*

**लेखा विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

अमरावती महानापालिका, सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात, लेखा विभागाने गुंतवणूक नोंदवही विहित नमुन्यात ठेवली नाही तसेच गुंतवणूक करताना, महाराष्ट्र महागरपालिका अधिनियम 1949 मधील नियम 92 (2) अन्वये गुंतवणूक करताना त्यास स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. या प्रमाणे सन 2015-2016 मध्ये गुंतवणूक करताना अशी कार्यवाही केल्या बाबत चे अभिलेख लेखा परीक्षणास उपलब्ध झाले

| |
|---|
| नाहीत. |

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 चे नियम 214 नुसार महापालिकेस चालू खर्चासाठी आवश्यक नसलेला कोणताही शिल्लक निधी शासनाच्या निर्देशानुसार सार्वजनिक रोख्यामध्ये किंवा अन्य कोणत्याही रोख्यामध्ये गुंतवणूक करता येईल.तसेच लेखा संहितेच्या नमुना नंबर 19 मध्ये नोंदवही ठेवील. गुंतवणूक नोंदवही मध्ये नगरपालिका निधी, विविध राखून ठेवलेले निधी, आणि विशिष्ट अनुदाने यामधून करणेत आलेल्या गुंतवणुकीच्या तपशिलाची नोंद घेण्यात येईल. सदर नोंदवही प्राधिकृत अधिका-याच्या व्यक्तिगत अभिरक्षेत ठेवण्यात येईल तसेच नोंदवही मध्ये गुंतवणुकीच्या सर्व नोंदी संपुष्टात आलेल्या गुंतवणुकीच्या नोंदी घेवून नोंदवही अध्यावत ठेवणे आवश्यक आहे.

अमरावती महानगपालिकेकडील गुंतवणूक नोंदवही तपासली असता महापालिकेने सन 2015-2016 मध्ये खालील प्रमाणे गुंतवणूक केल्याचे दिसून येते.

ROB योजना

| दिनांक | बँकेचे नाव | रक्कम | तारीख | मिळालेले व्याज |
|---|---|---|---|---|
| 09/05/2015 | ॲक्सिस बँक | 8,61,79,398/- | 30/09/2015 | 2770963/- |
| 01/07/2015 | ॲक्सिस बँक | 8,69,46,749/- | 30/09/2015 | 2,41,005/- |
| नवबौद्ध घरकुल योजना | | | | |
| दिनांक | बँकेचे नाव | रक्कम | तारीख | मिळालेले व्याज |
| 18/05/2015 | ॲक्सिस बँक | 2,00,00,000/- | 30/06/2015 | 1,41,370/- |
| 01/07/2015 | ॲक्सिस बँक | 2.01,41,370/- | 30/09/2015 | 3.64.062 /- |

यावर खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) गुंतवणूक नोंदवही विहित नमुन्यात ठेवण्यात आली नसून अद्यावत करण्यात आली नाही.

2) महाराष्ट्र महागरपालिका अधिनियम 1949 मधील नियम 92 (2) अन्वये गुंतवणूक करताना त्यास स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच गुंतवणूक काढताना देखील स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. या प्रमाणे सन 2015-2016 मध्ये गुंतवणूक करताना अशी कार्यवाही केल्या बाबत चे अभिलेख लेखा परीक्षणास उपलब्ध करून दिले नाहीत.

उपरोक्त अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 135 दिनांक-21/09/2020 अन्वये खुलासा अनुपालन दर्शविण्यास कळविले असता,विभागाने अनुपालन सादर केले नसल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे .

DATVDKM6401 (Ref No : 143, Hmm No : 135)

PREVIEW

## *126 अमरावती महानगरपालीकेच्या अतीक्रमण विभागाकडील भरणा नोंदवही, पावती पुस्तके माल पुस्तीका इत्यादीच्या अनुषंगाने अनियमीतता.*

**अतिक्रमण विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : लेखा विभाग महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| अतीक्रमण विभागाकडील भरणा नोंदवही, पावती पुस्तके माल पुस्तीका इत्यादी मधील अनियमितता बाबत. |

PREVIEW

अतीक्रमण विभागाकडील भरणा नोंदवही, पावती पुस्तके माल पुस्तीका इत्यादीची लेखापरीक्षणादरम्यान तपासणी केली असता त्या अनुषंगाने अनियमीतता खालीलप्रमाणे आहेत.

१. सन २०१५-१६ साठी अतिक्रमण विभागाने एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ या कालावधीसाठी एकूण पावती पुस्तकांचा वापर केला असून अनेक पावत्यांवर सक्षम प्राधीकारी यांनी वसूली रक्कम स्वीकारल्यानंतर स्वाक्षरी केलेली नाही.

२. अतिक्रमण विभागाकडील सन २०१५-१६ ची भरणा नोंदवही तपासली असता सदर नोंदवहीवर महापालीकेची गोल मुद्रा उमटविण्यात आलेली नसून सदर नोंदवही अतिक्रमण विभागाचे सक्षम अधीकारी यांनी प्रमाणीत केलेली नाही.

३. अतिक्रमण विभागाकडील सन २०१५-१६ ची माल पुस्तीका तपासली असता मालपुस्तीकेतील माहे जानेवारी १६ व मार्च २०१६ मधील प्राप्त पावती पुस्तकांचा साठा तपासला असता पावती पुस्तके क्रमांक 948,1143,1144,1200 पर्यंतची पावती पुस्तकांची नोंद मालपुस्तीकेत घेण्यात आलेली नसताना सदर पावती पुस्तकांचा वापर वसुलीसाठी करण्यात आल्याचे दिसून येते.

४. अतिक्रमण विभागाकडील सन २०१५-१६ ची माल पुस्तीकेत पृष्ठांवर गोल मुद्रा उमटविण्यात आलेली नसून सदर नोंदवही अतिक्रमण विभागाचे सक्षम अधीकारी यांनी प्रमाणीत केलेली नाही.

५. अतिक्रमण विभागाकडील मालपुस्तीकेत पृ.क्र.००१ वर दि.२५/०८/२०१५ रोजी लोहा रॉड कटींग १ नग प्राप्त असल्याची नोंद घेण्यात आलेली आहे. सदर नोंदीसमोर वस्तूची किंमत नमूद करण्यात आलेली नाही. माल पुस्तीकेतील सर्व प्राप्त वस्तूंच्या नोंदीसमोर वस्तूची किंमत नमूद केलेली नाही.

याबाबत अतिक्रमण विभाग यांना अर्धसमास पत्र क्रमांक 59, दि. 12/02/2020 अन्वये तीन दिवसांत अनुपालन दर्शविण्यास कळविले असता अनुपालन सादर न केल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

## *127 अमरावती महानगरपालीकेच्या अतीक्रमण विभागाकडील प्रमाणक खर्चातील अनियमीतता बाबत.*

**अतिक्रमण विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 03**

*लेखा शीर्ष : लेखा विभाग महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 25599.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 25599.00/-

अतीक्रमण विभागाकडील प्रमाणक खर्चात आढळलेल्या अनियमीतता बाबत.

अतीक्रमण विभागाकडील प्रमाणक खर्चात आढळलेल्या अनियमीतता खालीलप्रमाणे आहेत.

अतिक्रमण विभागाकडील लेखापरीक्षणासाठी निवड महिना जानेवारी व मार्च १६ मधील उपलब्ध करून देण्यात आलेली खर्च प्रमाणकांची तपासणी केली असता प्रमाणक क्रमांक १२७१२ ते १२७२७ दिनांक २७/०१/२०१६ सर्व प्रमाणकांमध्ये वाहन चालक व कुली मासिक नियमीत देयकासोबत अतिरिक्त तासाचे देयक अदा केल्याचे दिसून आले. सदर देयकांचा तपशील खालीलप्रमाणे.

| प्रमाणक क्रमांक व दिनांक | धारकाचे नांव | पदनाम | अतिरिक्त तासीका रक्कम रू. |
|---|---|---|---|
| १२७१२ दि २७/०१/१६ | मिथून वनवे | वाहन चालक | १७२० |
| १२७१३ दि २७/०१/१६ | पुंडलीक बायस्कर | वाहन चालक | १७२० |
| १२७१४ दि २७/०१/१६ | वासुदेव काठोळे | वाहन चालक | १७२० |
| १२७१५ दि २७/०१/१६ | दिनेश ढवळे | वाहन चालक | १९३५ |
| १२७१६ दि २७/०१/१६ | मजहर हुसेन | कुली | १६२० |
| १२७१७ दि २७/०१/१६ | मोहीत साहु | कुली | १४४० |
| १२७१८ दि २७/०१/१६ | अब्दुल सलमान | कुली | १६२० |
| १२७१९ दि २७/०१/१६ | बबलु यादव | कुली | १६२० |
| १२७२० दि | हेमंत | कुली | १४४० |

| | | | |
|---|---|---|---|
| २७/०१/१६ | जयस्वाल | | |
| १२७२१ दि २७/०१/१६ | राजीव मसराम | कुली | १५१२ |
| १२७२२ दि २७/०१/१६ | अमित मानके | कुली | १५१२ |
| १२७२३ दि २७/०१/१६ | राजेंद्र चौधरी | कुली | १६२० |
| १२७२४ दि २७/०१/१६ | मनिष काकडे | कुली | १६२० |
| १२७२५ दि २७/०१/१६ | आदेश आढाऊ | कुली | १४४० |
| १२७२६ दि २७/०१/१६ | जावेद सलीम शेख | कुली | १४४० |
| १२७२७ दि २७/०१/१६ | गोलू पाल | कुली | १६२० |
| | | एकूण | **२५५९९** |

1.उक्त अतिरिक्त तासीका बाबत अतिक्रमण विभागाकडील नोंदवही तपासली असता सदर नोंदवही अतिशय औपचारीक स्वरूपात ठेवण्यात आलेली असून सदर नोंदवहीत कोणत्या दिनांकास उपरोक्त नमूद कर्मचारी यांनी किती तास अतिरिक्त तास काम केले आहे आणि संबंधीत कर्मचारी यांनी अतिरिक्त तास काम केल्याबाबत त्यांची स्वत:ची स्वाक्षरी इत्यादी तपशील नोंदविण्यात आलेला नाही. त्यामुळे संबंधीतास उक्त देयकात नमूद अतिरिक्त तासीकांचे देयक किती तासासाठीचे आहे हे कोणत्या आधारावर निर्धारीत करण्यात आले आहे याबाबतची प्राधीकृत अभीलेखे अतिक्रमण विभागाकडे उपलब्ध नसल्याने उक्त एकूण रूपये २५५९९/- ची रक्कम वसूलीपात्र ठरते.

2.अतिक्रमण विभागाकडील प्रमाणक क्रमांक १४१५८ दि. ३/३/२०१६ तपासले असता संबंधीत धारक श्री. राजेंद्र गव्हाणे यांची दि. ३० जानेवारी २०१६ रोजीची अनुपस्थीती असताना संबंधीताचे एक दिवसाचे वेतन कमी आहरीत करणे आवश्यक होते. परंतु संबंधीतांना रू ४८३ अतिरीक्त प्रदान झाल्याचे दिसून येते.

3. प्रमाणक क्रमांक १८२७ दि. २७/०५/२०१५ अन्वये रूपये १,००,०००/- अग्रीम अतिक्रमण प्रमुख श्री. कुत्तरमारे यांनी घेतल्याचे दिसून येते. सदर अग्रीमाची रक्कम अतिक्रमण काढणे,अनाधीकृत बांधकामे पाडणे, शहरातील लहान मोठे नाले साफ करणे, वाहनावर वाहन चालक लावणे व मजूर लावणे, मजूरांना किमान वेतन अदा करणे या प्रयोजनासाठी घेतल्याचे प्रमाणकावरून दिसून येते. परंतु प्रत्यक्षात सदर अग्रिमातून अग्रिम घेण्यापूर्वीच्या कालावधीचे म्हणजेच दि.०५/०३/२०१५ पासूनचे वेतन एकूण रू.९३६००/- अदा करणे म्हणजे अग्रिमातून नियमबाहय प्रदान करणे आहे.

याबाबत अतिक्रमण विभाग यांना अर्धसमास पत्र क्रमांक 61, दि. 12/02/2020 अन्वये तीन दिवसांत अनुपालन दर्शविण्यास कळविले असता अनुपालन सादर न केल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATBPKM7901 (Ref No : 21, Hmm No : 61)

PREVIEW

## *128 अमरावती महानगरपालीकेच्या अतीक्रमण विभागाकडील वाहनाचे लॉग बुकमधील अनीयमीतताबाबत.*

**अतिक्रमण विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष : लेखा विभाग महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| अतीक्रमण विभागाकडील वाहनाचे लॉग बुकमधील नोंदी विहित नसणे, सक्षम प्राधिकारी यांची स्वाक्षरी नसणे, इंधनाचा हिशोब अचूक न घेणे मधील अनियमीतता. |

अतीक्रमण विभागाकडील वाहनाचे लॉगबुक मध्ये आढळलेल्या अनियमीतता खालीलप्रमाणे आहेत. अतिक्रमण विभागाकडे वाहन क्र.एक्स-७० पोकलँड, एम.एच.२७- एसी-९९५७ जेसीबी, एम.एच.-२७ एएन-०६११ सुमो, एम.एच.-२७ सी-५३३ ट्रक इत्यादी वाहने असून लेखापरीक्षणा दरम्यान वाहन क्रमांक एम.एच. २७ एसी-९९५७ च्या लॉगबुक ची तपासणी केली असता खालीलप्रमाणे अनियमीतता दिसून आलेल्या आहेत.

१. सदर लॉग बुकमधील माहे जानेवारी १६ (पृक्र. २० ते पृक्र.३१) व माहे मार्च २०१६ (पृ.क्र.४१ ते पृ.क्र.५०) वरील नोंदी तपासल्या असता सदर नोंदीसमोर अतिक्रमण पथक प्रमुख यांनी स्वाक्षरी केलेली नाही.

२. उक्त वाहनापैकी एकाही वाहनाचे लॉग बुक महापालीकेची गोल मुद्रा उमटवून सक्षम प्राधीकारी यांनी प्रमाणीत केलेले नाही.

३. सदर वाहनावर एका तासाला ६ लीटर इंधन खर्च होत असल्याचे लॉग बुक मधील नोंदीवरून दिसून येते. माहे जानेवारी १६ अखेरचा गोषवारा तपासला असता एकूण तासाचे तुलनेत एकूण ५ लीटर इंधन अधीकचे खर्च झाल्याचे दिसून येते.

४. सदर लॉग बुक मध्ये अनेक दिनांकास व्हाईटनर लावून खाडाखोड केल्याचे निदर्शनास येते.हि बाब अतिशय गंभीर असून अपहार करण्याचा हेतू दिसून येतो.

५.अतिक्रमण विभागाचे वाहन क्र.एम.एच.२७ सी-५३३ चे लॉगबुकमधील माहे जून २०१५ चे नोंदी तपासल्या असता नोंदवहीतील सर्व रकाने भरण्यात येत नसल्याचे दिसून आले. प्रत्येक नोंदीसमोर अतिक्रमण पथक प्रमुख यांनी स्वाक्षरी नोंदविणे आवश्यक असताना असे करण्यात आलेले नाही.

६. माहे जून २०१५ महिन्यात जप्ती नोंदवहीला कार्यवाहीच्या दि.२,६,१२,१६,२६ जून २०१५ इत्यादी

PREVIEW

दिनांकासच नोंदी असताना लॉगबुक नुसार वाहन क्र.एम.एच.२७ सी-५३३ वापरात दाखवण्यात आले असून उक्त नमूद दिनांक सोडून माहे जून महिन्यातील उर्वरीत दिनांकासाठी एकूण इंधन खर्च २५० लीटर दर्शविण्यात आला आहे. सदर नोंदीसमोर सक्षम अधीकारी यांनी स्वाक्षरी नोंदविलेली नाही. त्यामुळे माहे जून २०१५ महिन्यात दि.२,६,१२,१६,२६ जून २०१५ इत्यादी दिनांकाच्या कार्यवाही सोडल्या तर इतर दिनांकास अतिक्रमण नव्हतेच असे मान्य करता येण्याजोगे नसल्याने लॉग बुकमधील इतर दिनांकास नोंदविण्यात आलेला इंधन खर्च लेखापरीक्षणास मान्य नाही. अशा प्रकारची कार्यवाही वेळोवेळी झाल्याचेही लेखापरीक्षणाचे मत आहे.

७. अतिक्रमण प्रमुख यांनी आपले विभागाकडील सर्व वाहनांच्या लॉगबुकचा आढावा घेऊन उपरोक्तप्रमाणे अनियमीतता असल्यास त्यातील त्रुटी दूर करून अनुपालन दर्शवावे.

याबाबत अतिक्रमण विभाग यांना अर्धसमास पत्र क्रमांक 62, दि. 12/02/2020 अन्वये तीन दिवसांत अनुपालन दर्शविण्यास कळविले असता अनुपालन सादर न केल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATBPKM7901 (Ref No : 22, Hmm No : 62)

## *129 अमरावती महानगरपालीकेच्या सन 2015-16 चे निरीक्षणादरम्यान अभीलेख शाखेत आढळलेल्या अनियमीतता बाबत.*

**अभिलेखे विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 07**

*लेखा शीर्ष : लेखा विभाग महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| अभिलेख विभागातील अभिलेखांची वर्गवारी, सुरक्षितता, नष्टीकरण इत्यादीच्या अनुषंगाने अनियमीतता बाबत. |

अमरावती महानगरपालिका सन 2015-16 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करतांना अभिलेख विभागातील नोंदवह्या बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1.महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख नियम 2007 दिनांक 28/02/2008 मधील तरतुदी नुसार अमरावती महानगरपालिका अंतर्गत सदर अधीनियम अस्तीत्वात आलेपासून अभिलेखाचे वर्गीकरण अ, ब, क, ड निहाय करण्यात आले नसून अभिलेखे लाल, हिरवा, पिवळा व पांढरा असे गठ्ठयामध्ये बाधण्यात



PREVIEW

आलेले नाहीत.हि बाब अतिशय गंभीर आहे.

2. अभिलेख कक्षाची तपासणी केली असता अभिलेख कक्षात वाळवी/ पुस्तकी किडे/उंदीर/ झुरळ इत्यादी प्रकारचे प्राणी अभिलेख कक्षाची हानी करतात त्यामुळे अशा किटकापासून अभीलेखाचे संरक्षण व्हावे याकरीता उपाययोजना दिसून येत नाहीत.

3. महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख नियम 2007 मधील तरतुदी नुसार अधीनियम अस्तित्वात आल्यापासून महापालीकेअंतर्गत कार्यरत सर्व विभागाची एकत्रीत अभिलेख नष्टीकरणाची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4. अभिलेख कक्षाच्या सूरक्षिततेच्या दृष्टीने अभिलेख कक्षात प्रवेश करणाऱ्या कर्मचाऱ्याचे नाव, पदनाम, अभिलेख कक्षात प्रवेश कोणत्या कारणासाठी केला आहे त्याचा तपशील आणि संबंधीताची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे परंतू अशा कार्यवाहीसाठी विहित नोंदवही सन 2015-16 मध्ये ठेवण्यात आली नसल्याचे दिसून येते.

5. अभिलेख कक्षाची तपासणी केली असता बऱ्याचअंशी अभिलेखे विस्कळीत पडल्याचे दिसून आले. तसेच अभिलेख कक्षात आडगळीचे सामान अस्ताव्येस्त पडल्याचे दिसून आले. सदर अडगळीच्या सामानामुळे किटक व वाळवी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अभिलेख्याचे जतन व्यवस्थितरित्या होण्याच्या दृष्टीने सदर आडगळीचे सामान काढून घेण्यात यावे व अस्ताव्येस्त पडलेले गठ्ठे वर्गवारी निहाय ठेवण्यात यावे.

6. अभिलेख कक्षाची तपासणी केली असता अभिलेख कक्षातील रॅक हे नेहमी भिंती, जमीन व छत यांच्यापासून कमीत कमी 15 सें.मी. दूर रहील याची दक्षता घेण्यात यावी.

7. मा.आयुक्त अमरावती यांचे परीपत्रक क्र.214/2003 दि.30/12/2003 अन्वये महापालीकेअंतर्गत सर्व विभागांना अभीलेखाचे नष्टीकरण करणे/सुरक्षीत ठेवणे/कायमस्वरूपी अभीलेखागारात अभीलेखे जमा करणे याबाबत सूचीत करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने अभीलेखागार कक्षाकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या बांधकाम विभाग,शीक्षण विभाग, अग्नीशमन विभाग इत्यांदी विभागांच्या नष्टीकरणाच्या नोंदवहया उदाहरणादाखल तपासल्या असता मा.आयुक्त यांचे माहे 12/2003 मधील आदेशान्वये नोंदवहीमध्ये अणुक्रमीत करण्यात आलेले अभीलेखे जाळून नष्ट केल्याचे नमूद करण्यात आले आहे. परंतु सदर विभागाकडील व इतर विभागाकडील कायमस्वरूपी अभीलेखे अभीलेख विभागात जतन केल्याच्या नोंदवहीत नोंदी दिसून येत नाहीत तसेच अशा प्रकरच्या नोंदवहया लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. यावरून अमरावती महापालीकेअंतर्गत कायमस्वरूपी अभीलेखे जतन केले जात नाहीत अशी लेखापरीक्षणाचे मत आहे.

याबाबत अभिलेख विभाग यांना अर्धसमास पत्र क्रमांक 63 दि. 12/02/2020 अन्वये तीन दिवसांत अनुपालन दर्शविण्यास कळविले असता अनुपालन सादर न केल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATBPKM7901 (Ref No : 23, Hmm No : 63)

PREVIEW

## *130 शिकाउ उमेदवारांना विद्यावेतन अदाईबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 3**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन विभा महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 11032.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 11032.00/-

आयटीआय शिकाउ उमेदवारांना महानगरपालीकेकडुन विद्यावेतन देण्याबाबत प्राधीकार दर्शवला नाही, उमेदवारांचे नियुक्ती आदेश व हजेरीपट दर्शवले नाही, विद्यावेतनाची रक्कम संबंधीत उमेदवारांना प्राप्त झाल्याबाबत पोचपावत्या दर्शवल्या नाही.

महानगरपालीका अमरावतीचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात खालील प्रमाणकान्वये आयटीआय शिकाउ उमेदवारांना माहे डिसेंबर 2015 चे विद्यावेतनापोटी रकमा प्रदान केल्याचे दिसुन आले.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | तपशील |
|---|---|---|---|
| 12686 | 27.01.2016 | 2758 | श्री.पवन प्रकाश डहापक |
| 12687 | 27.01.2016 | 2758 | श्री.निरज विनयकुमार तिवारी |
| 12688 | 27.01.2016 | 2758 | श्री.ईश्वर संतोषराव ठाकरे |
| 12689 | 27.01.2016 | 2758 | श्री.राजेश प्रभाकर शेगोकार |
| | एकुण | 11032 | |

लेखापरीक्षणात उपरोक्त प्रमाणकांची तपासणी केली असता त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. उपरोक्त शिकाउ उमेदवारांना महानगरपालीकेतर्फे विद्यावेतन देणेबाबत प्राधीकार दर्शवावा.
2. संबंधीत उमेदवारांचे नियुक्ती आदेश व हजेरीपट दर्शवावे.
3. संबधीत उमेदवारांना सदरील रकमा प्राप्त झाल्याबाबत पोचपावती दर्शवावी.

उक्त उणीवांबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 197 दिनांक 07.12.2020 अन्वये खुलासा मागवूनही खुलासा केलेला नाही.

DATVPWM6902 (Ref No : 150, Hmm No : 197)

PREVIEW

## ***131 सामान्य प्रशासन विभागांतर्गत विविध कंत्राटी पदे नियुक्ती बाबत***

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 06**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन विभा महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 453270.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 453270.00/-

कंत्राटी अधिकारी/कर्मचारी यांना नियुक्ती देण्याबाबतचा उद्देश व निकड/आवश्यकता तसेच सक्षम प्राधीकारी यांची मान्यता दर्शवली नाही, हजेरीपट/केलेल्या कामाचा तपशील दर्शवला नाही, मंजुर पदे, भरलेली पदे व रिक्त पदांची माहिती सादर केली नाही, कर्मचा-यांच्या नियुक्ती संदर्भात संबंधीत सक्षम प्राधीकारी/ समिती यांची मान्यता/ठराव दर्शवला नाही, संबंधितांना सदरील रकमा प्राप्त झाल्याबाबत पोचपावत्या दर्शवल्या नाही.

महानगरपालीका अमरावतीचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात खालील प्रमाणकान्वये विविध विभागातील कंत्राटी पध्दतीवर नियुक्त केलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना माहे डिसेंबर 2015 चे वेतन/मानधनापोटी रकमा प्रदान केल्याचे दिसुन आले.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | तपशील |
|---|---|---|---|---|
| 1 | 12413 | 20.01.2016 | 75608 | श्री.जीवन सदार |
| 2 | 12414 | 20.01.2016 | 44093 | श्री.एस.पी.देशमुख |
| 3 | 12415 | 20.01.2016 | 36265 | श्री.एम.व्ही.राउत |
| 4 | 12416 | 20.01.2016 | 37012 | श्री.पि.जी.वानखडे |
| 5 | 12417 | 20.01.2016 | 42260 | श्री.एस.आर.जाधव |
| 6 | 12418 | 20.01.2016 | 36175 | श्री.ए.एम.वाकोडे |
| 7 | 12419 | 20.01.2016 | 11000 | श्री.जे.आर.सुर्यवंशी |
| 8 | 12420 | 20.01.2016 | 11000 | श्री.पी.जी.सोळंके |
| 9 | 12421 | 20.01.2016 | 19247 | श्री.पी.सी.वानखडे |
| 10 | 12422 | 20.01.2016 | 43000 | श्री.आर.एम.जोशी |
| 11 | 12423 | 20.01.2016 | 10050 | श्री.एस.एम.वानखडे |
| 12 | 12424 | 20.01.2016 | 31035 | श्री.डि.जे.बागडे |
| 13 | 12425 | 20.01.2016 | 11085 | श्री.र.ल.टेवरे |
| 14 | 12426 | 20.01.2016 | 10030 | श्री.भास्कर करडे |

PREVIEW

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 15 | 12427 | 20.01.2016 | 10750 | श्री.भा.ज.धोटे |
| 16 | 12428 | 20.01.2016 | 8735 | श्री.वाय.एन.ठाकरे |
| 17 | 12684 | 27.01.2016 | 8705 | श्री.अनिल रामचंद्र सिंघई |
| 18 | 12685 | 27.01.2016 | 7220 | श्री.शितलकुमार समनपुरे |
| | | एकुण | 453270 | |

लेखापरीक्षणात उपरोक्त प्रमाणकांची तपासणी केली असता त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. उपरोक्तपैकी अ.क्र.17 व 18 चे सेवानिवृत्त कर्मचा-यांची नियुक्ती मा.उपायुक्त (प्र) यांचे आदेश क्रमांक साप्रवि-उपा-1460-2015 दिनांक 24.06.2015 नुसार नियुक्त केल्याचे प्रमाणकावर नमुद केले आहे तथापी सदरील आदेश लेखापरीक्षणात पहावयास मिळाले नाही तर अ.क्र.01 ते 16 चे कंत्राटी अधिकारी/कर्मचारी यांना नियुक्ती देण्याबाबतचा उद्देश व निकड/आवश्यकता तसेच सक्षम प्राधीकारी यांची मान्यता दर्शवली नाही.

2. संबंधीतांचे नियुक्ती आदेश (अ.क्र.17 व 18 वगळता) व हजेरीपट/केलेल्या कामाचा तपशील दर्शवला नाही.

3. ज्या विभागात संबंधीतांना नियुक्त्या दिल्या आहेत त्या विभागाची माहे नोव्हेंबर 2015 अखेर मंजुर पदे, भरलेली पदे व रिक्त पदांची माहिती सादर केली नाही.

4. महानगरपालीकेअंतर्गत सदरील कामे करण्यासाठी अर्हता धारक पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध असताना उपरोक्त अ.क्र.17 व 18 चे सेवानिवृत्त कर्मचा-यांची नियुक्ती करण्याबाबत अभिलेख्यासह साधार खुलासा होणे आवश्यक आहे.

5. उपरोक्त कर्मचा-यांच्या नियुक्ती संदर्भात संबंधीत सक्षम प्राधीकारी/ समिती यांची मान्यता/ठराव दर्शवणे आवश्यक आहे.

6. संबधीत उमेदवारांना सदरील रकमा प्राप्त झाल्याबाबत पोचपावत्या दर्शवल्या नाही.

उपरोक्त उणीवांबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 198 दिनांक 07.12.2020 व क्रमांक 201 दिनांक 14.12.2020 अन्वये खुलासा मागवूनही खुलासा केलेला नाही.

DATVPWM6902 (Ref No : 151, Hmm No : 201)

PREVIEW

### *132 भ्रमणध्वनी/दुरध्वनी देयकांचे प्रदानातील अनियमितताबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 6**

*लेखा शीर्ष : सामान्य प्रशासन विभा महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 216209.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 216209.00/-

भ्रमणध्वनी साठी खर्च करण्याबाबत ठराव/मान्यता दर्शवली नाही, महानगरपालीका अधिनियमात तरतुद नसल्यामुळे उपविधी केले असतील तर तेही दर्शवले नाही, विलंब आकारापोटी रकमा प्रदान करताना जबाबदारी निश्चीत केलेली नाही, देयकासोबत बिजके जोडलेली नाहीत तसेच पोचपावत्या दर्शवल्या नाही.

महानगरपालीका अमरावतीचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात खालील प्रमाणकान्वये दुरध्वनी/भ्रमणध्वनी देयकांचे प्रदान केल्याचे दिसुन आले.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| 12429 | 20.01.2016 | 104374 | ग्रुप भ्रमणध्वनी |
| 12430 | 20.01.2016 | 3807 | मा.उपायुक्त(प्र) यांचे निवासस्थान दुरध्वनी |
| 12442 | 20.01.2016 | 266 | भ्रमणध्वनी |
| 12443 | 20.01.2016 | 266 | भ्रमणध्वनी |
| 12444 | 20.01.2016 | 266 | भ्रमणध्वनी |
| 12777 | 28.01.2016 | 62808 | 42 दुरध्वनीचे माहे 12/15 चे देयक |
| 14561 | 03.03.2016 | 44422 | 33 दुरध्वनीचे माहे 01/16 चे देयक |
| | एकुण | 216209 | |

लेखापरीक्षणात उपरोक्त प्रमाणकांची तपासणी केली असता त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. उपरोक्त भ्रमणध्वनी साठी खर्च करण्यासाठी सक्षम प्राधीकारी यांची मान्यता/ठराव लेखापरीक्षणास पहावयास मिळाले नाही. सर्व संबंधीत मान्यता/मर्यादा बाबत संचिका दर्शवणे आवश्यक आहे.

2. महाराष्ट्र महानगरपालीका अधिनियमामध्ये अधिकारी/पदाधिकारी/कर्मचारी यांना ग्रुप भ्रमणध्वनी पुरविणेबाबत तरतुद नाही तसेच सदरील खर्चासाठी महानगरपालीकेने उपविधी केले असतील तर सदरील उपविधी शासन मान्यतेसह दर्शवावे.

3. उपरोक्तपैकी प्र.क्र.12429 चे देयकात रु.1888.53 पैसे लेट फिस भरणा केली आहे याबाबत खुलासा करावा व विलंबाबाबत संबंधीतावर जबाबदारी निश्चीत करुन करुन रक्कम रु1883.53 पै. वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

4. उपरोक्तपैकी प्र.क्र.12430 चे देयकात रु.3537.48 पैसे मागील थकबाकी पोटी अदा केली आहेत सदरील थकबाकी केंव्हापासुन आहे व थकबाकी राहण्याबाबत अभिलेख्यासह खुलासा करावा.

5. उपरोक्तपैकी प्र.क्र.12442,12443 व 12444 च्या रकमांचा भरणा केल्याबाबत पोचपावती दर्शवली नाही.

6. उपरोक्तपैकी प्र.क्र.12777 व 14561 चे देयकासोबत बिजके व पोचपावत्या आढळून आल्या नाहीत तरी सदरील बिजके व पोचपावत्या तात्काळ सादर कराव्या.

उपरोक्त उणीवाबाबत अर्धसमासपत्र क्रमांक 202 दिनांक 14.12.2020 अन्वये अभिलेख्यासह खुलासा सादर करण्याबाबत कळवूनही अर्धसमासपत्र अनुत्तरीत ठेवले.

DATVPWM6902 (Ref No : 152, Hmm No : 202)

PREVIEW

## *133 मनपा अमरावती अंतर्गत अनुसूचीत जाती व जमाती घटकांसाठी घरकूल योजनेतील खर्च प्रमाणके व संचीकेच्या अनुषंगाने अनियमीतता बाबत.*

**घरकुल विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 11**

*लेखा शीर्ष : लेखा विभाग महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 480000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 480000.00/-

| |
|---|
| घरकूल विभागाकडील घरकूल योजनेचे लाभार्थी यादी, पात्रता, निकष, कागदपत्रांची छाननी, लाभार्थ्यांचे दत्त्क पत्रक इत्यादी मधील अनियमितता बाबत. |

अमरावती महापालीकेचे सन 2015-16 या आर्थिक वर्षामधील लेखापरीक्षण सुरू असून अनुसूचीत जाती व जमाती घटकांसाठी घरकूल योजनेअंतर्गत उपलब्ध खर्च प्रमाणके तपासली असता खालील अनियमीतता आढळून आलेल्या आहेत.

१ ) प्रमाणक क्रमांक 9508 दि 26/01/2015 चे लाभार्थी पात्रता यादीतील अ .क्र 352 वरील श्री किशोर उत्तम गरूड यांची घरकूल प्रकरणी संचिका तपासली असता संचिकेतील पेवटेक कंन्सलटंट, पुणे यांचे अहवालावर कार्यकारी अभीयंता यांनी दि.08/08/2014 रोजी असा अभीप्राय नमूद केला आहे की, लाभार्थाकडे पक्के घर स्लॅब चे बांधलेले असून फॉरेस्ट कॉलनीतील लागून असलेल्या नालीवर व सर्व्हीस गल्ली मधे कच्च् शेड बांधलेले आहे. त्या सर्व्हीस गल्लीच्या जागेवर बांधकाम करणे योग्य नाही. तरीसुध्दा श्री.गरूड यांना या योजनेचा लाभार्थी ठरविण्यात आले आहे.

२ ) उक्त प्रकरणी लाभार्थी यांची मालकी जागा अतीक्रमण क्षेत्रात येते किंवा कसे याबाबतची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच शासन निर्णय सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभाग, दिनांक 09/03/2010 मधील परीच्छेद ४ (अ) (४) मधील निकषाची लाभार्थ्यांने पुर्तता करीत असल्याबाबत अभीलेखे संचीकेत नमूद नाही.

३ ) उक्त प्रकरणी श्री.गरूड यांचे आधार कार्डवर आडनांव गरूग असताना बँक पास बुक वर गरूडकर व इतर काही कागदपत्रांवर गरूड व गारूड असा उल्लेख दिसून येतो. त्यामुळे लाभार्थी पात्रता यादी निश्चीत करताना संबंधीतांच्या कागदपत्राची छाननी व्यवस्थीत करण्यात आले नसल्याचे दिसून येते.

PREVIEW

४ ) प्रमाणक क्र.12650 दि.27/01/2016 रू.80000/- व प्रमाणक क्र.5150 दि.12/08/2015 रूपये 1,00,000/- च्या अनुषंगाने श्री.ताराचंद ग.सुखदेवे यांची घरकुल संचिका तपासली असता पेवटेक कंन्सलटंट, पुणे यांचे अहवालावर अनेक ठिकाणी तपशील जसे नांव,दिनांक इत्यादी नमूद नाही. तसेच श्री.सुखदेवे यांची समीतीने निर्धारीत केलेली लाभार्थी यादी तपासली असता सदर यादी संगणकीकृत दिसून येते. मात्र सदर यादीतील अ.क्र 3,17,43,44,45 वरील नावे हस्तलीखीत समाविष्ट करण्यात आल्याचे यादीवरून दिसून येते ज्यामध्ये श्री.सुखदेवे यांचे नावाचाही समावेश आहे. परंतु सदर हस्तलीखीत समाविष्ट नावासमोर समीतीतील एकाही प्राधीकृत अधीकारी यांनी स्वाक्षरी केलेली नसल्याने समीतीच्या अपरोक्ष सदर नावांचा समावेश केला गेला आहे किंवा कसे याचा खुलासा करून अनुपालन दर्शवावे.

५ ) प्रमाणक क्रमांक 11635 दि.02/01/2016 रू 80,000/- चे अनुषंगाने लाभार्थी मथुरा भीमराव गुगलमाने यांचे प्रकरणी संचिका तपासली असता सदर प्रकरणी विधी विभागाचा अभीप्राय न घेता प्रदान करण्यात आले आहे. दत्तक पत्र हे लाभार्थीचा मृत्यू दि.11/09/2013 रोजी झालेला असताना 11/08/2014 रोजी दत्तक पत्रक मृत्यूनंतर कसे करण्यात आले याचा खुलासा करण्यात यावा. तसेच लाभार्थी मृत्यूनंतर रू.90,000/-चे प्रदान अनुपालन सादर होईपर्यंत लेखापरीक्षणास मान्य नाही.

६ ) प्रमाणक क्रमांक 11640 दि. 02/01/2016 रू 10000/- चे अनुषंगाने लाभार्थी श्री.पुरूषोत्तम पुरण खडसे, प्रमाणक क्रमांक 11639 दि.02/01/2016 रू 10000/- चे अनुषंगाने लाभार्थी ज्ञानेश्वर नारायण सरकटे यांची संचिका तपासली असता संबंधीतांना रू 10000/- प्रदान करणे पूर्वी महापालीकेच्या बांधकाम विभागाचे सहा.अभीयंता, उप अभीयंता व कार्यकारी अभीयंता यांचे काम पूर्ण झालेच्या प्रमाणपत्रावर तसेच पेवटेक कन्सलटंट पूणे यांचे काम पूर्ण झाल्याचे अहवालावर प्रमाणीत स्वाक्षरी केल्याशीवाय प्रदान केलेले असल्याने सदर बांधकाम पूर्ण होण्यापूर्वीच व आवश्यक निकष पूर्ण होण्याआधीच प्रदान केल्याचे दिसून येत असल्याने उपरोक्त एकूण रू.30000/- चे सदर प्रदान लेखापरीक्षणास मान्य नाही.

७ ) प्रमाणक क्रमांक 11671 दि.02/01/2016 रू.10000/- चे अनुषंगाने लाभार्थी संध्या पंजाबराव बोरकर यांची घरकूल योजनेअंतर्गत संचिका तपासली असता पेवटेक कंन्सलटंट पूणे यांनी बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर केल्याशीवाय तसेच महापालीकेच्या बांधकाम विभागाचे सहा.अभीयंता, उप अभीयंता व कार्यकारी अभीयंता यांचे काम पूर्ण झालेच्या प्रमाणपत्रावर स्वाक्षरी नसताना प्रदान करण्यात आले आहे. बांधकाम पूर्ण केल्याचे निकष पडताळणी केल्याशीवाय प्रदान केले असल्याने सदर प्रदान लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही. तसेच संचिकेमध्ये बांधकामासाठी अपूरी जागा असल्याचे नमूद असताना व याबाबत पेवटेक कंपनी यांनी कोणताही सुधारीत अहवाल सादर केलेला नसताना लाभार्थी यांना रू 80000/- चे करण्यात आलेले प्रदान लेखापरीक्षणास मान्य नाही. अनुपालन

PREVIEW

दर्शवावे.

८ ) प्रमाणक क्रमांक 5299 दि 21/01/2015 रू 80000/- व प्रमाणक क्रमांक 11676 दि 02/01/2016 रू 10000/- चे अनुषंगाने लाभार्थी श्री जानराव शीवाजी बनसोड यांची संचिका तपासली असता संबंधीतांना दुसरा व तिसरा लाभ प्रदान करणेपूर्वीची संचीका गहाळ असल्याचे तपासणीत दिसून आले. त्यामुळे दुसरा व तिसरा लाभ कोणत्या आधारावर प्रदान करण्यात आला याबाबत खुलासा करून अनुपालन दर्शवावे. तसेच उपलब्ध करून देण्यात आलेल्या संचिकेत लाभार्थी यादी जोडण्यात आलेली नाही. लाभार्थी यादीतील नांव न तपासताच दुसऱ्या व तिसऱ्या लाभाचे प्रदान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे एकूण रू.90000/- चे प्रदान लेखापरीक्षणास मान्य नाही. अनुपालन दर्शवावे.

९ ) प्रमाणक क्रमांक 11644 दि.02/01/2016 रू 10000/- चे अनुषंगाने लाभार्थी श्री.बंडू नंदू हिवराळे यांनी सदर रक्कम प्राप्त केल्याबाबत प्रमाणकावर मुद्रांकीत स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे संबंधीतांना रक्कम प्रदान करण्यात आली आहे किंवा असंवितरीत ठेवण्यात आलेली आहे.

१० ) प्रमाणक क्रमांक 11656 दि 02/01/2016 रू 10000/- व प्रमांणक क्रमांक 24 दि 01/04/2015 रू 80000/- चे प्रमाणक तपासले असता सदर योजनेतील लाभार्थी गिरीजा बंडू गायकवाड यांची मालकीची जागा ही शासकीय जागा असल्याचे संचिकेतील महापालीका कर भरणा उताऱ्यावरून दिसून आले. त्यामुळे संबंधीतांनी घरकूल योजनेअंतर्गत घराचे बांधकाम अतीक्रमण जागेवर केले आहे किंवा कसे याचा खुलासा करावा. असे असेल तर, शासन निर्णय सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभाग, दिनांक 09/03/2010 मधील परीच्छेद ४ (अ) (४) मधील निकषाची लाभार्थ्यांने पुर्तता केल्याची तपासणी केली किंवा नाही याची खात्री लेखापरीक्षणास आवश्यक कागदपत्रा अभावी करता आलेली नाही.

११ ) प्रमाणक क्रमांक 2726 दि. 25/06/2015 रू 80000/- व प्रमाणक क्रमांक 11665 दि. 02/01/2016 रू 10000/- चे अनुषंगाने लाभार्थी श्री.पदमाकर रामकृष्ण उके यांची घरकूल योजना संचिका तपासली असता सदर संचिकेतील काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्रावर बांधकाम विभागातील प्राधीकृत अधीकारी यांनी स्वाक्षरी करून प्रमाणीत केलेले नसताना प्रदान करण्यात आल्याने सदर प्रदान लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही. तसेच सदर संचिकेतील महानगरपालीका कर आकारणी उताऱ्यावरून मालमत्ता धारकाची जागा ही शासकीय जागा असल्याचे नमूद आहे. त्यामुळे सदर जागा अतिक्रमण केलेली जागा आहे किंवा कसे याचे अनुपालन दर्शवावे. तसेच सदर जागा अतिक्रमण केलेली असल्यास शासन निर्णय सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभाग, दिनांक 09/03/2010 मधील परीच्छेद ४ (अ) (४) मधील तरतुदीनुसार लाभार्थी हा संरक्षीत झोपडीदार म्हणून संरक्षण प्राप्त असल्याचे अभीलेखे लेखापरीक्षणास सादर करण्यात यावेत. तसेच 2015-16 मध्ये अशा प्रकरणी किती

PREVIEW

लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात आला आहे याची यादी लेखापरीक्षणास हे अर्धसमास पत्र प्राप्त झालेपासून तीन दिवसांत उपलब्ध करून देण्यात यावी.

याबाबत घरकूल विभाग यांना अर्धसमास पत्र क्रमांक 88, दि. 05/03/2020 अन्वये तीन दिवसांत अनुपालन दर्शविण्यास कळविले असता अनुपालन सादर न केल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATBPKM7901 (Ref No : 24, Hmm No : 88)

## *134 मनपा अमरावती अंतर्गत अनुसूचीत जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकूल योजनेतील खर्च प्रमाणके व संचीकेच्या अनुषंगाने अनियमीतता बाबत.*

**घरकुल विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : लेखा विभाग महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 690000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 690000.00/-

घरकूल विभागाकडील घरकूल योजनेचे लाभार्थी यांचे नांवे मालमत्ता नसताना व संबंधीताचे स्वाक्षरीत तफावत दिसून असताना झालेल्या प्रदानातील अनियमितता.

अमरावती महापालीकेचे सन 2015-16 या आर्थिक वर्षामधील लेखापरीक्षण सुरू असून अनुसूचीत जाती व जमाती घटकांसाठी घरकूल योजनेअंतर्गत उपलब्ध खर्च प्रमाणके तपासली असता खालील अनियमीतता आढळून आलेल्या आहेत.

१ ) प्रमाणक क्रमांक 11652 दि.02/01/2016 रू 10000/-, प्रमाणक क्रमांक 11069 दि.08/03/2013 रू 80000/- व प्रमाणक क्रमांक 8571 दि 31/12/2012 रूपये 1,00,000/- चे अनुषंगाने श्रीमती चंद्रकला नामदेव अडाळसे यांची घरकूल योजनेअंतर्गत संचीका तपासली असता उक्त सर्व प्रमाणकाचे प्रदान श्रीमती चंद्रकला नामदेव अडाळसे यांना प्रदान करण्यात आल्याचे दिसून येते. शासन निर्णय सामाजीक न्याय व विशेष सहाय्य दिनांक 09/03/2010 मधील ४ (ब) मध्ये लाभार्थ्याने सादर करावयाची कागदपत्रे याबाबतची तरतूद नमूद करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने सदर संचिकेतील महानगरपालीकेच्या कर आकारणी उताऱ्याचे अवलोकन केले असता सदर उताऱ्यावर नामदेव नागोराव अडाळसे यांचे नावावर मालमत्ता असल्याचे दिसून येते. परंतु सचिकेतील मृत्यू दाखल्यानुसार नामदेव



PREVIEW

नागोराव अडाळसे यांचा मृत्यू दिनांक 22/10/1994 रोजी झाल्याचे नमूद आहे. परंतु श्रीमती चंद्रकला नामदेव अडाळसे यांचे नांवे मालमत्ता नसताना त्यांना सदर योजनेअंतर्गत घरकूलाचा लाभ देण्यात आला आहे. त्यामुळे उक्तप्रमाणे एकूण रू 190000/- ची रक्क्म लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही. अनुपालन दर्शवावे. तसेच मालमत्ता स्वत:चे नांवे नसताना त्यावर घरकूल योजनेचा लाभ २०१५-१६ मध्ये किती प्रकरणी लाभ देण्यात आला आहे याबाबतची माहीती लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात यावी.

२ ) प्रमाणक क्रमांक 11652 दि.02/01/2016 रू 10000/-, प्रमाणक क्रमांक 11069 दि.08/03/2013 रू 80000/- व प्रमाणक क्रमांक 8571 दि 31/12/2012 रूपये 1,00,000/- चे अनुषंगाने लाभार्थी श्रीमती चंद्रकला नामदेव अडाळसे यांची घरकूल योजनेअंतर्गत संचीका तपासली असता सर्व प्रमाणकावरील रक्कम प्राप्त करणाऱ्या लाभार्थी यांच्या स्वाक्षरीत तफावत दिसून येते. त्यामुळे झालेले प्रदान मान्य् करता येत नाही.

३ ) प्रमाणक क्रमांक 15156 दि. 16/03/2016 चे अनुषंगाने लाभार्थी सौ.हर्षा गजानन गोरले यांची घरकूल योजना संचीका तपासली असता संबंधीतांना या योजनेअंतर्गत पहीला लाभ रू 1,00,000/- जो देण्यात आला आहे त्याबबत लाभार्थीने रू.1,00,000/- चे प्रमाणकावर नोंदविलेली स्वीकृती मुद्रांक स्वाक्षरी व रू.10000/- चे प्रमाणकावर नोंदविलेली स्वीकृती मुद्रांकीत स्वाक्षरी यामध्ये तफावत दिसून येते. त्यामुळे झालेले प्रदान मान्य् करता येत नाही.

४ ) प्रमाणक क्रमांक 11641 दि.02/01/2016 रू 10000/- चे अनुषंगाने लाभार्थी श्री.बंडू नामदेव सुतार यांची घरकूल योजना संचीका तपासली असता सदर संचीकेतील कार्यकारी अभीयंता २ अमरावती महानगर पालीका अमरावती यांचे पत्र क्र.46/2015 दि.29/07/2015 अन्वये श्री.बंडू सुतार यांनी शासन निर्णय दि.09/03/2010 मधील तरतूदीनुसार 269 चौ.फू. चटई क्षेत्राचे बांधकाम पूर्ण केले नसल्याने संबंधीतांनी सदर बांधकाम पूर्ण केल्यानंतरच अनुदानाचा तीसरा टप्पा देण्यात येईल असे कळविण्यात आलेले असताना व त्याअनुषंगाने श्री.सुतार यांनी 269 चौ.फू.बांधकाम पूर्ण केल्याचे कोणतेही कागदपत्रे संचीकेत नसताना संबंधीतांना रू.10000/- चा देण्यात आलेला तीसरा टप्पा कोणत्या आधारावर देण्यात आला याचा खुलासा व्हावा.

५ ) प्रमाणक क्रमांक 13105 दि.03/02/2016 रू 10,000/- चे अनुषंगाने श्रीमती सिंधूबाई प्रल्हादराव मोरे यांची घरकूल संचिका तपासली असता लाभार्थ्याचे नांवे मनपा टॅक्स पावती व जागेचे असेसमेंट कॉपी नसताना संबंधीत लाभार्थ्याला रू 190000/- चा लाभ देण्यात आल्याचे दिसून येते.

याबाबत घरकूल विभाग यांना अर्धसमास पत्र क्रमांक 97, दि. 17/03/2020 अन्वये तीन दिवसांत अनुपालन दर्शविण्यास कळविले असता अनुपालन सादर न केल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.



PREVIEW

### *135 मनपा अमरावती अंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण महोत्सव दलित वस्ती स्वच्छता व पाणी पुरवठा योजनेअंतर्गत अनुसूचीत जाती व नवबौध्द घटका करीता वैयक्तीक नळ जोडणी व शौचालय योजनेच्या अनुषंगाने अनियमीतता बाबत.*

**घरकुल विभाग**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 05**

*लेखा शीर्ष : लेखा विभाग महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 83900.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 83900.00/-

स्थळ निरीक्षण अहवाल संचिकेत नसतना , शौचालय खडडा तयार नसताना , काम पूर्णत्वाचे फोटो संचिकेत नसताना प्रदान करणे इत्यादी कामातील अनियमितता बाबत.

PREVIEW

अमरावती महापालीकेचे सन 2015-16 या आर्थिक वर्षामधील लेखापरीक्षण सुरू असून महाराष्ट्र सुवर्ण महोत्सव दलित वस्ती स्वच्छता व पाणी पुरवठा योजनेअंतर्गत अनुसूचीत जाती व नवबौध्द घटका करीता वैयक्तीक नळ जोडणी व शौचालय योजनेतील उपलब्ध करून देण्यात आलेल्या खर्च प्रमाणके व त्याअनुषंगाने संचिका तपासली असता खालील अनियमीतता आढळून आलेल्या आहेत.

१ ) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, दिनांक 09/05/2013 अन्वये नगरपरिषदा व महानगर पालिका यांनी वैयक्तीक शौचालयाचे खोदकाम पूर्ण झाल्यानंतर रू 3000/- तसेच उर्वरीत काम पूर्ण झाल्यानंतर व काम पूर्ण केल्याची तपासणी केल्यानंतर क्रॉस चेकव्दारे उर्वरीत रक्कम देणे बंधनकारक असल्याचे नमूद केले आहे. खालील प्रमाणके तपासली असता शौचालय खडडा तयार केलेला नसतानाही संबंधीतांना रू.3000/- चा धनादेश कार्यालयामार्फत देण्यात आलेला आहे. तसेच त्यापुढील बांधकाम पूर्ण झालेले नसतानाही रू 5500/- चा टप्पा प्रदान करण्यात आला आहे. अशा प्रकारचे प्रदानाचे अनुषंगाने महानगरपालिकेने ठरावाची प्रत लेखापरीक्षणास सादर केलेली नाही.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक व दिनांक | रक्कम रूपये | लाभार्थीचे नांव |
|---|---|---|---|
| 1 | 210 दि.01/04/2015 | 3000/- | श्री.किसनराव ह.काळे |
| | 11991दि. 11/01/2016 | 5500/- | |
| 2 | 4212 दि.21/07/2015 | 3000/- | श्री.भीमराव नामदेव दहाट |

| | | | |
|---|---|---|---|
| | 12031 दि.11/01/2016 | 5500/- | |
| 3 | 11994 दि.11/01/2016 | 5500/- | श्री.सुरेंद्र धरमराज चव्हाण |
| 4 | 2266 दि.09/06/2015 | 3000/- | श्री.प्रल्हाद हुसेन मेश्राम |
| | 12019 दि.11/01/2016 | 5500/- | |
| 5 | 12045 दि.11/01/2016 | 5500/- | श्री.अतुल खेचंद ढवळे |
| 6 | 12012 दि.11/01/2016 | 5500/- | श्री.धीरज विनायक गणवीर |
| | 182 दि.01/04/2015 | 3000/- | |
| 7 | 11923 दि 11/01/2016 | 5500/- | श्रीमती कांताबाई जानराव वानखेडे |
| 8 | 5198 दि.12/08/15 | 3000/- | श्री.कमलेश बा वानखेडे |
| | 11975 दि.11/01/2016 | 5500/- | |
| 9 | 5230 दि 12/08/2015 | 3000/- | श्री.कालीदास ए.गजभीये |
| | 11973 दि.11/01/2016 | 5500/- | |
| 10 | 5559 दि.27/08/2015 | 3000/- | श्री सदाशीव पुंडलीकराव कोकणे |
| | 12000 दि.11/01/2016 | 5500/- | |
| | **एकूण** | **76000/-** | |

२ ) प्रमाणक क्रमांक 11921 दि.11/01/2016 व 11923 दि.11/01/2016 चे प्रमाणकावर प्राप्त कर्त्या लाभार्थीची रक्कम रू 5500/- स्वीकारल्याची स्वाक्षरी नाही.

३ ) प्रमाणक क्रमांक 11952 दि.11/01/2016 च्या अनुषंगाने दिनांक 04/11/2015 रोजीचा स्थळ निरीक्षण अहवाल संचिकेत दिसून येत नसताना टिप्पणीमध्ये स्थळ निरीक्षण अहवाल दिनांक 04/11/2015 च्या आधारे रू 5500/- चे प्रदान करण्यात आले आहे.

४ ) प्रमाणक क्रमांक 11948 दि.11/01/2016 श्री.सुरेश शा.छापने यांना रू.2300/- प्रदानाबाबत मंजूरी नसताना रू 2300/- चे प्रदान आर.टी.जी.एस. व्दारे दिनांक 16/09/2017 रोजी केल्याचे यादीवरून दिसून येते. अनुपालन दर्शवावे.

५ ) प्रमाणक क्रमांक 11973 दि 11/01/2016 रू 5500/- चे अनुषंगाने संचिकेची तपासणी केली असता लाभार्थी नामे श्री.कालीदास ए.गजभीये यांचे नावाने योजनेचा लाभ मंजूर असताना शौचालय पूर्ण झाल्याचा फोटो महिलेचा जोडण्यात आल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रत्यक्ष लाभार्थी यांचा फोटो संचिकेत का जोडण्यात आला नाही याबाबतचे अनुपालन दर्शवावे.

याबाबत घरकूल विभाग यांना अर्धसमास पत्र क्रमांक 98, दि. 17/03/2020 अन्वये तीन दिवसांत अनुपालन दर्शविण्यास कळविले असता अनुपालन सादर न केल्याने आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

DATBPKM7901 (Ref No : 26, Hmm No : 98)

PREVIEW

## *136 आरोग्य विभाग (वैद्यकीय) यांच्या लेखापरीक्षणात आढळून आलेल्या अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 2**

*महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| १ महाराष्ट्र परिचारिका अधिनियम १९६६ मधील कलम २८ नुसार नोंदणी प्रमाणपत्राशिवाय केलेली परिचारिका सेवा हे अपराध समजण्यात आलेले असून ती व्यक्ती शिक्षेस पात्र ठरेल असे नमूद असतांना श्रीमती नूरजहा रईस खान यांनी आपल्या प्रमाणपत्राचे नूतनीकरण न करता सेवा केल्याचा अपराध केला आहे. तरी त्यांच्या विरुद्ध योग्य ती कार्यवाही करण्यात यावे.<br>२ आरोग्य विभागाचे सन २०१५-२०१६ मधील तरतूद व खर्च रजिस्टर लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. |

अमरावती महानगरपालिका आरोग्य विभाग (दवाखाने) यांचे सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाच्या अभिलेख्यांची तपासणी केली असता, खालील अनियमितता निदर्शनास आलेली आहे.
१. महाराष्ट्र परिचारिका अधिनियम १९६६ मधील कलम २४ नुसार परिचारिका नोंदणी प्रमाणपत्राची मुदत संपल्यानंतर प्रमाणपत्राचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे. अन्यथा परिचारीकेचे नाव नोंदणीपुस्तकातून काढून टाकून त्यांना देण्यात आलेले नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यात आले असल्याचे समजण्यात यावे असे नमूद आहे. अमरावती मनपातील परिचारिका श्रीमती नूरजहा रईस खान यांच्या प्रमाणपत्राची मुदत दिनांक ३०/०३/२०१२ पर्यंतच होती. त्यानंतर त्यांनी नोंदणी प्रमाणपतत्राचे नूतनीकरण केलेले नाही. महाराष्ट्र परिचारिका अधिनियम १९६६ मधील कलम २८ नुसार नोंदणी प्रमाणपत्राशिवाय केलेली सेवा हे अपराध समजण्यात आलेली आहे. व ती शिक्षेस पात्र ठरेल असे नमूद आहे. तरी श्रीमती नूरजहा रईस खान यांनी आपल्या प्रमाणपत्राचे नूतनीकरण न करता सेवा केल्याचा अपराध केला आहे. तरी त्यांच्या विरुद्ध योग्य ती कार्यवाही करण्यात यावे.
२ आरोग्य विभागाचे सन २०१५-२०१६ मधील तरतूद व खर्च रजिस्टर लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.
याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक १३६ दिनांक २२ /०९/२०२० देण्यात आले आहे. प्राप्त अनुपालनात वरील मुद्द्यांचे खुलासे प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.



PREVIEW

## *137 मनपा दवाखान्याच्या अभिलेख्यातील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 3**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

अमरावती महानगरपालिका मनपा दवाखान्याचे अभिलेखे तपासले असता, खालील द्वाखान्यानी अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेले नाहीत.

**१. आदिवासी दवाखाना**

पावती बुक क्रमांक ३८३ पावती क्रमांक ५५ ते १०० चा दुबार वापर करण्यात आला आहे. दिनांक २१/०७/२०१५ ते २५/०७/२०१५ व पुन्हा ०२/१२/२०१५ ते १०/१२/२०१५ दरम्यान बुकातील पावत्या व्दारे रक्कमा जमा केले आहे. पावती बुक क्रमांक ३८४ पावती क्रमांक १ ते ७७ चा दुबार वापर करण्यात आला आहे. दिनांक २४ /०७/२०१५ ते ०६/०८/२०१५ व पुन्हा १०/१२/२०१५ ते १९/१२/२०१५ दरम्यान बुकातील पावत्या व्दारे रक्कमा जमा केले आहे.

**२. आदिवासी व पाचबंगला दवाखाना एकत्र औषध साठा पुस्तक**

Sys Albendazole 10 ml प्रमाणक क्रमांक १६२० दिनांक ११.०२.२०१६ नुसार ५० बॉटल आदिवासी व पाचबंगला दवाखाना यांना वाटप करण्यात आल्याची नोंद आरोग्य विभाग मुख्य साठा पुस्तक पान क्रमांक ४० नोंद आहे. परंतु औषध प्राप्ती बाबत दवाखाना साठा पुस्तक पान क्र.८१ वर Sys Albendazole 10 ml च्या प्राप्त यादीत सदर नोंद नाही. सदर औषधाचा अपहार झालेला आहे. तरी संबंधिताकडून Sys Albendazole 10 ml ,नग ५० बॉटल खरेदी खर्चाची वसुली करण्यात यावे.

**३. हरिभाऊवाढ दवाखाना**

दवाखान्याने सन २०१५-२०१६ चे तपासणी पावती पुस्तके,प्रथम नोंदणी पावती पुस्तके व औषध साठा पुस्तक लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

अमरावती महानगरपालिका आरोग्य विभागांतर्गत कार्यरत असलेले मनपा द्वाखानाचे बाह्यरुग्ण तपासणी फी व प्रथम नोंदणी फी वसुली पावती पुस्तके तपासले असता,खालील दवाखान्यांनी अभिलेखे सादर केलेले नाही.

**१ आदिवासी दवाखाना**

PREVIEW

तपासणी बुक पावती बुक क्रमांक ३१४१ ते ३१४८ पर्यंत ८ बुक हे वापरत आणले नसतांना, त्या बुकाव्दारे तपासणी शुल्क वसूल केल्याचे जमा चालन वरून दिसून आले आहे. जर पावती पुस्तके वापरात आणली नसेल तर मनपास ज्या रक्कमा जमा करण्यात आले आहेत त्या कोणत्या पावती बुकाव्दारे करण्यात आले, रुग्णाला कोणत्या बुकातील पावत्या देण्यात आले याबाबतची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही. खालील पावती पुस्तके दवाखानास वाटप केली नसतांना त्याचा वापर कसे काय केले याबाबत खुलासा सादर करण्यात आलेला नाही.

पावती पुस्तक क्रमांक ३३५ व ३४३

पावती बुक क्रमांक ३८३ पावती क्रमांक ५५ ते १०० चा दुबार वापर करण्यात आला आहे. दिनांक २१/०७/२०१५ ते २५/०७/२०१५ व पुन्हा ०२/१२/२०१५ ते १०/१२/२०१५ दरम्यान बुकातील पावत्या व्दारे रक्कमा जमा केले आहे. पावती बुक क्रमांक ३८४ पावती क्रमांक १ ते ७७ चा दुबार वापर करण्यात आला आहे. दिनांक २४ /०७/२०१५ ते ०६/०८/२०१५ व पुन्हा १०/१२/२०१५ ते १९/१२/२०१५ दरम्यान बुकातील पावत्या व्दारे रक्कमा जमा केले आहे.

**२ आदिवासी व पाचबंगला दवाखाना एकत्र औषध साठा पुस्तक**

Sys Albendazole 10 ml प्रमाणक क्रमांक १६२० दिनांक ११.०२.२०१६ नुसार ५० बॉटल आदिवासी व पाचबंगला दवाखाना यांना वाटप करण्यात आल्याची नोंद आरोग्य विभाग मुख्य साठा पुस्तक पान क्रमांक ४० नोंद आहे. परंतु औषध प्राप्ती बाबत दवाखाना साठा पुस्तक पान क्र.८१ वर Sys Albendazole 10 ml च्या प्राप्त यादीत सदर नोंद नाही. त्याऐवजी साठा पुस्तकात Albendazole tab.(टॅबलेट) ची नोंद आहे, त्यामुळे Sys Albendazole 10 ml ,५० बॉटल औषधाचा अपहार झालेला आहे. तरी संबंधिताकडून Sys Albendazole 10 ml ,नग ५० बॉटल खरेदी खर्चाची वसुली करण्यात यावे.

**३ हरीभाऊवाढ दवाखाना**

दवाखान्याने सन २०१५-२०१६ चे तपासणी पावती पुस्तके, प्रथम नोंदणी पावती पुस्तके व औषध साठा पुस्तक लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक १३६ दिनांक २२/०९/२०२० व अर्धसमासपत्र क्रमांक १६९ दिनांक १५ /१०/२०२० देण्यात आले आहे. प्राप्त अनुपालनात वरील मुद्द्यांचे खुलासे प्राप्त न झाल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 35, Hmm No : 169)

## *138 महानगरपालिका हद्दीतील नर्सिंग होम नोंदणी/नुतनीकरण परवानाबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 02**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| नर्सिंग होम परवाना प्रस्ताव अभिलेख्यात खालील अनियमितता निदर्शनास आले आहे.<br>१ परवानाची मुदत तीन वर्षाकरिता आहे. परंतु अर्जासोबत सादर करण्यात येत असलेले दस्तऐवजची मुदत ही एक वर्षाची आहे. तरी यापुढे नुतनीकरण परवाने निर्गमित करतांना मागील किमान तीन वर्षाचे अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे.<br>२ महाराष्ट्र नर्सिंग होम नोंदणी अधिनियम कलम ९ नुसार मनपा आरोग्य अधिकारी शुश्रुषा-गृहाची तपासणी केल्याबाबत तपासणी रजिस्टर ठेवलेले नाही. त्यामुळे मनपा आरोग्य अधिकारी शुश्रुषा-गृहाची वेळोवेळी तपासणी करीत नसल्याचे दिसून येत आहे. |

मनपा अमरावती सन २०१५-१६ च्या लेखापरीक्षणात आरोग्य विभागांतर्गत असलेल्या नर्सिंग होम परवाना प्रस्ताव अभिलेखे तपासले असता, खालील अनियमितता निदर्शनास आले आहे.

१ महाराष्ट्र नर्सिंग होम नोंदणी अधिनियम कलम ५ (२) नुसार प्रमाणपत्राची मुदत तीन वर्षाकरिता आहे. परंतु अर्जासोबत सादर करण्यात येत असलेले दस्तऐवजची मुदत ही एक वर्षाची आहे. उदाहरणात. अग्नीशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र, तरी यापुढे नुतनीकरण परवाने निर्गमित करतांना मागील किमान तीन वर्षाचे अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे.

२ अधिनियमातील तरतुदीनुसार महानगरपालिकेकडून शुश्रुषा-गृहाना तीन वर्षाकरिता परवाना देण्यात येत आहे. परंतु शुश्रुषा-गृहाची महानगरपालिकेस अर्ज सादर करते वेळी जी खाटांची व डॉक्टर/कर्मचारी वर्गाची स्थिती ही, परवाना कालावधीत म्हणजे तीन वर्ष कायम असल्याबाबत अधिनियमातील कलम ९ नुसार मनपा आरोग्य अधिकारी शुश्रुषा-गृहाची तपासणी केल्याबाबत तपासणी रजिस्टर ठेवलेले नाही. त्यामुळे मनपा आरोग्य अधिकारी शुश्रुषा-गृहाची वेळोवेळी तपासणी करीत नसल्याचे दिसून येत आहे.

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक १३६ दिनांक २२ /०९/२०२० देण्यात आले आहे. प्राप्त खुलासात वरील मुद्द्याबाबत संयुक्तिक खुलासा प्राप्त झाले नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 36, Hmm No : 136)

PREVIEW

## *139 स्थानिक संस्था कर ताळमेळाबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 01**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : ९ड*

गुंतलेली रक्कम रु. 1054714843.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1054714843.00/-

सन २०१५-२०१६ मध्ये स्थानिक संस्था कर विभागाने सन २०१५-२०१६ मध्ये एल.बी.टी. प्राप्त रक्कमेचे विवरणपत्र लेखापरीक्षणास सादर केलेले नाही. तसेच प्राप्त रक्कमेचे बँक खातेनिहाय ताळमेळ घेण्यात आले नसल्यामुळे सन २०१५-२०१६ मध्ये वार्षिक जमा खर्च अहवालात दर्शविण्यात आलेली रक्कम रु १०५,४७,१४,८४३/- योग्य असल्याचे प्रमाणित करण्यात येत नाही.

सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाच्या स्थानिक संस्था कर विभागाच्या लेखापरीक्षणात विभागाने सन २०१५-२०१६ मध्ये प्राप्त झालेले स्थानिक संस्था कराची माहिती बँक खाते निहाय लेखापरीक्षणास सादर केलेली नाही. वार्षिक जमा-खर्च विवरणपत्रात सन २०१५-२०१६ मध्ये स्थानिक संस्था कर रक्कम रु प्राप्त झाल्याचे दर्शविण्यात आले आहे. परंतु विभागाने सदर रक्कमेबाबत बँक खातेनिहाय ताळमेळ घेतला नसल्यामुळे सन २०१५-२०१६ मध्ये प्राप्त स्थानिक संस्था कर योग्य असल्याचे प्रमाणित करण्यात येत नाही. तसेच वार्षिक जमा खर्च अहवालात दर्शविण्यात आलेली रक्कम रु १०५,४७,१४,८४३/- आक्षेपित ठेवण्यात येत आहे.

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक १२० दिनांक १८ /०९/२०२० देण्यात आले आहे.संयुक्तिक खुलासा अप्राप्त झाल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 38, Hmm No : 120)

PREVIEW

## *140 महानगरपालिका अमरावती यांनी फेरीवाल्यांच्या संदर्भात शासन मान्य फेरीवाला उपविधी तयार केली नसल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 1**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : ९ड*

महानगरपालीका अमरावती यांनी सन २०१५-२०१६ पर्यंत शहरातील फेरीवाले संदर्भात अमरावती फेरीवाला (व्यवसायाचे विनियमन) उपविधी तयार करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४६१ नुसार

| |
|---|
| राज्य शासनाकडून कायम करून घेण्यात आलेले नाही. |

सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाच्या बाजार व परवाना विभागाच्या लेखापरीक्षणात महानगरपालिकेने फेरीवाले धोरण लागू केलेले नाही.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांनी दिनांक ०२.०३.२००९ ला महाराष्ट्रातील महानगरपालिके करिता आदर्श उपविधी तयार करून प्रसिद्ध केलेली आहे. त्यानुसार महानगरपालिका आवश्यक त्या बदलानुसार अमरावती शहराची स्वतंत्र फेरीवाला (व्यवसायाचे विनियमन) उपविधी तयार करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ नुसार राज्य शासनाकडून कायम करून घेऊन त्यानुसार फेरीवाल्यांवर कर आकारणी करून व कराची वसुली करणे आवश्यक आहे. परंतु मनपाने उपविधी तयार केली नसल्यामुळे फेरीवाल्यांकडून आवश्यक तेवढा कर वसुल करीत नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे, तरी त्वरित उपविधी तयार करून राज्य शासनाकडून कायम करून घेऊन शहरातील फेरीवाल्यांकडून कर वसूल करण्यात यावे.

याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक १७५ दिनांक १९/१०/२०२० देण्यात आले आहे. खुलासा अप्राप्त झाल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 52, Hmm No : 175)

PREVIEW

### *141 महानगरपालिके मार्फत अभियंते, पर्यवेक्षक यांना देण्यात येत असलेल्या परवाना बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 4**

*महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| सन २०१५-२०१६ मध्ये अमरावती महानगरपालिका बाजार व परवाना विभागाने अर्जदारांना अभियंते, पर्यवेक्षकीय कामाबाबत परवाने निर्गमित केलेले आहेत. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे<br>१ “ड” वर्ग महानगरपालिके करिता लागू करण्यात आलेल्या विकास नियंत्रण नियमावली मधील परिशिष्ठ “सी” मध्ये नमूद केल्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या पात्रतेनुसार अनुज्ञेय श्रेणीचा परवाना महानगरपालिकेने निर्गमित करणे आवश्यक असतांना, महानगरपालिकेने फक्त वास्तूशास्त्रज्ञ/अभियंता,पर्यवेक्षक या दोनच श्रेणीचे परवाने निर्गमित केलेले आहेत.<br>२ नवीन/नूतनीकरणासाठी प्राप्त होणाऱ्या अर्जासोबत अर्जदाराकडून अनुभव कालावधीत संबंधित |

| |
|---|
| संस्था/कंपनी यांच्याकडून वेतन प्राप्त झाल्याबाबत बँक विवरणपत्रे अथवा वेतनाबाबत ईतर पुरावा प्राप्त करून घेण्यात आले नाहीत. त्यामुळे अर्जदारांना निर्गमित करण्यात आलेले परवाने योग्य असल्याची खात्री करता आलेली नाही.<br>३ परवानाधारकांचे परवाना नूतनीकरण करतांना महानगरपालिकेने मागील वर्षीचे त्यांचे आयकर रिटर्न प्रमाणपत्र प्राप्त न करता नूतनीकरण परवाना निर्गमित करण्यात येत आहे.<br>४ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३७३ नुसार आयुक्तास, स्थायी समितीच्या मान्यतेने लायसन्सदार, वास्तूशास्त्रज्ञ किंवा अभियंते, संरचना संकल्पचित्रकार, बांधकाम लिपिक यांच्या मार्गदर्शनासाठी वेळोवेळी आदेश काढता येते, परंतु महानगरपालिकेने सन २०१५-२०१६ मध्ये उपरोक्त परवानाधारकांकरिता कोणतीही मार्गदर्शक सूचना/ आदेश निर्गमित केलेले नाही. |

सन २०१५-२०१६ मध्ये अमरावती महानगरपालिका मार्फत नगर रचना विभागाच्या शिफारसी नंतर बाजार व परवाना विभागाने अर्जदारांना अभियंते, पर्यवेक्षकीय कामाबाबत परवाने निर्गमित केलेले आहेत. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे

१. "ड" वर्ग महानगरपालिके करिता लागू करण्यात आलेल्या विकास नियंत्रण नियमावली मधील परिशिष्ठ "सी" मध्ये वास्तूशास्त्रज्ञ/अभियंते, संरचना संकल्पचित्रकार ,पर्यवेक्षक १,२,३ यांना परवाना प्रदान करण्याकरिता लागू असलेल्या शैक्षणिक व अनुभव अहर्ताबाबत विविध अटी व शर्ती नमूद केले गेले आहेत. त्यानुसार अर्जदारांना त्यांच्या पात्रतेनुसार अनुज्ञेय श्रेणीचा परवाना महानगरपालिकेने निर्गमित करणे आवश्यक असतांना, सन २०१५-२०१६ मध्ये अमरावती महानगरपालिकेने फक्त वास्तूशास्त्रज्ञ/अभियंता,पर्यवेक्षक या दोनच श्रेणीचे परवाने निर्गमित केलेले आहेत.

२. परवाना प्रकरणांची तपासणी केली असता, महानगरपालिकेने, अर्जदारांनी सादर केलेल्या अनुभव प्रमाणपत्राबाबत सखोल तपासणी केले नसल्याचे दिसून येत आहे. उदा. सादर करण्यात आलेल्या अनुभव कालावधीत अर्जदाराने नमूद संस्थेकडून वेतन घेत असल्याबाबत अर्जदाराचे बँक विवरणपत्र प्राप्त करणे आवश्यक असतांना, महानगरपालीकेकडून सदर बाबीची तपासणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे अर्जदारांना निर्गमित करण्यात आलेले परवाने योग्य असल्याची खात्री करता आलेली नाही. तरी यापुढे नवीन/नूतनीकरणासाठी प्राप्त होणाऱ्या अर्जासोबत अर्जदाराकडून अनुभव कालावधीत संबंधित संस्था/कंपनी यांच्याकडून वेतन प्राप्त झाल्याबाबत बँक विवरणपत्रे अथवा वेतनाबाबत ईतर पुरावा प्राप्त करून घेण्यात यावे.

३. परवानाधारकांचे परवाना नूतनीकरण करतांना महानगरपालिकेने मागील वर्षीचे त्यांचे आयकर रिटर्न प्रमाणपत्र प्राप्त न करता नूतनीकरण परवाना निर्गमित करण्यात येत आहे. तरी यापुढे परवाना नूतनीकरण करतेवेळी मागील वर्षाचे आयकर रिटर्न प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे.

४. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३७३ नुसार आयुक्तास, स्थायी समितीच्या मान्यतेने लायसन्सदार, वास्तूशास्त्रज्ञ किंवा अभियंते, संरचना संकल्पचित्रकार, बांधकाम लिपिक यांच्या

PREVIEW

मार्गदर्शनासाठी वेळोवेळी आदेश काढता येते. त्यानुसार मा. आयुक्त बांधकाम परवानगी प्रस्ताव / बांधकाम नकाशा तयार करण्याकरिता लायसन्सदारकास जनतेकडून प्रती चौरस मीटर प्रमाणे कमाल मर्यादा मोबदला फी निश्चितीबाबत आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे. तसेच आवश्यकतेनुसार मा. आयुक्तांनी वेळोवेळी मार्गदर्शन आदेश निर्गमित करणे आवश्यक असतांना, मनपाने सन २०१५-२०१६ मध्ये लायसन्सदारकाबाबत कोणतेही आदेश निर्गमित केलेले नाही. त्यामुळे मनपाकडून लायसन्सदारकावर कोणतेही नियंत्रण व जनतेच्या दृष्टीने हितकारक निर्णय घेतल्याचे दिसून येत नाही. तरी यापुढे उपरोक्त बाबीचे पालन होणे आवश्यक आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक १७४, दिनांक १९/१०/२०२० निर्गमित करण्यात आले असून संयुक्तिक खुलासा प्राप्त नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 62, Hmm No : 174)

PREVIEW

### *142 शिवटेकडी येथील वाहनतळ भाडे तत्वावर देणे बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 5**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 46500.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 46500.00/-

१. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मातंसं ०८०/६/२०१३-DIR-DIT(MH)/३९ दिनांक ०३/१२/२०१४ अन्वये ई-लिलाव करणे बंधनकारक असतांना अमरावती मनपाने शिवटेकडी (मालटेकडी) वाहनतळ ज्याचे आधारभूत मुल्य १,००,०००/- असतांना देखील ई-लिलाव प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही.
२ करारनाम्यातील अट क्रमांक ३ नुसार कंत्राटाची रक्कम सहा समान हप्त्यात भरावी लागेल प्रती महा रु ६२५०/- प्रमाणे असे नमूद आहे. परंतु अटीचे पालन करण्यात आले नाही.
३ करारनाम्यातील अट क्रमांक १३ नुसार पावती पुस्तकांचा/वाहनांचा मासिक हिशोब कंत्राटदारास महानगरपालिकेस द्यावा लागेल असे नमूद असतांना तशी कार्यवाही झालेली नाही.
४ करारनाम्यातील अट क्रमांक १८ नुसार पावती पुस्तके वापरण्यापूर्वी मनपा मधील संबंधित अधिकाऱ्याकडून प्रमाणित करून घेणे बंधनकारक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.
५ शासन निर्णय उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक भांखस १०८८/(२५१२)/उद्योग-६ दिनांक ०२ जानेवारी १९९२ च्या परीच्छेद ८.५ मध्ये नमूद करण्यात आलेली २ लिफाफे पद्धत अनिवार्य करण्यात आली असतांना देखील मनपाने सदर कामाच्या निविदा प्रक्रिया २ लिफाफे पद्धतीने बोलावण्यात आलेली नाही.

अमरावती महानगरपालिका बाजार व परवाना विभागाचे सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाचे जमा बाजूचे लेखापरीक्षणात शिवटेकडी येथील वाहनतळ कंत्राटदार श्री.चंदन गोविंदराव नाईक यांनी प्रतिवर्षी रक्कम रु ७५०००/- दराने भाडे तत्वावर दिलेले आहे.

वाहनतळाची जागा ५६०४ चौफुट

निविदा प्रक्रिया सुरु ०८/०९/२०१५

स्थायी समिती ठराव क्रमांक १४२ दिनांक ३०/०९/२०१५ नुसार मंजुरी

कंत्राटदार :- श्री.चंदन गोविंदराव नाईक

कंत्राटमुल्य :- ७५०००/- रुपये एका वर्षाकरिता

कंत्राट कालावधी :- ०२/१०/२०१५ ते ०१/१०/२०१५

कंत्राट आदेशाची प्रत नस्तीत उपलब्ध नाही.

जमा पावती ९८५/८ दिनांक ११/१०/२०१५ रक्कम २०,०००/-

९८५/९ दिनांक ५-१०-२०१५ रक्कम १७५००/-

१११७/४१ दिनांक २९-०३-२०१६ रक्कम ९०००/-

१२९७/८ दिनांक ३१/०५/२०१६ रक्कम १०,०००/-

१२९७/२० दिनांक ६/०९/२०१६ रक्कम १०,०००/-

१२९७/२२ दिनांक ३०/०९/२०१६ रक्कम ६०००/-

१२९७/२३ दिनांक ०५/१०/२०१६ रक्कम २५००/-

सन २०१५-२०१६ मध्ये रक्कम रु ४६५००/- कंत्राटदाराकडून महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे

१ महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मातंसं ०८०/६/२०१३-DIR-DIT(MH)/३९ दिनांक ०३/१२/२०१४ अन्वये रक्कम रु १,००,०००/- व किंवा त्यापेक्षा जास्त राखीव किंमतीच्या लिलावासाठी ई-लिलाव प्रणालीचा वापर करणे बंधनकारक केले असतांना अमरावती मनपाने शिवटेकडी (मालटेकडी) वाहनतळ ज्याचे आधारभूत मुल्य १,००,०००/- असतांना देखील ई-लिलाव प्रणालीचा वापर करण्यात आलेला नाही.

२ करारनाम्यातील अट क्रमांक ३ नुसार कंत्राटाची रक्कम सहा समान हप्त्यात भरावी लागेल प्रती महा रु ६२५०/- प्रमाणे असे नमूद आहे. परंतु अटीचे पालन करण्यात आले नाही.

३ करारनाम्यातील अट क्रमांक १३ नुसार पावती पुस्तकांचा/वाहनांचा मासिक हिशोब कंत्राटदारास महानगरपालिकेस द्यावा लागेल असे नमूद असतांना तशी कार्यवाही झालेली नाही.

४ करारनाम्यातील अट क्रमांक १८ नुसार पावती पुस्तके वापरण्यापूर्वी मनपा मधील संबंधित अधिकाऱ्याकडून प्रमाणित करून घेणे बंधनकारक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

५ महाराष्ट्र शासन उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस १०९४/(२६७९)/उद्योग-६ दिनांक ३० मार्च १९९४ अन्वये शासन निर्णय उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक भांखस

१०८८/(२५१२)/उद्योग-६ दिनांक ०२ जानेवारी १९९२ च्या परीच्छेद ८.५ मध्ये नमूद करण्यात आलेली २ लिफाफे पद्धत अनिवार्य करण्यात आली असतांना देखील मनपाने सदर कामाच्या निविदा प्रक्रिया २ लिफाफे पद्धतीने बोलावण्यात आलेली नाही.
याबाबत अर्धसमासपत्र क्रमांक १५१ दिनांक ०१/१०/२०२० देण्यात आले आहे. खुलासा अप्राप्त झाल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATPKWM8301 (Ref No : 67, Hmm No : 151)

## *143 घसारा राखीव निधी स्थापन न केले बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 01**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका 1984 चे नियम 415 प्रमाणे घसारा निधी मध्ये नमूद केले प्रमाणे, दरानुसार घसारा निधी ठेवणे आवश्यक आहे. मुंबई वित्तीय नियम 1959 चे नियम 146 मधील टिपणी क्रमांक 2 च्या तरतुदी नुसार महानगरपालिका मालकीच्या मालमत्ता सुरक्षितता व देखभाल दुरुस्ती करिता घसारा निधी या नावाने स्वतंत्र घसारा निधी उभारून परिरक्षित करणे आवश्यक आहे.अमरावती महानगरपालिकेने घसारा राखीव निधी नावाने स्वंतत्र निधीची स्थापना केली नाही. अंदाजपत्रकात तरतूद करून देखील रक्कम जमा करण्यात आली नाही. |

अमरावती महानगपालिका सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात, लेखा विभागाने घसारा राखीव निधी नावाने स्वंतंत्र निधी ठेवला नसल्याचे निदर्शनास आले. मुंबई वित्तीय नियमावली 1959 चे नियम 146 चे टिपणी क्रमांक 2 च्या तरतुदीनुसार नुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्ता सुरक्षितता व दुरुस्ती करिता घसारा निधी नावाने स्वंतत्र घसारा राखीव निधी उभारणे आवश्यक आहे. रस्ते.पूल,इमारती, वाहने कार्यालयीन फर्निचर इत्यादीची नित्यनियमाने देखभाल दुरुस्तीसाठी दरवर्षी आर्थिक तरतुदी करणे आवश्यक असून, विहित मुदतीनंतर आयु मर्यादा संपते. त्यानंतर नविन प्रकल्प उभारणेस, मालमत्ता विकत घेणेस निधी उपलब्ध नसतो त्यासाठी दरवर्षी नियमा प्रमाणे घसारा निधी स्वतंत्र तयार करून त्यामध्ये पुरेशी तरतूद करून करणे गरजेचे आहे. महानगरपालिकेने सन 2015-2016 च्या सुधारित अर्थसंकल्पात रक्कम रुपये

PREVIEW

200000/- तरतूद केली आहे तथापि घसारा निधी तयार केला नाही.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम पुस्तिका 1984 चे नियम 415 प्रमाणे घसारा निधी मध्ये तरतूद केले दरानुसार रक्कम जमा करणे आवश्यक आहे.

1) यंत्र व सामुग्री –यंत्राच्या प्रकारानुसार 10,20 %

2) हत्यारे -20%

3) फर्निचर -5%

4)वाहने- 15%

5)विद्युत मोटारी व सयंत्र -5 %

महानगरपालिकेकडे असलेल्या एकूण मालमत्तेची खरेदी किंमत विचारात घेवून घसारा निधीची तरतूद करणे आवश्यक आहे. यामुळे सदराची वाहने इमारती याचे नुतनीकरणाचे उदिष्टाने या निधी चा योग्य वापर करणे आवश्यक होते.

सदर अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 86 दिनांक 04/03/2020 नुसार खुलासा अनुपालन दर्शविण्यास कळविले असता, अनुपालन सादर केले नाही त्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATVDKM6401 (Ref No : 84, Hmm No : 86)

PREVIEW

## *144 राष्ट्रीय व राज्य नागरी उपजीविका अभियान (NULM) अंतर्गत बचत गटांना दिलेल्या फिरत्या निधी मधील अनियामितते बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 2**

*महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| केंद्रशासनाच्या निकषाप्रमाणे, बचतगटातील सदस्याचे वय 18 वर्षापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. तसेच गटामध्ये एका कुटुंबातील एकच व्यक्ती सदस्य असणे आवश्यक आहे असे असतना, ख़ुशी बचतगटामधील सदस्याचे वय 18 वर्षापेक्षा कमी असतना व साईराम बचत गटामध्ये एकाच कुटुंबातील दोन व्यक्ती सदस्य |

| |
|---|
| असतना बचतगटाला लाभ दिला असल्याने अमरावती मनपाने नियमोचीत कार्यवाही केली नाही. |

मनपा अमरावतीने सन 2015-2016 या वित्त्तीय वर्षात राष्ट्रीय नागरी उपजीविका योजने अंतर्गत बचत गटांना फिरता निधी वितरीत केला आहे. योजनेतील काही निवडक नस्ती तपासणी करण्यात आली असता पुढील प्रमाणे उणीवा दिसून आल्या आहेत.

1) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना क्रमांक OMN /k-14011/ 2013 UPA दिनांक 24 सप्टेंबर 2013 नुसार,बचतगटामधील सदस्याचे वय 18 वर्षापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. ख़ुशी महिला बचतगट (बचतगट क्रमांक SHG2741000307) या गटातील किरण जयराग या सदस्याची जन्म तारीख-12/03/1998 असून बचत गटाने दिनांक-13/01/2016 रोजी फिरता निधी मिळण्यासाठी अर्ज केला आहे. अर्जाचे तारखेस सदर सदस्याचे वय 18 पेक्षा कमी असतना बचत गटाला लाभ दिला असल्याने अनियमितता झाली आहे.

2) साईराम महिला बचतगट क्रमांक (SHG 77400900469) या बचतगटामध्ये एकाच कुटुंबातील दोन व्यक्ती बचतगटामध्ये सदस्य आहेत. 1) कमलाबाई पट्टेलाल कोविल 2) सावित्री पट्टेलाल कोविल) केंद्र शासानाच्या मार्गदर्शक सूचना नुसार बचतगटामध्ये एका कुटुंबातील एकच व्यक्ती सदस्य असणे आवश्यक आहे. साईराम बचतगटामध्ये एकाच कुटुंबातील दोन व्यक्ती सदस्य असतना गटास निधी वितरीत केला आहे. तरी वरील अनियमितते बाबत खुलासा करावा

तो पर्यंत बचतगटास दिलेला निधी लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

उपरोक्त अनियमितते बाबत विभागास अर्धासमास पत्र क्रमांक 166 दिनांक 13/10/2020 अन्वये अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन सादर न केल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATVDKM6401 (Ref No : 101, Hmm No : 166)

PREVIEW

## *145 लेखापरीक्षणास अभिलेखे सादर न केले बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 02**

*महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 196100765.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 196100765.00/-

| |
|---|
| लेखापरीक्षणास अभिलेखे सादर न केल्यामुळे संबंधितांवर दंडात्मक कार्यवाही होणे आवश्यक आहे. |

महानगरपालीका अमरावतीचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात सामान्य प्रशासन, शिक्षण, नगररचना व वैयक्तीक शौचालय विभागाकडील खालील प्रमाणकांन्वये विविध प्रकारचे खर्च नोंदवले आहेत.

सामान्य प्रशासन विभाग

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| 11731 | 02.01.2016 | 121600 |
| 11733 | 02.01.2016 | 253160 |
| 11734 | 02.01.2016 | 118700 |
| 11735 | 02.01.2016 | 97677 |
| 11736 | 02.01.2016 | 26713 |
| 11910 | 11.01.2016 | 63612 |
| 11911 | 11.01.2016 | 42912 |
| 12128 ते 12262 | 13.01.2016 | 20160051 |
| 12264 | 13.01.2016 | 225846 |
| 12278 | 13.01.2016 | 15438 |
| 12279 | 13.01.2016 | 22992 |
| 12302 ते 12369 | 19.01.2016 | 240823 |
| 12432 | 20.01.2016 | 100999 |
| 12433 | 20.01.2016 | 30501 |
| 12464 | 20.01.2016 | 2758 |
| 12465 | 20.01.2016 | 2758 |
| 12466 | 20.01.2016 | 2758 |
| 12467 | 20.01.2016 | 2758 |
| 12468 | 20.01.2016 | 5516 |
| 12469 | 20.01.2016 | 5516 |
| 12470 | 20.01.2016 | 4982 |
| 12471 | 20.01.2016 | 2880 |
| 12472 | 20.01.2016 | 20427 |
| 12526 | 20.01.2016 | 12124 |
| 12542 | 21.01.2016 | 225824 |
| 12544 | 21.01.2016 | 410505 |
| 12545 | 21.01.2016 | 1155865 |
| 12550 | 22.01.2016 | 150950 |
| 12551 | 22.01.2016 | 222110 |
| 12552 | 22.01.2016 | 130275 |
| 12556 | 22.01.2016 | 135175 |
| 12567 | 22.01.2016 | 91962 |
| 12570 | 22.01.2016 | 65137 |
| 12597 | 22.01.2016 | 2180298 |
| 12630 | 25.01.2016 | 25000 |
| 12690 | 27.01.2016 | 9000 |
| 12703 | 27.01.2016 | 5516 |
| 12704 | 27.01.2016 | 6000 |
| 12755 | 27.01.2016 | 11100 |

PREVIEW

| | | |
|---|---|---|
| 12756 | 27.01.2016 | 11100 |
| 12757 | 27.01.2016 | 108020 |
| 12774 | 28.01.2016 | 8500 |
| 12775 | 28.01.2016 | 8500 |
| 12776 | 28.01.2016 | 1480373 |
| 12781 | 28.01.2016 | 2587586 |
| 12782 | 28.01.2016 | 94240 |
| 12783 | 28.01.2016 | 367610 |
| 12784 | 28.01.2016 | 404650 |
| 12785 | 28.01.2016 | 47850 |
| 12841 | 28.01.2016 | 292635 |
| 12842 | 28.01.2016 | 5300400 |
| 12844 | 28.01.2016 | 69800 |
| 12850 | 30.01.2016 | 163307 |
| 12855 ते 12858 | 30.01.2016 | 8955802 |
| 14148 | 03.03.2016 | 3885 |
| 14149 | 03.03.2016 | 12422 |
| 14150 | 03.03.2016 | 3862 |
| 14802 | 04.03.2016 | 13464 |
| 14803 | 04.03.2016 | 18380 |
| 14892 | 09.03.2016 | 97718 |
| 14893 | 09.03.2016 | 245234 |
| 14933 | 09.03.2016 | 31858 |
| 14947 | 09.03.2016 | 16500 |
| 14961 | 10.03.2016 | 14831 |
| 14962 | 10.03.2016 | 7879 |
| 14963 | 10.03.2016 | 12624 |
| 14964 | 10.03.2016 | 6024 |
| 14995 | 14.03.2016 | 525 |
| 14996 | 14.03.2016 | 96115 |
| 15010 ते 15048 | 14.03.2016 | 119735 |
| 15053 | 14.03.2016 | 5000 |
| 15111 ते 15116 | 16.03.2016 | 186583 |
| 15117 | 16.03.2016 | 18380 |
| 15153 | 16.03.2016 | 18285 |
| 15168 | 18.03.2016 | 138861 |
| 15193 | 18.03.2016 | 18000 |
| 15205 | 18.03.2016 | 69890 |
| 15324 | 22.03.2016 | 245000 |
| 15325 | 22.03.2016 | 266000 |
| 15395 ते 15414 | 22.03.2016 | 87963 |
| 15438 | 28.03.2016 | 6532 |
| 15439 | 28.03.2016 | 16000 |

PREVIEW

| | | |
|---|---|---|
| 15477 ते 15494 | 28.03.2016 | 561910 |
| 15531 | 29.03.2016 | 8432 |
| 15532 | 29.03.2016 | 45885 |
| 15534 ते 15665 | 29.03.2016 | 18893319 |
| 15703 ते 15713 | 29.03.2016 | 15441014 |
| 15741 | 30.03.2016 | 48880 |
| 15743 | 30.03.2016 | 339671 |
| 15744 | 30.03.2016 | 471426 |
| | एकुण | 83896678 |

शिक्षण विभाग

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| 11626 | 01.01.2016 | 1090025 |
| 11627 | 01.01.2016 | 2417688 |
| 11628 | 01.01.2016 | 3611834 |
| 11629 | 01.01.2016 | 2916372 |
| 11737 | 02.01.2016 | 500000 |
| 12565 | 22.01.2016 | 96177 |
| 12568 | 22.01.2016 | 180080 |
| 12576 | 22.01.2016 | 3900 |
| 12577 | 22.01.2016 | 10595 |
| 14117 | 01.03.2016 | 4611 |
| 15092 | 16.03.2016 | 68401 |
| 15443 | 28.03.2016 | 14827 |
| 15525 | 29.03.2016 | 91739 |
| | एकुण | 11006249 |

नगररचना विभाग

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| 12620 | 22.01.2016 | 87977880 |
| 12621 | 22.01.2016 | 149040 |
| 12773 | 27.01.2016 | 876096 |
| 14584 | 03.03.2016 | 28332 |
| 14585 | 03.03.2016 | 39204 |
| 14824 | 04.03.2016 | 106969 |
| 14942 | 09.03.2016 | 177976 |
| 14943 | 09.03.2016 | 419896 |
| 14990 | 14.03.2016 | 771479 |
| 15172 | 18.03.2016 | 560277 |
| 15326 | 22.03.2016 | 709045 |
| 15327 | 22.03.2016 | 1324539 |
| 15328 | 22.03.2016 | 3820511 |
| 15448 | 28.03.2016 | 256081 |

PREVIEW

| | | |
|---|---|---|
| 15449 | 28.03.2016 | 304913 |
| | एकुण | 97522238 |

वैयक्तीक शौचालय विभाग

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| 11917 ते 12088 | 11.01.2016 | 946000 |
| 12370 ते 12405 | 19.01.2016 | 273900 |
| 14151 ते 14156 | 03.03.2016 | 1507000 |
| 14919 | 09.03.2016 | 7800 |
| 14932 | 09.03.2016 | 5500 |
| 15329 ते 15369 | 22.03.2016 | 255400 |
| 15433 | 28.03.2016 | 144500 |
| 15434 | 28.03.2016 | 535500 |
| | एकुण | 3675600 |

यावर पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1. लेखापरीक्षणात वारंवार तोंडी व अर्धसमासपत्र क्रमांक 10 दिनांक 16.12.2019, क्रमांक 162 दि.12.10.2020, क्रमांक 20 दिनांक 16.12.2019, क्र.131 दिनांक 21.09.2020, क्रमांक 18 दिनांक 16.12.2019, क्रमांक 132 दिनांक 21.09.2020, क्रमांक 133 दिनांक 21.09.2020, क्रमांक 134 दिनांक 21.09.2020 क्रमांक 22 दिनांक 16.12.2019 व क्रमांक 195 दिनांक 03.12.2020 अन्वये उपरोक्त प्रमाणकांच्या संदर्भात मुळ प्रमाणके व सर्व संबंधीत अभिलेखे नोंदवह्या, सेवापुस्तके, मंजुर आकृतीबंध, खरेदी संचीका, साठा नोंदवह्या बांधकाम परवानगी नोंदवही, रेडी रेकनर, काम पुर्णत्वाची प्रमाणपत्रे, भोगवटा प्रमाणपत्रे, बांधकाम परवानगीसाठी पॅनलवर नियुक्त अभियंतांची यादी व शैक्षणिक अर्हता, उपविधी,विकास शुल्काबाबतची सर्व संबंधीत अभिलेखे तसेच वैयक्तीक शौचालय योजनेअंतर्गत प्राप्त अनुदान व खर्च, मंजुर लाभार्थींची यादी, प्रदानाची रक्कम ई. माहिती ची मागणी करण्यात येवूनही संबंधीत अभिलेखे/माहिती लेखापरीक्षणास सादर केलेली नाही.

2. लेखापरीक्षणात उपरोक्त अर्धसमासपत्रांन्वये लेखापरीक्षणास अभिलेखे सादर न करणे हि अतिशय गंभीर बाब असून अभिलेखे सादर न केल्यास महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 (सुधारीत 2011) चे कलम 8 नुसार रु.25000/- पर्यंत दंडाची तरतुद असल्याबाबत कळवूनही अभिलेखे न दर्शवल्यामुळे संबंधीतांवर दंडात्मक कार्यवाही होणे आवश्यक आहे.

DATVPWM6902 (Ref No : 160, Hmm No : 195)

## *146 भांडार विभागाने दरपत्रक मागवून केलेल्या खरेदीतील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 3**



PREVIEW

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

गुंतलेली रक्कम रु. 183662.00 /-

| |
|---|
| अमरावती महानगरपालिकेच्या भांडार विभागाने साहित्य खरेदी करतना दरपत्रक मागणीवर व प्राप्त दरपत्रकावर दिनांक नमूद केले नाहीत. त्यामुळे सदरील खरेदीमध्ये पारदर्शकता असल्याची खात्री करता आली नाही. देयके अदा करताना सर्व वाजवाटीसह देयके अदा न करता फक्त पुरवठादाराचे देयक अदा केले असून आयकर भरणा केल्याचे दिसून येत नाही. आयकर भरणा केल्याचे चालन लेखा परीक्षणास उपलब्ध न झालेने आयकर भरणा केल्याची खात्री करता आली नाही. |

PREVIEW

मनपा अमरावती सन 2015-2016 मध्ये भंडार विभागाने दरपत्रक मागवून खरेदी केलेल्या काही निवडक प्रमाणकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे उणीवा आढळून आल्या .

| अ क्र. | प्रमांक क्र. | दिनांक | पुरवठादारचे नाव | तपशील | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 14039 | 25/2/16 | श्रीराम एन्टरप्रायजेस अमरावती | आरोग्य विभागाकरिता लागणारे व्हकुम क्लीनर पाईप टॅकर क्र. 83868 | 44872 |
| 2 | 14040 | 25/02/16 | श्रीराम एन्टरप्रायजेस अमरावती | आरोग्य विभागाकरिता लागणारे पाईप होस पाईप टॅकर क्र. 5120 | 43112 |
| 3 | 14043 | 25/02/16 | श्रीराम एन्टरप्रायजेस अमरावती | उप महापौर यांचे कार्यालायाकरिता लागणारे साहित्य पुरवठा | 47482 |
| 4 | 14042 | 25/02/16 | श्रीराम एन्टरप्रायजेस अमरावती | बांधकाम विभागाकरिता लागणारे चेअर.फर्निचर | 48196 |
| | | | | एकूण | 183662 |

यावर लेखापरीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय आहेत..

1) विभागाने सदरील खरेदीसाठी दरपत्रके मागवून खरेदी केल्याचे दिसते, तथापी दरपत्रक मागणी नोटिशीवर दिनांक नमूद केले नाहीत.त्यामुळे दरपत्रके कधी मागतली याचा बोध होवू शकला नाही.

2) प्राप्त दरपत्रकावर दिनांक नमूद केलेले नाहीत त्यामुळे दरपत्रक कोणत्या तारखेनुसार सादर केले याचा बोध होवू शकला नाही. दरपत्रक मागणीवर व प्राप्त दरपत्रकावर दिनांक नसल्याने खरेदीमध्ये पारदर्शकता असल्याची खात्री करता येत नाही.

3) पुरवठादाराचे देयक अदा करताना नियमानुसार शासकीय वजावटीसह रकमा वजावट करून तात्काळ शासन सदरी भरणा करणे आवश्यक आहे. तथापी महानगरपालिकेने फक्त पुरवठादाराचे निव्वळ देयक अदा केलेले असून आयकर रकमा भरणा केलेले दिसून येत नाहीत. तसेच सदरचा आयकर शासन सदरी कधी भरणा केला याचे चालन लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्याने आयकराचा भरणा केला असल्याची खात्री करता आली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 124 दिनांक 18/09/2020 अन्वये कळविले असता विभागाने अनुपालन सादर न केल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATVDKM6401 (Ref No : 90, Hmm No : 124)

PREVIEW

## *147 अमनापा क्षेत्रातील सार्वजनिक नळाची व मनपा पी.व्ही.सी. पाईपलाईन वरील लिकेज दुरुस्ती करणे कामातील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 8**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

मनपाने अमरावती क्षेत्रातील सार्वजनिक नळांची दुरुस्ती व पी.व्ही.सी.पाईप लाईन दुरुस्तीची देयके अदा केलेची मोजमाप पुस्तिका क्रमांक 129 लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. करारनाम्यातील अट क्रमांक 1 नुसार नळाची दुरुस्तीचा आदेश दिल्यानंतर दोन दिवसात काम करणे आवश्यक आहे. कामाबाबतचा कार्यारंभ आदेश, कार्यारंभ आदेश नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त झाला नाही, त्यामुळे मुदतीत काम झाल्याची खात्री करता आली नाही. अंदाज पत्रकीय रक्कम रुपये 8,50,000/- असतना एकूण रक्कम रू.884,597 /- खर्च केला आहे. जादा रक्कम रुपये 34596.99 ला मंजुरी घेण्यात आली नाही

मनपा अमरावती महानगरपालिका सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात अमरावती क्षेत्रातील सार्वजनिक नळांची दुरुस्ती, पी.व्ही.सी.पाईप लाईन, प्रशासकीय इमारती, दवाखाने, बगीचे मधील नळांची दुरुस्ती करण्यात आली असून काही निवडक प्रमाणकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आली आहे.

1) प्र.क्र.14859 दिनांक- 4/3/2016 रक्कम रू. 90450/- सहावे अंतिम देयक

2) प्र.क्र.14860 दिनांक- 4/3/2016 रक्कम रू. 89967./- आठवे अंतिम देयक

3) प्र.क्र.14866 दिनांक- 4/3/2016 रक्कम रू. 87224./-नववे अंतिम देयक

1)करारनामा दिनांक- 29/12.2012

2)कामाची मुदत दिनांक 1/12/0212 ते 30/10/2013

3)कार्यारंभ आदेश दिनांक- अमनपा/कार्य.अभि.2/का,अ./14/13 दिनांक 3/1/2013

अंदाजपत्रकीय रक्कम -8.50.000/-

ठेकेदाराचे नाव- ए.आर सूर्यवंशी

1) उपरोक्त देयके अदा केलेची मोजमाप पुस्तिका क्रमांक 129 लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही.

2) करारनाम्यातील अट क्रमांक 1 नुसार नळाची दुरुस्तीचा आदेश दिल्यानंतर दोन दिवसात काम करणे आवश्यक आहे. उपरोक्त देयकामध्ये केलेल्या कामाबाबतचा कार्यारंभ आदेश, कार्यारंभ आदेश नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त झाला नाही. त्यामुळे मुदतीत काम झाल्याची खात्री करता आली नाही.

3) नळ दुरुस्ती बाबत तक्रार नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

4) मनपा क्षेत्रात असलेल्या नळाची नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाही. तसेच देयकासोबत दुरुस्ती केलेल्या नळाची यादी जोडली नाही.

5)) देयकासोबत केलेल्या कामाचा तपशीलवार अहवाल नस्तीस जोडला नाही.

6) नळदुरुस्ती बाबत केलेल्या कामाचे विवरणपत्र (दैनंदिन अहवाल) नस्तीस आढळून आला नाही.

7) कामाच्या आदेशानुसार कामासाठी वापरण्यात आलेल्या आलेल्या साहित्याच्या अहवाल स्टॉक बुकाच्या नोंदीसह सादर केला नाही.

8) अंदाज पत्रकीय रक्कम रुपये 850.000/- असतना एकूण रक्कम रू. 8, 84,597 /- खर्च केला आहे. जादा रक्कम रुपये 34596.99 ला मंजुरी घेण्यात आली नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 180 दिनांक 28/10/2020 अन्वये खुलासा/अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन सादर न केल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे

DATVDKM6401 (Ref No : 94, Hmm No : 180)

## *148 बोअरवेल खोदणे व हातपंप बसविणे कामातील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**अनियमितता संख्या : 3**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम  : 9ड*

| |
|---|
| अमरावती मनपाने नविन बोअरवेल काढणे व हातपंप बसवणे कामामध्ये 1) करारनाम्यातील अट क्रमांक 7 अन्वये ज्या ठिकाणी हातपंप बसवावयाचा आहे त्या ठिकाणाचे भूजल सर्वक्षण विकास यंत्रणेकडील स्थळ निश्चितीचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाही.<br>2) अट क्रमांक 9 नविन हातपंप उभारणीकरीता लागणारे साहित्य हे अंदाजपत्रकात नमूद बाबी नुसार वापरणे आवश्यक आहे. नविन हातपंपाची उभारणी करणे,  आणि हातपंप उभारणी करीता वापरात आणणारे सर्व साहित्य हे संबंधित अभियंता, उपअभियंता यांचेकडून प्रमाणित करून योग्य असल्याचे प्रमाणपत्र नस्तीस नाही. तसेच एम.बी. मध्ये तपासणी केल्याबाबत दिनांकित स्वाक्षरी केली नाही<br>3) नस्ती सोबत yield test रिपोर्ट जोडला नाही |

अमरावती महानगरपालिका सन 2015-2016 चे लेखापरीक्षणा मध्ये, महानगरपालिकेकडील बोअरवेल  व हातपंप बसविणेबाबतची काही निवडक प्रमाणके तपासली असता खालील प्रमाणे अनियामितता निदर्शनास आली आहे.

**1)कामाचे नाव - प्रभाग क्रमांक 6 मध्ये बोअरवेल काढणे व हातपंप बसविणे**

2) प्रशासकीय मान्यता दिनांक 09/07/2014

3) कामाची निविदा- दरकरार

4) ठेकेदाराचे नाव- एच. हिरालाल

5) अंदाजपत्रकीय रक्कम- 84768/-

6) कार्यारंभ आदेश- जा.क्र.अमनपा/बांधकाम/का.अ.2/ कार्यारंभ आदेश 11/2014/ 2014-2015

7) प्रमाणक क्र.13368/- दिनांक 11/02/2016 रक्कम रू.78909 /-

यावर खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) करारनाम्यातील अट क्रमांक 7 अन्वये ज्या ठिकाणी हातपंप बसवावयाचा आहे त्या ठिकाणाचे भूजल सर्वक्षण विकास यंत्रणेकडील स्थळ निश्चितीचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

2) अट क्रमांक 9 नुसार नविन हातपंप उभारणी करीता लागणारे साहित्य हे अंदाजपत्रकात नमूद बाबी नुसार वापरणे आवश्यक आहे. नविन हातपंपाची उभारणी करणे,  आणि हातपंप उभारणी करीता वापरात आणणारे सर्व साहित्य हे संबंधित अभियंता, उपअभियंता यांचेकडून प्रमाणित करून, योग्य असल्याचे प्रमाणपत्र नस्तीस नाही. तसेच एम.बी. मध्ये तपासणी केल्याबाबत दिनांकित स्वाक्षरी केली नाही. हातपंपाची उभारणी केल्यानंतर त्याची कार्यालयीन स्टॉकबुक मध्ये संबंधिता मार्फत नोंद घेतलेबाबत, स्टॉकबुक लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही.

3) नस्ती सोबत yield test रिपोर्ट जोडला नाही.

PREVIEW

**2)1)कामाचे नाव- प्रभाग क्रमांक 31 मध्ये बोअरवेल खोदणे व हातपंप बसविणे**

2) प्रशासकीय मान्यता दिनांक 05/03/2015

3) कामाची निविदा - दरकरार

4) ठेकेदाराचे नाव- एच हिरालाल

5) अंदाजपत्रकीय रक्कम-रू.42384/-

6)कार्यारंभ आदेश जा.क्र. अमनपा/बांधकाम/का.अ.2/ कार्यारंभ आदेश 2//2014/ 2014-2015 दिनांक 24/02/2015

7) प्रमाणक क्र.11386 ,दिनांक 11/2/0216 रक्कम रुपये 42231/-

यावर खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1)करारनाम्यातील अट क्रमांक 7 अन्वये ज्या ठिकाणी हातपंप बसवावयाचा आहे. त्या ठिकाणाचे भूजल सर्वक्षण विकास यंत्रणेकडील स्थळ निश्चितीचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

2) अट क्रमांक 9 नुसार नविन हातपंप उभारणीकरीता लागणारे साहित्य हे अंदाजपत्रकात नमूद बाबी नुसार वापरणे आवश्यक आहे. नविन हातपंपाची उभारणी करणे आणि हातपंप उभारणी करीता वापरात आणणारे सर्व साहित्य हे संबंधित अभियंता, उपअभियंता, यांचेकडून प्रमाणित करून योग्य असल्याचे प्रमाणपत्र नस्तीस नाही. तसेच एम.बी. मध्ये तपासणी केल्याबाबत दिनांकित स्वाक्षरी केली नाही. हातपंपाची उभारणी केल्यानंतर त्याची कार्यालयीन स्टॉकबुक मध्ये संबंधिता मार्फत नोंद घेतलेबाबत, स्टॉकबुक लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही.

3) नस्ती सोबत yield test रिपोर्ट जोडला नाही.

**3) 1)कामाचे नाव- प्रभाग क्रमांक 27 मध्ये बोअरवेल खोदणे व हातपंप बसविणे**

2) प्रशासकीय मान्यता, दिनांक 17/07/2014

3) कामाची निविदा - दरकरार

4) ठेकेदाराचे नाव-एच हिरालाल

5) अंदाजपत्रकीय रक्कम -42384/-

6)कार्यारंभ आदेश जा.क्र. अमनपा/बांधकाम/का.अ.2/ कार्यारंभ आदेश13/2014 दिनांक-16/07/2014

9) प्रमाणक क्र.11380,दिनांक 11/2/0216 रक्कम रुपये 33419/-

यावर खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) करारनाम्यातील अट क्रमांक 7 अन्वये ज्या ठिकाणी हातपंप बसवावयाचा आहे. त्या ठिकाणाचे भूजल सर्वक्षण विकास यंत्रणेकडील स्थळ निश्चितीचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

2) अट क्रमांक 9 नुसार नविन हातपंप उभारणीकरीता लागणारे साहित्य हे अंदाजपत्रकात नमूद बाबी नुसार वापरणे आवश्यक आहे. नविन हातपंपाची उभारणी करणे, आणि हातपंप उभारणीकरीता वापरात आणणारे सर्व साहित्य हे संबंधित अभियंता, उपअभियंता यांचेकडून प्रमाणित करून योग्य असल्याचे प्रमाणपत्र नस्तीस नाही. तसेच एम.बी. मध्ये तपासणी केल्याबाबत दिनांकित स्वाक्षरी केली नाही. हातपंपाची उभारणी केल्यानंतर

PREVIEW

त्याची कार्यालयीन स्टॉकबुक मध्ये संबंधिता मार्फत नोंद घेतालेबाबत, स्टॉकबुक लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही.

3) नस्ती सोबत yield test रिपोर्ट जोडला नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 181 दिनांक 28/10/2020 अन्वये खुलासा /अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन सादर न केल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATVDKM6401 (Ref No : 95, Hmm No : 181)

### *149 महानगरपालिकेच्या अधिकारी वर्गाकरिता भाडेतत्वावर वाहने पुरवणेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 3**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

मनपा अमरावती विभागाने अधिकारी वर्गाकरिता भाड्याने घेतलेल्या वाहनाचे लॉगबुक लेखापरीक्षणास उपलब्द करून दिले नाही. तसेच देयकासोबत लॉगबुकाच्या प्रमाणित प्रती जोडल्या नाहीत.

मनपा अमरावती महानगरपालिका सन 2015-2016 चे लेखापरीक्षण कालावधीमध्ये महापालिकेच्या अधिकारी वर्गाकरिता सन 2015-2016 मध्ये भाडेतत्वावर घेतलेल्या खाजगी वाहनावरील खर्चाचे माहे सप्टेंबर 2015 देयक तपासणी असता पुढील अनियमितता आढळून आली आहे.

1) करारनाम्यातील अटी नुसार पुरविलेल्या प्रत्येक वाहनाचे लॉगबुका मध्ये विहित नोंदी घेवून, वाहन वापर केलेल्या अधिकार-याकडून प्रमाणित करून लॉगबुकाची प्रत मासिक देयकासोबत जोडणे आवश्यक आहे. मात्र माहे सप्टेंबर 20115 चे देयकासोबत वाहनाचे लॉगबुकाची प्रत जोडली नाही.

2) भाड्याने घेतलेल्या एकूण 11 वाहनाचे लॉगबुक लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही त्यामुळे अधिकारी यांनी विहित कि.मी च्या मर्यादेत वाहन वापर केला असल्याची खात्री करता आली नाही.

3) उपाभियंता कार्यशाळा यांचे पत्र क्रमांक कार्यशाळा विभाग/उप/उपा/322/2015 दिनांक 22/09/2015 अन्वये मासिक वापर मर्यादा 1000/- कि.मी.अशी ठरवून देण्यात आली आहे. मर्यादेपेक्षा जास्त वाहन वापरण्याची आवश्यकता भासल्यास प्रत्येक वेळी योग्य ती कारणमीमांसा देवून वापरासाठीचा प्रस्ताव मंजूरीसाठी आयुक्तांकडे सादर करावयाचा आहे. माहे सप्टेंबरच्या देयकामध्ये वाहन क्रमाक एम.एच-27 -9922 या



PREVIEW

वाहनाची मर्यादा 294 कि.मी जास्त आहे. तरी सदर संदर्भा प्रमाणे मंजुरीची कार्यवाही केली असल्याचे दिसून आले नाही.

उपरोक्त अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 183 दिनांक 28/10/2020 अन्वये अनुपालन दर्शवण्यात कळविले असता विभागाने अनुपान सादर न केल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे,

DATVDKM6401 (Ref No : 102, Hmm No : 183)

## *150 नविन वाहन खरेदीतील अनियामितते बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 2**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

अमरावती मनपाने शासन निर्णय, वित्त विभाग वाहन 2014/प्र.क्र./14 विनिमय मंत्रालय मुंबई दिनांक मे 2014 अन्वये, वाहन खरेदी करताना राज्यस्तरीय वाहन आढावा समितीची मंजुरी घेतली नाही. तसेच नविन वाहन खरेदी करताना जुने वाहन, नियमातील निकषानुसार निर्लेखित केल्यानंतर नविन वाहन खरेदी करता येईल असे असतना, जुने वाहन निर्लेखित न करता नविन वाहने खरेदी केली आहेत. त्यामुळे वाहन खरेदी करताना नियमोचीत कार्यवाही करण्यात आली नाही.

PREVIEW

मनपा अमरावती महानगरपालिका सन 2015-2016 चे लेखापरीक्षण कालावधीत महानगरपालिकेने, महानगरपालिका उपायुक्त (प्रशा) व उपायुक्त (सा) यांचे कामकाजाकरिता 2 नविन TOYOTA ETIOS कार खरेदी केल्या आहेत. नस्तीची पडताळणी केली असता खालील प्रमाणे उणीवा निदर्शनास आल्या आहेत.

प्र.क्र.1654 दि.22.5.2015 रक्कम रू 662446/-

प्र.क्र.1655 दि.22.5.2015 रक्कम रू 1831/-

प्र.क्र.1656 दि.22.5.2015 रक्कम रू 662446/-

प्र.क्र.1657 दि.22.5.2015 रक्कम रू 1831 /-

एकूण - रू.1328554/-

1) एकूण रक्कम 1328554 /- कंपनीला अदा केली असून रकमेची पोहच पावती घेण्यात आली नाही.

2) शासन निर्णय, वित्त विभाग वाहन 2014/प्र.क्र.14 विनियम मंत्रालय मुंबई दिनांक मे 2014 अन्वये महानगरपालिकेने राज्यस्तरीय वाहन आढावा समितीची मंजुरी घेतली नाही. तसेच नविन वाहन खरेदी करतना

जुने वाहन नियमातील निकषानुसार निर्लेखित झाल्या नंतर नविन वाहन खरेदी करता येईल असे असतना1) उपयुक्त प्रशासन यांचेकडील वाहन MH-27 R333 खरेदी दिनांक 10/05/2004, 2) उपायुक्त (सा) याचेकडील वाहन क्रमांक MH-27 1OO1 खरेदी दिनांक 1/10/2002, ही जुनी वाहने निर्लेखित न करता नविन वाहन खरेदी केली आहे त्यामुळे वाहन खरेदी करताना नियमोचीत कार्यवाही करण्यात आली नाही.

3) नविन वाहन क्रमांक 1) MH- 27 AA0720, 2) MH- 27 650 च्या इतिहास पुस्तकेतील पहिल्या पानावरील वाहनाची तांत्रिक माहिती वाहनाचा प्रकार,बॅटरी, वाहनाची किंमत इत्यादी महत्वपूर्ण नोंदी सह सर्व परिपूर्ण माहिती भरली नाही.

4) इतिहास पुस्तके महापालिकेच्या शिक्यांनी मुद्रांकित /साक्षांकित करण्यात आली नाहीत तसेच प्रमाणित केलेली नाहीत.

5) नविन कार खरेदीत वाहन बदल करणे आला असून, मा. आयुक्तांच्या 13/5/2015 चे मंजुरी नुसार बदल करून TOYOTA ETIOS कार खरेदी केली आहे. बदलास स्थायी समितींच्या मंजुरी बाबत अवलोकनार्थ व मंजुरीस्तव पत्र दिले आहे. त्यास मंजुरी दिल्याबाबत स्थायी समितीचा ठराव नस्तीस जोडला नाही. त्यामुळे बदलास स्थायी समितीच्या मंजुरीबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही

उपरोक्त अनियमितते बाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 184 दिनांक 29/10/2020 नुसार खुलासा/अनुपालन दर्शविण्यास कळविले असता विभागाने अनुपालन सादर न केल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATVDKM6401 (Ref No : 103, Hmm No : 184)

PREVIEW

## *151 आरोग्य विभाग स्वच्छता विभागाकडील JCB -JS 80 चे दुरुस्ती बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**अनियमितता संख्या : 3**

*लेखा शीर्ष :001 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 131100.00 /-

अमरावती मनपाने JCBची दुरुस्ती निविदा मागवून केली असल्याचे नस्ती वरून दिसून येते तथापी नस्ती सोबत निविदा उपलब्ध करण्यात करण्यात न आल्याने केलेली दुरुस्ती निविदा मागवून केली असल्याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

